नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

जुलै • ऑगस्ट • सप्टेंबर • २००६



अनुक्रमणिका




युगवाणी

शंकर पळशीकरांबद्दल थोडेसे

मुखपृष्ठावरील चित्र विख्यात चित्रकार शंकर पळशीकर यांचे असून हे चित्र नागपुरातील ज्येष्ठ चित्रकार श्री. चंद्रकांत चन्ने यांच्या खाजगी संग्रहातून 'युगवाणी'ला मिळालेले आहे.

शंकर पळशीकर हे विदर्भातले. त्यांचा जन्म १७ मे १९१७ रोजी भंडारा जिल्ह्यातील साकोली या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण साकोलीलाच झाले. त्यांच्या वयाच्या बाराव्या वर्षीच त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. त्यामुळे माध्यमिक शिक्षण सावनेर येथे मावशीकडे राहून त्यांनी पूर्ण केले आणि हायस्कूल शिक्षणाकरता त्यांनी नागपूर गाठले. नागपूरला मॅट्रीक झाल्यानंतर काही दिवस पुण्यात राहून ते मुंबईला गेले. मात्र प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे मुंबईत येऊनही सात वर्षे ते 'जे. जे. स्कूल ऑफ आर्ट' ला प्रवेश घेऊ शकले नाहीत. पुढे त्यांना जे. जे. ची फेलोशिप मिळाली. तिथेच ते प्रोफेसर झाले आणि १९६८ साली जे. जे. चे डीनही झाले.



१९५१ साली त्यांचा विवाह नागपुरातील मालती आनंदराव जोशी यांच्याशी झाला.

विख्यात चित्रकार एन. एस. बेंद्रे हे त्यांना गुरूस्थानी होते.

१९७५ साली पळशीकर जे. जे. चे डीन म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांची कला-कारकीर्द परिपक्वतेच्या नवनव्या परिसीमा गाठत असतांनाच दि. ४ मार्च १९८४ रोजी त्यांचा मुंबईत मृत्यू झाला.

भारतीय चित्रकलेच्या मुख्य प्रवाहात महत्त्वाची भर घालणाऱ्या चित्रकाराच्या कलाकर्तृत्वाचा सांगोपांग आढावा घेणारा श्री. चंद्रकांत चन्ने यांचा नियोजित लेख आम्ही काही अपरिहार्य कारणास्तव या अंकात देऊ शकत नाही. तो आम्ही यथावकाश प्रकाशित करूच. तो आम्ही विख्यात कला समीक्षक एस. व्ही. वासुदेव यांनी पळशीकरांबाबत व्यक्त केलेले विचार आम्ही उधृत करतो.

"Palsikar found a profound insight into art, through all these questions and answers. "Form, colour, space and texture are the basic elements for an artist," he has observed in a note on Tantra Art. *(Lalit Kala Contemporaty, April-September, 1971)*. "All these create a sound appealing to the eye and the mind. The sound is not possible without space and space is not possible without form and form is not possible without colour and texture. The necessary strength of mind which can go through the reverse process would certainly experience voices of silence, the very core of the cultural richness of any time."

It is silence that speaks. Not the silence of solitude but the silence of the still centre, the moment of realisation and revelation. Most of Palsikar's later paintings come alive in the silence of calm and contemplation, in the transubstantiation of the perception of senses."

- संपादक

अनुक्रमणिका

वर्ष ५७ वे अंक पहिला

जुलै/ ऑगस्ट / सप्टेंबर २००६

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक नारायण कुळकर्णी-कवठेकर

सहसंपादक प्रफुल्ल शिलेदार

अनुक्रमणिका

मुखपृष्ठ
शंकर पळशीकर यांचे
जलरंगातील संकल्पचित्र
(श्री. चंद्रकान्त चन्ने यांच्या
संग्रहातून साभार प्राप्त)

अंक व मुखपृष्ठ मांडणी
विवेक रानडे

रेखाटने
हेमंत मानमोडे

अक्षरजुळणी व मुद्रण
नारायण ऑफसेट वर्क्स

मूल्य ४० रुपये

वार्षिक वर्गणी शंभर रुपये

प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९

संपादकीय पत्रव्यवहार
'किताव', राऊतवाडी, अकोला - ४४४५०५
दूरध्वनी ०७२४-२४५०१८५

अनुक्रमणिका

॥ संपादकीय ॥

'युगवाणी' हे विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन मुखपत्र यापुढे त्रैमासिक स्वरूपात प्रसिद्ध व्हावे अशी योजना साहित्य संघाचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि संपादक यांनी आखली आहे.

मराठी भाषा आणि साहित्य यांना असलेली लिखित आणि मौखिक स्वरूपाची परंपरा यांचे भान ठेवून कुठलाही अभिनिवेश न बाळगता आणि कसलाही पूर्वग्रह न ठेवता 'युगवाणी'ला आजच्या काळाची स्पंदने नोंदवायची आहेत. ललित साहित्यासोबतच समीक्षा, संशोधन आणि साहित्यकलेशी संबंधित असे वैचारिक लेखन यांचा तोल सांभाळण्याचा प्रयत्न 'युगवाणी'त राहील. आज मराठीत वाचक, रसिक यांच्या संवेदनेला आणि वैचारिकतेला आवाहन करतील अशी जीवनाच्या विविध पैलूंचा विविध कोनांतून वेध घेणारी पुस्तके प्रकाशित होत आहेत. पण त्या पुस्तकांचा सांगोपांग परामर्श घेणारी समीक्षा कमी प्रमाणात आढळते. अशा निवडक नव्या पुस्तकांचे अंतरंग उलगडण्याचा प्रयत्न 'युगवाणी', समीक्षक-परीक्षकांकडून विनम्रपणे करवून घेईल.

'युगवाणी'च्या प्रत्येक अंकात काही पाने अनुवाद, भाषांतर यांना वाहिलेली असतील. भारतीय आणि जागतिक भाषांमधील काही साहित्यप्रकारांचे अनुवाद देण्यामागे हेतू असा की अनेक बाबतीत तपशीलात वेगळेपण असले तरी अनेक बाबतीत मानवसमूह म्हणून समानताही असते. सूर्याखालच्या (आणि सूर्यापलीकडच्याही) ज्ञात-अज्ञात विश्वाचे कोणते अपरिचित कंगोरे इतर भाषिकांना सापडले याचाही बोध मराठी भाषिकांना होऊ शकेल.

अंकाविषयीच्या आपल्या कोणत्याही मताचे, प्रतिक्रियेचे स्वागतच होईल.

- नारायण कुळकर्णी कवठेकर

अनुक्रमणिका

अ । नु । क्र । म

।। वाङ्मयीन संस्कृती आणि इतिहास : काही प्राथमिक निरीक्षणे ।।

गोविंद पुरुषोत्तम देशपांडे

अलीकडेच म्हणजे दोन-तीन वर्षांपूर्वी प्रा. शेल्डन पॉलॉक (Sheldon Pollock) यांनी एक भला मोठा म्हणजे सुमारे अकराशे पृष्ठांचा ग्रंथ संपादित करून सिद्ध केला आहे. त्या ग्रंथात अनेकांचे निबंध आहेत आणि त्यांचा विषय दक्षिण आशियातील वाङ्मयीन संस्कृतीचे दर्शन घडविणे आणि त्यांचा उद्‌गम व विकास मांडणे हा आहे. त्याच ग्रंथात प्रा. स्टीवन कॉलिन्स (Steven Callins) यांचा पालीमधल्या वाङ्मयीन संस्कृतीवर एक निबंध आहे. त्या निबंधात एका बौद्ध प्रार्थनेचे अवतरण दिलेले आहे. ह्या अनामिक प्रार्थनाकर्त्याला स्वतः बुद्ध होता यावे व त्याचबरोबर पुढच्या जन्मात आपल्याला (भारतातील) "सर्व प्रादेशिक भाषा याव्यात आणि (ह्या देशातील) प्रत्येक कलेत पारंगत व्हावे" अशी इच्छा आहे व ती त्याची बुद्धचरणी प्रार्थना आहे. एका प्रकारे पॉलॉकसाहेबांनी सिद्ध केलेला खंड वाचला की त्या अज्ञातवासी बौद्ध भक्ताची प्रार्थना आपल्या बाबतीत काही अंशी पूर्ण झाली असे वाटते !

अर्थात् त्या ग्रंथावर लिहिणे असा माझा हेतू नाही. हा लेख म्हणजे त्या खंडाचे परीक्षणही नव्हे. नाही म्हटले तरीही त्या पुस्तकातल्या विविध वाङ्मयीन संस्कृतीच्या "निबिड कांतारी" (टिळकांच्या 'केसरी' मधील दोन ओळी ज्यांना आठवत असतील त्यांना हा शब्द पटकन् कळावा !) घुसण्याचा माझा इरादा नाही. खरे म्हणजे तो माझा वकूबही नाही. पण तो ग्रंथ वाचत, चाळत असताना वाङ्मयीन संस्कृतीचे वाचन एकूण सर्वच संस्कृतीचा इतिहास म्हणून करायला हवे असे जाणवले. संस्कृती कुठे सरते आणि इतिहास कुठे सुरू होतो असे विचारता येत नाही. वाङ्मयीन इतिहास आणि सांस्कृतिक इतिहास दोन्ही समांतरपणे वाचावे, बघावे लागतात; बघितले वाचले पाहिजेत. ह्या लेखाचे उद्दिष्ट खरे म्हणजे तो पक्ष मांडणे हे आहे. त्यासाठी उपयुक्त होईल तेवढेच त्या पुस्तकाचे उल्लेख ह्या लेखात तुम्हाला मिळतील. मूळ पुस्तक पाहिल्याशिवाय ज्याचा अर्थ लागणार नाही असे काही प्रस्तुत लेखात वापरलेले नाही. अर्थातच ह्या लेखाचा व्याप मराठीपुरता मर्यादित आहे आणि पॉलॉकच्या ग्रंथात मराठीची चर्चाच नाही. ह्या ग्रंथातून मराठी व पंजाबी वगळली जावी हेही एक विशिष्ट इतिहासदृष्टीचे लक्षण मानले पाहिजे. म्हणजे जेमतेम शंभर वर्षे तरी भरतील की नाही एवढा हा भारतीय इंग्रजीतील वाङ्मयाचा इतिहास. त्याच्यावर एक प्रकरण. आणि मराठीच्या नावे एकही प्रकरण नसावे, ह्यात एक भाषाभाषातील नातेसंबंधाचे एक इतिहास- सिद्धरूप पाहायला मिळते. माझा मुद्दा असा आहे की भारतीय इतिहासात "बहुप्रादेशिक" भाषांचे महात्म्य फार आहे. बहुप्रादेशिक हा शब्दही तेवढा योग्य नाही. अप्रादेशिक

असे म्हणायला हवे. संस्कृत ही काही भारतातील कुठल्या, एक किंवा अधिक प्रदेशांची अशी भाषा नव्हती. ती भाषा सार्वप्रादेशिक किंवा प्रदेशांच्या पलीकडे जाणारी अशी होती. त्यामुळे ती कुठल्या एका प्रदेशाची किंवा एका लोकसमूहाची भाषा नव्हती. ब्राह्मण संस्कृत बोलत होते असेही म्हणता येत नाही. त्याला पुरावा नाही. आता खरी गोष्ट अशी आहे की भारतीय मनुष्य असा अप्रादेशिक असत नाही, असू शकत नाही. तो "प्रादेशिक" असतो म्हणूनच तो भारतीय असतो. इंग्रजीचे तेच आहे. ती "पॅन-इंडियन" आहे. म्हणूनच ती कुठल्याही प्रांताची, पर्यायाने कुणाचीच भाषा नव्हे. तरीही त्या भाषेला घवघवीत जागा, स्थान मिळते. मराठीला मिळत नाही.

अशा पॅन-इंडियन भाषेतील साहित्याला बाजारपेठ चांगली मिळते. बिल्हणाने एके ठिकाणी, 'असे एकही गाव किंवा देश, अशी कुणी राजधानी किंवा असले जंगल, असे उपवन किंवा शाळा नसेल जिथे स्त्री किंवा पुरुष, तरुण किंवा प्रौढ माझी कविता वाचत नसतील' असे मोठ्या गर्वाने म्हटले होते. अगदी गेल्याच महिन्यात इंग्रजीतले एक कादंबरीकार किरण नगरकर ह्यांनी असेच म्हटले होते. त्यांनी मराठीतून लिहिणे का सोडले ह्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. त्यांची मराठी कादंबरी 'सात सक्कं त्रेचाळीस' किती खपली आणि (इंग्रजीतील) 'एडी आणि रावण' किती खपली, त्याची आकडेवारी काढून पहा असे त्यांना म्हणायचे आहे. थोडक्यात पॅन-इंडियन लिहू बघणाऱ्यास आता पॅन-इंडियन बाजारपेठ मिळते असा त्या तर्कवादाचा अर्थ होतो व तो खराही आहे. मराठी लेखकाला काय मिळते हे आपल्या सर्वांना विदित आहेच ! अर्थात मोठी बाजारपेठ नाही म्हणून मराठीत लिहिणे सोडून इंग्रजीत लिहिणे सुरू करावे हा त्याचा अर्थ लावणे, लेखन ही सर्जनप्रक्रिया मानली तर रास्त ठरेल का ? मी काय लिहितो, का लिहितो, कुठल्या माध्यमातून लिहितो हे प्रश्न बाजारपेठेच्या हवाली करावेत काय ? पण इतिहासाची गती-प्रगती अशी झाली आहे की हाही प्रश्न असा विचारला जावू लागला आहे की बाजारपेठ साहित्याची, खरा सामाजिक अवकाश (सोशल साईट) आहे. पॉलॉक्साहेबाच्या इतिहासावलोकनातून मराठी निसटली आहे. ह्या पार्श्वभूमीवर त्या बुद्धभक्ताची प्रार्थना किती रास्त व भविष्यदर्शी होती हे ध्यानात येऊन नवल वाटत राहते.

वाङ्मयीन संस्कृती नेहमी एका विशिष्ट सामाजिक क्षेत्रात किंवा अवकाशात कार्यरत असते. ही 'सोशल साईट'ची संकल्पना विचारात घेतल्याशिवाय वाङ्मयीन संस्कृतीची मांडणी करता येत नाही. तो अवकाश किंवा ते क्षेत्र समजले की वाङ्मयीन संस्कृती अर्थपूर्ण होते. "सोशल साईट"ची पॉलॉक्‌ची संकल्पना आपल्याला काही प्रमाणात बदलून किंवा मुडपून घ्यावी लागेल. म्हणजे पॉलॉक् कडून शब्द उसना घेऊन त्याची संकल्पनात्मक मांडणी मात्र वेगळ्या अंगाने करावी लागेल. भारतीय समाजातील "सोशल" जाणून घ्यायचे तर हे "सोशल" एकसंध नाही व एका प्रकारे नेहमी "आव्हानित" असे राहिलेले आहे हे ध्यानात घ्यावे लागेल. इंग्रजीतला एक समर्पक शब्द इथे वापरायला हरकत नाही. ही सोशल साईट नेहमीच "कॉन्टस्टेड" (म्हणजेच मी ज्याचे आव्हानित असे भाषांतर केले आहे तो शब्द) राहिलेले आहे. मराठी वाङ्मयीन संस्कृतीचा अवकाश किंवा क्षेत्र नेहमीच एकसंध, सुसंवादी राहिले आहे असे दिसत नाही. त्यातल्या त्यात भक्तीकवितेच्या काळात (तेरावे ते सतरावे शतक) मराठीची वाङ्मयीन संस्कृती ही काही अपवाद वगळले तर विठ्ठलाप्रमाणे महासमन्वयाची होती. एरव्ही सांस्कृतिक आव्हाने हाच मराठीचा सामाजिक अवकाश होता व आहे, असे म्हणता येईल.

त्या इतिहासाचा अर्थ लावताना पॉलॉक्‌ने संस्कृत, पाली व अपभ्रंश ह्या भाषा "ट्रान्स-रीजनल" (प्रदेशनिरपेक्ष) व त्यामुळे प्रमाणभाषा होत्या असे म्हटले आहे. ते महत्त्वाचे

आहे. प्रमाणभाषेपासून सुटका नाही हा त्याचा अर्थ. ह्या भाषा टिकल्या ह्याचे कारण त्या बोलीभाषा नसून प्रमाणभाषा होत्या हे आहे. प्रमाणभाषेचे एकप्रकारे गणिती असे नियम असतात. त्याचा 'शुद्ध' किंवा 'अशुद्ध' भाषेशी काही संबंध असतोच असे नाही. "म्यां" हा शब्द त्याचे चांगले उदाहरण आहे. ह्या शब्दावर दुहेरी अन्याय झाला. एकोणिसाव्या शतकातील प्रमाणभाषेने हा शब्द नाकारला. शुद्ध असून नाकारला. (ते 'मी' चे तृतीया विभक्तीतले रूप आहे) तर अलीकडे ग्रामीण लेखनात प्रथमा विभक्तीतल्या 'मी' च्या जागी 'म्या' लिहायची पद्धती पडली आहे असे दिसते. तेही अशुद्ध आहे. खरी गोष्ट अशी आहे की ग्रामीण भाषेत 'मी' व 'म्या' ही दोन्ही रूपे वापरली जातात. व ते खरे शुद्ध आहेत. कारण त्यात प्रथम विभक्तीतला मी ("कोण आहे ?" "मी") आणि तृतीया विभक्तीतील मी (म्या बुक वाचले) ह्यात नेमकेपणाने फरक केलेला असतो. 'मी' ब्राह्मणी आणि 'म्या' ग्रामीण असा तो फरक नाही. पण ते लक्षात न घेता जेव्हा 'मी' ची जागा सरसकट 'म्या' घेऊ लागते तेव्हा त्या शब्दावर अन्याय होतो. आणि ग्रामीणांच्या भाषेची शुद्धता नाकारली जाते. थोडक्यात काय, हे अन्याय आपण वर म्हटलेल्या आव्हानित (कॉन्स्टस्टेड) स्वरूपामुळे शक्य होतात.

एका अर्थाने 'प्रमाणभाषा' हीच मुळी सामाजिक क्षेत्र व तेही आव्हानित क्षेत्र आहे हे मराठीच्या बाबतीत तरी ध्यानात ठेवले पाहिजे. त्यामुळे प्रमाणभाषा रूढ व्हायचे (किंवा करायचे) दोन प्रयत्न झालेले दिसतात. पहिला प्रयत्न, महानुभावांच्या गद्यापासून सुरू होऊन ज्ञानेश्वर ते तुकाराम (महर्षी शिंद्यांच्या दृष्टीने, ह्यांच्याच काळात मराठी खरी जिवंत होती, ते काही उगीच नाही !) ह्यांच्या कवितेत शिखरावर पोहचल्यासारखा दिसतो. भारतीय समाजात जोवर भाषा, जाती व जातिविशिष्ट शब्द, अभिव्यक्तीपद्धती ह्याच्याशी जोडून पाहिली जात नाही तोवर ती पूर्णांशाने कळणे कठीण. म्हणून एका अर्थाने सार्वजातीय अभिव्यक्तीपद्धती रूढ होणे म्हणजे प्रमाणभाषेचा उदय होणे असे म्हणता येईल. फक्त हे होताना जातीविशिष्ट अभिव्यक्तीपद्धती ही प्रमाणभाषा स्वीकारते का नाकारते एवढाच खरा प्रश्न असतो. भक्तीकाळात अशी समावेशक प्रमाणभाषा तयार झाली होती असे दिसते. त्यामुळेच एकनाथाची मराठी व चोखामेळ्याची मराठी एकमेकांपासून फारशी भिन्न वाटत नाही. एकनाथाची मराठी ही विष्णुशास्त्र्यांच्या मराठीच्या अर्थाने ब्राह्मणी आहे असे म्हणता येत नाही. (इथे प्रबंधाची किंवा विज्ञानाची भाषा मला अभिप्रेत नसून सृजनाची भाषा अभिप्रेत आहे.) थोडक्यात काय, तर फुल्यांच्या व विष्णुशास्त्र्यांच्या मराठीत आपल्याला जेवढे अंतर दिसते तेवढे अंतर एकनाथांच्या व चोखामेळ्याच्या कवितेत दिसत नाही. हा मुद्दा महत्त्वाचा अशासाठी आहे की भाषेचे सामाजिक क्षेत्र, तिचे स्वरूप व विस्तार ठरवित असते. ह्याच्यावर थोडा बारकाईने विचार केला तर मराठीच्या इतिहासात प्रमाणभाषेच्या विकासाची दोन पर्वे दृष्टीस पडतात. प्रमाणभाषेचा इतिहास नाही म्हटले तरीही आव्हानित किंवा द्वंद्वात्मक आहे. त्यामुळेच ही दोन वेगवेगळी पर्वे टाळता येत नाहीत. दुसरे प्रमाणभाषेचे पर्व अव्वल इंग्रजीच्या काळात सुरू झाले. पहिल्या पर्वाला एका सांस्कृतिक लोकचळवळीचा आधार होता. त्यामुळेही त्या पर्वातील प्रमाणभाषेची निर्मिती ही लोकशाही प्रक्रिया होती. दुसऱ्या पर्वात प्रमाणभाषेची निर्मिती हा प्रामुख्याने "ब्राह्मणी" प्रकार दिसतो. केवळ त्यामुळे त्या प्रमाणभाषेला काही अर्थ नाही अशी माझी भूमिका नाही; किंबहुना तशी भूमिका, सांस्कृतिक इतिहासाची दृष्टी नसल्याची द्योतक ठरेल. हा सगळाच प्रकार, भाषा व भाषांचे इतिहास प्रवाही असतात, ते कप्पेबंद होऊ शकत नाहीत हे लक्षात ठेवून ध्यानात घेतला पाहिजे. शेवटी भक्तीचळवळीने एक महाराष्ट्रीय राष्ट्रक (नॅशनॅलिटी) निर्माण केले हे ध्यानात घेतलेच पाहिजे. त्या राष्ट्रकाची पुरेशी दखल आपला इतिहासविचार घेत नाही हे म्हटले

पाहिजे. असो. मुद्दा असा की ह्या दुसऱ्या पर्वातील प्रमाणभाषा, नेमाड्यांचा शब्द वापरायचा तर "अँग्लो भटाळलेली" होती. त्यामुळेच कदाचित पहिल्या पर्वातील प्रमाणभाषेच्या उदयामुळे मराठा राजकीय सत्तेचा उदय झाला. तर दुसऱ्या प्रमाणभाषेच्या उदयामुळे साम्राज्यवादाची जाणीव निर्माण झाली. त्याचबरोबर ब्राह्मणी श्रेष्ठत्व, पेशवाईच्या अस्तामुळे लयाला जाईल की काय, असे वाटले होते. त्या श्रेष्ठत्वाची पुनर्मांडणी झाली. अर्थात् प्रमाणभाषेमुळेच नवे शास्त्र, नवे विज्ञान, मराठीत आले हेही विसरता कामा नये. प्रमाणभाषेचा उदय हे असे दुहेरी अर्थाचे प्रकरण आहे.

दोन्ही पर्वे आपआपल्या परीने "राजकीय" होती हेही विसरता येत नाही. पहिल्या पर्वात मराठी जाणीव बळकट झाल्यामुळे राजकीय सत्तेचा उद्‌भव झाला. पंजाबातही हाच प्रकार झाला आहे. शीख सत्तेचा उदय आणि पंजाबातील भक्तीपरंपरा यांचा परस्परसंबंध लक्षात घेतला पाहिजे. तसेच दुसरे पर्व जसे ब्राह्मणी होते तसे राजकीयही होते. साम्राज्यवादविरोध हे मूल्य आता मराठीत तरी फारसे कुणी उल्लेखिताना दिसत नाही. अगदी कडवे परिवर्तनवादीही साम्राज्यवादाचा विचार करतात असे वाटत नाही. पण आपण अजूनही साम्राज्यवादाच्या युगात जगत आहोत व त्यामुळे साम्राज्यवादविरोध हे फार महत्त्वाचे मूल्य आहे हे नजरेआड करता येत नाही. म्हणून चिपळूणकर ते टिळक ह्या परंपरेचा त्या परिप्रेक्ष्यात विचार झाला पाहिजे. शिवाय ह्या प्रमाणपर्वाला आधुनिकतेचेही परिमाण होते. चिपळूणकरांचे सॅम्युअल जॉन्सनवरचे लेखन किंवा त्यांची शेक्स्पीअरच्या भाषांतराची परीक्षणे (विशेषतः 'सिम्बालीन' किंवा 'तारा' ह्या भाषांतराचे) वाचली की नजरेत भरते. ह्यावरून प्रमाणभाषेचे आणखी एक रूप सिद्ध व्हावे. प्रमाणभाषा ही बोलीभाषा असतेच असे नाही. संस्कृत कधी बोलली जात नव्हती. चिपळूणकरी मराठी कुणी, अगदी ब्राह्मणही बोलत होते असे म्हणता येत नाही. सावरकरी भाषाशुद्धीचा आग्रह, भाषा कशी बोलली जाते ह्याकडे पूर्ण दुर्लक्ष करणारा होता. तोही ह्यात प्रमाणभाषा आणि बोली-भाषा ह्यातील विरोधविकास न कळल्यामुळे निर्माण झालेला होता. तितकेच प्रमाणभाषा आणि बोलीभाषा ह्यात काही भिन्नता असता कामा नये हा वरवर पाहता परिवर्तनवादी किंवा क्रांतिकारी वाटणारा आग्रह जितका अनाठायी आणि वाङ्मयीन संस्कृतीचा इतिहास नाकारणारा आहे, तितकाच प्रमाणभाषेचा आणि बोलीभाषेचा काही संबंधच नसतो असा आग्रह गैर वा अनाठायी आहे. भाषाशुद्धीचा विचार करताना बोलीभाषेचा विचारच न केल्यामुळे सावरकराची भाषाशुद्धी (सुदैवाने) इतिहासजमा झाली.

संस्कृत काय, चिपळूणकरी मराठी काय, ह्या भाषा आहेत तशाच तत्त्वविचार (आयडियोलॉजी) आहेत. भक्ती हा सुद्धा एक तत्त्वविचार होता हे विसरता येत नाही. त्याची ताकद आणि त्यांच्या त्रुटी, त्याशिवाय समजावून घेता येणार नाहीत. आपल्याकडे वाङ्मयीन संस्कृतीची मागणी पुरेशी होऊ शकली नाही ह्याचे कारण इतिहास कसा द्वंद्वात्मक असतो, त्यात शंभर टक्के घेण्याजोगे किंवा टाकून देण्याजोगे असत नाही हे अजून आपल्या ध्यानात आलेले नाही.

भाषा, कालिदासाचा शब्द वापरायचा तर, "ललिताभिनया"चे साधन असते आणि तुकारामाचा शब्द वापरायचा तर, "शस्त्र" असते ह्या दोन्ही रूपांचा हिशोब मांडावा लागतो. आणि हे करणे म्हणजेच वाङ्मयीन संस्कृती व इतिहास यांची सांगड घालणे असते. त्या दिशेने काहीएक चर्चा व्हावी ह्या हेतूने या चारदोन ओळी लिहिल्या आहेत.

■■■

।। 'न्यूनगंडाची वाताहत' : दुसऱ्या टप्प्यातली दलित कविता ।।

◗ वसंत आबाजी डहाके

१

एका गुजराथी कवितेच्या मराठी अनुवादातील काही ओळी देत आहे

'जंतू होऊन जगणं मान्य आहे
मला माणूस नाही व्हायचं'

अशी नीरव पटेल यांच्या या कवितेची सुरूवात आहे. 'मी अमीबा होऊन जगेन', 'मी पोटाने सरपटेन - साप अथवा सरडा बनून' असं पुढच्या कडव्यांमध्ये म्हटलं आहे. शेवटच्या कडव्यातल्या चार ओळी अशा आहेत

'पण मला माणूस नाही व्हायचं,
मला अस्पृश्य माणूस नाही व्हायचं,
मला काळा अस्पृश्य माणूस नाही व्हायचं,
मला गरीब काळा अस्पृश्य माणूस नाही व्हायचं'.
(तात्पर्य, दिवाळी १९८४)

माणूस, अस्पृश्य माणूस, काळा अस्पृश्य माणूस, गरीब काळा अस्पृश्य माणूस - विशेषणं वाढत गेली आहेत आणि अर्थाच्या मितीही वाढल्या आहेत.

कविता हा एक साहित्यप्रकार आहे आणि साहित्य ही एक कला आहे. साहित्याकडे सामाजिक दस्तऐवज म्हणून, समाजाच्या अभ्यासाचं एक साधन म्हणून देखील पाहिलं जातं. 'प्रतीतिविश्रांती' हे साहित्याचं एक प्रयोजन मानलं तर 'प्रतीतीनंतरची जागृती' हे दुसरं प्रयोजन समजायला प्रत्यवाय नसावा. साहित्याच्या विविध आविष्कारांमधून समाजाच्या विविध स्थिती, गतिविधी व्यक्त होत असतात. मनुष्याची वेदना, त्याचा संघर्ष, विवशता, असहायता, आकांक्षा, इच्छा, आक्रोश यांची साहित्यातून अभिव्यक्ती केली जाते. साहित्यावर लेखक-कवींच्या वर्गाचा प्रभाव असणं, साहित्यातून त्यांच्या जीवन व साहित्यविषयक दृष्टीची प्रतीती येणं स्वाभाविक मानलं जातं. साहित्याची विविध रूपं, प्रकार, त्यातून व्यक्त होणारे वाक्प्रयोग यांचं काळाशी, परिसराशी, सामाजिक-आर्थिक-राजकीय घडामोडींशी नातं असतं. साहित्यलेखन हे कोणत्या वर्गाचे व वर्णाचे लोक करतात, कोणत्या विचारप्रणालींनी ते प्रभावित आहेत, समाजाच्या संदर्भात त्यांच्या धारणा काय आहेत, त्यांचा मूल्यविचार काय आहे यारून साहित्याचं स्वरूप निश्चित होत असतं. साहित्यनिर्मिती करणारा लेखक-कवी व्यक्तीचं व समूहाचं जगणं, विचार, उक्ती आणि कृती, घटना आणि त्यांचे व्यक्तीवर, समूहावर होणारे परिणाम यांचा शोध घेत असतो. त्यावेळी व्यक्तीच्या व समूहाच्या उक्ती व कृती यांच्या मागे समाजाची, संस्कृतीची, धर्माची, अर्थकारणाची, राजकारणाची संरचना असते याची त्याला जाणीव होत असते. म्हणजे साहित्यकृतीची संहिता रचत असताना अन्य विविध संहितांची जाणीव त्याला होत असते. सुरूवातीला आपण वाचलेल्या कवितेत अशा अन्य

संहितांचा निर्देश आहे.

या विविध संहिता आणि व्यक्ती यांच्यातील परस्परसंबंध (अनुकूल अथवा प्रतिकूल) शोधणं हे लेखक-कवीचं काम असतं. त्यातून तो साहित्यकृतीची संहिता रचतो. त्यामुळेच साहित्यकृतीची संहिता सतत बाहेरच्या अन्य संहितांचा निर्देश करीत असते. ती जगण्याशी, मानवी जीवनाच्या विविध क्रियाप्रतिक्रियांशी जोडलेली असते. दलित कवितेचं वाचन करीत असताना कवितेच्या बाहेरच्या विविध संहितांचा बोध सतत होत राहतो. आपण वाचलेल्या कवितेतील 'माणूस', 'अस्पृश्य माणूस', 'काळा अस्पृश्य माणूस', 'गरीब काळा अस्पृश्य माणूस' या अर्थभारित शब्दांतून विविध संहिता उलगडत जातात.

२

'दलित कविता' असा शब्दप्रयोग आपण करीत असलो तरी 'दलित' हे कवितेचं विशेषण नाही; व्यक्तींचं, समूहाचं ते विशेषण आहे. पीडित, शोषित, अवमानित, उद्ध्वस्त, भग्न अशा व्यक्तींच्या, व्यक्तिसमूहाच्या अथवा समाजाच्या संदर्भात ते विशेषण वापरलं जातं. दलितत्वाचा उगम मुख्यतः येथील समाजरचनेतील जातिव्यवस्थेत आहे. या व्यवस्थेमुळे व्यक्ती जन्माबरोबरच दलितत्व घेऊन येते आणि ते मृत्यूपर्यंत, किंबहुना अंतिम संस्कारांपर्यंत टिकून राहतं. दलितत्वच व्यक्तीच्या, व्यक्तिसमूहाच्या सामाजिक स्थानाची, आर्थिक व राजकीय कृतींची निश्चिती करते. 'दलित' या शब्दात सर्व प्रकारचं शोषण अभिप्रेत आहे त्यामुळे कोणत्याही शोषित, दलित व्यक्तीचा व व्यक्तिसमूहाचा निर्देश 'दलित' या शब्दानं करता येईल. ('दलितस् इन मॉडर्न इंडिया'च्या प्रस्तावनेत एस्. एम्. मायकेल यांनी 'दलित' या शब्दाचे अनेक पर्याय दिलेले आहेत. उदा. अनटचेबलस्, हरिजन, डिप्रेस्ड क्लासेस, आऊटकास्टस्, चांडाल, अवर्ण, पंचम, निषाद, अंत्यज, अतिशूद्र इत्यादी. आंबेडकरांनी 'ब्रोकन मेन' हा शब्दप्रयोग केला होता. १९३१ मध्ये 'दलित' हा शब्द वापरला गेलेला असला तरी पँथरच्या चळवळीत या शब्दाला विशेष वजन आलं. या शब्दामुळे आधीचा हीनभाव नाहीसा झाला. एक संघटित वर्ग आणि त्यानं चालविलेली समतेची चळवळ असा अर्थ या शब्दाला आला. दलित मुक्ती चळवळीनं लोकशाहीच्या राजकारणात एक नवीनच युग निर्माण केलं).

धर्म आणि अर्थ या दोन सत्ता-घटकांच्या सहाय्यानं ज्यांचं शोषण केलं जातं ते 'दलित'. त्यामुळे आजच्या दलित कवितेच्या क्षेत्रात पूर्वास्पृश्य, आदिवासी, ख्रिस्ती व मुस्लिम धर्मीय कवींच्या कवितेचा समावेश झालेला दिसतो. वर्णव्यवस्थेच्या भाषेत बोलायचं तर 'दलित' हा वर्ण आहे आणि आर्थिक व्यवस्थेच्या परिभाषेत सांगायचं तर 'दलित' हा वर्ग आहे. एककडे पितृसत्ताक, वेदस्मृतिपुराणाधिष्ठित धर्मव्यवस्था आणि दुसरीकडे उत्पादनाच्या साधनांची मालकी बाळगणारी भांडवली अर्थव्यवस्था या दोन व्यवस्थांच्या जात्यात भरडलं जाणारं मानवी आयुष्य दलित कवितेच्या उदयाला कारण झालेलं आहे. धर्मव्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांतूनच राजकीय व्यवस्था आकारत असते. धर्मसत्तेच्या आणि अर्थसत्तेच्या बाजूनं ती असते. जनार्दन वाघमारे यांनी म्हटलं आहे : 'जातिभेदावर आधारलेली समाजरचना हीच खरे तर आमच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक व्याधींच्या बुडाशी आहे. या जातिभेदाने वरिष्ठवर्णीयांना अमानुष बनविले आणि कनिष्ठवर्णीयांचे अमानुषीकरण केले.' (समुचित, एप्रिल-मे-जून १९८८). शोषण करणाऱ्या धर्मव्यवस्थेला व अर्थव्यवस्थेला नकार देणं हा जसा दलित कवितेचा पहिला आणि स्वाभाविक उद्गार असतो, तसाच तो राजकीय व्यवस्थेलाही असतो. दलित व्यक्तींना, व्यक्तिसमूहांना तीन पातळ्यांवर एकाच वेळी लढावं लागतं. दलित कविता हा या लढ्याचाच एक भाग म्हणून अस्तित्वात आली. 'एकंदर सामाजिक, मानसिक व वैचारिक व्यवस्थेविरुद्ध आम्ही आहोत' असं बाबूराव बागूल यांनी

म्हटलं आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अनेक सुधारकांना, विचारवंतांना त्यांचे शत्रू दिसत होते. पण आमचा शत्रू तर अदृश्य आहे. तो ग्रंथात, भाषेत, शब्दात, विचारात, मनात आहे. ते म्हणतात 'असल्या प्रचंड आणि सर्वव्यापी असूनही अदृश्य असलेल्या शत्रूबरोबर आमचे युद्ध सुरू झालेले आहे' (समाज प्रबोधन पत्रिका, मार्च-एप्रिल १९७१).

दलित कवितेच्या मागे हीच भूमिका आहे. नामदेव ढसाळ यांनी 'सर्वहारा दलित वर्ग' असा शब्दप्रयोग केलेला आहे. या सर्वहारा वर्गात त्यांनी कामगार, शेतमजूर, भूमिहीन, दलित, आदिवासी माणसांचा समावेश केला आहे. 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले'च्या भूमिकेत ढसाळांनी कविता ही राजकीय कृतीच असते असं म्हटलेलं आहे. अर्थातच ही राजकीय कृती सर्व प्रकारच्या शोषणाच्या विरोधातच असते.

'दलित' या शब्दाच्या संदर्भात सुरूवातीपासूनच दोन भूमिका आढळतात. एक भूमिका 'मार्क्सवादी' म्हणून ओळखली जाते तर दुसरी 'आंबेडकरवादी'. पहिल्या भूमिकेनुसार सामाजिक, आर्थिक दृष्टीनं शोषित हे दलित, तर दुसऱ्या भूमिकेनुसार जन्मानं प्राप्त होणारं अस्पृश्यत्व आणि तज्ञन्य दास्य ज्यांच्या वाट्याला आलेलं आहे ते दलित. या दोन भूमिकांचा समन्वय करण्याचा प्रयत्न झाला, मार्क्सवादी भूमिकेला विरोधही झाला. दलित कोण ते केवळ जातीमुळे ठरतं, वर्ग कोणता आहे किंवा धर्म कोणता आहे यावरून नाही अशी वस्तुनिष्ठ भूमिकाही काहींनी मांडली. कवितेच्या संदर्भात मार्क्सवादी आकलन क्षीण होत जाऊन आंबेडकरवादी आकलन अधिक प्रभावी ठरत गेलेलं दिसतं. 'उत्थानगुंफा'च्या (यशवंत मनोहर) प्रस्तावनेत नरहर कुरुंदकरांनी समन्वयवादी भूमिका घेतली होती. चार्वाक, मार्क्स, फुले, आंबेडकर यांच्या भूमिकांचा समन्वय करणाऱ्या विद्रोही आंदोलनाची उभारणी करता येईल का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. यशवंत मनोहरांनी असा समन्वय साधलेला दिसतो. चार्वाक, सिद्धार्थ गौतम बुद्ध, ज्योतिबा गोविंदराव फुले, कार्ल मार्क्स, भीमराव रामजी आंबेडकर या कविता त्यांच्या या संग्रहात आहेत. 'वर्णलढ्याची वर्गलढ्याशी सांगड अपरिहार्य' असल्याचं मत अर्जुन डांगळे यांनी व्यक्त केलं होतं. (दलित विद्रोह, १९९१, १९९८). 'आंबेडकर-मार्क्सवाद समन्वय - एक मूल्यमापन' या निबंधात सुधाकर गायकवाड यांनी अशा समन्वयातील व्यर्थता दाखवून दिली आहे. (पाहा : अस्मितादर्श, दिवाळी अंक १९८०). मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यांचा समन्वय नव्हे तर या दोन वादांचं संश्लेषण आवश्यक असल्याचं प्रतिपादन काही विचारवंतांनी केलेलं दिसतं. (पाहा परामर्श, मे १९८५ आणि फेब्रुवारी १९८६).

या चर्चेच्या संदर्भात गोरख भालेराव (अस्मितादर्श, दलित स्त्री विशेषांक १९८१) यांची एक प्रतिक्रिया नोंदवणं आवश्यक आहे

'मी समाजवादी
मी प्रजा समाजवादी
मी मार्क्सवादी
मी लेनिनवादी
मी नक्षलवादी
मी शेतकरी कामगार प्रतिनिधी
मी सर्वोदयवादी
मी गांधीवादी
आम्ही सगळेच डावे
मी सर्वांना
जाणिवेच्या स्टेथोस्कोपनं तपासलं
आणि कार्डिओग्राम घेतला
यातनेच्या प्रयोगशाळेत
यांचा मेंदू, हृदय, डोळे, रक्त तपासले
त्यांचा सामाजिक एक्स-रे घेतला.
तेव्हा कोठे कळले

ते आरशातच डावे दिसले
(एकजात ढोंगी असले)
आरशातच डावे दिसले'.

दलित चळवळीच्या दृष्टीनं डाव्या विचारवंतांचा उपयोग शून्य असल्याचा निष्कर्ष या कवितेतून निघतो. १९७२ साली स्थापन झालेल्या दलित पँथर या संघटनेतील पहिली फूट ही आंबेडकरवाद विरुद्ध मार्क्सवाद अशी तात्त्विक स्वरूपाची होती. (पाहा : पूर्वोक्त सुधाकर गायकवाड यांचा निबंध). दलित साहित्याची चळवळ आणि दलित पँथरचा उदय या परस्परांशी निगडित अशा दोन गोष्टी आहेत. अर्जुन डांगळे यांची भूमिका मार्क्सवाद, आंबेडकरवाद आणि बौद्ध तत्त्वज्ञान यांच्या समन्वयाची होती. त्यांच्या मते ही तिन्ही तत्त्वज्ञाने परस्परविरोधी नसून परस्परपूरक अशीच आहेत. (पाहा, उपरोक्त दलित विद्रोह). उत्तरोत्तर दलित चळवळ आंबेडकरवाद-केंद्रित होऊ लागली त्याचं प्रमुख कारण येथील जातिव्यवस्थेचं, अर्थव्यवस्थेचं आणि राजकीय व्यवस्थेचं आंबेडकरांचं आकलन हे अधिक मर्मस्पर्शी असल्याचं भान हे होय. त्यामुळे दलित कवितेतून आंबेडकरांविषयीची प्रखर निष्ठा आढळते. आंबेडकरवाद हा दलित कवितेचा प्रेरणास्रोत ठरला. त्याचबरोबर या वैचारिक घुसळणीचा, रिपब्लिकन पक्षातील नेतृत्वावरील अविश्वासाचा, दलित पँथरमधील फुटीचा दलित कवितेवर प्रभाव पडलेला आहे. पँथरमधील फुटीनंतर, रिपब्लिकन पक्षातील निर्नायकीनंतर दलित चळवळीचा, विद्रोहाचा, दलित जीवनाचा पुनर्विचार सुरू झाला. सत्तरच्या, ऐंशीच्या दशकांतील कवींच्या पिढीनंतर आलेल्या दुसऱ्या पिढीच्या कवितेत ही पुनर्विचाराची प्रक्रिया आढळते. लोकनाथ यशवंत यांच्या 'आता होऊन जाऊ द्या' (१९८९) या संग्रहानंतर प्रकाशित झालेल्या 'आणि शेवटी काय झाले ?' (१९९५) या संग्रहाच्या प्रस्तावनेत ही पुनर्विचाराची, आत्मपरीक्षणाची जाणीव व्यक्त झालेली आहे. 'तप्त लाव्हा थंड व्हावा तशी दलित लढ्याची धार बोथट होताना दिसली. दलितांतल्या स्वार्थी नेतृत्वाने दलित लढ्याची दिशाच आपल्या मालकीची करून टाकली आणि दिशा दाखवणारे बोटच नेमके तोडून टाकले' हा आपला प्रत्यय त्यांनी नोंदवला आहे. राजकीय क्षेत्रात विविध मतभेद, फुटी झालेल्या असल्या तरी दलित कवितेच्या क्षेत्रात विविध प्रवाह आलेले आहेत. आर्थिक आणि सामाजिक अशा दोन्ही स्तरांवरील दलित कवी कविता लिहीत आहेत. त्यांच्या प्रेरणास्रोतांमध्ये फुले आहेत आणि आंबेडकर आहेत. एका अर्थी पँथरच्या जाहीरनाम्यात ज्या समाजगटांचा दलित म्हणून उल्लेख होता त्या समाजगटातले कवी आजची कविता लिहीत आहेत.

3

ऐंशी-नव्वदच्या दशकांत दलित सांस्कृतिक चळवळ मंदावल्याचं आणि तिच्या या मंदगतीचं नातं दलित राजकीय चळवळीशी असल्याचं निरीक्षण गोपाळ गुरू यांनी नोंदवलं आहे. (दलित कल्चरल मूव्हमेंट ॲण्ड डायलेक्टिक्स ऑफ दलित पॉलिटिक्स इन महाराष्ट्र, १९९७). तथापि या मंदीचा दलित साहित्यनिर्मितीवर काही परिणाम झाला आहे असं दिसत नाही. 'चार साडेचारशे उपलब्ध कवितासंग्रह दलित कवींचे आहेत आणि त्यात अव्याहतपणे प्रतिमासी भरच पडते आहे' असं दुसरं निरीक्षण केशव मेश्राम यांचं आहे. (अक्षरभाकिते, १९९९). दलित कवितेच्या पहिल्या टप्प्यातील केशव मेश्राम, दया पवार, नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, प्रल्हाद चेंदवणकर, त्र्यंबक सपकाळे, प्रकाश जाधव, अरूण कांबळे, अर्जुन डांगळे, हिरा बनसोडे, मलिका अमरशेख, ज्योती लांजेवार इत्यादी कवि-कवयित्रींनी मराठी साहित्यात दलित कवितेची नाममुद्रा उमटवली. 'दलित कविता ही मराठी साहित्यात आता एक प्रस्थापित झालेली वस्तुस्थिती आहे' हे म. सु. पाटील यांचं विधान (अस्मितादर्श दिवाळी १९७९) यथार्थ आहे. दलित कवितेच्याच संदर्भात नव्हे

तर एकूण मराठी कवितेच्या संदर्भात ती महत्त्वाची कविता ठरलेली आहे. सत्तर-ऐंशीच्या दशकांतील या कवींनंतर दुसऱ्या टप्प्यातील दलित कविता विविध संग्रहांच्या रूपानं उपलब्ध झालेली आहे. ही कविता पहिल्या टप्प्यातील कवितेहून काही बाबतीत निराळी आहे. या कवितेचंही बांधिलकीशी नातं आहे, विद्रोहाची अभिव्यक्ती आहे, आत्मभानाप्रमाणे भोवतीच्या स्थितीचं भानही आहे, त्याचबरोबर आत्मपरीक्षणही आहे. या आत्मपरीक्षणात चळवळीची चिकित्साही अंतर्भूत आहे. नेत्यांच्या वर्तनातील अंतर्विरोधांची छाननी आहे. चळवळीचा वैयक्तिक फायद्यासाठी उपयोग करून घेणाऱ्यांवर टीका आहे. आरंभापासूनच दलित कवितेत चळवळीला महत्त्वाचं स्थान आहे. परंतु तिच्याविषयीचं गांभीर्य नाहीसं होत असलेलंही दिसतं. वाहरू सोनावणे यांनी चळवळीविषयी म्हटलं आहे :

'चळवळ म्हणजे काही
दोन पाच दिवसांची जत्रा नव्हे;
की नदीला आलेला पूर नव्हे !
चळवळी म्हणजे माणुसकीचा गाभा
सतत विकसित होत जाणारा प्रवाह.'

(निवडक कविता)

हे भान सुटतं आणि 'या समाजासाठी आपण काय नाही केलं' असे म्हणणारा, 'व्यवहारी डोळ्यांचा' कार्यकर्ता आपण केलेल्या कामाचा मोबदला मिळवावा म्हणून निवडणुकीत उभं राहायचं ठरवतो. लोकनाथ यशवंत यांच्या 'भाऊराव किसन वाडीभस्मे' या कवितेत (प्रतिष्ठान, मे-जून १९९८) म्हटलं आहे

'मी काय नाही केलं ?
सुखाचा जीव चळवळीत टाकला.
एवढं सगळं केल्यावर निवडणुकीत उभं
राह्यचं नाही तर काय करायचं ?'

'राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीत करावयाचे असेल तर सत्ता हस्तगत केल्याशिवाय आंबेडकरी चळवळीला पर्याय नाही' असं जे अर्जुन डांगळे यांनी म्हटलं होतं (दलित विद्रोह), ते हे नव्हे. तडजोडीच्या राजकारणानं उद्विग्न झालेली मनःस्थिती उत्तम अंभोरे यांच्या पुढील ओळीत व्यक्त झालेली आहे

'टमरेलभर फायद्यानं
सगळ्याच पिढ्यांना
वाहून नेले
गटारगंगेत
पराभवाच्या समुद्राकडे.'

(प्रतिष्ठान, मार्च-एप्रिल १९९८).

'चळवळीचे रूपांतर शेवटी व्यवस्थेमध्ये झाले' ही खंत लोकनाथ यशवंत यांच्या अनेक कवितांतून व्यक्त झालेली आहे. उदाहरणार्थ, 'इतरांना पोथीनिष्ठ म्हणता म्हणता आमच्या डोक्यावर पोथ्या आल्या', 'विद्रोहाची भाषा करणारे सत्ताधारी होऊन लाळ गाळू लागले', इत्यादी. 'चळवळ' या कवितेत त्यांनी म्हटलं आहे

'महामहिमा,
मोहल्ल्यात तुमच्या दोन जयंत्या साजऱ्या झाल्या
मृत्युदिनही दोन जागी बघितलेत'.

चळवळीतल्या फुटीचा कवीनं काढलेला हा आलेख मर्मभेदक आहे. रिपब्लिकन पक्ष आणि दलित पँथर या दोन्ही संघटनांतील फुटीचा दलित चळवळीशी आणि त्या चळवळीतून घडू शकणाऱ्या परिवर्तनाशी संबंध आहे. त्यामुळे या विपर्यस्त वास्तवाचा परिणाम कवि-मनावर होणं हे स्वाभाविकच आहे. दलित चळवळीतील अंतर्विरोधांचा एक आलेख केशव मेश्राम यांच्या 'दलित चळवळीचे भवितव्य' (अक्षरभाकिते) या निबंधात आढळतो. 'समृद्ध मनाचा सर्वसमावेशक नेताच दलित चळवळीजवळ नाही' असा त्यांचा निष्कर्ष आहे. 'आत्मसन्मानाचा बळी देऊन कुठलाही वंश वाढूच शकत नाही ही इतिहाससिद्ध वस्तुस्थिती आहे' मेश्राम यांच्या या विधानाचा काव्यगत प्रत्यय लोकनाथ यशवंत यांच्या 'बोकड' या कवितेत येतो.

जाती-जमातींपुरतं मर्यादित नाही. सर्व प्रकारच्या व्यवस्था, त्या व्यवस्थांकडून होणारं शोषण, त्या शोषणाला दिला जाणारा नकार हाच दलित कवितेचा मध्यवर्ती विषय आहे. त्यामुळे दलित कविता स्वभावतः वास्तवोन्मुख आहे. जात, जातीमुळे होणारी मानखंडना, दारिद्र्य, त्यामुळे येणारं अवलंबून असणं, लाचारी, अज्ञान, त्यामुळे होणारी फसवणूक-या सगळ्यांच्या भोवती असलेली वर्णाश्रमधर्माची चौकट, त्या चौकटीमुळे उत्पन्न झालेली समाजातील अलंघ्य दरी - हा कवितेतील वास्तवाचा एक भाग आहे. कवितेत केवळ भौतिक वास्तवाचं चित्रण होत नाही. या भौतिक वास्तवामुळे मनाला पडणारा पीळ, यातना, खिन्नता, उद्वेग, क्षोभ या विविध भावावस्था दलित कवितेत येतात. स्मृतीमधला इतिहास, प्रत्यक्ष भोगावं लागणारं वास्तव आणि उद्याविषयीची आशा, त्यात निर्माण होणारे संभ्रम या संदर्भातल्या अनेक छटा दलित कवितेत आढळतात. वाहरू सोनावणे यांच्या भिलोरी कवितेत प्राथमिक वास्तवाचं चित्र पुढील ओळींमध्ये आढळतं

'कुंदाचं खळं खणता-खणता
दिवस ढळून गेला
अजून भाकरीचा पत्ता नाही
खणता-खणता
हाडं गेली मसणात
वितर पोटासाठी'.

- भुजंग मेश्राम यांच्या 'कलाहंडी'त म्हटलं आहे

'कलाहंडीत आता खेळला जातोय गोयंदा
भूक
करते
सर्वसाक्ष
धंदा
कलाहंडीला शोधून सापडत नाही सखा.'

सर्वसाधारण मानवी जगणं अशक्य व्हावं अशी अर्थव्यवस्था, ती अर्थव्यवस्था जिचं एक अंग आहे अशी राज्यव्यवस्था आणि राज्यव्यवस्था जिचा आविष्कार आहे ती समाजव्यवस्था - या सर्व व्यवस्थांच्या संदर्भात कवींच्या प्रतिक्रिया आहेत. या प्रतिक्रिया त्यांच्या वास्तवविषयक जाणिवेतून आलेल्या आहेत. मूलभूत अशा प्राथमिक गरजांना अग्रक्रमानं महत्त्व देण्याऐवजी समाजात जातिद्वेष, धर्मद्वेष निर्माण केला जातो, त्याविषयीची ही एक कडवट प्रतिक्रिया पाहा

'कमल महाआरती कर
रझिया महानमाज पढ
गौतम पाटलाच्या घरी जा
गाईला गवत घाल
डेव्हिड कबूतरं उडव
करीम मंदिर बघून ठेव
दगन मशीद बघून ठेव
एकमेकांचे धर्म बघा, जाती बघा
एकमेकांचा द्वेष करा
दगडं डोक्यात घाला
दगड आणा, दगड घाला'

(अरुण काळे, सायरनचे शहर).

हिंदू-मुसलमान यांच्यातील विद्वेषानं उत्पन्न झालेल्या मानसिक स्थितीचं चित्रण जावेद कुरैशी यांच्या 'बएत' मध्ये आढळतं. त्याचबरोबर मुसलमान समाजातील जातीयतेनंही कवी व्यथित झालेला आहे. पूर्वास्पृश्य, मुसलमान यांच्या पुनःपुन्हा वाट्याला येणारं एक प्रखर वास्तव म्हणजे दंगल. जावेद कुरैशी यांनी या स्थितीचं 'नियमित येणारा दंगलीचा पाऊस' या शब्दांत वर्णन केलं आहे. 'सायरनचे शहर' या अरूण काळे यांच्या संग्रहात 'माणसाच्या दंगलखोर, युद्धखोर मनःस्थितीच्या कवितांचा जमाव' आहे. सगळ्या शहरावर (समाजावर) भयाची अशुभ काळी सावली पडलेली आहे. कवीच्या मते, 'नागरिक आणि श्वापदं एकत्र । ही युद्धभूमी जात धर्माची । सत्ताकांक्षीची, पोटांची' दंगलीनंतर वित्त आणि

जीवितहानीविषयी मजकूर छापून येतो. कवी विचारतो

'किती मनं दुभंगली ?
किती मेली ?
किती जखमी झाली ?
हे कवा छापून येणार ?'

मुक्तीसाठी चालणारा लढा आणि दंगल यात फरक आहे. दंगल घडवली जाते. वित्त आणि जीवितहानी होतेच, पण त्याहूनही अधिक वाईट गोष्ट घडते. मनात दहशत निर्माण केली जाते. दहशतीच्या वातावरणात काही उगवत नसतं. आत्मभान खुडून टाकणं आणि मनं भयग्रस्त करणं हे दंगलीचं कार्य असतं. व्यवस्था मुक्तिलढ्याचं रूपांतर दंगलीत करू शकते.

६

दुसऱ्या टप्प्यातील दलित कविता वाचताना आंतरिक क्षुब्धतेचा प्रत्यय येत राहतो. ही क्षुब्धता गेल्या पन्नास वर्षांच्या, स्वातंत्र्याच्या कालखंडात आकांक्षांची परिपूर्ती व्हायची ती न झाल्यामुळे आलेली आहे. कवी स्वातंत्र्याचं झाड खोदतो, पण भ्रमनिरासाचं सोटमूळ त्याच्या हाती पडतं. माधव सरकुंडे यांनी म्हटलं आहे 'वारकाचा उकिरडा उकरला । तर केसांशिवाय दुसरे काय सापडणार । इतकंच उपमान आहे माझ्याकडं'. हे उपमान वीजेच्या दाबाप्रमाणे अर्थभारित आहे.

हा कवी एखाद्या विशिष्ट जाती-जमातीपुरतं बोलत नाही. सगळ्याच दलितांशी त्याचं एकरूपत्व झालेलं आहे. माधव सरकुंडे यांनी 'ठणक' या कवितेत म्हटलं आहे

'मी माडीया, मी आंध, गोंड, प्रधान
मांग, महार, ढोर, चमार मी
आणि ज्यांच्या नावावर, माझ्या देशाने जात
नोंदवली
ते सगळेच मी.'

सगळ्यांच्याच व्यथा-वेदनांचा आलेख तो काढतो. 'भारत आपला देश आहे' असं म्हणतानादेखील 'आपल्या देशात आपलं घर नाही । पोटाला पोटभर भाकर नाही । अंगाला धड लक्तर नाही' याची दाहक जाणीव होत राहते. यातूनच सगळ्याच दलितांच्या संदर्भातलं नातं निर्माण होतं. सगळे दलित, शोषित एकाच समाज-राज्य-अर्थव्यवस्थेचे बळी असतात. आनंद विंगकर यांनी अत्यंत समर्पक शब्दांत म्हटलं आहे

'सर्वांच्या दुःखाच्या मुळापाशी येतो
अन् तिथं जो असतो
बदलासाठी
प्रदीप्त पुरातन जाळ
त्यातच त्याचा मी बाप्तिस्मा उरकतो.'

आंबेडकरांना जे सामाजिक-आर्थिक रूपांतर अपेक्षित होतं आणि ते ज्या सांस्कृतिक क्रांतीमधून शक्य होणार होतं, ती सांस्कृतिक क्रांती दलित कवितेतून पाहायला मिळते.

सर्वांच्या दुःखांच्या मुळाशी पोचणं हे प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतही दिसतं. 'पवळा हिवरगावकर ते विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर' या कवितेत (महाराष्ट्र टाइम्स, वार्षिक २००१) त्यांनी म्हटलं आहे

'खरंच, काय फरक पडतो
बाईचा चेहरा असतो
पवळा नावाचा
काय फरक पडतो
जेव्हा चेहरा असतो
विठाबाईचा
काय फरक पडतो
जेव्हा बाई असते
महार मांग ढोर चांभार
कोल्हाटी
किंवा डोंबारी'

काही फरक पडत नाही. कारण 'टिचभर खळगी,

अनुक्रमणिका

अभावाची ढोलकी, भुकेचा आदिम वग, विटाळाची बतावणी' या गोष्टी समानच असतात.

परंपराधिष्ठित समाजव्यवस्थेतील सगळ्याच शोषित स्त्रियांशी प्रज्ञा लोखंडे, सिसिलिया कार्व्हालो यांसारख्या कवयित्रींचं नातं असतं. प्रज्ञा लोखंडे यांच्या 'अंतःस्थ' या संग्रहात आणि सिसिलिया कार्व्हालो यांच्या 'अंतर्यामी' या संग्रहात रूपकुंवरविषयीच्या कविता आहेत. तरीदेखील सवर्ण स्त्रियांची आणि दलित स्त्रियांची दुःखं सारखीच नसतात. कुमुद पावडे यांच्या 'त्या तेथे चल सखी' या कवितेत 'जन्मताच मृत्यूचं दुःख साहणारं स्त्रीपण' व्यक्त झालेलं आहे. 'संस्कृतीच्या काटेरी कुंपणात आयुष्याचं फूल' कुस्करलं गेल्याची वेदना संध्या रंगारी यांच्या कवितेत दिसते. प्रतिभा अहिरे यांच्या कवितेत 'परंपरेनं घातलं जाई काळोखाचं काजळ, आमच्या डोळ्यात, पापण्या-पापण्यात जगण्याची स्वप्नं, जायबंदी होऊन विव्हळत' असल्याची विदारक जाणीव व्यक्त होते. सुरेखा भगत यांच्या कवितेतील आत्मभान व्यक्त करणाऱ्या या ओळी पाहा

'काचेरी वस्तू म्हणून की काय
काचेच्या बांगड्यांचं तिच्यावर बंधन आलं,
काचघरातल्या मॉडेलसारखं राहणं आलं,
पण आपण काच नाही
हे तिला कळून चुकलं
काचेच्या बाहेर पाहायला लागल्यापासून.'

उषाकिरण आत्राम यांच्या कवितेत नवी धगधगणारी जाणीव व्यक्त होते

'आता गवत जाळून
रान पेरायची आणि जागा सोडायची वेळ गेली
टोळ्याटोळ्यांनी कडाकपारी शोधण्याची
वेळ आज गेली
आता सर्व टोळ्या एकत्र आणू
अनंत हाताचे शक्तियुद्ध पुकारू, हाकारा देऊ
सर्व वाटा एकत्र येतील
लाख पावलांची लाट पाहून
दुधारी शस्त्र उगारणारे हात खाली येतील
आता पुढचे आपणच ठरवू
माझ्या डोळ्यांतल्या काळ्या लाटांत एकदा पाहून घ्या
ही निघालेय पुढे मी, पाठीमागून येऊ द्या मोर्चा'

७

हे आत्मभान ही दलित कवितेची सर्वात मोठी मिळकत आहे. भाषेच्या पातळीवरही हे आत्मभान दिसून येतं. बहुतेक दलित कवींनी प्रमाण, नागर भाषा टाळलेली आहे. ज्यांनी नागर भाषेचा स्वीकार केलेला आहे त्यांनी बोली भाषेचा ताजेपणा त्यात मिसळला आहे. वाहरू सोनावणे यांनी भिलोरी भाषेत कविता लिहिल्या; भुजंग मेश्राम यांच्या 'ऊलगुलान'मध्ये परधानी, गोंडी, गोरमाटी कवितांचा समावेश आहे; जावेद कुरैशी यांच्या कवितेत ग्रामीण मुस्लिम मराठीचा वापर आढळतो. आनंद गायकवाड यांच्या 'आखरीचं तुव्हच सडान चिबवीन' या संग्रहातल्या कवितेत संमिश्र ग्रामीण बोलीचा उपयोग केलेला आहे. कवितेच्या भाषेच्या संदर्भातले निर्बंध दलित कवितेनं झुगारले आणि जे जगणं कवितेचा विषय झालेलं आहे त्या जगण्याच्या भाषेचा अवलंब केला. उदाहरणार्थ या काही ओळी

'धंदा अपनो चले नही
टायर की चप्पल कोई ले नही
जिते उते लखाणी बाटा
करके अपनो घाटा
लखाणी बाटा चमारच नां बापू
अपने को बाटा होता आये नही का
जरू जसी चिपकी है जात
ओको कसो काटता आये
पागल रे बापू तू

अरे, तब रापी कोन्ते कामकी ?'

या शेवटच्या ओळीतील 'रापी' हा शब्द किती अर्थच्छटांचं मोहोळ उठवतो, ते लक्ष्यात घेण्यासारखं आहे, 'समकालीन दलित कवितेने बोलभाषेला वक्तृत्वाच्या पातळीवर नेऊन सांस्कृतिक वास्तव सिद्ध केले आहे, विद्रोही व्यक्तिमत्त्वे उभी केली आहेत. अभिनिवेश, आवाजीपणाला नाकारून स्वाभाविक रूपात ही भाषा अभिव्यक्त झाली आहे. स्वाभाविक अर्थ ओलांडून एक नवी अर्थप्रतीती या भाषेने घडविली आहे' असं महेंद्र भवरे यांनी (दलित कवितेतील नवे प्रवाह) म्हटलं आहे ते यथार्थच आहे.

दलित कवितेचा विचार आपण स्वतंत्रपणे करीत असलो तरी या कवितेचं नातं नारायण सुर्वे, अरुण कोलटकर, मनोहर ओक, तुलसी परब इत्यादी साठोत्तरी कवींच्या कवितेशी आहे असंही लक्षात येतं. याचं एक कारण बहुतेक साठोत्तरी कविता ही 'सेक्युलर' (धर्मातीत) स्वरूपाची आहे हे असावं. त्याचबरोबर दलित कवितेनं दिलेलं समाजभान ही एकंदरीत मराठी कवितेच्या दृष्टीनं एक महत्त्वाची उपलब्धी आहे याचा निर्देश करणं अत्यंत आवश्यक आहे. ■■■

काही कवितासंग्रह :

१९८७ *वाहरू सोनावणे, 'गोधड'; २०००, 'निवडक कविता'*
१९८९ *लोकनाथ यशवंत, 'आता होऊन जाऊ द्या !'; १९९५, 'आणि शेवटी काय झाले ?'*
१९८९ *१९९६, विलास शेळके, 'कॉलम'*
१९९० *भुजंग मेश्राम, 'ऊलगुलान'*
१९९१ *जगन्नाथ कांबळे, 'उद्ध्वस्त'*
१९९२ *भगवान भोईर, 'उन्हातलं झाड'*
१९९२ *दीपक त्रिभुवन, 'खोल खदानी'; १९९६, 'माणसाचा जनक आणि इतर कविता'*
१९९३ *बळवंत कांबळे, 'गावभोग'*
१९९३ *अरुण काळे, 'रॉक गार्डन'; १९९७, 'सायरनचे शहर'*
१९९३ *प्रज्ञा लोखंडे, 'अंत:स्थ'*
१९९६ *मनोहर जाधव, 'कधी कधी'*
१९९६ *राहुल वानखेडे, 'व्यवस्थाविध्वंस'*
१९९६ *आ सो शेवरे, 'दफरवेणा'*
१९९६ *विवेक द. मोरे, उठाव'*
१९९६ *१९९७, लहू कानडे, 'टाचा टिभा'*
१९९७ *सागर जाधव, 'उजेड'*
१९९७ *जावेद कुरैशी, 'बएत'*
१९९७ *प्रतिभा राजानंद, 'मला हवी असणारी पहाट'*
१९९७ *मोतीराम कटारे, 'दिशांताची पाखरं'; १९९९ 'शतकान्ताच्या क्षितिजापार'*
१९९८ *प्रकाश खरात, 'पार्थिव अपार्थिव'*
१९९८ *माधव सरकुंडे, 'मनोगत'*
१९९८ *जगदीश कदम, 'रास आणि गोंडर'*
१९९८ *महेंद्र भवरे, 'चिंताक्रांत मुलुखाचे रुदन'*
१९९८ *प्रकाश मोगले, 'दंभस्फोट'*
१९९८ *विठ्ठल शिंदे, 'चित्तरकथा'; २०००, 'रानगाणी'*
१९९९ *अविनाश गायकवाड, 'जंजाळ'*
१९९९ *उषा हिंगोणेकर, 'मुद्रालेख'*
१९९९ *आनंद विंगकर, 'आत्मटीकेच्या उदास रात्री'*
१९९९ *शिवा इंगोले, 'उजेडयात्रा'*
१९९९ *अमोल बागूल, 'ऋतूंचे मृत्युपत्र'*
१९९९ *कृष्णकुमार चांदेकर, 'पतुसा'*
२००० *उत्तम अंभोरे, 'पत्ता बदलत जाणारा गनीम'*
२००० *राम दोतोंडे, 'गल्ली बदललेला मोर्चा'*
२००० *आनंद गायकवाड, 'आखरीचं तुव्हच सडान चिबवीन'*
२००१ *सुनील कांबळे, 'टेळका'*

॥ नाटक ॥

▶ दिवाकर कृष्ण आचार्य

बाई दचकून जाग्या झाल्या. अंधारात क्षणभर काही समजेचना ! भानावर येताच स्वतःच्याच डाव्या हाताने दाबल्या जाणारा उजवा हात त्यांनी सोडवून घेतला. रात्र गडद होती. पहिल्या प्रथम त्यांनी आजुबाजूला चाचपून पाहिले. पलंगावर त्यांच्या दोन्ही बाजूंना उषा व निशा - त्यांच्या मुली, झोपलेल्या होत्या. त्यांच्या अंगावरचे कपडे नीट करत बाईंनी पांघरूण घातले. अजूनही त्यांची छाती धडधडत होती. चाळ्यातील शीर तडतडत होती. सर्व शरीर घामेजून ओलसर वाटत होते. घशाला मात्र उलट कोरड पडली होती ! पुढारलेले दात आणि वरचा ओठ यावर बाईंची जीभ वारंवार फिरली. पण काही फायदा झाला नाही. *पाणी पिणे भागच आहे तर !*

त्यांनी आवंढा गिळला.

काय झालं आपल्याला ? जाग कशी काय आली ? स्वप्न पडत होतं का ?...

मानेवरचा घाम पदराने पुसत, गादीवर हात रेटवत त्या उठल्या. दोन्ही गुडघे किरकिरले. पण ते त्यांना जाणवलेच नाही. स्वप्नाच्या तारेत त्यांनी स्वैंपाकखोलीतल्या अंधारातच पाणी पिले. आणि घरामागील मोरीमध्ये त्या आल्या, आणि बसल्या. दोन्ही पायांमधला चिकट ओलसरपणा जाणवून त्यांना धक्काच बसला !

त्या शरमल्या !

पण जराशाच !

खरं तर सुखावल्याच ! (लघवी सुद्धा किंचित चिकट होती !)

एकदम त्यांना स्वप्न अंधुकसं आठवलं !

कसलं विचित्र स्वप्न पाहिलं आपण !

बाईंना झावळं झावळं आठवत होतं.

वातावरणात एक अनिश्चित धूसरता... नेमकी वेळ कोणती ?... अंधाराकडे झुकणारी रात्रपूर्वेची संध्याकाळ की जरा फटफटणारी उदयापूर्वेची अर्धअंधारी रात्र ?... काही लक्षात येत नव्हते. जागा मात्र नाटकाच्या तालमीसाठी मिळालेला शाळेचा हॉलच होता. आपण पोहोचलो. किंवा आधीपासूनच होतो. दादांचेही तसेच ! तालमीसाठी जमलेल्या इतर कलावंतांचे अस्तित्व मात्र स्वप्नात जाणवत नव्हते... आबा-आजीचा प्रवेश सुरू होता. दादा बोलत आपल्या जवळ आले. त्यांची निकटता जाणवली. त्यांची निकटता आणि आपली निकड... जी कधी आपल्या लक्षातच आली नव्हती ! त्यांनी आपला हात त्यांच्या हातात घेतला. हात हातात जाताना जाणवली ती किंचित थरथर... छातीत धडधड... हात आवेगाने दाबल्या गेला आणि -

आणि बाई दचकून जाग्या झाल्या. पहाते तो आपलाच एक हात दुसऱ्या हाताने दाबल्या जात होता !

पण असं कसं स्वप्न दिसलं ? की आपल्याही

नकळत आपल्या मनात दादा शिरले आहेत ?...

बाई घरात आल्या, आणि खिडकीत टांगलेल्या पिंजऱ्यातून गोड हाक आली. 'मिठूऽऽ' आणि त्या पाठोपाठ मिठूच्या लांबलचक बोलण्याचा पट्टा सुरू झाला. अखंड, श्वासासाठीही न थांबणारा. मिठू जागच्या जागी त्याच्या डाव्या-उजव्या पायावर डोलत असावा. शेवटी बाईंनी त्याच्या पिंजऱ्याभोवतीचे कापड काढले. टोपलीतल्या शेंगा आणि पाणी दिले. त्याचे असे लाड झाल्यावर तो शांत झाला. पिंजऱ्याभोवतीचे कापड पूर्ववत टाकत बाई म्हणाल्या,

"हं ! झोपा आता"

कितीही टाळायचं ठरवलं तरीही बाईंची नजर नेहमीच्या कोपड्याकडे गेलीच. अर्धवट बांधलेल्या आडोशाआडची बेपटीवजा जागा बाबांना दिलेली होती. तिथेच त्यांचे वास्तव्य अन् विश्व. खरं तर ही जागा कोठीघराची. पण साठवून ठेवण्याजोगं धान्य बाईंनी आयुष्यात कधीही पाहिलं नव्हतं. या बेपटीवजा जागेतून बाहेरच्या बैठकीत आणि आतल्या स्वैंपाकघरात ये-जा करणे शक्य होते. पण बाबा क्वचित्‌च बैठकीत येत आणि स्वैंपाकघरात येण्याचा तर प्रश्नच नव्हता. त्या जागेतच त्यांच्या सर्व वस्तू व्यवस्थित लावल्या होत्या. बाबांच्या 'या' संसारात डोकावून पाहण्याची वेळ बाईंना फारशी येत नसे.

खिडकीतून येणाऱ्या रस्त्यावरच्या दिव्याचा प्रकाश कोपऱ्यात पसरला होता. बाबा गाढ झोपले होते - तोंड उघडे टाकून ! अंगात फक्त हिरव्या पट्ट्या-पट्ट्यांची अंडरपँट आणि अपेक्षेप्रमाणे उजवा हात आतमध्ये ! बाबा जागेपणी डावा हात शक्यतोवर पंचाने झाकत असत. तो हात ते पूर्णपणे दुमडू शकत नसत. कारण ढेपरामधील जखम कायम चिघळलेली असायची.

बाईंची नजर अखडलेल्या डाव्या हातावरून सरकत पंजावर स्थिरावली. नकळत बोटे मोजल्या गेली. एक, दोन, तीन, चार ! मधले बोटच नव्हते ! ते कधीतरी आपोआप गळून पडले होते. काहीही दुःख न देता.

बाईंची नजर पर उजव्या हातावर सरकली, आणि त्या पाठोपाठ त्यांच्या मनात उगवलेली किळस जाता जाईना.

: काढून टाकायचा का त्यांचा हात ? जाऊ द्या, मिळो त्यांना तेवढंच सुख ! नाही तरी ते उपाशीच नाहीत का ? पण त्यांची कींव केली की ते किती शेफारतात, ते आपण पूर्वी अनुभवले आहे. शिवाय ते जसे उपाशी आहेत तसे मग आपणही... अच्छा ! म्हणूनच तर हे सकाळचे स्वप्न नसेल ?...

बाई शहारल्या, त्यांच्या अंगावरची लव तरारली.

मग नवऱ्याची घृणा करण्यात काय अर्थ आहे ? शरीर कोणाला सुटले आहे ? सोडतो म्हटले तरी सुटत नाही हेच खरे !... हे सर्व बरोबर आहे का ? ज्याअर्थी हा प्रश्न मनात येतो त्याअर्थी हे बरोबर नाही. काय बरोबर आणि काय चूक हे कसे ठरवायचे ?

सुस्कारा सोडून त्या बाहेरच्या खोलीत आल्या. उताण्या झोपलेल्या मोठ्या मुलीस त्यांनी एका कडेवर केले. झोप चाळवू नये म्हणून त्यांनी मुलींच्या केसांमधून हात फिरवला. उषाचे कंबरेपर्यंत पोचणारे केस... महिन्यातून एका रविवारी तरी शिकेकाईमध्ये संत्र्यांची सालं टाकून त्या तिला न्हाऊ घालत. लहान्या निशाच्या डोक्यात उवांची खाण सापडली होती. त्यासाठी तिचा 'बापकट' केला होता !...

बाईंनी अंथरुणावर दोन्ही मुलींच्या मध्ये पुन्हा अंग टाकले. आईचा स्पर्श जाणवताच झोपेतही मुली दोन्ही बाजूंनी आईला बिलगल्या ! इतक्या घट्ट की, बाईंना श्वास घेणे मुश्किल !

"अंऽऽ ! काट्या मेल्या !! अगं जगू तर द्या गं ! सोडा मला... सोडा !! श्वास तर घेऊ द्या मेल्यांनो ! कुठे जात नाही मी पळून !"

अंगावरचे हात सारत बाई बडबडल्या. बाईंना झोप येईना. मनात स्वप्नाचेच विचार सुरू होते. एरव्ही हवेहवेसे वाटणारे मुलींचे हात जाचक व्हायला लागले !

त्यांनी मुलींचे हात हलकेच दूर केले आणि डोळे

मिटवून झोपेला बोलावले. पण ती कधीच दूरवर उडून गेली होती !..

मनात स्वप्नाचे च्युईंगम चघळणे सुरू झाले होते...

बाई मुद्दाम स्वप्न 'पाडण्याचा' प्रयत्न करू लागल्या. पण जिथे मुळात झोपच नव्हती तिथे स्वप्न काय पडणार फतरं ?

बाई नकळत स्वतःशीच बोलत राहिल्या -

कसलं भलतंच स्वप्न पडलं आपल्याला ? जिथे माणसाच्या हातात स्वतःचे आयुष्यच नसते, तिथे तर मग स्वप्न दूरच राहिले...

माणसाला स्वतःच्या मनाचे तळघर माहीत नसते तर !

जागेपणी आपल्याला दादांबद्दल काही वाटले होते का ?... दादांबद्दलच काय, तसे आयुष्यात कोणाबद्दलच कधी काही 'खास' असे कधी वाटल्याचे आठवत नाही.

...नाही कसे ? लग्नापूर्वी दुरून आतेभाऊ लागणारा मोठ्या भावाचा मित्र घरी यायचा. तो चोरून आपल्या हालचाली टिपत राहायचा. त्याचं ते जमेल तिथून आपल्याला निरखणं अंगावर हळूवार मोरपीस फिरल्यासारखं वाटत असे ! मग एक दिवशी अचानक त्याचं आपल्या घरी येणंच थांबलं ! कारण काही कळलं नाही. मग पुढे कधी तरी खूप वर्षांनी भाऊ बोलून गेला... त्याने म्हणे आपल्यासाठी मागणी घातली होती. पण त्याची नोकरी सरकारी नाही, या सबबीखाली बाबांनी ते स्थळ एका क्षणात झटकून टाकले... भाऊ सांगत होता की, एकदमच त्याची नजर जखमी झाल्यासारखी वाटली. दुखावलेल्या डोळ्यांनी एकवार त्याने आतल्या खोलीचा वेध घेण्याचा प्रयत्न केला. आणि 'चलतो मी' असे तोंडातल्या तोंडात अस्पष्ट असे पुटपुटत तो जो निघून गेला तो कायमचाच ! ही गोष्ट कळली तेव्हा सुद्धा हृदयात अशीच कालवाकालव झाली होती... पण म्हणून तो दूरचा आतेभाऊ कधी स्वप्नात डोकावला नाही.

तो आतेभाऊच कशाला, ह्यांचा सख्खा लहान भाऊबंडू आपल्यापेक्षा किती लहान होता ? तरीही सारखा मागे-पुढे, मागे-पुढे करायचा. इतके का आपण सुंदर आहोत ?... अगदी खरं तर आपण चारचौघी प्रमाणे सर्वसामान्य आहोत. तरी सुद्धा बंडू नेमका आपण साडी बदलतानाच माजघरात का यायचा ? शेवटी त्याला राहावले नाही, तेव्हा पटकन् बोलून गेला -

"वहिनी, साडी बदलताना तुम्ही अधिकच सुंदर दिसता !' त्यावेळी सुद्धा आपण त्याला हेच समजावले होते -

"भाऊजी, मी सुंदर नाही. सुंदर आहे ते तुमचे वय ! या वयामुळे मी तुम्हाला सुंदर दिसते आहे. माझे ऐका, तुम्ही फक्त नोकरीची सुरूवात करा, मी माझ्यापेक्षाही अधिक सुंदर मुलगी हेरून ठेवली आहे. तुमच्याशी तिचे लग्न लावून देईन."

अचानक 'हे' तिथे आले ! त्यांनी काहीतरी अर्धवट ऐकले होते. माजघरात साडी बदलणारे आपण आणि दारातच उभा लहान दीर पाहून ह्यांचा केवढा तरी तीळपापड झाला होता ! त्यानंतर त्यांनी लहान भावास आपल्याशी बोलू देण्यास मज्जावच केला होता...

दीराने त्याची पासंती स्पष्टपणे ऐकवली होती. पण तरी देखील तो कधी असा मनात उगवून स्वप्नात डोकावला नव्हता !..

आणि सर्वात जास्त कहर होता तो मात्र त्या सरपंच्याचाच ! त्या गावावरून बस जरी गेली तरी हृदय धडधडतं आणि एस.टी. कधी एकदाची ते गाव सोडते असे आपल्याला आजही वाटते. तो त्या गावच्या शाळेतला शेवटचा दिवस होता. बदलीच्या गावातील शाळेत आपली ड्यूटी सुरूही झाली होती. आता फक्त शाळेत जावून आधीच्या महिन्याचा पगार घ्यायचा राहिला होता. आपण शाळेत जावून पोहोचलो तेव्हा शनिवारची शाळा संपली होती. आणि चपराशाने निरोप दिला की "तुमची वाट पाहिली. शेवटी नाईलाजाने तुमचा पगार सरपंचसाहेबांच्या

घरी ठेवला." आपण तडक त्यांच्या घरी गेलो. आपले सर्व लक्ष पगाराकडे होते आणि सरपंचाची नजर मात्र आपल्यावर होती. पगार देताना त्यांनी हातच धरला. तो आणखी काही करण्याच्या आत अंगात कुठून बळ संचारले देव जाणे ! आपण हिसडा मारून हात सोडवून घेतला आणि तडक दाराबाहेर जावून उभे राहिलो. आणि तिथूनच त्याला सुनावले, "साहेब मी आत्ता इथे तमाशा करू शकते. बऱ्याबोलाने माझा पगार द्या. आता यानंतर मी कधीही तुमच्या गावात पाय टाकणार नाही" सरपंच अगदी शरमून गेला होता. त्याने दारातच पगार जमिनीवर ठेवला. आपण तो उचलला आणि एक क्षणही न गमविता धावतच एस. टी. स्टँड गाठले होते...

हे असे आपल्या आयुष्यातील निरनिराळ्या पुरूषांचे अनुभव. कमी अधिक सर्व पुरूष जवळपास सारखेच. पण या पैकी कोणीही आपल्या मनाचा ताबा घेतला नाही. तो ताबा या दादांनी कसा घेतला आणि तो ही इतक्या लवकर ? पुरे चार महिनेही झाले नाहीत त्यांना भेटून. पूर्वी त्यांना कधी पाहण्याचा प्रसंगच आला नव्हता. आपण त्यांच्याबद्दल फारसे ऐकले ही नव्हते. त्यांची भेट झाली ती नाटकाच्या तालमीचा नारळ फुटला तेव्हा आणि तो दिवस होता पंधरा ऑगस्ट !

●●●

"चौदा ऑगस्ट" शेखर पुटपुटला. काऊंटरवरूनच हात लांब करून त्याने चौदा ऑगस्टची तारीख कॅलेंडरवरून फाडली आणि तिचा चोळामोळा करून तो गोळा न बघता दुकानाबाहेर भिरकावला...

दुकानाच्या पायरीपर्यंत सायकल भिडवून उभे असलेल्या दादांनी तो अलगद झेलला. आणि नाटकी ढंगात ते म्हणाले -

"फेका ! फेका !! गरिबाच्या अंगावर कचरा फेका." - आवाज ऐकू येताच शेखरने डेकचा आवाज कमी केला. आणि मागे वळून रस्त्याकडे पाहिले.

"अरेच्या ! दादा तुम्ही कधी आलात ? माझं लक्षच नव्हतं."

"कसं असणार. तुम्ही पडले मालक आणि मी पडलो..."

"पुरे झालं दादा आता नाटक. आधी दुकानात या"

पण दुकानाच्या थेट पायरीला सायकलचे पुढचे चाक टेकवून उभे असलेले दादा हलायला तयार नव्हते. सायकलच्या सीटवर बसल्या बसल्या दादांनी बुटाचा पाय जमिनीवर टेकवला होता. उन्हात त्यांचे टक्कल आणि चष्मा प्रकाश परावर्तित करीत होता. अंगानेटका भडक चौकड्यांचा शर्ट त्यांनी पांढऱ्या शुभ्र पँट मध्ये व्यवस्थित खोचला होता. त्याखालचे चमकदार काळे बूट जरासे पोलिसांच्या धाटणीचे होते. जरा बाहेरच ओथंबणारे पोट त्यांनी पट्ट्याने करकचून आवळले होते.

"अहो जरा आत पायधूळ झाडता की रस्त्यावरूनच संवाद फेकता ?"

"दुकानात यायला काही हरकत नाही. पण एका अटीवर..."

"कोणती ?"

"आधी तुमचे ते भसाड्या आवाजातील ध्वनीप्रदूषण करणारे 'पाप' संगीत बंद करा. आणि आमच्या आगमनाप्रित्यर्थ आशा भोसलेंचे नाट्यसंगीत लावा."

शेखरने कॅसेट बदलली.

"हं आता कसं झकास वाटतंय" म्हणत ते सायकलवरून उतरले आणि एखाद्या महाराजाप्रमाणे पायऱ्या चढत दुकानात शिरले. आणि विचारते झाले -

"आमचे सिंहासन कोठे आहे ?"

शेखरही मग तत्परतेने स्वतःच्या खुर्चीवरून उठला आणि ती झटकवून कंबरेत वाकत म्हणाला -

"महाराज आसनस्थ व्हा !"

दादा महाराजांसारखे सिंहासनावर बसले आणि चोहोकडे पहात त्यांनी चौकशी केली -

"आमच्या राणीसरकार कुठे आहेत ?"

"त्या गेल्या असतील परसाकडेला ! पुरे करा नाटक. नाट्यगीत ऐका."

"अच्छा अच्छा नाटक संपवतो ! काय म्हणतो धंदा ?"

"धंदा सुरू आहे त्याच्या गतीने. तुम्ही कशी काय वाट वाकडी केली ते सांगा ?"

"विशेष काही नाही. डॉक्टरांचे कॉल्स उरकले. घराकडे जाताना म्हटलं तुम्हाला पहावं"... शेखर केवळ त्यांच्याकडे पहात राहिला. ते विषय कधी सुरू करतात याचा अंदाज घेत राहिला.

"उद्या पंधरा ऑगस्ट आहे... म्हणून तुम्ही दुकान बंदच ठेवणार ना ?"

"कुठे जायचे आहे" - शेखरने नेमके विचारले.

"जायचं असं कुठे आहे, पण समजा वेळ असता तर गेलो असतो..."

"कुठे ते सांगा ना"

"विद्यापिठात ?"

"बापरे ! इतक्या दूर आणि कशासाठी ?"

"नाटकाच्या मुहूर्तासाठी"

"अरे वा ! नाटक !... अहो पण तुम्ही तर -"

"सोडलेलेच आहे ! मी नाटक सोडलेलच आहे. हे माझे नाटक नाही. माझ्या हस्ते फक्त नाटकाचा मुहूर्त व्हावा अशी निर्मात्याची इच्छा आहे."

"कोण आहेत निर्माते ?"

"नारायण माने. तोच निर्माता दिग्दर्शक आहे. तसा तो माझा शिष्यच असल्याने मुहूर्ताचे नारळ माझ्याच हातून वाढवून घ्यावे अशी त्याची इच्छा आहे."

"अच्छा, त्या मुहूर्तासाठी आपण सोबत जावे असे तुमचे म्हणणे आहे तर... ठीक आहे. किती वाजता जायचे आहे ?"

"दुपारी बारा वाजता"

"काही हरकत नाही. जावू आपण. पण मला वाटतं तुम्ही जरा सांभाळूनच रहा. नाहीतर नेहमी प्रमाणे हेही नाटक तुमच्या बोकांडी बसेल !"

"नाही. तसे होणार नाही. ज्या अर्थी लोकांना माझ्या हस्ते मुहूर्त करवून घ्यावा वाटतो त्या अर्थी लोकांनी मला आता रिटायर्ड केले आहे."

"ठीक आहे पाहू या काय होतंय ते."

"ओ. के. थँक्स. चलतो मी"

दादा मेडीकल रिप्रेजेंटेटिव्हची चामड्याची बॅग उचलत म्हणाले -

"मग उद्या दुपारी बाराच्या पूर्वी तुम्ही माझ्या घरी या. इथून आपण सोबत निघू."

शेखरला एक नाटकी सॅल्यूट ठोकून दादा गेले. शेखर त्यांच्याकडे पहात राहिला.

●●●

जुन्या शहरातील गल्ली बोळांमधून शेखरची स्कूटर चालली होती. अरूंद गल्ल्या, तुंबलेल्या नाल्या आणि गटारं, बाया बापडे, म्हातारे कोतारे, क्रिकेट खेळणारे गल्लीतले धोनी-सेहवाग, भटकी कुत्री आणि डुकरांचे जथ्थे यामधून शेखरची स्कूटर चपळाईने अडथळ्यांची शर्यत पार करीत वडाच्या झाडाखाली येवून थांबली. दादांचे घर तिथून जवळच होते. आणि घरापर्यंत स्कूटर नेणे शक्य नव्हते.

पायी चालत शेखरने दादांची चाळ गाठली.

"आहेत का दादा घरी ?"

"बाई बाई ! आज वेळ सापडला का तुम्हाला ? फारच महाग झाले भाऊजी तुम्ही !"

वहिनी साडीचा पदर तोंडापुढे धरून ओसरीवरून बोलत होत्या. वहिनींचे फक्त डोळे आणि अर्धवट नाक दिसत होते. आणि तेच शेखरचा जरा ठीक वाटले. कारण शेखरला वहिनींचा पदराआडचा चेहरा नेहमीच अवघडलेला, कडूमडू वाटत हसे. म्हंजे असे की, परसाकडेला जोऱ्यात लागलेली असावी आणि संडासाची सोयच नसावी अशासारखे भाव त्यांच्या चेहऱ्यावर असत.

"दादा आहेत ना घरी ?" - शेखरने अंगणातूनच विचारले.

"आता घरात येता की बाहेरूनच साऱ्या चौकशा करता ? इतके कधीपासून महाग झालात ?"

"आम्हा दोघांनाही एका ठिकाणी जायचे आहे."

"आधी मुकाट्यानं आत या ! हे येतातच आहेत तोवर माझा चहा होतोच."

शेखरचा नाईलाज झाला. जोडे काढून तो आत बसला तेवढ्यात -

"अरे व्वा ! आलात का राव ? गाडी एकदम राईट टाईम सुटणार असे दिसते." म्हणत दादा गडगडाट करून हसले. शेखरने वळून पाहिले, अंडरपँट आणि छिद्राछिद्रांच्या बनियनवरचे दादा कानावरचे जानवं उतरवत होते.

"अच्छा ! म्हणजे जैन लोकसुद्धा जानवं घालतात तर !"

"तुम्ही येण्यापूर्वी म्हटलं 'ग्रीनरूमला' लावून यावं !"

"ग्रीनरूम ?" - शेखरला काही कळले नाही.

झाले ! दादांना मोठ्याने हसायला तेवढेच कारण पुरेसे होते.

"ते नाही सांगणार बा आम्ही ! ते आमचे अगदी 'टॉप सिक्रेट' आहे. ते तुमचे तुम्हालाच शोधून काढावे लागेल." म्हणत दादा परत मोठ्याने हसले. दादांचं हे नेहमीचं होतं. अगदी क्षुल्लक गोष्टीतला विनोदही ते प्रचंड समजायचे. अन् स्वतःच हसायचे.

"तुमचे टॉप सिक्रेट घाला चुलीत. नाहीतर घरात रॉकेल नाही की लाकडं नाहीत. आधी हा चहा घ्या. अन् मग जा कुठेही दिवसभर उंडारायला !" वहिनी चहाचे कप देत म्हणाल्या.

शेखरलाच कसे तरी वाटले. पण दादांच्या चेहऱ्यावरचे स्मितहास्य जराही कमी झाले नव्हते.

"गरिबाचा चहा गोड मानून घ्या." - वहिनी.

"मानून घ्यायचा प्रश्न येतोच कुठे ? खरोखरच तो अती गोड झाला आहे. काय शेखरराव बरोबर आहे की नाही ?" - एका दमात चहा संपवून कप बायकोला परत देत दादांनी विचारले.

आता यावर काय बोलावे ते शेखरला समजेना. कप तोंडाला लावून त्याने चहा पिणे लांबविले. तोवर दादा बाहेर पडण्यास तयार झाले.

शेखर त्यांना निरखत होता. *ठेंगणे, आडवे शरीर, डोळ्यावरचा चष्मा आणि डोक्यावरचे चकाकते टक्कल या जरी वाढलेल्या वयाच्या खुणा होत्या; तरीही कपड्यावरील चित्रविचित्र नक्षी आणि एकंदरच भडक रंगसंगती, तंग पँटमध्ये व्यवस्थित खोचलेला अर्ध्या बाह्यांचा शर्ट, पॉलिश केलेला जोडा आणि मुख्य म्हणजे सदैव जागृत राहणारा त्यांच्यातला अवखळ मुलगा, यामुळे दादांचे वय लपत होते.*

शेखर उठला.

"घ्या ना सोप सुपारी !" - उगाचच इकडे तिकडे पहात वहिनी म्हणाल्या.

"नको" - घरातली सोप सुपारी लवकर सापडणार नाही. असे शेखरला वाटले.

"माझी पुडी कुठे आहे पहा बरं" दादा म्हणाले.

"काही नाही. सगळं संपलं. बाहेर जातच आहात तर तिकडेच विकत घ्या. आणि हो मुख्य म्हणजे इलेक्ट्रीकचे बिल कधी भरणार आहात तुम्ही ? तो 'एमएसीबी'चा माणूस कालच लाईन कापणार होता. मोठ्या मुश्किलीने त्याला परतवलं."

"पहातो ना" - दादा.

"तुम्ही रोजच असे म्हणता. तुम्ही बाहेर पहाता, मी तुम्हाला घरात पहाते ! काय वाटेल ते करा पण ती लाईन कटू देवू नका. लेक जावई येण्याचे दिवस आहेत. लोकांसमोर तमाशा नको."

शेखरला तिथे उभे राहवेना.

"मी जरा एक मिनिटात आलेच." - शेखर दादांना

करंगळी दाखवत म्हणाला.

"जा ना तिकडे." - म्हणत दादांनी बाजूलाच हात दाखविला.

संडासाचे जुनाट टपरी दार जंगाटल्याने खालून सर्व कुरतडलेले होते. आत जाताच, शेखरला भपकारा असह्य झाला. संडास जुन्या पद्धतीचा होता. शेखरने श्वासासोबत डोळेही गच्च बंद केले. आणि कशीबशी उरकून तो पळून आला.

"कशी वाटली ग्रीन रूम ?" दादा.

"ग्रीन रूम ?" - शेखरला काही कळेना.

"अहो आताच नाही का तुम्ही ग्रीन रूमला भेट देवून आलात ? ग्रीन रूम कशाला म्हणतात माहीत आहे ना ?"

"हो... म्हणजे जिथे नाटकाच्या वेळी मेकअप वगैरे करताच तेच ना ?"

"बास बास. तीच ग्रीन रूम. त्याचं काय झालं, घरामध्ये थोडासा हिरवा रंग पडून होता. तो इतका कमी होता की कुठे द्यावा तेच कळत नव्हतं. म्हणून शेवटी तिथेच देवून टाकला. आणि नाव ठेवलं 'ग्रीन रूम'. त्याचं असं आहे, आपण नेहमीच नाटकाच्या मूड मध्ये राहतो."

"अहो हे तर काहीच नाही. क्वचित एखादवेळी ह्यांच्या सायकलवर डबलसीट बसायची वेळ येते. तेव्हा मी ह्यांना आधीच बजावते... सरळ सरळ नाकाच्या रेषेत सायकल चालवणार असाल, तरच मी तुमच्या सायकवर बसते. अरे म्हणजे होतं काय की, काहीच गरज नसताना रंगमंदिराच्या रस्त्यावरून हे सायकल काढतात ! तिथे डावी उजवीकडे सिनेमाच्या - नाटकाच्या जाहिराती असतात. त्या पाहत पाहत सायकल चालवतात. आपण काही बोलावं तर म्हणतात, नाटक पाहू शकत नाही तर निदान नाटकाचा बोर्डच पाहतो. त्याला काही पैसे पडत नाहीत !"

शेखरने दादाकडे पाहिले. दादा मिशीतल्या मिशीत हसत होते !

"अहो मग वाचू देत जा" - शेखर.

"बोर्डस् वाचायला कोण नाही म्हणते हो ?... पण बोर्ड पहायलाही काही मर्यादा असते की नाही ? रंगमंदिर ओलांडून जाता, तरीही मान वाकडी करून तुम्ही पाहतच राहता..."

काही न बोलता शेखर बाहेर पडला. स्कूटरला तो किल्ली लावणार तेवढ्यात दादा म्हणाले - "आणा. मी चालवू ?"

"नंतर... एकदा हे जुनं शहर मागे पडलं की गाडी मी तुम्हाला देतो."

दादांना स्कूटर चालविणे आवडते हे शेखरला माहित होते. शेखर त्याची स्कूटर दुसऱ्या कोणाला देत नसे. पण दादांची गोष्टच वेगळी होती. ते वयाने मोठे असूनही एखाद्या समवयस्क मित्राप्रमाणे वागत. शेखरच्या घरी अधूनमधून ते येत, त्यावेळी बैठकीत बसून शेखरच्या वृद्ध बाबांशी ते जैन धर्माबद्दल गंभीरपणे बोलत असत. आणि थोड्यावेळाने अंगणात खेळणाऱ्या शेखरच्या लहान मुलाशी क्रिकेट खेळू लागत. एखाद्यावेळी शेखरच्या म्हाताऱ्या आईला पेटीवर 'आला आला गंऽ सुगंध मातीचा' हे भावगीत मनःपूर्वक गाऊन दाखवीत. कधी वेळ पडल्यास स्वैंपाकघरात शिरून शेखरच्या बायकोला कचोरीचे सारण कसे करायचे आणि नेमके केव्हा आणि काय केले म्हणजे कचोरी टरटर फुगत वर येते आणि कढईमध्ये तरंगायला लागते, हे प्रत्यक्ष करून दाखविले होते. कारण पूर्वी त्यांचे एक शाकाहारी उपहारगृह होते. भाऊबंदकीमुळे त्यांना त्यांच्या हॉटेलवरचा अधिकार सोडून द्यावा लागला होता. तसे त्यांचे फारसे शिक्षणही झाले नव्हते. पण आत्मविश्वासाने ते कामचलावू इंग्रजी बोलू शकत असत. आणि त्याच्या जोरावर ते एका छोट्याशा औषध कंपनीचे रिप्रेजेंटेटीव म्हणून काम करत. संगीत, कला, नाटक हा त्यांच्या आणि शेखरमधल्या मैत्रीचा बळकट दुवा होता.

"दादा, तुम्ही काही नाटकापासून दूर राहू शकत नाही. नाटक सोडलं असं म्हणता म्हणताच तुम्ही मागील

अनुक्रमणिका

दोन वर्षे नाटक सादर केले."

"हं. हे काही अंशी खरे आहे. एकदा मा माणसाच्या चेहऱ्याला रंग फासल्या गेला की त्यापासून सुटका होणे कठीण ! तो रंगच जणू तुमच्या चेहऱ्याचा खरा रंग होतो. त्या रंगाची माणसाला एक 'खाज' असते. 'नाटक' म्हटलं की शिकारी कुत्र्याप्रमाणे आपले कान टवकारून उभे राहतात. खरं तर टी. व्ही. मुळे नाटकाचे दिवस जणू संपल्यासारखे वाटतात ! कामगार आणि राज्य नाट्यस्पर्धांना पूर्वीसारखा प्रतिसाद उरलेला नाही. तरीही हे कंडबाज लोक निष्ठेने नाटक करतात."

"लोकांचं सोडून द्या. पण तुम्ही जर दरवर्षी कुठेतरी नाटक सादर करताच तर मग 'नाट्यसंन्यास' घेतला असं कशाला बोलता ?"

"या हौशीखातर सादर होणाऱ्या नाटकात दिग्दर्शकाची सर्व प्रकारची हानी होते. नाट्यप्रयोग कितीही चांगला सादर केल्या जावो किंवा तो फसो, दिग्दर्शकाने सारखीच मेहनत घेतलेली असते. मला तर उलट असे वाटते की, पडलेल्या नाट्य प्रयोगाच्या वेळी दिग्दर्शकाचा जास्तीत जास्त ऱ्हास झालेला असतो. त्याचे शारीरिक, मानसिक, आर्थिक, लौकिक, सर्वसर्वांचे दिवाळे निघालेले असते. अशा परिस्थितीत आता यानंतर कधीही नाटक करणार नाही असेच वाक्य तोंडातून बाहेर पडणार."

"आणि तरीही पुढच्या वेळेला पहिले पाढे पंचावनचे ! आजही तुम्ही नाटकासाठी चालले आहातच आणि वर मला नाट्यसंन्यास घेतला आहे असे सांगताच." - शेखर.

"पुरे करा तुमचे स्कूटर चालविणे. आता द्या माझ्या ताब्यात."

शेखरला काही मार्गच उरला नव्हता. त्याने डावीकडे स्कूटर थांबविली आणि तो स्वतः मागे बसला.

"शेखर, एका अर्थाने हा माझा नाट्यसंन्यासच आहे. अरे ज्या अर्थी तो माने माझ्या हाताने नाटकाचा नारळ फोडून घेत आहे, त्या अर्थी कुठेतरी त्यानेही माझा नाट्यसंन्यास स्वीकारला आहे. हे पहा, ही माझी संस्था नाही. तेथे जमा होणाऱ्या कलावंतांना मी ओळखत नाही. किंवा खरं तर तिथे कोण येणार याची मला माहिती नाही किंवा त्यांच्याशी माझं काही देणं घेणंही नाही. मी नाटकाचा निर्माता दिग्दर्शक किंवा सादरकर्ताही नाही. मी फक्त नारळ फोडणार आणि बाजूला होणार. मग हा माझा नाट्यसंन्यासच नाही का ?..."

विद्यापीठाची इमारत गावाबाहेरील टेकडीवर होती. वारा जोरात होता. कितीही समोर वाकले तरी शब्द नीट कळत नव्हते. शेवटी शेखरने नाद सोडून दिला.

विद्यापीठाच्या नाट्यगृहासमोर दादांची स्कूटर डौलात येवून थांबली. पांढऱ्यास्वच्छ नेहरू शर्ट आणि चुस्त पैजाम्यातला माने अत्यंत नाटकी पद्धतीने नमस्कार करत समोर आला. शेखरला एकदम कसेतरीच वाटले. मानेच्या मागे जरा अंतरावर नाटकातील इतर कलावंत उभे होते. त्यांच्या नजरेत दादांबद्दलचे कुतूहल आणि आदर ओसंडून वाहत होता. माने त्याच लकबीने जवळ आला. आणि त्याने दादांच्या पायांना स्पर्श केला.

"अरे बापरे ! शालजोडीतली आहे की तेलात बुडवून ठेवली होती ?" - म्हणत दादांनी त्याला वरचेवर अलगद उचलले. आणि -

"वा रे मेरा ग्रब्रू !" म्हणत खो खो हसत त्याला जवळ कवटाळत दोनतीनदा छातीशी लावले. शेखरलाच लाजल्यासारखे झाले. 'हे' दादा त्याला काही 'वेगळेच' वाटले. एकटा शेखर सोडून जमलेल्या सर्व जथ्थ्यावर खुशीची लहर पसरली होती. शेखरचे लक्ष एका वयस्कर बाईंकडे गेले. बहुदा ती दादांबद्दलच शेजारच्या तरूण मुलीजवळ चौकशी करत असावी. ती तरूण मुलगी शेखरच्या पाहण्यातली होती, पण शेखर तिला प्रत्यक्ष ओळखत नव्हता. ती सारखी दादांकडे पाहत त्या वयस्कर बाईंच्या कानात काहीतरी सांगत होती...

कोणीतरी विचारले -

अनुक्रमणिका

"काय दादा, गाडी कधी घेतली ?... तुमची नां ?"

"म्हटलं तर आपलीच ! मी गाडी चालवत आलो ना ? म्हणजे माझीच !" शेखरकडे पाहून डोळा मारत दादा हसत हसत बोलले. शेखरनेही मग बळे बळेच मान डोलावत हसून दिले.

"चला चला ! आधीच उशीर झालाय." - कोणीतरी बाई बोलली.

"ओह ! येस. चला लवकर हॉलमध्ये" - माने.

"आज पहिल्यांदाच सर्व कलावंत जमले आहेत, की नाटकाची तालीम आधीपासून सुरू केली होती ?"

"नाही तसे नाही. यापैकी काही लोकांना नाटक माहित आहे. म्हणजे वाचन वगैरे झालेले आहे. दोन चार महत्वाचे रोल पक्के झाले आहेत."

"मागच्या पंधरा दिवसांपासून त्यांची थोडीफार तालीम घेत होतो. पण नाटकाचा मुहूर्त आज आहे."

मंचावर भारतीय बैठकीच्या समोर टीपॉयवर सरस्वतीची आणि नटराजाची मूर्ती, हार, फुले, उदबत्त्या, कापूर, नारळ इत्यादी पूजेच्या वस्तूंची नीटसपणे मांडणी करून ठेवली होती. रंगमंचावर चढताना सगळ्यांनी आपआपल्या चपला जोडे खालीच काढून ठेवल्या. शेखर मात्र जोडे काढायला काचकूच करतो आहे असे दादांच्या लक्षात आले.

"जोडे काढा, जोडे !" - दादांनी सुचविले.

शेखर दादांच्या कानाशी लागला आणि म्हणाला,

"माझ्या एका मोज्याला अंगठा आहे ! काय करू - मोजेच काढून टाकू का ?"

"नको नको ! वासाने सर्व कलावंत बेशुद्ध पडतील ! पटकन् जोडे काढ अन् चटकन् मंचावर ये. मग तिथे मी तुला एक गंमत सांगतो."

शेखरचा नाईलाज झाला. जोडे काढून पाय लपवत, तो सर्व मंडळींच्या मागे चोरासारखा बसला. पण इतर त्याच्यासाठी बाजूला सरकत व त्याला समोर बसवत. यामुळे शेखर अगदी समोर दादांच्या बराच जवळ पोहचला.

माने साहेब उभे राहून प्रास्ताविक बोलायला लागले होते. जमलेल्या कलावंतामध्ये अजूनही थोडीशी कुजबूज चालूच होती. मानेचे भाषण सुरू असताना दादा शेखरकडे वळले. अन् हळू आवाजात त्याला म्हणाले -

"तुमच्या मोज्याला काय, फक्त अंगठाच आहे. माझ्या मोज्यांना तर संपूर्ण टाचच आहे." स्वतःचा पाय किंचित वर उचलून शेखरला दाखवत दादा म्हणाले. अन् हळू आवाजात त्याला म्हणाले -

"तुमच्या मोज्याला काय, फक्त आंगठाच आहे. माझ्या मोज्यांना तर संपूर्ण टाचच आहे." स्वतःचा पाय किंचित वर उचलून शेखरला दाखवत दादा म्हणाले. शेखरला एकदम फस्सकन हसूच आले. भाषण करताना काहीतरी गडबड आहे हे मानेंच्या लक्षात आले होतेच. भाषण थांबवून त्यांनी शेखरकडे एकदम रागावून बघितले.

शेखर वरमला. काहीतरी करायचे म्हणून त्याने हात लांबवून दादांजवळ पडलेले नाटकाचे पुस्तक घेतले. आणि एखाद्या आज्ञाधारक विद्यार्थ्याप्रमाणे तो पुस्तक पहायला लागला.

'दिव्याखाली अंधार !' मानेच्या भाषणाकडे दुर्लक्ष करत शेखर पुस्तक चाळू लागला. 'दिव्याखाली अंधार !' दोन अंकी स्वतंत्र सामाजिक नाटक. लेखक, दिग्दर्शक, पात्रपरिचय, आबा, आजी, जजसाहेब, शिल्पा, रामागडी... पानं उलटून चाळताना नाटक अगदीच सर्वसामान्य पठडीतले आहे. हे शेखरच्या लक्षात आले.

तोवर मानेंनी भाषण आवरते घेतले. आणि दादांना पूजेसाठी आणि आशिर्वादपर दोन शब्द बोलण्यासाठी आमंत्रण दिले. दादा थोडक्यात पण मुद्देसूद अन् चमकदार बोलले. ते काहीतरी विनोदी बोलणार हे आधीपासून गृहित धरलेल्या मूठभर श्रोत्यांनी हसून हसून प्रतिसाद दिला. शेखर कंटाळला. दादांच्या हस्ते मुहूर्ताचा नारळ फुटला. तोवर चहा आला. आणि शेखर दादांशी घरी परतण्यासाठी

बोलणार, तोच माने म्हणाले -

"आता आलाच आहात तर थोडी तालीमही पाहून घ्या."

आणखी थांबायच्या कल्पनेने शेखरचा चेहरा पडणार तोच दादा म्हणाले -

"काय शेखरराव, थोडं थांबायला काही हरकत नाही ना तुमची ?"

शेखरने फक्त मान किंचित हवली. त्याचा 'हो' असाच अर्थ घेवून दादांनी स्वतःची बैठक जमविली. मानेच्या अंगात एकदम नाटक संचारले. त्याने स्वतःच रंगमंचावरील सामान आरडा ओरड करत हलवले. कलावंतांना सूचना दिल्या. आणि तालीम सुरू करण्याचा आदेश दिला.

त्यासारशी पूजेचे सामान हलवणाऱ्या बाईने रंगमंचाला नमस्कार केला. आणि त्या उभ्या राहिल्या. "दादासाहेब ही आजी." बाईंनी समोर येवून दादांना नमस्कार केला. दादाही मग "अहो अहो कशाला" म्हणत मोकळेचाकळे हसले.

"तशी माझी पद्धत आहे." - बाई म्हणाल्या.

"पद्धत आहे हे मान्य आहे. पण नमस्कार माने साहेबांना करा. ते तुमचे दिग्दर्शक आहेत. मी कोण आहे तुमचा ? कोणीच नाही !"

काही न बोलता बाई आपल्या जागेवर जावून उभ्या राहिल्या. शेखर त्यांना पहात होता. बाईंची मध्यम उंची, चालणं, आवाज, निमगोरा वर्ण यामुळे बाई 'आजी' वाटत नव्हत्या. समोरचे दात थोडे बाहेर असल्यामुळे की काय, शेखरला त्या जरा जास्त हसऱ्या वाटल्या.

"अरे आबा कोठे आहे ? कुठे गेला हा ? आताच तर इथे होता !" - मानेंचा आवाज हळूहळू चढायला लागला. तेवढ्यात सभागृहातील एका कोपऱ्यात चुळबूळ जाणवली. सगळ्यांचे लक्ष तिकडे गेले.

"सर हा आबा इथे लपला आहे."

"अरे काढ त्याला बाहेर. चल रे लवकर. वेळ कमी आहे."

"आज नको सर. आपलं चांगलं सेट झालं की मगच लोकांसमोर करू."

"माने, ही इज फीलींग ऑक्वर्ड. तालीम राहू द्या." - दादा म्हणाले.

"असं कसं ? असं कसं ? उद्या तर तो प्रेक्षकांसमोरही असाच लाजेल. आणि तुम्ही का कोणी परके आहात ? चल रे शाम, ठाकू नको !" म्हणत माने उठले. आणि श्यामच्या दिशेने जावू लागले. नाईलाजाने श्याम उठला. आणि ढकलल्यासारखा रंगमंचावर गेला.

"तुम्ही काही काळजी करू नका. वाटल्यास मी डोळे बंद करून घेतो. आणि चुकून उघडलेच तर तुमच्याकडे न पाहता या आजींकडे पाहत जाईल." दादा म्हणाले.

हे ऐकून आजी चक्क लाजल्या ! त्या बरोबर सर्व मोकळे झाले. आणि हसायला लागले. आबांनाही मग हसून साजरे करावे लागले.

तालीम सुरू झाली. पण शेखरच्या काही केल्या लक्षात येईना. मानेंनी सांगितल्यामुळे ते सर्व तालीम करत तर होते, पण दादांच्या उपस्थितीमुळे खुलत नव्हते. सगळ्यात जास्त वाईट परिस्थिती 'आबांची' होती. तो अजिबात म्हातारा वाटत नव्हता. त्याच्या तरूण वयाप्रमाणे तो पाठ केलेले वाक्य फेकत होता. पण त्याचा नाटकातल्या आबाशी, आबांच्या वाक्यांशी, आजीशी, तिच्या दुःखाशी अजिबात संबंध नव्हता. मुळात तो आजीशी बोलत नव्हता. तो इतक्या मोठ्याने ओरडत होता की आजीही मोठ्याने व अतिजलद गतीने जाणाऱ्या आगगाडीप्रमाणे आजीचे काम करणाऱ्या बाई बोलायला लागल्या. शेखर दादांकडे पाहत वेडीवाकडी तोंडं करायला लागला.

दादा मानेंच्या दिशेने किंचित झुकले. त्याचक्षणी माने ताबडतोब उठले. आणि दादांच्या पुढे कंबरेत झुकले. दादा पुटपुटले -

"या भडभुंज्याला काहीच सांगितले नाही का ?"

माने ओशाळवाणे हसत म्हणाले -

"आबांचाच तर प्रॉब्लेम आहे. त्यातल्या त्यात याला थोडे फार जमते. पण जे काही त्याला मी सांगू शकलो ते तुमच्या उपस्थितीमुळे गर्भगळित झाले !"

समोरचे दोघेही आपल्याबद्दलच बोलताहेत हे ओळखून आबा अधिकच बिथरले.

"सांगा ना ! सांगा ना ! त्याला काही" - दादा.

दादांची आज्ञा मिळताच माने तालमीत घुसले. आणि आबांना 'डायरेक्ट' करू लागले. सर्वांसमक्ष फक्त आपल्यालाच सूचना देत आहोत, हे पाहून आबांचा आणखीनच 'इगो हर्ट' झाला ! आणि ते तिरसटल्याप्रमाणे वागू लागले.

मानेंची मात्रा लागू पडली नाही. हे दादांच्या लक्षात आले. त्यांनी भुवया कपाळावर दोन वेळा उडवल्या. मानेंनी खालचा ओठ दुमडत खांदे उडवले. काहीच न सुचून माने परतले. ते थेट दादांच्या अगदी जवळ आले. चेहऱ्यावर लाचारी आणत, लाडीगोडी लावत ते दादांना म्हणाले -

"तुम्ही पाहता का जरा !... सांगता का त्याला काही... प्लीज"

दादांनी एकदम मानेंकडे राखून पाहिले - काही न बोलता माने एकदम हिरमुसला. चुपचाप खुर्चीत बसला.

दादा आता आपल्याकडे पाहतील हे शेखरने लगेच ओळखले. 'मारु का कुस्ती ?' अशा सारखे दादांनी शेखरला नजरेने विचारले. शेखर गालातल्या गालात हसला. दादा तालमीत उतरले. आणि आबांचं काम करणाऱ्या तरूणाला समजावून सांगू लागले. त्याने दोन, तीन वेळा आबाचे वाक्य म्हटले. पण दादा डोळे गच्च मिटवत कपाळावर आठ्या पाडत मान नकारार्थी हलवत राहिले. "इतकं वाटतं तर तुम्हीच करून दाखवा ना !" तरुण आबा तिरसटला आणि तिकडे मानेंनीच जीभ चावली. पण त्याने तसे म्हणताच जमलेल्या लोकांमधून 'हं !' असा उत्स्फूर्त प्रतिसाद आला. दादांनी शेखरच्या हातात पुस्तक दिले. आणि ते विंगमध्ये गेले. कंटाळून खुर्च्यांमध्ये सैलावलेले प्रेक्षक सावरून बसले. शेखर रंगमंचाच्या अगदी जवळ उभा राहिला. एका मिनिटातच कंबरेत किंचित वाकलेल्या आबांनी रंगमंचावर प्रवेश केला. घशातून खाकरत, कातर स्वरात आजीच्या दिशेने येत आबा बोलले. वाक्यातील योग्य त्या ठिकाणी चढउतार, कधी आजीशी तर कधी प्रेक्षकांशी संवाद साधत आबांनी वाक्य कधी पूर्ण केले ते कोणालाच लक्षात आले नाही. आबा थांबताच खुर्च्यांमध्ये बसलेले सर्व प्रेक्षक टाळ्या वाजवत रंगमंचावर धावले. त्या आधीच आजींनी आबांना नमस्कार करून टाकला होता. मानेंची छाती अभिमानाने फुलून आली होती.

"दादा ! तुम्हीच करा आबांचा रोल आणि नाट्यदिग्दर्शन !" - माने.

दादा काही बोलायच्या आतच जमलेल्या सगळ्यांनी कल्ला करत, टाळ्या वाजवत मानेंचे म्हणणे उचलून धरले.

"आहे पण - ऐका तर..."

"काही ऐकायचं नाही, न बोलायचं नाही. निर्णय एकमताने झाला आहे !" - म्हणत आजींनी नाटकाची अनाउन्समेंट केली.

"दिव्याखाली अंधार ! निर्माता नारायण माने. दिग्दर्शक आणि प्रमुख भूमिका - दादा साहेब...?"

"लोखंडे !" - शेखरने पूर्ण केले. आजी परत म्हणाल्या.

"हं ! दादासाहेब लोखंडे"

"तुमचे सर्व ठीक आहे..." दादा गोड हसत पुढे म्हणाले -

"पण एकतर मी यासाठी इथे आलोच नव्हतो. दुसरी गोष्ट गेले पंधरा दिवस ज्यांनी आबांचा रोल केला. त्यांचाही विचार करावाच लागेल... कुठे आहेत ते ? नाव काय त्यांचं ?"

"शाम ! अरे शाम..." मानेंनी हाक मारली. सर्व शामला शोधत असताना शाम काही न बोलता चप्पल

घालून बाहेर निघून गेला.

"चला, सुंठेवाचून खोकला गेला." - कोणीतरी बोलले. कोणीतरी हसले. दादांना मात्र वाईट वाटले. हे मानेंनी ओळखले. ते म्हणाले -

"जावू द्या दादा, मी त्याला सांभाळून घेईन. तुम्ही आता आपल्या नाटकाचं पहा."

"आधी मला कलावंताची ओळख तर करून द्या. बहुतेक सर्व माझ्यासाठी नवीनच आहेत."

"अरे हो. हे महत्वाचं काम तर आधीच करायला पाहिजे होतं. तर आजीचं काम करणाऱ्या ह्या आहेत शेवलकर मामी. त्या शिक्षिका आहेत. त्यामुळे आम्ही त्यांना मामी, काकू किंवा बाई असं काहीही म्हणतो."

बाईंनी नमस्कार केला. माने पुढची ओळख करून देवू लागले.

"आपल्या नाटकातील आबांच्या चिरंजीवाचा म्हणजे न्यायाधीशाचा जो रोल आहे, तो करणार आहेत हे बँक मॅनेजर - फडके."

"अरेच्चा ! तरीच म्हटलं यांना कुठेतरी पाहिल्यासारखं वाटते. अर्थात् आपला बँकेशी फारसा संबंध येत नसल्याने नेमकं लक्षात आलंच नसतं." - दादा.

"आणि ह्या तर तुम्हाला माहिती असतीलच. नाटकातील शिल्पाचा म्हणजे आबांच्या सुनेचा रोल करताहेत, कु. दुर्गा बारड."

समोर येत दुर्गाने ओळखीचे स्मितहास्य देत नमस्कार केला. दादांचेही हात जोडल्या गेले. पण त्यांच्या मनात मात्र घणांचे घाव घातल्या जात होते...

...असे कसे आहांत तुम्ही ? यासाठी का घेवून आले मी तुम्हाला ? नामर्द आहात तुम्ही ! एक नंबरचे षंढ आहात षंढ !... खरं तर हे शब्द कुचकामाचे आहेत. जाता आहात तर जा. पण लक्षात ठेवा, तुम्ही पुरूष नाही, छक्के आहात छक्के !...

त्यानंतर मानेंनी इतरांचीही ओळख करून दिली, पण दादांचे फारसे लक्ष नसून ते कोठेतरी दुसरीकडेच हरवले आहेत असे शेखरला वाटले.

"आणि तुमच्यासोबत हे कोण ? त्यांची ओळख तर तुम्ही करूनच दिली नाही !" - वयस्कर बाई बोलल्या.

"अरे हो ! हे राहूनच गेलेत. तर हे आहेत, शेखर गावपांडे. माझे जवळचे मित्र. खरं तर माझ्या लहान भावासारखे. यांचे जुन्या शहरात साऊंड सिस्टिमचे दुकान आहे. गरज पडल्यास हे आपल्या नाटकाचे ध्वनी संयोजन आणि प्रकाशयोजना सांभाळतील."

"खरं तर मला हे काम करायला खूप आवडले असते. पण ज्यावेळी आपली ही स्पर्धा राहणार आहे त्या महिन्यात मला मुंबईला परिक्षेसाठी राहावे लागेल. नाईलाज आहे, आपले नाटक पहायला देखील मिळेल की नाही याची मला शंका आहे." - शेखर म्हणाला.

"माने, आज मी फक्त यांचे आवाज पाहतो. त्यानंतर तालीम कोठे, केव्हा घ्यायची हे तुम्ही ठरवा." - आणि शेखरकडे वळत दादा म्हणाले -

"काही हरकत नाही ना ? आणखी थोडावेळ थांबू शकता ना ?"

काही न बोलता शेखर एका खुर्चीत चुपचाप बसून राहिला. दादांचे संपले तसे स्कूटरमागे जावून बसला.

"तुम्ही म्हणत होता तसेच झाले. माझ्या गळ्यात त्यांनी नाटक अडकवलेच. माझा काही दोष आहे का ?" - दादांनी विचारले.

"जावू द्या. मला यावर काही बोलायचे नाही. मुळात तुम्हालाच नाटक आवडते. म्हणून कोणीही तुमच्या गळ्यात ते मारू शकते."

"हं !" - दादा विचारमग्न होत उद्‌गारले.

"अर्थात जे काही झालं त्यात काही बिघडलं असं मला वाटत नाही. उलट जे झालं ते चांगलंच झालं."

शेखरने म्हणताच दादांची कळी खुलली.

"हो का ? चांगलं कसं काय ?"

"चांगलं हेच की निर्माते तुम्ही नसून माने आहेत. त्यामुळे सगळी जबाबदारी तुमच्या एकट्याच्याच अंगावर येवून पडणार नाही. बहुतेक सर्व कलावंत अनोळखी असल्याने त्यांच्या मनात तुमच्याबद्दल एक भीतीयुक्त आदर आहे. पण त्यांना दिग्दर्शन करणे म्हणजे अगदी छिन्नी हातोडा घेऊनच बसावं लागेल. आजीचा रोल तर बराच महत्वाचा आणि मोठा दिसतो. त्या बाई पेलू शकतील ? मला तर शंकाच वाटते." - शेखर.

"का ?" - दादा.

"त्या बाई मला उत्साही वाटतात. पण नुसता उत्साह काय कामाचा ? त्या किती घाईत बोलतात ! मला तर त्यांचे बोलणेच समजत नव्हते. शक्यतोवर तुम्ही हा रोल कोणा दुसऱ्याला द्या."

"कोणाला देणार ?... दुसऱ्या कोणाचाही विचार आपण सुरू केला की झालंच ! मग आलं ते नाटक संपूर्णपणे आपल्याच छाताडावर ! कारण मग नवीन बाई शोधा रे, तिला मस्का मारा रे, तिच्या येण्याजाण्याची सोय पाहा रे, या सगळ्या कटकटी आपला जीव खातात. यापेक्षा जे कलावंत आपल्यापाशी आहेत त्यांनाच ठोकठाक करून काम निभवायचं."

"तरी पण दुसरं कोणी मिळणारच नाही काय ? तुम्ही काही म्हणा, त्या बाई इतक्या मोठ्या रोलला काही न्याय देवू शकतील, असे मला वाटत नाही."

"ठीक आहे तुझे म्हणणे बरोबरच आहे. आणि मी ते लक्षात ठेवतो. मी आठ दिवसांचा वेळ गृहीत धरतो. या दिवसांमध्ये आजीमध्ये समाधानकारक प्रगती दिसली तर ठीकच, नाही तर मी दुसरी आजी शोधून काढेन. शेवटी नाटक मला दिग्दर्शित करायचे आहे. मानेंना नव्हे."

"आणि दादा, ती कोण होती हो, आपण दिसल्याबरोबर जिच्या कपाळावर आठ्या पडल्या !" - शेखर.

"कोण बुवा ? मला तर काही असं जाणवलं नाही !"

"अहो ती नाही का, ओळख करून देताना जिने जरा जबरदस्तीनेच 'करायचा म्हणून' नमस्कार केला !"

"हं !" - लक्षात आले असूनही दादा कबूल करत नव्हते !

"अहो ती नाही का, एकदम उजव्या कोपऱ्यात उभी होती, सावळी पण एकदमच स्मार्ट मुलगी, सगळेच तर तिच्याशी बोलण्यासाठी धडपडत होते..."

"हं, हं ! ती ?... अरे ती दुर्गा !! - दुर्गा बारड"

"बारड ?... म्हणजे या बारड पहेलवानाची कोण ?"

"ती त्याची 'खास' आहे."

"अरे बापरे !... ती दुर्गा तुम्हाला ओळखते का हो ?"

दादा काहीही न बोलता पहात राहिले. शेवटी शेखरच पुढे बोलला -

"तुम्ही काही म्हणा दादा, ती काही तुमच्या बाजूची नाही."

"आँ ! तुला कशावरून असं वाटलं ?"

"नाही, ती सारखी तुमच्याकडे पाहत त्या बाईंना काहीतरी सांगत होती... ही दुर्गा मला काही फारशी ठीक वाटत नाही. शक्यतोवर तिला नाटकातून काढूनच टाका."

शेखरने म्हणताच दादांनी गच्चकन ब्रेक दाबून स्कूटर थांबविली. आणि ते रस्त्यावर उतरले, मागच्या सीटवरचा शेखर समोरच्या सीटवर सरकला. रस्त्याच्या एका बाजूला सरकत दादा शेखरला म्हणाले -

"तुम्ही माणसांना चांगलं वाचू शकता. पण तुम्ही नाटक सादर करू शकणार नाही ! जे नाटक तुम्ही बसवायला घ्याल, त्याला अक्षरशः 'बसवून' टाकाल !"

"कशावरून ?"

"अहो तिथे इनमिन दोनच बायका. त्यातल्या एकीला धड बोलता येत नाही, म्हणून 'दुसरी शोधा' हा तुमचा सल्ला आणि दुसरीला तर तुम्ही एकदम बाहेरचाच रस्ता दाखवता !" - दादा.

"एकवेळ ठोकपीट करून त्या बाईंना आजीच्या रोलमध्ये

तुम्ही कसेतरी बसवू शकाल. पण ती दुर्गा बारड मात्र..." - शेखर.

"दुर्गाची गोष्ट नंतर मी तुम्हाला सांगेन. तशी ती चांगली मुलगी आहे. ती कधीही मला डोईजड होणार नाही. काहीही झालं तरी शेवटी ती माझं ऐकेल... ती पाठांतरात चोख असते, वाटेल तेवढा वेळ देते, शिवाय मेहनती आहे. आणि दिग्दर्शकाला शेवटी यापेक्षा अधिक काय पाहिजे असते ?"

"याचाच अर्थ तुम्ही तिला चांगले ओळखता !"

"आम्ही दोघेही एकमेकांना चांगले 'ओळखून' आहोत !" - दादा.

"म्हणजे तुमचं आणि तिचं..."

"काहीही नाही !" - दादांनी ताडकन तोडले.

"ते तर माहितच आहे हो. मला विचारायचं होतं की, तुमचं आणि तिचं काही बिनसलं आहे का ?"

"नंतर सांगेन. पण शेखर तुमचा तिला इतका का विरोध ?"

"मला फारसं काही लक्षात येत नाही. पण मधल्या वेळात स्कूटर सावलीत ठेवण्यासाठी मी गेलो असताना, माझ्या कानावर जे उडत उडत आलं, ते असं की, बापरे ! या नाटकांत दुर्गा आहे का ! मग झालाच नाटकाचा सत्यानाश ! म्हणून म्हणतो, तिला नाटकात घेवू नका. तिच्यामुळे नाटकाचं पानदान होईल." - शेखर.

"हं हं आलं लक्षात ! नीट आठवून सांग, त्यांच्यामध्ये कोणी भरघोस मिशावाला पण एकदम गुळगुळीत टकला होता का ?"

"त्यांच्या मध्ये नाही, तो मिशावाला टकलाच हे म्हणत होता."

"अरे मग तू बिलकूल काळजी करू नको. ते उडत उडत तुझ्या कानावर आलेलं वाक्य नाही तर तुला नीट ऐकू यावे म्हणून मुद्दाम तशी सोय करण्यात आलेली आहे."

"म्हणजे ?"

"अरे तो टकल्या आपला शत्रू आहे. आपले नाटक पडावे म्हणून ज्या अनेक चाली स्पर्धेतील इतर संस्था आता खेळणार आहेत. त्यापैकी ही पहिली चाल होती. आता कोणत्याही परिस्थितीत दुर्गा नाटकातून बाद होणार नाही. कारण ती माझ्याबद्दल कितीही वाईट बोलली तरी तीच माझी खरी ताकद असेल."

"मला तर काही समजेनासेच झालेले आहे. या दुर्गाचे नेमके काय प्रकरण आहे."

"सांगितले ना मी तुला, योग्य वेळ आली की सांगेन."

"तुम्ही काहीही म्हणा बुवा, पण ही दुर्गा मला थोडी उथळ, थिल्लरच वाटते."

"वाटते नव्हे ती आहेच ! पण शेखर, हे नाटक 'दुर्गा बारडचे नाटक' म्हणून ओळखल्या जाणार नाही. तर दादासाहेब लोखंडे यांचे नाटक असा त्याच्यावर शिक्का राहणार आहे. दुर्गाच्या विरोधात बोलणारे लोक एकतर माणे आणि माझ्या नाटकाचे विरोधक आहेत. किंवा -"

"हे तुम्ही इतक्या ठामपणे कसे काय म्हणू शकता ?" - शेखर.

"तुझ्या लक्षात येणे शक्यच नाही. तो मिशाळ टकला आधी होता का ?... तो आणि त्याच्या सोबतचे तीन चार धुरंधर कधी आलेत हे तुला माहीत आहे का ?"

"मी असा विचारच केला नव्हता. त्यामुळे मला माहित नाही."

"तो नाराज झालेला तरूण आबा चप्पल घालून निघून गेल्यानंतर बऱ्याच वेळाने, हे वेगवेगळ्या नाट्य संस्थांमधील लोक आपल्या मुहूर्ताला न बोलावता आले. ही गोष्ट फक्त माझ्या आणि मानेंच्या लक्षात आली होती."

"कमाल आहे !" - शेखर.

"तरीही तू दुर्गाबद्दल जसे बोलत आहे तसेच आपल्या घरचे, आजुबाजूचे लोक तिच्याबद्दल बोलत असतात. पण हे दुर्गाला नावं लावणारे लोक नाटक करतात का ?

निदान स्पर्धेतील नाटकं पाहण्यासाठी पैसे आणि वेळ तरी खर्च करतात का ?" - दादा.

शेखर काही बोलू शकला नाही.

"नाही. मला माहिती आहे. नाटक-सिनेमा, संगीत नृत्य अशी नावं जरी घेतली, तरी घाणीत पाय पडल्यासारखा यांचा चेहरा होतो..."

"एकीकडे हे असे लोक आहेत. तर दुसरीकडे दुर्गा आली की, तालमीमध्ये 'जान' येते, अशा मताचे लोक आहेत. दुर्गाच्या वागण्यावर, बोलण्यावर, तिच्या खळखळून हसण्यावर हे लोक खूष असतात. 'दुर्गा आहे' असे कळताच 'अरे व्वा ! मग मस्तपैकी टाईमपास होईल.' - असे त्यांना वाटते"

"माझा या 'टाईमपास'लाच तर विरोध आहे. ज्यामुळे नाटकाचे वातावरण बिघडेल असे काहीही नको."

"मी पूर्ण लक्ष देईन. जर दुर्गा त्या भूमिकेला न्याय देत असेल तर तिला काढायचा प्रश्नच नाही. शिवाय दुर्गा असण्याचे इतरही काही फायदे आहेत. ती असली की बारड पहेलवानाची माणसे आपण न सांगताच प्रयोगाला हजर असतात. अंगावर पडेल ते काम ही माणसे बिनतक्रार व बिनबोभाट पार पाडतात. मी त्यांना एकदा गेटकिपर म्हणून सुद्धा उभे केलेले आहे. ते रंगमंदिराच्या आवारात असले की इतर संस्थांचे हस्तक ठाकत नाहीत... ठीक आहे. आज तुमचा खूप वेळ मी घेतला. मला अजून एमएसईबीतल्या माझ्या एका मित्राला भेटायला जायचे आहे. माझ्या मागे ते इलेक्ट्रीक मीटरचं झेंगट लागलं आहे. ते जर मी निपटवलं नाही तर मोठी मुलगी आणि जावई येण्याच्या वेळेसच नेमकी लाईन कटेल. आणि सर्वांना डास आणि गर्मी मध्ये सडावे लागेल. अच्छा चलतो."

दादांनी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने पँटमध्ये दोन्ही हातांचे अंगठे सरकवत खोचलेला शर्ट तपासला. आणि शेखरच्या पाठीवर थाप मारून, बुटांना स्प्रिंग लागलेले असावेत, अशा चालीने ते ऐटीत निघून गेले.

●●●

"काय झालं काय तुम्हाला ? कुठे जायचं आहे का ?"

घड्याळ्यात पहात दादांनी विचारले

"नाही बाई"

"नक्की ?"

"हो नं !"

"नाही म्हटलं, काही कोणाला वेळ दिलेली आहे अन् भेटायला जायचं आहे. अपॉइंटमेंट ठरली आहे का कुणासोबत ! गावाला जायचं आहे आणि गाडीची वेळ झाली आहे. शाळेत काहीतरी मिटींगच आहे. भूकच लागली आहे. निदान ह्याला तरी जायचं आहे का ?"

आधी करंगळी आणि मग दोन बोटं दाखवत दादांनी विचारले.

"नाही - नाही" म्हणणाऱ्या बाई.

"ईऽऽ बाई काहीही विचारता !" म्हणाल्या.

"नाही गं काही यापैकी ? नक्की मग प्रश्न असा आहे... तुम्हाला घाई कशाची आहे ?

वाक्य पाहिलं का ? पहा नीट पहा... हा स्वल्पविराम, हा अर्धविराम, हा पूर्णविराम ! याचा अर्थ काय ? तिथे तुम्हाला थांबायचं आहे ? तुमची गीतांजली जी निघते ती मधे थांबतच नाही. कधी एकदा पाठ केलेलं ऐकतो अन् कधी एकदाची मोकळी होते असे करता तुम्ही. हं, म्हणा, हं अस्सं, थांबा थोडं थांबा, विचार करा, बोला, वळा इकडे पहा, आता ऑडियन्सला वाक्य द्या. हं शाब्बास ! श्वास घ्या, श्वास घ्या छाती भरून श्वास घ्या !"

: तुम्ही आजकाल मला फारच रागावता. तुम्हाला नाही असे वाटत ? मुख्य म्हणजे तुम्ही फक्त माझ्यावरच मेहनत घेता. कधी कधी तर असे वाटते की नाटकात काम करणारे इतर कोणी तुम्हाला दिसतच नाही की काय !

"दादा, दादा ! मी परत एकदा सांगतो... दगड आहे ती बाई, दगड ! द्या सोडून तिचा पिच्छा. काढून टाका. शोधू आपण दुसरी आजी. किती मेहनत घेता आहात तुम्ही तिच्यावर !"

"दगडातूनच मूर्ती निर्माण करता येते !"

"पण सगळ्याच दगडतून मूर्ती तयार होत नसते ! तुम्ही विनाकारण मेहनत घेता आहात. तुम्ही फुटून जाल, पण हा दगड काही फूटणार नाही. मूर्ती तर दूरच राहिली !"

"तू मला आव्हान दिले आहे. ते आव्हान मी स्वीकारले आहे ! मी पाठ दाखवणारा सेनापती नाही !"

मला पहिले तुमचा रागच यायचा. वाटायचं, किती शहाणा समजतो आहे हा माणूस स्वतःला ? किती वेळ तेच ते तेच ते करून घेतो आपल्याकडून ! कंटाळा येत नाही का त्याला ? मग हळूहळू तुमची तळमळ जाणवायला लागली.

"शेखर ! प्रश्न वाढवायचे नसतात ! तू जर रोज तालमीला आला तर तुझ्या लक्षात येईल. नाटक म्हणजे मुद्दाम खाजवून खरूज करून घेणं असते. आता पहा त्या मानेनी हळूहळू अंग काढून घेतले आहे. कलावंत उशीरा येतात. निर्लज्जपणे खोटीनाटी कारणं सांगतात. आपण चिडलो की हसतात. आपण चिडावे म्हणूनच ते तसे वागत असतात. स्पर्धेतील इतर नाटकवाले आपल्या वाईटावर टपलेले असतात. आपले कलावंत ते फोडायला पाहतात. पाठांतरच कळत नाही, मुद्दाम बाहेरगावी जातात, तालमींना वेळेवर येत नाही, हॉल झाडणे, नेपथ्य नीट लावणे, पाण्याची सोय पाहणे या छोट्या छोट्या कामांमध्येही कोणी लक्ष घालत नाही. सगळ्यांना असत वाटतं की ही सर्व कामे दिग्दर्शकाचीच आहेत आणि आपण त्याच्या नाटकात काम करतोय म्हणजे त्याच्यावर काहीतरी डोंगराएवढे उपकार करत आहो."

...तुम्ही त्या दिवशी शेखर जवळ खूप अगतिक होवून बोलत होता. त्यादिवशी मला जाणवलं की तुम्ही किती एकटे, खरं तर एकाकी पडला आहात. आणि माझ्या लक्षात आलं की, का तुम्ही दिग्दर्शक व्हायला पहिल्या दिवशी तयार नव्हिता ! त्यावेळी माझे मीच पुढाकार घेवून नाटक तुमच्या माथी मारलं होतं... मग आता आमची नसेल पण निदान माझी तर काही जबाबदारी आहे की नाही ?

दादा नाटकाच्या तालमीमध्ये रंगून गेलेत. मधूनच एखादेवेळी ते आले की, शेखर त्यांना उत्सुकतेने विचारीत असे, "कुठपर्यंत आलं नाटक ?"

"ठिक सुरू आहे."

खरं तर नाटकाची तालीम म्हटली की, हॉलमध्ये शांतता आणि शिस्त यांचा अभाव असतो. जरा कुठे ढील मिळाली की अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होणाऱ्या कलावंतांचे गाणे-बजावणे, सिगरेट फुंकत स्वतःच्या बडेजावाच्या बाता मारणे, नवशिक्या कलावंतांची चेष्टा-मस्करी करणे, कलावंतांच्या आपापसातील कटकटी, कुरबुरी ह्या असतातच, हे शेखरला अनुभवाने माहित होते. पण दादांचा स्वभाव म्हणजे गेंड्याच्या बत्थड कातडीचा. समोरच्याने कितीही त्रास दिला तरी तो फारसा मनाला ते लावूनच घेत नसत. आणि लहान सहान प्रश्न तर ते केवळ हसूनच उडवून लावीत असत.

"शेखर इतक्या दिवसानंतर तू तालमीला आला. आज काही फरक जाणवला की नाही तुला ?"

"आजीमध्ये नक्कीच सुधारणा आहे. त्या आता पूर्वीपेक्षा सावकाश बोलायला लागल्या. पाठांतरात त्या चोख आहेत. दुर्गाही बरं काम करते. पण अजूनही आजी अधिक परिणामकारक व्हायला पाहिजे कारण सर्व नाटक

आबा आणि आजीवरच आहे. मुख्य म्हणजे तुमचं स्वतःचंच काही फारसं पाठ नाही. हो, सगळ्यात मोठा बदल मला वातावरणांतील जाणवला.

"तो कसा ?"

"थोडसं गढूळ वातावरण वाटलं... म्हणजे असं की तुम्ही वाक्य थोडंही विसरले की आजी आणि दुर्गा सोडून इतर मुद्दाम डोळ्यानं खाणाखुणा करत होते. टिंगल टवाळी करण्याची हिंमत करत होते.

...थोडक्यात तुमचा त्रास थोडा वाढतो आहे."

बरं झालं हे मला सांगितलं. मी आता यावर लक्ष देईल.

एका रात्री शेखरला अचानक मोकळा वेळ मिळाला, म्हणून त्याने त्याची स्कूटर दादांच्या नाटकाच्या तालीम हॉलकडे वळवली. रात्रीची वेळ, आसपास शांतता आणि हॉलमधल्या जळणाऱ्या ट्यूबलाईटस्‌मुळे बंद खिडकीतल्या तावदानांवर नाट्यतालमीच्या छाया पडल्या होत्या. नटांचे अस्पष्टसे आवाज आणि रडण्याचे, हसण्याचे एकापाठोपाठ एक अस्पष्ट आवाज ऐकायला आले. हॉलच्या दाराशी चप्पल जोडे काढून ठेवलेले.

चपला काढताना दादांचा आवाज ऐकू आला. "हं चला ! आता शांत रहा. ए, पुस्तकात लक्ष दे रे."

क्षणभर शेखर बाहेरच थबकला. आत जावे की नाही ? दादांच्या तालमीत अडथळा तर येणार नाही ?

आतून शांत सुरात दादांचे म्हाताऱ्याच्या आवाजातले समजावण्याचे सूर कानावर यायला लागले.

शेखरचा किंचित थरथरता हात बंद दाराला लागला, अन् लोटून ठेवलेला हॉलचा उंच दरवाजा जराही न करकरता हळुवार उघडला गेला.

दादांच्या आवाजासोबत आजीचा रोल करणाऱ्या स्त्रीचा दुःखी असा आवाज ऐकू आला. शेखरने पावलांचा आवाजही न होऊ देता हॉलमध्ये प्रवेश केला. मध्यभागी किंचित झुकलेले दादा एका बाईसोबत उभे होते.

शेखरच्या येण्याची दखल तालमीतल्या कलावंतांनीच काय पण प्रेक्षकांनीही कोणी फारशी घेतली नाही. शेखर हळूच तालीम पाहणाऱ्यांच्या पाठीमागे गेला आणि दादांच्या जास्तीत जास्त जवळ, तरीही त्यांना जाणवू नये अशा पद्धतीने उभा राहिला.

आबा-आजींचे संवाद सुरू होते... दादा आपल्याकडे मुद्दाम दुर्लक्ष तर करीत नाहीत ? नाहीं तसं नाही. हे दादा आता मला ओळखत नाहीत, इतकंच काय ते आता स्वतःलाही ओळखत नाहीत. सर्व विसरून आता ते केवळ आबा झाले आहेत, कारण ते जीव ओतून ताकदीने आबा सादर करताहेत.

आबांच्या मनातल्या भावना, दुःख त्यांच्या थरथरत्या हातांमधून, आवाजामधून, कष्टावलेल्या चेहऱ्यावरून, हालचालींमधून शेखरपर्यंत पोहचून शेखरला अक्षरशः वेढून टाकीत होत्या.

एक म्हातारा, सेवानिवृत्त झालेला, आयुष्यभर प्रामाणिकपणे तत्त्वांना उराशी कवटाळून ध्येयाचे मागे धावणारा, आयुष्यातील खडतर रस्त्यातील गरीबीच्या दगड धोंड्यातून ठेचाळणारा, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात बेडरपणे लाठ्या खाणारा, आयुष्याच्या उत्तरार्धात स्वार्थासाठी तडजोड न करणारा, स्वाभिमानी, मोडेल पण वाकणार नाही या बाण्याचा, आयुष्याच्या उतरणीला लागल्यावर आर्थिक अवदसा संपलेली, कारण 'साहेब' बनलेली कर्तबगार मुले, पण मुलांच्या आणि सुनेच्या वागणुकीने खंतावलेला. विफल झालेला, पण मूळ पीळ कायम ठेवण्याची केविलवाणी धडपड करणारा आबा...

दादा ही आबांची व्यक्तिरेखा फार बेमालूम वठवीत होते. समजून-उमजून समरस होऊन. आबांच्या भूमिकेतील दादा त्या व्यक्तिरेखेत जणू तादात्म्य पावले होते. ते पूर्णपणे आबाच बनले होते. ते शेखरच्या पाहण्यातले नेहमीचे दादा नव्हते. इतर वेळी ते वय घटवणारे, क्वचित

पांचट, उथळ विनोद करणारे, नाटकी असत.

खरे दादा कुठे अन् हे आबांची भूमिका करणारे दादा कुठे ! हे एक टोक तर ते थेट दुसरेच ! पण दादा किती सहजतेने हे अंतर पार करतात ! एखादी बाह्य त्वचा गळून पडून आंतर त्वचेने आपसूकच तिची जागा घ्यावी, तितक्या सहजतेने दादा आबांची भूमिका पार पाडत होते. पण त्यासाठी त्यांना खास प्रयत्न करावे लागत नव्हते. विहिरी खणताना आड आलेला दगड सुरूंगांनी फोडल्यावर पाणी जसे धडपडून विहिरीत येते तसे एकदा दादा आबांच्या भूमिकेत गेल्याबरोबर त्यांच्यातून ती जणू उत्स्फूर्तपणे उफाळून बाहेर पडत होती.

...हे असं कसं शक्य आहे ? यालाच कलावंत म्हणायचे का ? एरव्ही थिल्लर, खुजे वाटणारे दादा एकदा भूमिकेत शिरले की केवढ्या उंचीवर जातात !... शिवाय ते एकटेच जात नाहीत, आपले बोट धरून आपल्यालाही त्यांच्यासह त्या उंचीवरती घेऊन जातात.

शेखर दादांबद्दल असा विचार करीत होता, तेवढ्यात त्याचं वाक्य संपलं, आणि इतका वेळ केवळ मूकपणे थरथरत प्रतिसाद देणारी ठसठशीत बांध्याची बाई दादांना सामोरी झाली आणि म्हातारीच्या आवाजात आजीचं वाक्य बोलायला लागली. सर्वप्रथम शेखरला जाणवला तो आजीचा किंचित नाकातून येणारा आवाज, आजीच्या मनातलं दुःख सहजपणाने पसरवीत होता.

आजीला असणारी परिस्थितीच्या मर्यादांची सार्थ जाण, त्यासोबतच आबांवरचे त्यांचे अकृत्रिम प्रेम आणि आबांना द्यायची असलेली साथ. त्यांच्या तडफडीला, तगमगीला त्या साक्षीदार म्हणून समरस होऊन साथ देत होत्या. आबा हातभर बोलतील, तर ह्या आपणास एकमेकांवाचून गती नाही हे दोघेही जाणून एकीकडे नवरा, तर दुसरीकडे मुलगा ! आजीची कात्रीत सापडलेली स्थिती. आयुष्यभर तिनेही बोलणे कमी आणि मूकपणाने, समजून घेणे अधिक, या संमिश्र भाव-भावना आजी समर्थपणे वठवित होत्या.

बोलता-बोलता आजी अचानक थांबल्या आणि आबांच्या समोर जाऊन, त्या एकदम त्यांच्या डोळ्यात पहायला लागल्या. एकटक, खोलवर शोधीत त्यांच्या बुबुळांना स्वतःच्या बुबुळांनी त्यांना जणू बांधून टाकलं होतं. दोघांचेही डोळे चमकायला लागले. पाण्याने काठोकाठ भरून आले. आजुबाजूला सर्वत्र शांतता.

शेखरला एकदम कसंतरीच वाटलं.

वाटलं अरे हे नाटक आहे की वस्तुस्थिती आहे ? इतका त्या दोघांचा अभिनय जिवंत होता.

आणि त्याचवेळा दादा जोराने खिंकाळले स्वतःची नजर सोडवून घेत आणि बाईंना कोपरापासून नमस्कार करीत ते ओरडले.

"मानलं मामी मानलं ! तुम्ही काही हार जाणार नाही. आम्ही काही हरवू शकणार नाही तुम्हाला ! कितीही ठरवलं तरीही !"

आणि जरावेळ ते हसतच राहिले. हॉलमधील सर्वच माफक हसले. कारण एकतर दादा स्वतः जरी आबांच्या भूमिकेतून खाडकन क्षणातच दादा झाले होते तरी तालीम पाहणाऱ्यावर अजून त्या दोघांच्या अभिनयाचा जबरदस्त पगडा होता.

"अरे, कोणी तरी मला चुना द्या रे !" पुडीतला तंबाखू तळहातावर घेत दादा म्हणाले. पण शेखर हॉलमध्ये थांबूच शकला नाही. जी धुंदी त्याला आबा-आजींचा प्रवेश पाहून जाणवली होती, तिला त्याला धक्का लावायचा नव्हता. शेखरची उपस्थिती अद्याप दादांच्या लक्षात आली नव्हती आणि शेखरलाही आता यावेळी तंबाखू मळणाऱ्या दादांना भेटून, त्यांची, आजीची तारीफ करण्याची इच्छा नव्हती.

"ए, हसताय काय ? नाटक गंभीरपणे करायचं आहे की नाही ? नसेल करायचे तर तसं सांगा. म्हणजे

मी तरी निदान मोकळा होवून जाईल. माने साहेब कुठे आहेत ? अशात ते बरेचदा येतच नाही ! हे बरं आहे. नाटकाची धोंड माझ्या गळ्यात अडकवून ते जर नामा निराळे होणार असतील तर मी हे खपवून घेणार नाही. चला सर्वजण गंभीरपणे तालीम द्या. बाई तुम्ही कुठे आहात ?"

तुम्ही विचारता तुम्ही कुठे आहात ? मला काहीच समजेचना ! धडधडीत तुमच्या समोर असूनही तुमचे आपले तेच !

"बाई ! बाऽई !! कुठे आहात तुम्ही ?" - दादा ओरडले. हॉलमधले सर्व चपापले.

"दादा, तुम्हाला फार रागावतात असे वाटते का ?" - दुर्गा.

"नाही बाई !"

"नाही ?... मला तर वाटते"

"शक्य आहे. तसंही असेल कदाचित. पण माझ्या काही लक्षात आले नाही तसे. पण समजा तसं असलंही तर बिघडलं कुठे ? शेवटी माझं काम चांगलं व्हावं म्हणूनच ते बोलताहेत ना ?"

"तरी पण एकाच्या म्हणजे एकाच्याच मागे लागणं कितपत योग्य दिसते ?"

"हं !"

"जणू काही इतर कोणीच नाही नाटकात काम करणारं. जणू फक्त तुम्ही एकट्याच. तुम्हाला एकट्यालाच ते शिकवतात. तुमच्या एकट्याचीच ते प्रॅक्टिस घेत राहतात. असे वाटते."

"सध्या तुम्ही कुठे 'जगत' आहात ?"

मला तर भयंकर हसू येत होतं. पण तुमचा अवतार पाहून घ्यायची हिंमत झाली नाही. आता जेव्हा विचार करते तेव्हा वाटते... खरंच माणूस जगत असतो पण खरंच तो कुठे असतो एक तर भूतकाळात... किंवा भविष्यकाळात ! वर्तमानात तो जवळपास नसतोच ! तुम्ही हुशार आहात. मी वर्तमानात नसून कुठेतरी भलतीकडेच भटकते आहे. हे तुमच्या बरोबर लक्षात आले. आणि तुम्ही मला अचूक पकडले. तुमच्या प्रश्नामुळे मला हसू फुटले. खरं तर मी हसायला नको होते. ते माझं चुकलंच. कारण मी तुम्हाला हसल्याबरोबर तालमीतल्या इतर सर्व कलावंतांना फावलंच आणि त्यांनी त्या संधीचा दुरुपयोग केला. ते जाणूनबुजून मुद्दाम मोठ्याने आणि बऱ्याच वेळ पर्यंत हसत राहिले. त्यांचे वागणे लक्षात येताच मी सावरले. पण मनातल्या मनात मात्र मी तुम्हाला खरोखर मानते. पूर्वी मी मोठी शेखी मिरवायची की, मी पन्नास नाटकात कामे केली आहेत. पण तुम्हाला सांगते, तुम्ही ज्या पद्धतीने मला भूमिका समजावून सांगता आणि माझ्याकडून करवून घेता तसे आजपर्यंत कोणीही केले नाही. आधीच्या नाटकात मी म्हणेल तीच पूर्व दिशा असायची. मी पाठांतर पटू असल्यामुळे सर्व नाटकंच मला पाठ आहेत. आणि मी माझे काम फक्त पाठ करून म्हणून दाखवायची आणि खेड्यापाड्यांमध्ये माझी वाहवा व्हायची. पण आता तुमच्या भाषेत सांगायचे म्हणजे नाटक कशाशी खातात हे मला थोडे थोडे समजायला लागले आहे.

अशात माझ्या लक्षात येत आहे की, मी सतत तुमच्याशीच बोलत असते. माझा हा एकतर्फी संवाद तुमच्यापर्यंत कधी पोचेल की नाही हे मला माहित नाही. खरं तर मला एका स्त्रीची कहाणी तुम्हाला सांगायची आहे. मी ती प्रत्यक्ष तुम्हाला कधी सांगू शकेल, असे वाटत नाही. ती कहाणी आहे माझ्यासारख्याच एका सर्वसामान्य मुलीची. जिच्याजवळ गरीबी, कमनशीब, दुर्दैव याशिवाय काहीही नव्हते. तिला ना धड रूप होते की पैसा, ना माहेर सासरचा पाठिंबा. सांगू का मी अशी गोष्ट ? आवडेल तुम्हाला ? ह्या गोष्टीत आवडण्यासारखं काय आहे, तर काहीही नाही. वेगळं काय आहे तर काहीही नाही. ही फक्त एक रडकथा आहे ! सावित्री नावाच्या मुलीची. तुमच्या लक्षात आलंच असेल मी माणं

नाव बदललं आहे. शेवटी नावात काय आहे असं म्हणतात ते खरंच आहे. प्रश्न असा आहे की हे सर्व मी तुमच्याशीच का बोलते आहे ? माणे मलाही ते समजत नाही. पण कुठे तरी उगीचच वाटते की तुम्ही निदान हे सर्व लक्षपूर्वक ऐकाल आणि ऐकल्यानंतर तुम्हाला आवडो अथवा नावडो, तुम्ही मला हसणार नाही, माझी चेष्टा करणार नाही. ऐका तर मग -

एका मध्यमवर्गीय चारचौघांसारख्या कुटुंबातील सावित्री ही एक मोठी मुलगी होती. केवळ एकोणवीस वर्षांची. गोरी, नाजुक मिळून मिसळून वागणारी आणि अत्यंत सहनशील. तिला तिच्यापेक्षा लहान दोन भाऊ आणि चार बहिणी सुद्धा होत्या. वडिलांना जेमतेम पगाराची नोकरी होती. आणि त्यांच्यावर पाच मुलींच्या लग्नाचा ताण.

कुठूनतरी एक स्थळ कळलं. सावित्रीच्या वडिलांच्या डोक्यात काय आले कोण जाणे. पण एकदमच त्यांनी सावित्रीच्या लग्नाचा निर्णय घेवून टाकला. दगडपारवाच्या वतनदारांच्या मुलाशी लग्न पक्के केले.

आई म्हणत होती - "अहो लोक असं सांगताहेत की माणसे काही फारसे चांगले नाहीत. "म्हणजे जरा विक्षिप्तच आहेत. आपली मुलगी का वर आली ? वयाच्या मानानेही तशी ती लहानच दिसते !"

"अहो, हे लग्न ठरवताना तुम्ही काही चौकशी केली का ?"

"त्या लोकांची परिस्थिती काही फारशी चांगली नाही"

"अगं कोण्या ब्राह्मणाची स्थिती आता चांगली उरली आहे ?"

"त्यात पुन्हा खाणारे तोडं आठ. अहो सहा तरूण भाऊ आहेत."

"अगं मुलबाळं काय कोणाच्या हातातली गोष्ट आहे ? ते तर ईश्वराचे देणे आहे."

"लोकही फारसे चांगले नाहीत. सारखे भांडत असतात. शिव्यागाळी करतात."

"आपल्या घरात का भांडणं वादविवाद होत नाहीत ? आणि तापटपणा दाखवून 'भोसडीचे हो' अशी शिवी वतनदारांनी नाही द्यायची, तर मग कोण्या चोरानी द्यायची ?"

सावित्रीच्या बावांनी कानकोरणीत जमलेला मळ बोटाच्या नखांनी उडवून लावला !

ठरल्याप्रमाणे सावित्रीचे लग्न झाले आणि ती दगडपारव्याच्या घरात सासरी रहायला आली. सावित्रीचा नवरा रोड होता पण दिसायला छान होता. गोरा होता.

"जे काही चांगले असते, ते फक्त सिनेमा, नाटकात आणि पुस्तकात. खरं आयुष्य कसं, तर खडबडीत रस्त्यावरून खराटा फिरवल्यासारखं !... चार चार दिवसांचे फाके पडायला लागल्यावर मी ठरवले, आता घरी बसण्यात काही अर्थ नाही. भिकाऱ्याला भीक मागायचं स्वातंत्र्य असतं. मध्यमवर्गीयाला त्याची देखील मुभा नसते, कुंभाराची सून किती दिवस घरात बसेल ? एक ना एक दिवस तिला चिखल तुडवायला बाहेर यावेच लागते ! सासऱ्यांच्या मोठेपणाच्या पोकळ कल्पना मी गुंडाळल्या. अर्ज केला, इंटरव्ह्यू दिला आणि प्राथमिक शिक्षिकेची नोकरी मिळाली. तेव्हापासून खेडोपाडी भ्रमंती सुरू झाली. गरज म्हणून नोकरी सुरू केली. पण खरं सांगू ? त्या लहान मुलांमध्ये माझं मन खूपच रमतं. पहिल्या वर्गापासून मुलं हातात येतात आणि सलग चार वर्ष त्यांना घडवायची संधी मिळते."

"एकदा का मी शाळेत गेलो की घरचे सगळे मी विसरते... लहान मुलांना सगळं समजते. आपण न सांगताही ते ओळखतात की बाईंची तब्येत चांगली नाही. मग ते विचारतात -

"बाई बरं नाही ? चहा आणू ?" माझे शाळेतले

मुलं माझ्यावर इतकं प्रेम करतात, इतकं प्रेम करतात की माझ्या सख्ख्या पोरी काय करतील !"

त्यांच्या जर लक्षात आलं की बाईंचं डोकं दुखतं आहे तर एखादा लगेच विचारतो, "बाई चहा आणू ?"

आपण म्हणतो, "कशाला उगीच ! राहू दे"

तर लगेच तो म्हणतो, "आणतो ना बाई. डोकं दुखतं ना"

आपल्याला "हो" म्हणावंच लागतं. अन् 'हो' म्हटलं रे म्हटलं की एकदम दोन-तीन पोरं पळतात ! प्रत्येकाला वाटते आपणच बाईला चहा दिला पाहिजे ! त्यांच्यापैकी एकाचं हॉटेल आहे. त्यामुळे तो पैसे घेत नाही."

आपण जबरदस्तीने दिले तर इतर मुलं म्हणतात -

"बाईकडून पैसे घेतो का रे ?"

मुलं अगदी तीन-तीनदा कपबशी धुवून पुसून चहा पाणी घेवून येतात. मोठ्या बाई माझ्यावर जळतात. त्या खिडकीतून रोखून पाहतात. एक मुलगी आहे, ती अगदी माठ आहे ! तिला काही म्हणता काहीच येत नाही ! ती वर्गात बोलत नाही. पण मोठ्या बाई खिडकीतून रागारागाने पाहतात म्हणून ती न चुकता खिडकी बंद करते ! एकदा एक मुलगा म्हणाला -

"बाई मी तुमच्यासाठी "बॉम्ब" आणला. डोक्याला लावा. मला काही समजेना ! पाहिलं तर "अमृतांजन" माझं डोकं दुखते म्हणून घरून घेवून आला तो !

गावात एक गुंड आहे. त्याची मुलं माझ्या वर्गात शिकत आहेत. एक मुलगा. एक मुलगी. त्या मुलांना काय वाटते कोण जाणे, ते त्यांच्या बापाची अन् माझी गाठच पडू देत नाहीत. आपल्या बाईंकडे पाहण्याची आपल्या वडिलांची नजर चांगली नाही. हे त्या मुलांना बरोबर समजते. ते बापाला बाहेरच्या बाहेरच कटवतात ! म्हणतात-

"जा तुम्ही, आम्ही भरतो फी !"

कोणाचा बाप वारला... कोणाच्या आईला टाकून दिलेलं असतं. कोणाचं बाहेर काही प्रकरण असते. त्यामुळे घरात लक्ष नसते. कोणी जुळे मुलं. कोणाच्या स्कर्टला बकल लावून दे, जेवणाच्या सुट्टीत कोणाचा डबा अपुरा आहे... अशा सतराशे साठ गोष्टी मला माहित असतात.

एक जुनी गोष्ट सांगते... एकदा वर्गात सहज सुचले म्हणून मी सांगितले की रोज संध्याकाळी देवाजवळ दिवा लावा. देवाला आणि मग आई बाबांना नमस्कार करा. दुसऱ्या दिवशी वर्गात विचारलं "केला का रे नमस्कार ?"

बहुतेक मुलं मुली विसरले होते. पण काहींनी आठवणीने नमस्कार केला होता. मग मी विचारले "काय म्हणाले आई बाबा ?"

त्यांच्याजवळ उत्तरं नव्हती. पण डोळ्यात आनंद होता. एकीला शाबासकी मिळाली होती. मी सर्वांना शाबासकी दिली. आणि परत आई बाबांना नमस्कार करण्याबद्दल सांगत राहिली. दुसऱ्या तिसऱ्या दिवसापासून सर्व मुले मुली नमस्कार करायला लागलेत. एक मुलगा मात्र काही केल्या खुलून बोलत नव्हता. काहीतरी गडबड आहे हे माझ्या लक्षात आलं. शेवटी त्या मुलाला विश्वासात घेवून विचारलं, त्याचं नाव घेत... "अर्जुन ! हो, हो अर्जुनच !" म्हटलं "का रे नमस्कार करत असतो काय ?" तो एक नाही न् दोन नाही ! हळुहळू मी त्याला बोलतं केलं. तर एक वेगळीच गोष्ट ऐकायला मिळाली. तो पहिल्या दिवसापासूनच नमस्कार करत होता. पहिल्या दिवशी देव आई बाबा असे नमस्कार झाले... पण विशेष असं काही झालं नाही. दुसऱ्या दिवशी मात्र त्याच्या बापाने चौकशी केली. हे तू काय करतो आहेस, कोणी सांगितलं तुला असा नमस्कार करायला ? कोण आहे ती तुझी बाई. नाव काय तिचं ? कशासाठी ही भानगड करते आहे ती ? तिसऱ्या दिवशी मात्र बाप चिडला आणि त्याने सांगितले, नमस्कार करण्याची काही गरज नाही. कारण काय होतं माहित आहे ?"

"काय ?"

"त्याचे वडील दारू प्यायचे. आता त्यांच्या दारू पिण्याचा आणि मुलाच्या नमस्काराचा संबंधच काय ? तर तो असा की, हा मुलगा जेव्हा नमस्कार करत असे तेव्हा बाप दारू पिवून असे ! तो नशेत असताना मुलाने "पितृ देवो भव !" म्हणत नमस्कार करणे तो सहनच करू शकत नव्हता. मुलाला समजत नव्हतं की आता काय करायचं ? मी त्याला सांगितलं की तू नमस्कार कर आणि बाबा काय म्हणतात हे रोज येवून मला सांग ! मात्र नमस्कार चुकवायचा नाही. झाले. रोज मला तो वेगवेगळ्या बातम्या द्यायचा. "बाप नाही म्हणायचा. चिडायचा, ओरडायचा, शिव्या द्यायचा, एकदा तर त्याने मुलावर हातही टाकला पण मुलाचे "पितृ देवो भव !" चालू राहिले. मग बापाने त्यावेळी घरी राहणे बंद केले. मी मुलाला सांगितले की "जेव्हा बाबा घरी परत येतील तेव्हा नमस्कार कर" त्यामुळे बाप येईपर्यंत मुलगा जागा राहायचा. रात्री १२ वाजता जरी तो आला तरी "पितृ देवो भव !" आहेच. मग मात्र बापाने हात टेकले. तो संध्याकाळी नियमित घरी यायला लागला. नमस्कार झाला की नाराजीने बरळायचा पण नमस्कार करू द्यायचा ! मुलाची चिकाटी पाहून शेवटी त्याने दारू घेण्याची वेळ बदलली. आई फारच खुष झाली. ती भेटायचा आली. कारण हळुहळू घरात वातावरणात फरक पडायला लागला. शाळेत आली. "घरी या" म्हणाली. मी त्यांना दिवस दिला. फक्त म्हणाली "दिवसभरात जेव्हा वेळ मिळेल तेव्हा येईल !" झाले. "बाई येणार !" म्हणून ते घरच सजले, बापही चांगले कपडे घालून दिवसभर तयार होता. मी दुपारी वेळात वेळ काढून गेली. त्या दिवशी बापानू दारू घेतली नव्हती. हळुहळू त्याची दारू कमी नक्कीच झाली ! मुलगाही अभ्यासात सुधारला.

"आता कुठे आहे तो ?"

"तो माहित नाही. बरीच जुनी गोष्ट आहे ही. मला फक्त त्याचे अर्जुन नाव आणि चेहरा आठवतो !"

शाळेच्या आवारातच राहणाऱ्या कुत्रीला पिलं झाली होती. ती पिलं आवारात सर्वत्र फिरत. भटकत भटकत हॉलमध्ये, खोल्यांमध्ये येत ! तालीम सुरू असताना गंभीर प्रसंग सुरू असतानाही तोंड वर करून 'कुईऽ कुईऽ' ओरडत. सगळ्यांना हसायला संधी मिळे. दादा पिल्लांना मारू देत नसत. फक्त पायानेच बाजूला सारत. पण तेवढेही बाईंना सहन होत नसे. शेवटी दुर्गा म्हणालीच -

"तुम्ही सुद्धा बाई जास्तच करता ! मधे मधे कडमडणारे पिल्लू पायाने लोटले तर काय बिघडले ? त्याने ते काय लगेच मरणार आहे ? तुम्ही का एवढ्या हळव्या होता ?"

"तसं नाही दुर्गा... कुत्र्याचे पिल्लू दिसलं की माझ्या छातीतच धस्स होतं. कारण लग्न होवून जेव्हा मी महिल्यांदा सासरी गेली होती, त्यावेळी माझ्या लहान्या दिराने एक काळ्या तोंडाचे कुत्र्याचे पिल्लू पाळले होते. ते पिल्लू घरभर सर्वत्र फिरायचे. घरात आठ खाणारी तोंडं. कमावणारे एकटे सासरे. ह्यांची नोकरी अशी तशीच तात्पुरती होती. त्यात त्या पिल्लाची भर. ते इतकं लहान होतं की त्याला दुधाची गरज होती. आता घरात जेव्हा चहालाच दूध पुरत नसे तेव्हा त्या कुत्र्याला कुठून देणार ? मग ते उपाशी पिल्लू वास घेत सतत स्वैंपाक खोलीत यायचं. जेव्हा घरात माझ्या नवऱ्यालाच किंमत नव्हती त्या घरात मला कोण विचारणार ? दिवसभर मी स्वैंपाकघरात अक्षरशः राब राब राबायची ! पोटात भुकेचा आगडोंब उसळलेला असायचा. पण आधी पुरूष मंडळी, सासूबाई, नणंदा आणि सर्वात शेवटी मी ! घरातल्या सर्व लोकांना जणू एकच काम होतं ते म्हणजे कुठलं न कुठलं काम शोधायचं अन् ते माझ्यावर ढकलायचं. सासूबाईंची सतत किरकिर, किटकिट, भुणभुण सुरूच. त्या बाहेरच्या खोलीत असल्या तरी त्यांचे कान डोळे सतत माझ्यावरच असायचे. जीवन अगदी नकोसे व्हायचे अन् परत हे काळुंद्र कुत्रं ! चुलीत

तोंड घालायचं, वाटेल तिथे घाण करून ठेवायचं. ते कुत्रं शिरलं रे शिरलं की सासूबाई ओरडायच्या, "सूनबाई काळ्याला पहा !" बरं माझ्या माहेरी कुत्र्याचे असे लाड नव्हते. कुत्रा होता पण तो बाहेर अंगणात. इथे म्हणजे सगळं उलट ! सासूबाई कुत्र्याला हाकल म्हणायच्या अन् दीर त्याचे लाड करायचा ! मधल्या मध्ये माझी पंचाईत ! एकदा असह्य होवून त्या पिल्लाला मी पायाने दाराबाहेर लोटलं अन् नेमकं त्याच वेळी दीर तिथे आला. त्याने अस्सं काही पाहिलं म्हणता माझ्याकडे... माझ्या जीवाचं पाणी पाणी झालं ! माझं नशीबही इतकं फुटकं की दोनच दिवसात ते काळुंद्र मेलं. त्याने अंगणात दम सोडला आणि दीराने जवळच पडलेली वीट उचलून मला फेकून मारली. मी ती चुकवली, तर स्वैंपाक घरातली फळं कापण्याची सुरी घेवून अंगावर आला. सासरे मध्ये आल्याने मी वाचली. पण त्याच रात्री मी माहेर गाठलं आणि नंतर लगेच वेगळं बिऱ्हाड केलं. तेव्हापासून कुत्र्याचं काळं पिल्लू असलं की माझा थरकापच होतो.

"बाई, तुम्ही माझ्याजवळ तुमच्या नवऱ्याची तरफदारी करू नका. तुमचा नवरा कसा आहे हे मला चांगले माहित आहे. सगळे नवरे इथून तिथून सारखेच ! तुम्ही सहन करता म्हणून ते आणखी माजतात ! ते जितके त्रास देतात तितकी जास्त सेवा करून, त्यांना देव मानता ! (असल्या देवांना तर खेटराने बडविले पाहिजे.) बरं तं बरं माझं लग्नच झालं नाही. माझा नवरा जर असा असता ना तर दाखवला असता त्याला हिसका.

दुर्गा, तुला काय म्हणायचे आहे हे मला समजते. नुसते समजते इतकेच नव्हे तर तितक्यापुरते ते पटते सुद्धा. पण बाई ! बोलण्यात आणि प्रत्यक्ष आचरणात आणण्यात फरक पडतो. नवऱ्याला सोडून राहणे ही काय साधी गोष्ट आहे ? मी एक वर्ष ह्यांच्यापासून दूर होते. मी अन् माझी मोठी बहीण, आम्ही दोघीच. त्या वर्षभरात जे काही अनुभव आलेत ना त्यावर एक रामायण होईल ! त्या दिवसांमध्येही ह्यांनी माझा पिच्छा पुरवलाच ! संशयी तर इतके आहेत की विचारूच नका ! जरा कोणाशी हसून बोललं की उडालाच ह्यांचा फ्यूज ! मी घरात घ्यायची नाही तरी मधून मधून माझ्या जवळून पैसे घ्यायचेच. अक्षरशः भिकाऱ्यासारखे बसस्टँडवर यायचे. त्यावेळी माझी नोकरी वल्लभपूरला होती. मी पोहचण्यापूर्वीच स्टँडवर पोचायचे अन् हात पुढे करायचे. एकदा हे आले त्यावेळी बस सुटण्यातच होती. मी रोजची जाणारी म्हणून कंडक्टर सहज म्हणाला -

"चलत नाही का ताई ?" झाले तेवढेच ह्यांना खटकले. म्हणाले - "त्याला काय गरज आहे इतकी तुझी आठवण ठेवायची ? अन् तू सुद्धा हसून बोलली. याचा अर्थ स्पष्ट आहे." आता सांग दुर्गा, त्या कंडक्टरची सख्खी बहीण माझ्या वर्गात होती, जी लग्नानंतर जळून वारली. ती वारली त्यावर्षी तर मी त्याला राखी सुद्धा बांधली होती ! म्हणजे तो तर मला बहिणीच्याच जागी पाहतो ना ? पण ह्यांना कोण सांगेल ? सुरू केला तमाशा ! पैसे देवू केले तर म्हणाले, "तुझ्या मनात पाप आहे म्हणूनच पैसे देतेस" शेवटी चालत्या बसमधून पैसे सोडले. ते खाली पडून राहिले पण शेवटपर्यंत उचलले नाही त्यांनी !

"पण वेगळी का झाली होतीस ?"

"अगं तेच नेहमीचंच, आळशासारखं घरी बसून रहायचं. ऐतखाऊ सारखं खायचं. आळशी तर इतके की स्वतःचं औषध देखील घेत नाही ते ! दत्तपूरला नेवून सोडलं की पंधरा दिवसात घरी परत ! घर मालक किरकिर करायचे, घरं सोडायला लावायचे, अनेक कटकटी असतात."

"तरीपण एकत्र आलात !"

"हो वर्षभरानंतर ह्यांच्या भावाचं लग्न ठरलं. माझ्या

दूरच्या नात्यातीलच मुलगी होती. ह्यांनी खूप विनवण्या केल्या. लग्नात वहिनी का नाही ? असा प्रश्न उपस्थित झाला असता. कार्यात वांधे होवू नये म्हणून गेली. त्या दरम्यान हे इतके चांगले वागले की आपोआपच पुन्हा एकत्र राहणं सुरू झालं. त्यानंतर छोटीचा जन्म झाला."

"म्हणजे ! छोटीच्या जन्माआधीपासूनच त्यांना हा आजार होता ?" - दुर्गा.

"सांगते काय मग मी ? एवढंच नव्हे तर छोटीनंतरही मला एकदा दिवस राहिलेच होते. ह्यांना मुलाची खूप हौस ना ! पण ह्यांचा चिघळणारा आजार पाहून मी ते काढून टाकले. पण त्यात इतका त्रास झाला की विचारू नको. अक्षरशः मरता मरता वाचली. त्यानंतर ठरवलं की आता हे पुरे. आता आम्ही एकत्र राहतो, पण त्यांचं सगळं वेगळं अन् आमचं वेगळं."

"तुम्ही खूपच सहन करता पण ! इतकं कसं काय जमते तुम्हाला ?"

"हे माझ्या आईकडून आलं. मला सांग दुसरा काय मार्ग आहे माझ्यापुढे ?" तेवढ्यात दादा आले म्हणून दुर्गा उठली.

"बोला ! बोला नं तुम्ही. मी पण आलेच तुमच्यात" - दादा.

"काही विशेष नाही सर ! आमचं आपलं नेहमीचंच. तोच गूळ अन् तीच काडी" ! - बाई म्हणाल्या.

"बाई आता तुम्ही पुष्कळंच बरं करायला लागल्या आहात. पण या प्रसंगात यापेक्षाही जास्त सेंटीमेंटल, पॅथेटिक व्हायला पाहिजे." - दादा.

"म्हणजे ? मला नाही समजलं !"

बाईंनी म्हणतात जमलेले सारे हसले. दादांनी मागे वळून जळजळीत नजरेने पाहिलं.

"तुम्हसाला थिल्लरपणाच करायचा असेल तर चालते व्हा !" - दादा गरजले.

मग लगेच शांतपणे बाईकडे वळत म्हणाले -

"बाई समजून घ्या. प्रसंग कसा आहे ?"

"दुःखी !"

"व्हेरी गुड ! प्रसंग दुःखी आहे असं जर तुम्हाला माहित आहे, तर तुमचं दुःख प्रेक्षकांपर्यंत पोचवा !"

"तेच तं करते आहे !"

"आणखी मेहनत घ्या. प्रेक्षकांची सहानुभूती संपूर्णपणे तुमच्या बाजूने येवू शकते. तुम्हाला गदगदून आलं पाहिजे. प्रेक्षकांच्या डोळ्यात अश्रू आले पाहिजे. तुम्ही घळघळ रडा या ठिकाणी."

"खरं सांगू, मी आयुष्यात इतकं दुःख पाहिलं की रडून रडून आता माझे अश्रू आटलेत ! मला रडायलाच येत नाही कितीही त्रास झाला, दुःखद घटना घडली, वाईट वाटले तरी रडू येत नाही. गेले कित्येक वर्षात मी रडले नाही आणि रडेल असं वाटतही नाही."

"बाई ती खऱ्या आयुष्याची गोष्ट झाली. मी नाटकाबद्दल बोलतो आहे. तुम्हाला नाटकात रडायचं आहे."

"प्रयत्न करते."

"बाई आपण यानंतर, एक झकास फार्स बसवू काय ?"

"फाऽऽर्स ?"

"हो ! का ?"

"मला विनोदी नाटकातच काम करणं जमणार नाही. मग फार्सची तर गोष्टच सोडा."

"का ? का नाही जमणार ?"

"जीवनात तितकं दुःख पाहिलं म्हणून दुःखी भूमिकाच मला जमतात. विनोदी भूमिका केल्याही नाहीत आणि मिळालीच तर मला जमणार नाही असंच वाटतं."

●●●

(तालीम सुरू आहे आणि सर्व कलावंत)

"येत्या रविवारी आपण रंगीत तालमीला आपल्या

अनुक्रमणिका

घरच्या लोकांना बोलावू... म्हणजे त्यांनाही समजेल आपण काय "दिवे" लावणार आहोत ! शिवाय त्यांच्या सूचनांचा आपल्याला फायदाही होवू शकतो." ...दादा सर्व कलावंताशी व मुख्यतः बाईशी बोलत होते.

बाईंची चलबिचल झाली. ते दादांच्या लक्षात आले. त्यांनी नजरेनेच विचारले. बाई घुटमळत म्हणाल्या -

"कल्पना चांगली आहे... पण माझे मिस्टर काही येवू शकणार नाही !"

"का ?... असं कसं !"

"त्या बरोबर बोलताहेत. त्यामागे मोठं पुराण आहे !" - दुर्गा बोलल्याबरोबर बाईंनी तिचा हात दाबला. दादांना काही समजेना.

"मीच त्यांना तसं सांगितलं आहे..."

"नंतर सांगते नं मी तुम्हाला !"

तालीम संपलीच होती, त्यामुळे इतर सर्व निघून गेले. हॉलमध्ये दादा, दुर्गा, बाई आणि शेखर उरलेत.

बाई आणि दुर्गा आपापसात हळुहळू बोलत होत्या. दादांना थोडेफार उमजत होते. दादांचं आपल्याकडे लक्ष आहे हे लक्षात येताच बाईंनी त्यांनाही संभाषणात सामील करून घेतले.

"त्याचं असं आहे दादा, माझे मिस्टर जरा संशयी आहेत." - बाई.

"जरा ? जरा नाही चांगलेच संशयी आहेत. ते फक्त संशयीच आहेत."

"नाही गं, तसे चांगले आहेत ते पण..."

"पण जरा रागीट तापट आहेत. झालंच तर ऐतखाऊ आळशी."

"अं ! आळशीपणा तर रक्तात मुरलेला आहे. तो तर त्यांचा खानदानी गुण आहे."

"झालं काय होतं नेमकं ?"

"विशेष असं काही नाही. पण कधी नव्हे ते एकदा ते बायकोचं कौतुक करायचं हुक्की आली त्यांना आणि ते आमची तालीम पहायला आलेत. त्यावेळी आमचं नाटक चालू होतं... त्या नाटकाच्या शेवटच्या सीनची तालीम झाली. त्यामध्ये तरूण मुलगा आणि आईचा प्रसंग होता. त्यामध्ये तो मुलगा आईच्या मांडीवर प्राण सोडतो. आणि मरतांना आईकडून काही वचन घेतो. त्याच्या मृत्युचा बदला घेण्यासाठी वचन घेतो. तालीम वगैरे आटोपून आम्ही सर्व घरी परतत होतो तर "हे" आम्हा सर्वांसोबत न येता मागे मागेच रेंगाळत राहिले. म्हटलं चला लवकर मला भूक लागली आहे."

तर म्हणाले, "मी येतो मागावून वाटल्यास तू जा डबलसीट त्या दुर्गाच्या सायकलवर."

"मीच ह्यांना सायकलवर घरी सोडले. परतणार होते तर ह्यांनीच मला मुद्दाम थांबवून घेतले."

बराच वेळानंतर हे आले. आल्या आल्या दुधड स्वरात म्हणाले -

"मोठं गोड वाटलं असेल तुला त्या पोट्ट्याचा हात हातात धरून बसायला !"

"असं म्हणाले ते ?" - दादा.

"हो ! अहो ही तर फक्त सुरवात होती. मी तर आश्चर्याने थक्कच झाली."

"नाही मला थोडा अंदाज होताच म्हणूनच मी तुला मुद्दाम थांबवून घेतलं होतं. तेवढाच आधार !"

"तरी बरं रोजच्या तालमीत काही तुम्ही मुलाच डोकं मांडीवर घेत नव्हत्या. मी बरंच बोलली त्यांना"

"मग ?"

"काही परिणाम होत नसतो."

"शेवटी मी निघून गेली." - दुर्गा.

"ही गेल्यानंतर तर आमचं कडाक्याच भांडण झालं. मी रडतच झोपी गेली. दुसऱ्या दिवशी हे अगदी नेहमीसारखे झाले. माझं मात्र ठरलं होतं."

रात्री तालमीच्या वेळी मला घरीच पाहून ते आश्चर्याने म्हणाले -

अनुक्रमणिका

"आज घरी कशी काय ? नाटक नाही का ?"

"मी तर नाटक सोडलं. त्यांना तसं सांगितल्यावर ते एकदम गयावयाच करायला लागले. नाटक सोडू नको म्हणाले. स्वतः तालीमहॉलवर सोडायची तयारी दाखवली."

"आं काय म्हणता ? इतका कसा काय बदल ?" - दादा.

"अहो सरळ गोष्ट आहे, मी ओळखून आहे ना ह्यांच्या नवऱ्याला. एक नंबरचा स्वार्थी माणूस आहे. नाटक बंद म्हणजे नाटकापासून मिळणारे उत्पन्न बंद !"

"नाटकापासूनचे उत्पन्न ? नाटकापासून कोणते पैसे मिळतात ? नाटकात तर उलट पैसे जातात !"

"अहो ते तुमच्या सारख्यांचे, हौशी कलाकारांचे. ह्या पहिल्यांदा हौशी कलावंतासोबत काम करताहेत. खरं तर ह्या शंभर टक्के व्यावसायिक कलावंत आहेत. खेड्यापाड्यात होणाऱ्या नाटकात, जत्रेतल्या कलापथकात ह्याखूप प्रसिद्ध आहेत."

"पण त्याचे काय पैसे मिळत असतील ?"

"फारसे नाही. पण तेच जे काही थोडेफार मिळतात, संसाराच्या कामी पडतात."

"हं !... मग ?"

"मग मी अडून बसली आणि शेवटी एक अट टाकली. ती ही की त्यांनी एकतर तालीम पाहायला येवूच नये आणि जर आलेच कधी तर नंतर माझे डोके खाऊ नये. नंतर माझ्या डोक्याशी कटकट करू नये. मग झाले सरळ." - बाई.

"मला तर पटतच नाहीत हिचे मिस्टर, मला इतका राग येत असतो त्यांचा ! पण त्यांच्यापेक्षा मला बाईंचाच जास्त राग येत असतो."

"का ?" - दादा.

"अहो या कशाला इतकं सहन करतात ? ह्या अन्याय सहन करतात म्हणून ते अधिकच शेफारतात मी जर त्यांच्या जागी असते ना ?..."

"काय केलं असतं ?..."

"चांगली गंमत दाखवली असती. अशी खरडपट्टी काढली असती की सुतासारखे सरळ झाले असते."

"या सर्व बोलायच्या गोष्टी आहेत बाई !... काही करता येत नाही... काहीच करता येत नसते."

"ठीक आहे फारसे काही करता येत नाही हे सुद्धा मी समजू शकते, पण ज्या नवऱ्याचा इतका त्रास आहे, त्याच्यासाठीच परत हरतालिका, वटसावित्रीचा उपवास, मंगळसूत्र, बांगड्या, कुंकू... कशाला हवीत ही सर्व नाटकं ?"

"अच्छा, अच्छा म्हणजे आता तू स्त्रीमुक्तीवाली झाली आहेस तर !"

"झाली म्हणजे ? होतीच मी पूर्वीपासून"

"अरे व्वा ! मी सुद्धा या चळवळीचा खंदा समर्थक आहे" - दादांनी म्हणताच दुर्गाने 'शेक हँड' साठी हात पुढे केला.

"एक मिनिट एक मिनिट ! माझी भूमिका आधी थोडी समजून घे ! तुम्ही स्त्रीमुक्तीवाले आम्हीपण स्त्रीमुक्तीवालेच. तरी पण आपल्यात थोडा फरक आहे. तो कसा ?"

"कसा" - दुर्गा.

"तुम्ही 'स्त्री'ची मुक्ती करू पाहता यासाठी तुमचा लढा असतो. आमची स्त्री मुक्ती म्हणजे स्त्री 'पासून' मुक्ती मिळावी म्हणून मनातल्या मनात प्रार्थना करतो. अब मिलाओ हाथ !"

बाई हसायला लागल्या. दादा मिस्किल हसत होते. आता दादांना काय म्हणावे ? हे दुर्गाला कळेना.

काहीसे व्यग्र असे, रात्री दादा अचानक शेखरच्या घरी आले आणि बसून राहिलेत. असे बसणे खरं तर त्यांच्या स्वभावात नव्हते. शेवटी शेखरने विचारले.

"का हो, काही नवल विशेष ?"

अनुक्रमणिका

"विशेष काही नाही. पण तुम्ही जरा चलता का ? बाहेर बोलू."

"इथेच सांगा नं. थोड्याच वेळात मला जेवायला बसायचं आहे" शेखर.

"बरं मग असं करतो, मी चलतोच, परत उद्यापरवा येईल."

दादा उठले आणि चालायलाही लागले ! ते जरा अस्वस्थच वाटत होते. आज काहीतरी वेगळेच प्रकरण आहे हे शेखरच्या लक्षात आले आणि तो उठला. दोघेही बाहेर पडले.

इतर वेळी भडभडून बोलणारे दादा, पण आज विषयाला तोंड कसे फोडावे यावर विचार करत होते.

"का हो काय झालं ? तब्येत बरी नाही का ?"

"नाही तब्येत ठीक आहे."

"नाटकाचं ठीक सुरू आहे ना ?"

"हं !... नाटकाचचं तर आहे..."

"का ? काय झालं कोणी गैरहजर आहे का ?"

"नाही, झालं काहीच नाही. आजार, सोडून जाणे, राग लोभ, रोलबाबत नाराजी या लहान सहान गोष्टी तर मी यूं उडवतो." तळहातावर फुंकर घालत ते म्हणाले.

"तर काय झालं..."

दादा परत थबकले !

"काय झालं ?" शेखरची उत्सुकता - काळजी.

"नाही... म्हणजे तसे काही भयानक झाले नाही... पण तरीही... तरी जरा वेगळंच घडलं. असं आजपर्यंत कधी घडलं नाही."

"अहो पण नेमकं काय घडलं ?"

"सांगतो नं, तेच तर सांगतो, त्याचं काय आहे नाटक बसवताना जे प्रवेश कच्चे असतात त्यावर अधिक मेहनत घ्यावी लागते."

"हं, बरं मग ?"

"ही मेहनत कधी घेणार ? तर मी साधारणतः अशा प्रवेशांची तालीम मुख्य तालमीच्या थोडी आधी घेतो. कारण तेव्हा सर्वच कलावंत आलेले नसतात. गर्दी नसते. ज्याच्यावर मेहनत घ्यायची असते त्या कलावंतासाठी वारंवार तालीम देताना संकोच वाटत नाही."

"हे तर मला सर्व माहितच आहे. अहो पण मग नेमकं झालं काय ?" आता शेखरची उत्सुकता ताणून तुटायला आली होती.

"सांगतोच आहे ना. ही झाली सगळी पार्श्वभूमी, तर आज झालं काय की हॉलमध्ये तालमीच्या आधी आम्ही दोघंच हॉलमध्ये होतो."

"कोण - कोण ?"

"मी आण - "

"शेवलकरबाई" शेखरने ताडले.

"आँ ? तुम्ही कसे ओळखले ?"

"इतकंही ओळखणार नाही ? तुम्ही पुढे तर सांगा."

"सांगतो तर ऐका. शेवलकर मामींची तालीम घेत होतो. सीन आमच्या दोघांचा."

"बहुतेक प्रसग तुमच्या दोघांचेच आहेत ना ?"

"हं ! तर अगदी भावनेनं ओथंबलेला तो प्रसंग. मुलगा-सून यांचा जाच आजीला असह्य होतो. आजोबा बाजारातून घरी येतात. आजी तिच्या मनाचा कोंडमारा आजोबांजवळ मोकळा करताना अक्षरशः मोडून पडते. ती ओक्साबोक्शी रडायला लागते. तिला तिच्या नवऱ्याचा आधार हवा असतो.

"नाही सहन होत हो, नाही सहन होत. असं म्हणत ती आजोबांच्या जवळ जाते. त्यांचा हात हातात घेते आणि रडते असा तो प्रसंग होता."

"आज मला सुरुवातीपासूनच असे वाटत होते की, मामी फार मनापासून काम करताहेत."

"त्या तर नेहमीच करतात." - शेखर.

"नेहमी तर त्या करतातच, पण आज त्यांची मनःस्थिती काही ठीक नव्हती."

"आणि तरीही त्या..."

"हो आज त्या नेहमीपेक्षा वेगळ्या वाटतच होत्या. काहीशा दुःखी, त्यामुळेही कदाचित त्या फार चांगलं काम करताहेत असं मला वाटलं होतं. तर झालं काय की, वाक्याच्या सुरुवातीपासूनच त्यांचा आवाज गदगदायला लागला. वाक्यांच्या मध्यभागी त्यांचे हुंदके सुरू झाले."

"तुम्ही नसले की मला फार एकटं वाटतं फार एकटं वाटतं !" हे वाक्य तर अशा काही बोलल्या की, तीक्ष्ण सुरी माझ्या काळजातून सर्रकन् फिरल्यासारखेच मला वाटले. त्या जवळ आल्या अन् म्हणाल्या,

"नाही सहन होत हो ! नाही सहन होत !"

मी त्यांच्याजवळ जाण्याच्या आतच त्यांचं रडणं सुरू झालं. त्यांचा अभिनय पाहून तर मी थक्कच झालो होतो. आवेगाने त्यांनी माझा हात त्यांच्या हातात घेतला अन् तेव्हा मात्र त्या स्पर्शाने मी चमकलो, चरकलो. एकदम मला शंका आली.

...ह्या खरंच तर रडत नाहीत ? मी त्यांचा हात थोपटला. तशा उसासून त्या म्हणत राहिल्या - "नाही सहन होत हो हे एकटेपण ! नाही सहन होत."

मी पुढचे संवाद म्हटले "रडू नको- रडू नकोस. आपण यातनं मार्ग काढू काहीतरी"

त्यावर - "रडू नको तर काय करू ? तुम्हीच फक्त यावर मार्ग काढू शकता, फक्त तुम्हीच ! असं म्हणत रडत त्या मला बिलगल्याच."

"आँ ! काय म्हणता ? बिलगल्या ?"

"हो ! बिलगल्या."

"कशा काय ?"

"घ्या ! आता बोंबला ! कशा काय म्हणजे, काय सांगू आता तुम्हाला ? त्या रडताना इतक्या जवळ होत्या की, हात लांब करताच मी त्यांच्या विळख्यातच गेलो."

"मग ?"

"मग काय, तेव्हा मला स्पष्ट लक्षात आले की आता काही हे नाटक नाही."

"विळखा घातल्यावरोवर काय वाटलं तुम्हाला ?" - शेखर.

"भीती वाटली."

"भीती ?"

"हो, पहिल्या प्रथम जाणवली ती भीतीच ! त्या एवढ्या मोठ्या हॉलमध्ये फक्त आम्ही दोघेच आहोत हे एकदम मला जाणवलं. त्यात ही बाई जोरजोराने रडते आहे. मला मिठी मारले आहे अशावेळीच समजा कोणी आलं असतं तर ?"

"हं ! बरोबर आहे. मग काय केलं तुम्ही ?"

"काय करणार ? मिठी मारल्याक्षणीच मी त्यांना - अहो मामी सोडा, अहो बाई सोडा, असं म्हणायला लागलो आणि त्याचबरोबर माझं शरीर त्यांना दूर ढकलून स्वतः मागे सरकायला पाहू लागलं."

"खरं ?"

"अगदी खरं ! पण त्यांना दूर सारायला पाहताच त्या अधिकच लगटल्या. मी जोर वाढवताच त्यांनी अगदी घट्टच धरले मला."

"त्यावेळी तुम्हाला नेमकं काय वाटलं ?" - शेखर.

दादा थोडं थांबले. डोळे मिटून त्यांनी आठवले अन् म्हणाले -

"मामी आपल्या इतक्या जवळ आल्या आहेत, हे सर्व शरीराला जाणवलं. त्या त्यांचा चेहरा वर करून - 'मला सोडू नका, या जगात मी एकटी आहे' - असे म्हणाल्या.

"मला सांगा, तुम्हाला चांगलं नाही वाटलं का ?"

"चांगलं ?" विचित्र, अनपेक्षित घडलं. अन् आता विचार करतो तेव्हा हे सगळं खरंच वाटत नाही."

"पुढे काय झालं ?"

"काही नाही. मी त्यांना जोरात ढकलून ओरडलो - 'मामी, मामी सोडा मला'. त्यावर त्या म्हणाल्या - मला

मामी म्हणू नका, वासंती म्हणा. 'मग मात्र मी चिडलो'. पागल झालात का ? आणि मी स्वतः सोडवून घेतले. त्याबरोबर त्या हुंदके देऊन रडायला लागल्यात.

पहिल्याप्रथम आजुबाजूला पहात मी माझे कपडे नीट केलेत. अन् त्यांना म्हणालो, "आधी शांत व्हा पाहू. त्यावर त्या काय म्हणाल्या असतील ?"

"काय ?"

"म्हणाल्यात की, 'मी पागल नाही !' तशाही स्थितीत मला हसूच आले. त्यांना समजावत म्हणालो, 'अच्छा बाबा, नाही आहात तुम्ही पागल. पण आता रडू नका. आणि स्वतःवरचा ताबा सोडू नका."

शेखर दादांकडे पाहतच राहिला. थोडावेळ थांबून दादाच पुढे बोलायला लागले -

"मी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. त्यांनी रडू आवरले. मी त्यांना समजावले. 'आधी तोंड पुसून शांत व्हा. आणि काय झालं ते नीट सांगा.'

"मग ?" - शेखर.

"त्या हळूहळू बोलायला लागल्या. काही वेळातच त्या अगदी नेहमीसारख्या झाल्या. थोड्याच वेळात इतरही लोक आलेत. तालीम सुरू झाली. जसं आधी काही घडलंच नाही. अशी त्यांनी तालीम दिली. पण मी मात्र स्वतःला सावरू शकलो नाही."

"मामीचं आश्चर्यच आहे."

"नाही, फारसं आश्चर्य नाही. कारण त्यांनी त्यांच्या मनातलं ओकून टाकल्याने त्यांचं मन साफ झालं असावं आणि त्या भूमिकेवर लक्ष केंद्रित करू शकल्या. पण त्यांचं ओझं माझ्या मनावर आल्यामुळे मात्र मी माझ्या कामाकडे लक्ष देऊ शकलो नाही."

"पण असं काय सांगितलं त्यांनी ?"

"चला नं. इथे फाटकाशी असं बोलत उभं राहण्यापेक्षा आपण थोडं रस्त्यावरून जाऊ." दादा म्हणाले.

रात्रीची नऊची वेळ असावी. रस्त्यावरून फारशी रहदारी नव्हती. रस्त्यावरच्या मोठ्या नाल्यावर जो छोटासा पूल होता त्याच्या कठड्यावर दादा आणि शेखर बसले.

"हं, सांगा."

"सांगतोच आहे. पण सांगण्यापूर्वी हे सर्व सांगावे की नाही असाही विचार मनात येतो. कारण विषय नाजूक आणि गुप्त आहे. पण असं समजतो की मी तुमच्याशी बोलतो आहे म्हणजे मी माझ्या मनाशीच बोलतो आहे."

"आता लवकर सांगा बुवा."

"शेवलकरमामी स्वतःबद्दल सांगत होत्या. माहेर किंवा सासरकडून त्यांना फारसे कोणी जवळचे नातलग नाहीत. कोणी असा मित्र मैत्रीण नाही, किंवा अशी एखादी जागा नाही जिथे निःसंकोचपणे मनातली जिव्हाळी लागलेली जखम त्या उघडली करू शकतील. त्यामुळे त्यांना फार एकाकी वाटतं. तशी त्यांना नोकरी आहे. मुलगी आहे आणि आर्थिक परिस्थिती फार चांगली नसली तरी वाईट नक्कीच नाही. त्यांना या जगात असं कोणी तरी हवं आहे की ज्याच्याजवळ त्या मन मोकळं करू शकतील."

"का ? त्यांचा नवरा ?"

"नवरा आहे त्यांना... पण तिथेच तर अडचण आहे."

"कोणती ?"

"त्यांच्या नवऱ्याला महारोग आहे."

"काय ? महारोग ?" ओट्यावर बसलेला शेखर किंचाळत उठला.

"हो त्याला महारोग झालाय."

"अरे बापरे ! पण कसा काय झाला त्याला हा रोग ?"

"आता ते कोण कसं सांगू शकेल ?"

"का हो पण मामीकडे पाहून तर तसं काही वाटतही नाही"

"नाही ना ? तेच तर ! आपल्या नवऱ्याला महारोग

झाला आहे ही गोष्ट मामींनी जवळपास गुप्त ठेवली आहे. नवरा आजारी असल्यामुळे सुट्टीवर आहे. एवढंच त्या सांगत होत्या. पण ह्या अशा गोष्टी काही प्रमाणात लोकांना कळतातच."

"कधी कळलं त्यांना ह्या रोगाचं ?"

"कधी कळलं म्हणजे गेल्या सात आठ वर्षांपासून मामी नवऱ्यापासून दूर आहेत. म्हणजे तितका तर नक्कीच जुना आहे हा आजार."

"दूर आहे म्हणजे ?"

"म्हणजे जरी शेवलकरांना महारोग झाला तरी मामींनी त्यांना घरातच ठेवले ! आश्रमात, कुष्ठधामात किंवा घराबाहेर काढले नाही."

"मग ?"

"ते सर्व एकत्रच राहतात त्यांच्या लहानशा घरात"

"महारोग असून एकाच घरात ?"

"हो. हा मामींचाच आग्रह होता आणि आहे. फक्त त्यांना दूर ठेवले आहे."

"दूर म्हणजे ?"

"त्यांच्या सर्व वस्तू वेगळ्या ठेवल्या असतात आणि मुख्य म्हणजे गेल्या अनेक वर्षांपासून त्यांचे एकमेकांशी कुठल्याही प्रकारचे शारीरिक संबंध नाहीत."

"अस्सं !"

"आणि अर्थात ते साहजिकच आहे म्हणा. पण याच गोष्टीचा मामीला अशात त्रास होतो. शरीराला ज्या आवश्यक गोष्टी असतात त्यात नवऱ्यापासून मिळणारे सुख-समाधान ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. पण या आजारामुळे मामी यापासून वंचित आहेत. इतकी वर्षे त्यांनी सर्व सहन केलं पण आज मात्र त्यांनी त्यांचं मन पहिल्यांदाच माझ्याजवळ मोकळं केलं. आतापर्यंत त्यांनी याबाबत स्वतःवर संयम राखला. पण ज़ेव्हापासून त्या माझ्या सान्निध्यात आल्या तेव्हापासून त्यांना माझे जबरदस्त आकर्षण वाटू लागले आणि संधी मिळताच त्यांनी त्यांच्या भावना माझ्याजवळ व्यक्त केल्या."

"अस्सं"

"मी त्यांना आवडतो माझा हसरा स्वभाव, नाटकातला अभिनय यावर त्या खुश आहेत. तशा त्या एकतर्फी प्रेमच करतात माझ्यावर. कारण मी त्यांना योग्य वाटतो. त्यांनी अपेक्षा व्यक्त केली तशी आज."

"कोणती ?"

"आता दुसरी कोणती असणार ?"

"अरे बापरे !"

"हं, तीच तर समस्या आहे." शेखरला दादा इतके गंभीर कधीच दिसले नव्हते.

"आणि त्यात परत हे नाटक अगदी तोंडावर आले आहे. काय करावं समजत नाही." दादा निःश्वास टाकीत म्हणाले.

"मामींना 'हो' म्हणावे तर कसे अन् 'नाही' म्हणावे तर ते कसं ? हा मला प्रश्न पडला आहे. अच्छा, मी निघतो, वेळ बराच झालाय."

दादा निघून गेले. शेखर अवाक् होऊन पाहतच राहिला. त्याच्या नजरेपुढे नाटकाची तालीम करताना दादांच्या डोळ्यात डोळे घालून पाहणाऱ्या मामी येत होत्या.

दुसऱ्या दिवशी शेखर बँकेतून परतताना दादांच्या घराकडे वळला. पण घराच्या दाराशीच दादा, त्यांची मोठी मुलगी, जावई, दोन लहान मुलं बाहेर पडलेले दिसले. शेखर दिसताच "बरे वेळेवर आलात, चला सिनेमाला !" दादा म्हणाले.

"सिनेमा ? कोणता ?"

"सिनेमा काय, जो भेटेल तो पहायचा - चला"

"मला जमणार नाही. मी घरी काही बोललो नाही" - शेखर.

"काही खास कामासाठी आला होता ?" - दादा.

"तसं काही नाही, पण असंच जरा..."

अनुक्रमणिका

दादा लगेच बाजूला आले.

"विशेष काही नाही मी नाटकातल्या..." शेखर काही बोलायच्या आतच दादांनी सुरूवात केली -

"नाही, नाही तुम्ही काही काळजी करू नका, आता मी नाटकातल्या सगळ्यांना सांगूनच टाकले आहे की, त्यांनी फक्त नाटकाचाच गंभीरपणे विचार करावा. इतर सर्व गोष्टी बाजूला टाकाव्या. नाहीतर हे नाटक काही धड होणार नाही आणि तसे झालेच तर माझेच नाक कापल्या जाईल असे नाही. नाटक काही माझे एकट्याचेच नाही. प्रत्येक कलावंताचे आहे. मीच काही ठेका घेतला नाही नाटकाचा."

"अहो पण झालं काय ?"

"लोकांना असे वाटते की, नाटक ही फक्त एकट्या दिग्दर्शकाचीच हौस आणि जबाबदारी आहे. आणि ते नाटकात काम करतात म्हणजे जणू माझ्यावर उपकारच करतात. साध्या साध्या गोष्टींमध्ये सहकार्य देत नाहीत. त्यांची कामे सुद्धा ते करणार नाहीत, त्यासाठीही मीच मेलो पाहिजे."

"दादा चला ना लवकर, उशीर होतोय. पिक्चर सुरू होऊन जाईल." दादांची मोठी मुलगी हातातल्या घड्याळाकडे पाहत किरकिरत होती.

"म्हणजे तुम्ही फर्स्ट शो पाहणार ?"

"हो" - दादा सहज म्हणाले.

"आणि मग आजची तालीम ?"

"गेली उडत ! बसतील बसतील अन् जातील बोंबलत ! माझी मुलगी, जावई आले आहेत."

●●●

दुर्गा तालमीसाठी शाळेत पोचली, त्यावेळी नाटकातील सर्व कलावंत शाळेच्या पटांगणात आपापल्या वाहनांवर, सायकलवर बसून आपापसात गप्पा मारत होते. दुर्गा त्यांना ओलांडत म्हणाली -

"अरे तुम्ही बाहेर का ? तालीम सुरू करायची नाही का ?" म्हणत ती हॉलकडे वळली.

"अरे अरे तुम्ही कुठे चालल्या ?"

"कुठे म्हणजे हॉल मधे !"

"अरे त्यांना जावू दे आत मधे...त्यांना कदाचित बोलावले असेल आत...." कोणीतरी म्हणाले. तसे उरलेले हसले.

"का बरं ? आत काय आहे ?"

"तुम्हांला माहित नाही ? काय गोष्ट करता मॅडम तुम्ही ?" आतमध्ये स्पेशल तालीम सुरू आहे" - परत तोच म्हणाला. यावेळी सर्व आधीच्यापेक्षाही जास्त हसले.

दुर्गाला काही ते ठीक वाटले नाही. काही न बोलता ती दार उघडून आत गेली. दादांनी तिला चूप रहायची खूण केली. आणि मधातल्या खुर्चीवर बसण्याची खूण केली. दुर्गाला बरे वाटले. कारण ती जागा दिग्दर्शकाची म्हणजे दादांची होती. बाई आजीच्या कामात बुडून गेल्या होत्या. दादा एकाच वेळी आबांचे काम आणि बाईसाठी दिग्दर्शक म्हणून काम करत होते. दादा बारीक बारीक गोष्ट समजावून सांगत होते. काही ठिकाणी बाईंना स्वातंत्र्य देत होते. तर काही ठिकाणी टोकाचा आग्रह धरत होते. आणि नकळत नाटकातील एक होऊन गेली. हळूहळू दुर्गाच्या पाठोपाठ इतरही आलेत आणि नेहमीची तालीम सुरू झाली. तालमीच्या शेवटी दादांनी प्रत्येकाच्या नावाची चिठ्ठी दिली. त्या मध्ये स्पेशल तालमीची वेळ, प्रवेश क्रमांक व विशेष सूचना होत्या. अशा रीतीने दादा प्रत्येक कलावंताला जणू वेठीला धरणार होते.

तालमी नंतर बाई आणि दुर्गा सोबतच घराकडे निघाल्या. तेव्हा बाई म्हणाल्या, "आज मला तालमीचे खूप समाधान वाटत आहे. दादा खरोखरच छान नाटक बसवतात. नाटक, त्यामधील प्रत्येकाची भूमिका, आपापसातील संबंध, बदलणारे संदर्भ व त्याचा होणारा परिणाम यावर ते जे भाष्य करतात ते तर मला ऐकतच रहावेसे वाटते."

"हो, अगदी बरोबर"

"त्यांना मी प्रश्न विचारून विचारून भंडावून सोडते. पण ते कधीही चिडत नाही ! मला तर खरंच कमाल वाटते त्यांची."

दुर्गा काही तरी मधे बोलणार होती. पण बाईंनी तिला बोलूच दिले नाही. त्यांनी आपले 'दादा-पुराण' अव्याहत चालूच ठेवले. शेवटी दुर्गा थकली व म्हणाली -

"अहो बाई विचार काय आहे तुमचा ? दादा खेरीज काही आहे की नाही आज तुम्हाला बोलायला ? निदान माझ्याकडे तर पहा."

"खरं आहे दुर्गा तुझे म्हणणे. तुझ्यामुळे मी या नाटकात आले. मला दादांचं शिकवणं इतकं आवडतं, इतकं आवडतं की, बाकी काहीच करू नाही. बस फक्त त्यांच्याकडून सतत शिकतच रहावं, शिकतच रहावं."

"असं काय काय शिकणार आहात तुम्ही ?"

"मला काय माहीत, ते आणखी काय शिकवू शकतात ते !"

"ते तर हरहुन्नरी कलावंत आणि माणूस आहेत. ते काय वाटेल ते करू शकतात. आणि शिकवू शकतात. स्वैंपाकापासून तो इंग्रजीपर्यंत अन् नाटक, गाण्यापासून तो नाचापर्यंत."

"ते जे जे काही शिकवू शकतील ते ते सर्व मी शिकेल."

"पहा बरं सावध रहा. नाही तर भलतंच काही शिकाल अन् वेगळंच काही कराल !"

"म्हणजे ?"

"हे असे जे कलावंत असतात ना ? त्यांच्यापासून आपल्यासारख्या साध्यासुध्या माणसाने सावधच राहीले पाहिजे."

"कारण काय ?"

"अहो कधी ते त्यांच्या जाळ्यात ओढतील आणि आपल्याला फसवतील ते सांगता नाही येत. वाईट असतात ते फार !"

"तुला काय म्हणायचे आहे, दादा चांगले नाहीत ? म्हणजे त्यांचे चारित्र्य ?"

"यात चांगलं वाईटाचा प्रश्न येतोच कुठे ? मला जो अनुभव आला तो मी सांगते आहे. आणि तुम्हाला सावध करते आहे. सगळे पुरुष शेवटी इथून तिथून सारखेच असतात."

"मला नाही बाई दादा तसे वाटत. आणि उलट दादा तसे असतील तर मला अधिक आवडतील !"

"काय बोलताय बाई तुम्ही ! तुम्ही तर एखाद्या प्रेमात पडलेल्या सोळा वर्षाच्या मुलीप्रमाणे बोलत आहात"

"काय हरकत आहे ? फक्त लहानांनीच प्रेमात पडावे असा काही नियम आहे काय ?"

"मला वाटते बाई आता काही खरं नाही तुमचं ! अहो तुम्ही कोण आहात ? तुमचं वय काय ? तुमचा व्यवसाय, तुमचा संसार, नवरा, मुली, शाळा आणि हे तुमचे संस्कार सर्व कुठे ? असं हे काय बेताल बडबडत आहात तुम्ही ? बाई तुम्ही किती बदलल्या ?"

"बदलली मी नाही. तू मला सतत बदलायचा उपदेश द्यायची ! मी बदलली नाही उलट तू बदलली. स्त्रीमुक्तीचा उठता बसता जयघोष करणारी तू ! मी फक्त तुझी गम्मत पहात होते. मग थोडंसं वेगळं बोलायला लागल्या बरोबर तू मला संस्कार आणि भलत्याच संसारिक गोष्टी शिकवायला लागली याचं कारण काय ? मी तर आता माझ्या वाटेने जाणारच आहे. तू स्वतःचा तपास कर !"

...इतक्या वर्षाच्या मुली, बाईंना आपल्या हक्काचे घर वाटत असत. त्या एकाएकी बदलल्या. त्या एकाएकी परकेपणाने बाईंकडे पहायला लागल्या. जे आपण इतके शाश्वत समजतो, गृहीत धरतो, ते इतके तकलादू असते ! म्हणजे मुली माझ्या नाहीत ? त्या माझ्या बाजूने उभ्या नाहीत ? माझं दुःख, माझी कुचंबणा, माझी कुतर ओढ, माझी उपासमार, माझा कोंडमारा हे काही त्यांना दिसत

नाही ? एका क्षणात त्या बापाच्या झाल्या ! त्यांची सगळी सहानुभूती बापाच्या बाजूला गेली. आणि माझ्या वाटेला आला त्यांचा अविश्वास, संताप, हेटाळणी.... कशासाठी केलं मी हे सर्व मग ? कशाला ओढला हा गाडा इतकी वर्षे ?...

"दुर्गा, मी तुला बदललेली वाटते. हा बदल माझ्यात परिस्थितीमुळे जरी झाला असला तरी तुझासुद्धा त्यात कुठेतरी सहभाग महत्वाचा आहे. तूच मला दादांच्या या नाटकात आणले. पूर्वीपासूनच तू स्त्रीस्वातंत्र्याच्या अतिरेकी कल्पनांनी भारलेली होतीस. कुंकू लावणे, बांगड्या भरणे, मंगळसूत्र घालणे, हरतालिका आणि वटपौर्णिमेचे व्रत ठेवणे अशा कल्पनांनी तू नेहमीच खिल्ली उडवायची. संसाराचे जोखड भिरकावून मुक्त स्वातंत्र्याचा मी अनुभव घेतला पाहिजे, असे तू मला जवळपास रोजच शिकवायची. पण ज्या दादांबद्दल तालमीच्या पहिल्या दिवसापासून ते आजपर्यंत तू वाईट बोलत आलीस ते मला कुठेही तसे वाटले नाहीत. माझ्या मनात त्यांच्याबद्दल निर्माण झालेला तरल, नाजूक आणि हळवा भाव मी ओझरताच तुझ्याजवळ व्यक्त केला. आणि काय आश्चर्य ? अचानक अनपेक्षितपणे तू एकदम बदललीस ! गडकऱ्यांच्या गितेचा आदर्श माझ्यासमोर ठेवणारी तू एकदम सिंधूच्या बाजूची होवून गेलीस. आणि मला भारतीय संस्कृती आणि संस्काराचे महत्व सांगायला लागली. मी दादांकडे वेगळ्या नजरेने जरी पाहिले तरी माझे डोळे फोडण्याइतपत तुझ्या भावाची सत्ता आहे... पण मलाही आता असे वाटते की, किती दिवस मी तुझ्या ओंजळीने पाणी पिवू आणि का म्हणून ? दादांना जर मी आवडते आणि मला ही जर ते आवडतात तर यात तुझा प्रश्न येतोच कुठे. तू काय स्वतःला हिटलर समजते ? आणि मग ऐक. एकंदरच आयुष्याबद्दल मी इतकी उदासीन, निरीच्छ आणि उदार आहे की, माझे आयुष्य लांबले काय अन् संपले काय, तू मला ओळखलेलेच नाही. मी किती टोकावर जावू शकते याची तुला कल्पनाच नाही. एकदा जर माझ्या मनाने दादांवर प्रेम करावे हे घेतले असेल तर तुझ्या सारखीला मी काय किंमत देणार. उलट तू नाही म्हणते आहेस म्हणून मी मुद्दाम हे असं वागणार. तरी सुद्धा माझ्या मनात राहून राहून हा प्रश्न डोकावतोच की, कालपर्यंत ज्या दादांना तू अक्षरशः शिव्या घालत होती, त्या दादांच्या नाटकात तू काम कसे काय करीत होतीस ? आणि त्यांच्या बद्दलची माझी भावना मी तुझ्याजवळ व्यक्त केल्याबरोबर तुझ्या पोटात एकदम आणि इतकं का दुखावं ?"

"तुम्हांला राग येणार नसेल तर एक विचारू का ?" - बाईंनी भीतभीत दादांना विचारले.

"तुम्ही जरूर विचारा. पण मला राग येणारच नाही असं मी आधीच कसं काय सांगू ? त्यापेक्षा तुम्हांला जे काही विचारायचे असेल ते निःसंकोच विचारा, पुढचे पुढे पाहून घेवू" - दादा

"आपल्या नाटकाचा मुहूर्त तुमच्या हस्ते झाला, त्या दिवसापासून ही गोष्ट मनात डाचते आहे. विचारीन विचारीन म्हणते पण हिम्मतच होत नाही."

"तुम्हांला दुर्गाबद्दल विचारायचे आहे."

"बाई गं ! तुम्हांला इतकं कसं अचूक कळलं ?"

"अहो इतकी साधी गोष्टही जर मी ओळखू शकलो नाही तर मी कसला आलो आहे कलावंत ?.... विचारा तुम्ही"

"काही नाही. विचारायचे एवढेच होते की, तुमचे आणि दुर्गाचे आपसात पटत नाही का ? मी पुढाकार घेवून तुमची मैत्री करून देवू का ?"

"तुम्ही काहीही करू शकणार नाही. तसे आमचे एकमेकांशी सर्वच मुद्यांवर पटते, फक्त माझी एकच गोष्ट तिला पटली नव्हती. आणि तिचीही एकच गोष्ट मला पटू शकली नव्हती."

"कोणती ? सांगा ना !"

अनुक्रमणिका

"तिने माझ्याकडून जी एक अपेक्षा ठेवली होती ती मला पटली नव्हती. आणि माझ्या हातून तिचा जो अपेक्षाभंग झाला होता तो तिला असह्य होता ! त्यामुळे साहजिकच ती माझ्याबद्दल चिडून चिडून बोलणार ! बस एवढे सोडून बाकी इतर काही समस्या नसाव्यात !"

"तुम्ही इतके कसे काय तटस्थ, खरं तर अलिप्त राहू शकता ?"

"यात विशेष असे काहीही नाही. ज्या काही भावना होत्या त्या दुर्गाकडूनच माझ्याजवळ व्यक्त झाल्या होत्या. माझ्याकडून तसे अजिबातच काहीही नव्हते. त्यामुळे मी तटस्थ, खरं तर अलिप्तपणे त्या प्रसंगाकडे पाहू शकलो."

●●●

नाटकाच्या तालमीची वेळ बदलली होती. दादांनी बहुतेकांना तसे निरोप दिले होते. काही परस्पर दिल्या जाणार होते. पण तरीही दादांना राहवले नाही. सवयीने त्यांनी कपडे बदललेच.

"काय तालीम वाटते ?" वहिनींनी टोकलेच. पॅन्टला पट्टा लावताना दादा केवळ ओशाळवाणे हसले.

"पण वेळ तर बदललेली आहे ना ?"

" दादा काही बोलले नाही.

"तरीही जावेच लागते, नाही ? ....तिकडे कोणी चुकून आले तर ?........असेच ना ?" - वहिनी

"हूं" - दादा

"बरोबर आहे. दुसऱ्या कोणाचा वेळ नको जायला.... तुमचा गेला तर तो मात्र चालतो !"

"लवकर याल. नाही तर बसाल तिकडेच ! वांग्याची भाजी करतेय मी आज ! बरं त बरं दारु पीत नाही ते ! नाटकाचीच नशा पुरेशी आहे, नाही ?.... करावेच कशाला मी म्हणते हे धंदे ? नाटकं न् फाटकं ! नाटक कमी अन नाटकंच जास्त ! की आहे कोणी तिकडे बसलेले ? मुलाला पाठवावं लागेल का ?"

"नाही नाही" दादा गडबडीने म्हणाले. आपण जास्तच घाईघाईने "नाही" म्हणालो की काय ? असे त्यांचे त्यांनाच वाटून गेले.

नाटकाच्या दिवशी ऐन वेळी दादांची खूप पंचाईत झाली. माहेरवाशीण म्हणून आलेल्या दादांच्या मोठ्या मुलीची तब्येत दुपारनंतर अचानक बिघडली. सहा महिन्यापूर्वीच तिचे बाळ पोटातल्या पोटात गेले होते. यावेळी तिला "स्ट्रिक्ट बेडरेस्ट' सांगितली असल्याने दादांचे जावई तिला माहेरी सोडून गेले होते. दादा आणि माने नाटकाच्या शेवटच्या धामधुमीत होते. नाटक की मुलीची तब्येत अशा द्विधा मनस्थितीत दादांची चलबिचल सुरू झाली. शेवटी वहिनी म्हणाल्या -

"तुम्ही बिनधास्त नाटक करा. हिच्या तब्येतीचं मी पाहते. नाही तरी सर्व डॉक्टर मंडळी आपलीच आहे."

"पण मग तू नाटकाला कधी येणार ?" - दादा

"नशीबात असेल तर नक्कीच येईल. आणि मी येवू शकले नाही तर मात्र तुम्ही -"

"नाटक संपल्याबरोबर मेकअपही न काढता तसाच हॉस्पिटलला येईन." - दादांनी वहिनीचे वाक्य पूर्ण केले. मुलीच्या डोक्यातून हात फिरवताना दादांना डोळे कोरडे ठेवणे अशक्य झाले. वहिनीकडे वळत ते म्हणाले -

"आज इथे आपल्यासोबत शेखर असता तर ! मी अगदी निर्धास्तपणे नाटकाला गेलो असतो."

"मला पण आज सकाळपासूनच त्याची खूप आठवण येत आहे. नाटक पहायला त्याच्या घरचे कोण कोण येत आहेत ?"

"नक्की मला माहीत नाही. बरेच दिवसात मी त्यांच्याकडे गेलोच नाही. पण नाटकाच्या पासेस मात्र आठवणीने त्यांच्या घरी पाठविण्याची व्यवस्था केली आहे."

दोन अंकी नाटकाचा प्रयोग सुरळीत पार पडला.

पहिला अंक संपताक्षणीच नाटकाने बाजी मारली हे सगळ्यांना कळून चुकले. प्रत्येकाच्या तोंडी आबा आणि आजीचेच नाव होते. आबाचे काम करणारे दादासाहेब लोखंडे यांना सर्वच ओळखत होते. पण 'आजीचे काम करणाऱ्या बाई कोण ? त्या खरोखरच लोखंडे वहिनी आहेत का ?' असे जो तो विचारत होता. दुसरा अंक सुरू होण्यापूर्वी ग्रीनरुममध्ये सर्वच कलावंतांच्या घरचे लोक अभिनंदन करण्यासाठी आत आले हाते. बाईंच्या मुली आपल्या बाबांसोबत आल्या होत्या. त्या दोघीही बाईंच्या भोवती आनंदाने वावरत होत्या. तेवढ्यात दादांचा एक वार्ताहर मित्र तेथे आला. आबा आणि आजीचे अभिनंदन करत तो म्हणाला-

"यावर्षीचे अभिनयाचे स्त्री आणि पुरुषांचे पारितोषिक एकाच नाटकातील जोडीला मिळणार आहे. आणि त्याचा फोटो मी आधीच काढून घेत आहे. प्लिज पोज द्या."

आणि त्याने त्यांचे भराभर दोन तीन फोटो घेतले. मुलींचे बाबा दूर कोपऱ्यातून हे सर्व पहात होते. बाईंचे लक्ष तेवढ्या धामधुमीत बरोबर आपल्या नवऱ्याकडे होते. त्या फोटोग्राफरला म्हणाल्या -

"अहो प्लिज, कोपऱ्यात नेहरु शर्ट आणि पायजामा घालून जे उभे आहेत ना त्यांनाही फोटोसाठी बोलवा."

पण मुलींचे बाबा ठामपणे नकार देत राहिले. हे सर्व दादांच्या जेव्हा लक्षात आले तेव्हा त्यांनी पटकन् बाईंच्या दोन्ही मुलींना फोटोत सामावून घेतले.

पण बाबांना तेही अजिबात आवडले नाही. हातातल्या अर्धवट पिलेल्या चहाची कपबशी त्यांनी बाजुच्या खिडकीत दाणकन् आदळली. आणि दुर्गाला जवळ बोलावून घेत ते बडबड करायला लागले -

"पुरे झाले यांचे हे तमाशे ! हे नाटकात काम करणारे सगळे चोर कसे रंगेल असतात, ते मी चांगले ओळखून आहे. आता यानंतर मी हिला दादांच्या नाटकात काम करू देणार नाही."

आजुबाजूने लगबगीने जाणारी येणारी मंडळी बाबांच्या अशा बोलण्याने थबकत होती. आणि नकळत बाबांच्या त्या बोलण्यात ओढल्या जात होती. प्रकरण हाताबाहेर जाईल हे लक्षात येताच दुर्गा गरजली -

"ए मिस्टर ! काय बोलता आहात तुम्ही ? आणि कोणाबद्दल बोलता आहात याचे काही भान आहे की नाही ? की तुमची सगळी अक्कल शेण खायला गेली ?"

"ए गावभवाने तू कशी आहेस तेही मला चांगले माहीत आहे. आणि तू या रंगेल दादाची बाजू का घेत आहेस ते ही मला कळते आहे !"

"ए म्हाताऱ्या तोंड सांभाळून बोल. एक वेळ तू माझ्याबद्दल काही बोललास तर तेही मी ऐकून घेईन पण खबरदार दादासाहेबांच्या बद्दल आता एक अक्षरही बोललास तर ! इथून उचलून तुला नदीत फेकून देईन. दादासाहेबांच्या नखाची तरी सर येईल का तुला ? अरे दादासाहेबांचे नुसते नांव जरी कळले तरी गावातले आईबाप निश्चितपणे आपल्या तरुण मुलींना त्यांच्या नाटकात पाठवीतात. दादांच्या नाटकाला कधी मुलींची कमी गेली नाही की त्यांच्या नाटकात काम केले म्हणून कोण्या मुलीला बट्टा लागला नाही."

भांडण आणखी लांबले असते. पण दुसरा अंक सुरू होण्यापूर्वीची घंटी झाली. आणि दुर्गा आत निघून गेली.

●●●

अपेक्षेप्रमाणेच स्पर्धेचा निकाल लागला. दादांच्या नाटकाने निर्मिती, दिग्दर्शन स्त्री पुरुष अभिनय यामधे प्रथम क्रमांक पटकावला. दरम्यानच्या काळात दादांच्या मुलीची तब्येत स्थिरस्थावर झाली होती. शेखर सुद्धा मुंबईवरून परतला होता. नाटकाचा निकाल लागून जेमतेम पंधरा-वीस दिवस झाले असतील. शेखर त्याच्या वडिलांना ऑफिसमध्ये पोचवून परतत होता. रस्त्यातच वाट अडवून उभ्या असणाऱ्या जनावराप्रमाणे अचानक दादा शेखरला दिसले. स्कूटर आपोआप थांबली. दादांनी लगेच मागच्या

सीटवर धुळीसाठी हात थोपटला. स्कूटरवर टांग मारत ते म्हणाले -

"चला"

"कुठे ?"

"कुठेही ! तुम्ही जिथे जाणार होता तिथे ! मी तुमच्या सोबत येतो. आज मला थोडा वेळ आहे. त्याचं काय आहे, बरेच दिवसात तुमची भेट झाली नाही तर मला चैन पडत नाही. म्हणून मी घरी येणारच होतो. तेवढ्यात तुमच्या स्कूटरचा आवाज ओळखायला आला."

चालू स्कूटरवर दादा शेखरच्या कानाशी बोलत होते. त्यांच्या कडक मिशा कानाच्या पाळीला लागून शेखरला हुळहुळत होते.

"बरं पण आता तुम्ही कुठे चालले ?" - दादा

"मलाही माहीत नाही." - शेखर

"म्हणजे ?"

"म्हणजे कुठेही ! जिथे स्कूटर जाईल तिकडे !" - शेखर हसत म्हणाला.

दादाही मग खुशीने खिंकाळले आणि मग म्हणाले "अरे वा ! अशी स्कूटर चालवायला तर मलाही आवडेल."

लगेच शेखरने स्कूटर थांबवली अन् दादांच्या ताब्यात दिली. दादांना स्कूटरचे फार आकर्षण आहे हे शेखरला नेहमी जाणवायचे. दादा मग आणखी रंगात आले. त्यांनी शेखरची स्कूटर भन्नाट दामटवली.

"अरेच्या, आता आपण इकडे आलोच आहोत तर चला तिकडे जाऊनच येऊ."

सहज लक्षात आले असे दाखवत दादा म्हणाले तर खरं. पण खरं म्हणजे स्कूटर हातात घेतल्याबरोबर त्यांच्या गाडीला ही दिशा आपोआपच मिळाली होती.

"तिकडे ? म्हणजे कुठे ? अहो आपण कुठे निघालो आहोत ?" - शेखर

"तुम्ही चला तर खरं !"

गालातल्या गालात हसत दादा म्हणाले. जणू ते शेखरला एखाद्या अलीबाबाच्या गुहेतच घेऊन जात होते.

"आपण तर रवीनगर भागात आलो ! पण राहते कोण इथे ?"

"शेवलकर मामी." दादा डोळे मिचकावत म्हणाले.

"आँ ! त्यांच्याकडे ?" शेखरला धक्काच बसला.

"त्यांच्याकडे कशाला आलो आपण ? आणि त्या इतक्या मोठ्या बंगल्यात राहतात ?"

"नाही हो, या बंगल्याच्या पाठीमागच्या आऊट हाऊसमध्ये राहतात - चला"

दादांनी स्कूटर एका झटक्यात स्टँडवर लावली. तंग पॅन्टच्या खिशातून मळलेल्या रूमालाची छोटी घडी काढली. चष्मा काढून त्यांनी कपाळावरचा, टकलावरचा घाम टिपला. चष्म्यावरचा ओघळलेला घामाचा ओलसरपणा पुसला. मग ओठात हलकीशी शीळ वाजवत ते म्हणाले - "चला."

दादांचा चेहरा हसतमुख होता. पण तो अविर्भाव नेहमीप्रमाणे सहज नव्हता तर प्रयत्न साध्य आहे हे शेखरला जाणवले.

शेवलकरमामींना भेटण्याची त्यालाही उत्सुकता होती. पण दादा इतक्या अचानकपणे आपल्याला त्यांच्या घरासमोर आणून उभे करतील, ही कल्पना नसल्याने शेखर जरासा भांबावला.

"आपण कशासाठी जातो आहोत त्यांच्या घरी ?"

"कशासाठी म्हणजे ? सहज !"

"घरी आता कोण कोण असतील ?"

"कोण कोण म्हणजे ? सगळेच ! मामी, मुलं, तो महारोगी. कदाचित मामी नसतीलही."

मामींचे घर, त्यांचा 'तो' नवरा पाहण्याची शेखरला एकदमच उबळ आली.

"चला" - शेखर म्हणाला, तसा दादांचा चेहरा उजळला. दोन्ही हातांच्या अंगठ्यांनी तंग पॅन्टमध्ये खोचलेला

अनुक्रमणिका

शर्ट दादांनी मागून पुढून तपासला. आणि उत्साहाने फाटक उघडून ते बंगल्याच्या मागे निघाले. शेखर सुद्धा कसल्याशा दडपणाखाली त्यांच्या मागोमाग निघाला. छोट्याशा बोळीत देखील फरशी बसवली होती. दादा बोळ ओलांडून सफाईने समोर गेले. शेखर मात्र काळजीपूर्वक बोळीतील नाल्या ओलांडत गेला. बंगल्यामागच्या सिमेंट काँक्रीटच्या आऊटहाऊसच्याही मागे जेव्हा दादा जायला लागले, तेव्हा शेखरला आश्चर्य वाटले. पण आऊटहाऊसच्या लगेचच मागे एक झोपडीवजा ठेंगणे कुडाचे घर दिसले.

दादा घराच्या ठेंगण्या दाराबाहेर उभे होते. उजवा हात घरावरच्या टिनाच्या छपरावर ठेवून अर्धवट कंबरेत वाकून अंधाऱ्या घरात डोकावत त्यांनी मोठ्याने विचारले- "आहेत का घरी ?"

"हो हो या नं ! आत या."

आतून बाईचा अतीउत्साही आवाज फुटून बाहेर आला.

दादा सरळ उभे झाले. मागे वळून शेखरकडे पाहत सूचक हसले. शेखरच संकोचून घुटमळला.

"आज पहा मी तुमच्या घरी कोणाला आणलं ?" दादांचा तसाच टपोरा आवाज.

"कोणाला आणलं ?" मामी पहिल्या खोलीत येत आनंदाने म्हणाल्या. त्याच वेळी,

"आता कोण आलं ?" असा तिरसट खेकसल्यागत प्रश्न घराच्या अंधाऱ्या पोकळीतून बाहेर आला आणि शेखरने घरात जाण्यासाठी उचललेला पाय मागे घेतला.

"आहे आपले दादा आलेत." मामींनी आपुलकीने सांगितले.

"दादा ? कोण आपले दादा ?....ते नाटकवाले ?....."

मामीच्या नवऱ्याने असे काही विचारले की, शेखरला वाटले दादांनी तिथे थांबूच नये.

"आपले कोणी दादा बिदा नाही.... 'आपले' कोणी नाही ते."

आपल्या माणसाचे स्वतःशीच पुटपुटणे कुडाच्या भिंतीबाहेर उभ्या असलेल्या शेखरला अस्पष्टसे ऐकू येत होते. पण दादाही इतके बथ्थड की, मामीच्या नवऱ्याकडे सोयिस्कर दुर्लक्ष करत ते खुर्चीत बसलेच आणि वर शेखरला म्हणाले - "अहो आत या ना !"

पण त्या घरात जायची शेखरला इच्छाच मरून गेली होती.

"अहो बाहेर ऊन आहे. आमच्या झोपडीत यायची इच्छा नाही वाटते" - मामींनी विचारले.

"नाही नाही तसं काही नाही."

"मग या तर"

भिंतीला टेकून उभी असलेली लोखंडी खुर्ची मामींनी घडी उलगडून सरळ केली आणि खुर्चीवरची धूळ पदराने पुसत त्या मनापासून म्हणाल्या "या, बसा !"

तो आत जाण्यासाठी जागचा हलला. मामी अजूनही अत्यंत साधेपणाने शेखरसाठी खुर्ची पुसत होत्या. आता यावेळी तळहातानेच !

खुर्ची पुसतांना मामी जरा समोर झुकल्या होत्या. शेखरला जाणवले ते मामींचे प्रमाणबद्ध शरीर.

....मामी दादांच्या जवळ गेल्या असताना त्यांच्या डोळ्यांना या भरगच्च शरीराने खुणावलेच असेल !... याचा अर्थ कोणीही माणूस कितीही प्रामाणिकपणे सांगतो म्हणाला, तरी तो त्याचा आवच असतो का ? त्या सांगण्यात त्याचे रंग उतरतातच. शेखर झोपडीच्या दारात उभा होता. दादांनी खुर्चीत बसल्या बसल्या ऐसपैस टांगा पसरल्या अन् दोन्ही तळहात एकमेकात गुंतवून हात उंच करून कडकडून जांभई दिली.

"अहो, अहो हात टिनाला लागतील ना !" म्हणत मामी दादांचे हात आवरण्यासाठी धावल्या. दादांचे हात खरोखरच छताला टेकण्याच्या बेतात होते. दादा आणि मामी एकदमच हसायला लागले.

....हे दोघे एकमेकांच्या इतक्या जवळ कधी गेलेत ? नाटकानंतर जेव्हा आपण इंदोरला होतो त्या काळात... की नाटका आधीच ? पण मग आपल्याला कसे कळले नाही ? दादांनी आपल्याला अंधरात ठेवले ? हे नेमके कुठपर्यंत पोचले असतील ? दादा आधी मग इतके आढेवेढे कशाला घेत होते ? आणि त्यावेळी त्यांनी मामींना मदत करावी म्हणून आपण त्यांच्या आणि आपल्याही डोक्याचा भुगा पाडला, तो कशासाठी ? त्यावेळी जे डोकं खाल्ल्या गेलं त्याची खरोखरच गरज होती का ? की दादांना फक्त आपल्या शाब्दिक पाठबळाची गरज होती ? शेखरच्या मनात विचारांचे चक्रीवादळ घोंगावत होते. वरकरणी मात्र तो स्थिरपणे समोर पाहत उभा होता.

"आहे विचार कसला करता आहा ?" एकदम स्वत:भोवती पदर घट्ट लपेटून घेत मामी पुढे बोलल्या.

"फार घाई आहे का ? निदान खाली बसून स्वस्थपणे पाणी तरी घ्या !"

दादांच्या गडगडाटी हसण्याने शेखर भानावर आला. तरीही त्याला वाटलेच..... हाच तो आर्जवी आवाज. भुरळ पाडणारा. या आवाजात कोणी काही मागितलं तर कोणाची बिशाद आहे नाकारण्याची ? तपस्वी देखील पाघळेल ! दादा तर मग अगदीच रक्तमांसाचे आहेत !....

शेखर निमूटपणे खुर्चीवर येऊन बसला. पण बसताक्षणीच त्याला बसला लोखंडी खुर्चीचा गरम चटका ! कासावीस होऊन शेखरने सभोवताल पाहिले. अन् त्याला जणू भट्टीत बसल्यासारखं वाटलं. कारण डोक्यावर गरम तापलेले उतरते टिन. टिनावर होती फुटक्या तुटक्या कवेलूंचे खपरेल ! शेखरच्या पाठीमागची एकच भिंत पक्की सिमेंटची आणि रंगवलेली होती. कारण ती भिंत ह्या झोपडीची नसून त्या आऊटहाऊसची होती आणि हे झोपडं त्या भिंतीवर चिटकूनच कसंबसं उभं होतं. शेखरच्या समोरची भिंत उघडउघड कुडाची होती. उघडउघड यासाठी की भिंतीतला काही भाग ढासळून आतल्या बांबूच्या कमच्या दिसत होत्या. त्या एवढ्याशा खोलीतली जागा आणखीनंच कमी होण्याचं कारण म्हणजे त्या ठेंगण्या कुडाच्या भिंतीला आतून एखाद्या कुबड्या म्हाताऱ्यासारखं पोक आलं होतं. खोलीला फरशी नव्हती. कधीतरी आजारी म्हशीच्या पातळ शेणानं सारवलेली हिरवट जमीन. सर्वत्र उललेली. त्यात मामींनी उत्साहात घाईने लोखंडी खुर्च्या टाकलेल्या. त्या खुर्च्यांच्या बेदरकार खुरांनी वेडेवाकडे उकरलेले उद्ध्वस्त जमिनीचे पोपडे... कधीतरी सारवलेले ! मध्येच एक वाकडी तिकडी हेंगाडी बल्ली रस्त्यातच उभी, उतरत्या टिनांच्या नाटीला आधार देण्यासाठी ! लाकडी आलमारी, धान्याच्या कोठ्या, शिलाई मशिन, रेडिओचा जुना सांगाडा अशा वस्तू ठेवून एका लांबलचक झोपडीच्या तीन खोल्या तयार केल्या होत्या. गरम झावा झोपडीत घुसत होत्या. वातावरण विचित्र घुसमटल्यासारखे. शेखर तिथे बसल्याबरोबर गुदमरल्या गेला.

पण दादांना आणि मामींना याची जाणीव नव्हती.

"अरेच्या ! अहो यांची ओळख करून देणार होते ना तुम्ही ? गप्पांच्या ओघात ते राहूनच गेलं" मामी म्हणाल्या.

"अरे हो ! हं, तर हे आमचे अगदी 'जवळचे' मित्र शेखर गावपांडे." 'जवळचे' शब्दावर जोर देताना दादा मामींकडे पाहत होते.

"तसा मी यांच्या कुटुंबाचाच मित्र आहे."

"मग नाटकाच्या वेळी तुम्ही ओळख करून दिली नाही !" - मामी.

"अहो तेव्हा ते असतील तर ना ? ते त्यावेळी इंदोरला होते."

"हे सुद्धा आहेत का मग नाटकवाले ?" परत एकदा खिळखिळ्या झोपडीच्या अंधाऱ्या पोकळीतून कुत्सित प्रश्न उमटला. मामींचे यजमान - 'मामा', बोलताना 'नाटकवाले' हा शब्द जणू शिवी म्हणूनच वापरत होते ! शेखरने आत पाहिले. शेवटच्या अंधाऱ्या खोलीत एका

लाकडी खांबाला टेकून कोणीतरी बसल्यासारखे अर्धवट जाणवत होते.

"माझे मिस्टर आहेत ते." मामींनी संथपणे शेखरला सांगितले.

"हं !" शेखरचा साधा उद्‌गारही असा होता की, हं ! अच्छा म्हणजे हेच आहेत का तुमचे ते महारोगी मिस्टर ?....

शेखर भित्र्या कुतूहलाने आतमध्ये चोरून पाहत होता. अंधारात अस्पष्ट जाणवणाऱ्या व्यक्तीने तिथूनच म्हटले - "नमस्कार"

आणि शेखरने नमस्कार करताच ते तिथल्या तिथे पण थोडे समोर सरकले. पण त्यांच्या अलीकडे सरकण्यानेसुद्धा शेखरच्या अंगावर काटा आला.

....त्यांच्या केवळ जाणिवेने आपण इतके अस्वस्थ होतो. मामी तर गेली अनेक वर्षे सतत त्यांच्या सान्निध्यातच आहेत. त्यांना कसे वाटत असेल ?

"अहो, अहो तुम्ही बसा नं तिकडेच." असे मामी कळवळून सांगत असतानाच मामींचे यजमान सरळ उठले आणि दादा, शेखरच्या दिशेने चालत आले. शेखरच्याच पोटात खड्डा पडला. पांढऱ्याफट्ट चेहऱ्याने तो दादांकडे पहायला लागला. आरामशीर बसलेले दादाही लगेच पाय आवरून ताठ बसलेत. मामा पहिल्या खोलीत येऊन म्हणाले - "तिकडे कोपऱ्यात बसायला मी काय महारोगी आहे ?" त्यांच्या या प्रश्नाने वातावरण विचित्र झाले. अन् त्यात मामी जबरदस्तीने कशातरीच हसल्या. त्यांच्या चेहऱ्याकडे शेखरला पाहवेना. खोलीतील दूषित वातावरणावर कसले तरी अभद्र सावट आले.

"छे हो ! भलतंच काय बोलता ? तुम्ही बसा नं आमच्यातच." स्वतःचे शरीर जास्तीत जास्त आखडत दादा बोलले तर खरं. पण त्यांचाच त्यांच्या शब्दांवर विश्वास नव्हता.

"हे काय भलतंच बोलताहात दादा तुम्ही !" शेखरने अविश्वासाने चमकून दादांकडे पाहिले.

"नाही, नाही तुम्ही बसा. मी इथे खालीच बसतो. मला खांबाला टेकून बसायला आवडतं" - मामा म्हणाले आणि साधारणतः पहिल्या आणि दुसऱ्या खोलीच्या दारात बसलेत. शेखरने सोडलेला निःश्वास मामींना जाणवला.

"काही चहा बिहा देता की नाही ?" दादा म्हणाले तसे -

"पहा विसरलीच !!" म्हणत मामी जलद गतीने आत गेल्या. मोठ्यांदा हसायला हे निमित्त दादांना पुरेसं होतं.

जवळच बसलेल्या मामांना नीट पाहण्याची शेखरला जबरदस्त उत्सुकता तर होती पण हिंमत अजिबात नव्हती. त्यामुळे भित्र्या डोळ्यांच्या कोपऱ्यातून त्याने ओझरतं पाहिले. काहीतरी शंका वाटली म्हणून मान वळवून सरळ पाहिलं आणि त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण शेखरच्या कल्पनेतले मामा आणि प्रत्यक्षातले मामा यात जमीन आसमानचे अंतर होते ! समोरच्या माणसाला काही गंभीर आजार झाला असावा याची कल्पनाही बाहेरच्या माणसाला येणं शक्य नव्हतं. शेखर मामांच्या चेहऱ्याकडे, नाकाकडे, हातापायांच्या बोटांकडे जो जो बारकाईने पहायला लागला तो तो ते त्याला सर्वसामान्य माणसासारखे वाटायला लागले. आता मात्र अस्वस्थ होऊन शेखर धीटपणे परंतु संशयित नजरेने मामांना तपासायला लागला. हे 'असे' पाहणे चांगले नाही, कारण ते जर मामांच्या लक्षात आले तर ? पण मामांचे लक्ष शेखरकडे नव्हतेच ! ते स्वतःच्या बायकोकडे होते. शेखरचीही नजर आपोआपच मामांवरून मामींकडे आणि दादांकडे वळली.

मामी दादांशी अगदी सहजपणे मुलीची परीक्षा, नोकरीतल्या कटकटी, संसारातील इतर नेहमीच्या विषयांवर बोलत होत्या. दादा ऐकत होते. हे अगदी सहजपणे सुरू असतानाच शेखरचे लक्ष परत मामांकडे गेले. आणि मग मात्र शेखर सावध झाला.

अनुक्रमणिका

कारण मामा अस्वस्थ झाल्याचे शेखरला जाणवले. त्यांचे सर्व लक्ष मामींकडे केंद्रित झालेले आणि मामी मात्र दादांशी सहज बोलत होत्या.

मामी चहा साखरेच्या महागाईवरच बोलत होत्या. पण दादांपलिकडे जणू त्या खोलीत दुसरे कोणीच नसावे असे त्यांचे वागणे होते. उलट मामांचे म्हणजे केवळ स्वतःच्या बायकोकडे रोखून पाहणारे डोळे झाले होते.

शेखरच्या अस्तित्वाची दखल मामा मामीच काय खुद्द दादाही घेत नव्हते. डाव्या पायाच्या टोंगळ्यावर उजवा हात ठेवून एकमेकात गुंफलेले तळहात उजव्या गुडघ्यावर अडकवून चेहऱ्यावर स्मित खेळवत त्यांचे 'हं ! हं' चालू होते. मामींचा चेहरा आनंदाने उजळून निघाला होता. बरेच दिवसात दोघांची भेट झाली नसावी. कारण बोलताना 'किती बोलू अन् किती नाही' असे मामींचे झाले होते. त्यांच्याजवळ दादांना सांगण्यासारख्या गोष्टींचे जणू भांडार होते. त्यामुळे चहासाठी आत जाताना बाहेर येताना इतकंच नव्हे तर स्टोव्ह जवळूनही त्या मोठ्या आवाजात काहीतरी सांगतच होत्या.

शेखरला वाटले इतकी निरर्थक वटवट ऐकतांना दादा कंटाळले कसे नाहीत ?

"काय गं तेच ते सांगतेस तू ?" मुद्दाम कंटाळवाणी जांभई देत मामा मध्येच म्हणाले.

"थांबा हो तुम्ही ! मी दादांना सांगते आहे. तुम्हाला ऐकायचे नसेल तर तुम्ही तिकडे जा !" मामी सहज म्हणाल्या. दादा हसले. मामांनी दादांकडे 'खाऊ की गिळू' असे पाहिले. शेखरलाच कसेतरी झाले.

पण तोवर जणू काही घडलेच नाही अशा थाटात मामींच्या गप्पा रंगल्याही होत्या ! मनाच्या कानाकोपऱ्यात कुठे कुठे नोंदवून ठेवलेल्या बारीक सारीक गोष्टी मामी सांगत होत्या. मध्येच त्या म्हणाल्या - "काय सांगत होते मी ? पहा विसरली ! हे अस्से होते अशात माझे ! म्हातारी झालेय ना आता !"

"तुम्ही ? अन् म्हाताऱ्या !! मग तर झालंच." सात मजली हसत दादा म्हणाले.

"चला तुमचं आपलं काहीतरीच !" मान उडवत मामी किंचित लाजल्या अन् आत गेल्या. मामांचा जळफळाट केवळ शेखरच समजू शकला. पण आत जातानाच मामी परतल्या अन् म्हणाल्या "पहा आठवले ! आपल्या नाटकाचा परत प्रयोग होणार आहे का त्या शाळेच्या मदतीसाठी ?"

"काही नको परत नाटक बिटक !" मामा

मामी तोंड वाकडं करत आत गेल्या. दादा मोठ्यानं म्हणाले "तसा विचार होता, पण सध्यातरी तो सोडून दिला आहे."

पण मामी नाराज झाल्या नाहीत. त्या नाटकाच्याच आठवणींमध्ये गुंतल्या. तालमीतल्या गोष्टी सांगतांना त्यांना त्यांच्या वयाचा, घराचा, मुलीचा, आजुबाजूच्या स्थितीचा, शेखरचा आणि मुख्य म्हणजे स्वतःच्या नवऱ्याचा विसर पडला होता. कधीपासून बोलत सुटलेल्या मामी जवळपास उत्तेजित झाल्या होत्या. शेखर व मामांना कधीच काठावर सोडून ते दोघेही पार दूरवर पोचले होते. दात नखं काढून पिंजऱ्यात अडकवलेल्या हतबल सिंहाप्रमाणे मामा असहाय्यतेने तडफडत होते. खुद्द त्यांची बायको त्यांच्या नजरेसमोर दादासारख्या परपुरुषाच्या निव्वळ आगमनाने नेहमीची राहिली नव्हती. आनंदाने उत्तेजित झालेली त्यांना जाणवत होती. ते मात्र त्यावर काही बोलूही शकत नव्हते. तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करणे त्यांना फार कठीण जात होते.

तेवढ्यात मामी चहाचे कप घेऊन आल्या. गरम गरम चहाचा कप दादांनी ओठांना लावला आणि ते चवीने घुटके घेऊ लागले. मामी स्निग्ध नजरेने एकटक त्यांच्याकडे पाहत होत्या. चहा संपवून दादांनी कपबशी समाधानानी मामींच्या हाती दिली.

"अहो, तुम्ही तर चहाला सुरूवातही केली नाही ! चहा घ्या नं" मामी शेखरला म्हणाल्या.

अनुक्रमणिका

"त्यांना थंड आवडतो" - दादा म्हणाले.

"अन् तुम्हाला गरम !" मामी पटकन बोलू लागल्या अन् मग फस्सकन् हसल्या ! जमिनीचा मोठ्ठा पोपडा निघाला. दादांनी कष्टाने हसू आवरले. रूक्ष वातावरणात गरम झळांवर झळा आल्या.

"अहो झाला थंड, घ्या आता."

"मी....मी ह्यांच्या करता थांबलो."

"अस्सं होय. पण मी देत होते त्यांना."

मामी आत गेल्या आणि चहाचे भांडे सांडशीत पकडून आल्या. लाकडी कपाटाखालची कपबशी त्यांनी ओढली आणि वरून चहाची धार सोडली. अर्ध्या कपातच चहा संपला. मामी हात धुण्यासाठी आत वळताच मामा शेखरला म्हणाले "तुम्ही घ्या हो. माझ्यासाठी थांबायची गरज नव्हती. मी घेत नसतो. थंडही नको अन् गरम तर त्याहून नको." मामा भेसूर आवाजात बोलले व त्यांनी कपबशी एका फटक्यात दूर सारली. उकरलेल्या पोपड्यावरून ती कलंडली. सांडलेल्या, जमिनीत शोषल्या जाणाऱ्या चहाकडे मामा स्थिरपणे पाहत राहिले.

"निघायचं ?" शेखर दादाला म्हणाला.

"हो, एक मिनीट"

"हं, मग काय ठरलं तुमचं ?" तळहातावरच्या तंबाखूवर चुन्याचे बोट रगडीत दादांनी एकदमच विचारले. जणू दादांच्या प्रश्नाची वाटच पाहत असल्याप्रमाणे मामी मधाळ हसल्या. उगाचच म्हणाल्या

"कशाचं ?" अन् परत हसल्या.

"घ्या ! कशाचं ! अहो ट्रिपचं. आपल्या सर्वांचं ठरलं नव्हतं का ?"

"ओ हो ट्रिपचं !...." - मामी

"आता कसली ट्रिप ?" मामांचा टिपेचा तिरकस सूर.

"वेरूळ अजिंठ्याची ट्रिप - जास्तीत जास्त दोन दिवसांची. ह्यांनी नाही का तुमच्या कानावर घातलं ?" - दादा

"त्या कसल्या घालतात कानावर ? कानावर घालायला मी कोण आहे त्यांचा ?" - मामा

क्षणभर मामींचा चेहरा पडला. दादांच्या चेहऱ्यावर एक प्रश्नार्थक आढी पडली अन् लगेच विरली.

"अहो ! विसरलेच मी" - मामी

"हो ! भलं ! म्हणे विसरली." मान खाली टाकून, हताशपणे हलवत मामा पुटपुटत होते.

"अन् दुसरं म्हणजे आपलं असं काही पक्कं ठरलंही नव्हतं - नाही का ?" उसनं अवसान एकवटत मामी दादांकडे पाहत म्हणाल्या.

"हो नं अन् समजा तेव्हा विसरल्या तर आता विचारलं नं बिघडलं कुठे ?" - दादा म्हणाले व विनाकारणच मोठ्यांदा हसले. वातावरणात आलेला ताण निघून जावा म्हणून शेखरच्या चहावर बारीक चुन्याची पातळ लालसर साय तयार झाली होती. शेखरने कप तोंडाला लावला. साय ओठावर चिटकून आली. नकोशी झालेली साय लवकर गिळल्या गेली नाही. काही क्षण शांत गेलेत. पण मामींचा उत्साह खदखदत होता. "मग कधी जायचं ?" - मामी

"जाऊ इतक्यातच कधीतरी."

"अहो पण आम्हाला काही सांगाल की नाही ? कुठे जाणार ? कधी जाणार ? कसे जाणार ?" - मामा

"इश्श ! कसे हो तुम्ही ? सांगूनच तर राहिले ना की आम्ही वेरूळ अजिंठ्याला जाणार. पण अजून काहीच नक्की ठरलं नाही. म्हणून तर तुमची परवानगी काढायला हे आलेत ना !" - मामी

"परवानगी ! अस्सं...तुमच्या नाटकवाल्यांची आहे वाटते ही ट्रिप ? कोण कोण जाणार ?"

"नाही, नाही नाटकवाल्यांचीच असं काही नाही. पण मित्रमंडळीपैकी जे जे येतील ते सगळेच जाऊ. ह्या शेखरच्या ताई सुद्धा येणार आहेत." - दादा म्हणाले.

चहा पितांना शेखरला एकदमच ठसका बसला.

"अच्छा ! तर मग तुमची वहिण सुद्धा जाणार आहे तर !"

मामा शेखरच्या डोळ्यात पाहत म्हणाले.

शेखरने दादांकडे आश्चर्याने ओझरते पाहिले अन् तो उद्गारला "हं !"

मामी आणि दादांनी सुटकेचा निःश्वास टाकला. वातावरण थोडे निवळले. तेवढ्यात अगदी कोवळा आवाज बाहेरून आला "बाबा ! कोण आले हो आपल्या घरी ?"

"उषा आली !" मामींच्या चेहऱ्यावर हसू पसरले. त्या दारापर्यंत गेल्या. मुन्नीच्या खांद्यावरची दप्तराची झोळी घेत त्या म्हणाल्या "इतका उशीर गं ? शनिवारी तर तू साडेबारालाच येते ना ?"

"तिचा आज एक्स्ट्रा क्लास होता" मामांनी माहिती पुरविली. दादा मुन्नीकडे पाहून हसले. पण ती चपला काढून स्थिरपणे आत निघून गेली.

"अगं मग तुला ट्रिपला जायचंच आहे आणि सोबत शेखरची ताई आहे तर मग आपल्या मुन्नीला सुद्धा घेऊन जा. उषा" मामांनी हाक मारली.

"उषाला ? अहो पण तिची नववीची वार्षिक परीक्षा नाही का ? आतापासून मॅट्रिकसारखी तयारी करून घेतात आजकाल. म्हणून तर हे एक्स्ट्रा क्लासेस ! ट्रिपला गेली अन् आजारी पडली तर !" - मामी.

तोवर टॉवेलला हातपाय पुसत मुन्नी मधल्या खोलीत आली होती.

"मग हिच्या परिक्षेनंतर का नाही जात ?"

"अहो ते ठरवणं आपल्या हातात आहे का ?"

तेवढ्यात उषाच किंचित बाहेर येत म्हणाली -

"बाबा ! जरा माझं तर ऐका"

उषा शेखरच्या नजरेच्या टप्प्यात समोरच उभी होती. सावळीच पण डोळ्यांमधले भाव स्पष्ट आणि स्वच्छ चेहऱ्यावरती निरागसता म्हटली तर आहे अन् म्हटली तर नाही ! शेखरची आणि तिची नजरानजर झाली तेव्हा कळत नकळत तिच्या डोळ्यात ओळखीपुरते हसू फुटले.

"काय म्हणते बेटा" - मामा थकलेल्या आवाजात म्हणाले.

"बाबा, मला नाही ह्यांच्या सोबत जायचं" दादांकडे ओझरते पहात उषा ठामपणे म्हणाली. मामींचा ताणलेला चेहरा एकदम नेहमी सारखा झाला. उषाकडे पाहत दादा हसले पण यावेळी लहानशा खकाण्याने. त्यांचं हसणं वरकरणी जरी उषाच्या कौतुकाचं होतं. त्यात सुंठीवाचून खोकला गेल्याचा आनंद तर होताच, पण कुठेतरी दुखावल्या गेल्याने येणाऱ्या कडवट धारेची किनार त्या हसण्याला होती.

"पण आईला जाऊ द्या ना बाबा. तेवढाच तिला बदल होईल. शेखरदादाची ताई सुद्धा तर सोबत आहे."

तिचा कोवळा स्वर इतका निरोगी आणि आश्वासक होता की मामी तिच्या नजरेला नजर देऊ शकल्या नाहीत.

"मी कोण तिला अडवणारा बेटा ?"

मामांची अगतिकता, त्यांची पराभूत जखमी नजर, विझलेले हे डोळे शेखरच्या मनावर डागण्या देत होते.

"येईल हो आई तुमच्या ताईसोबत" उषा शेखरकडे पाहत म्हणाली. शेखर उषाला पाहून अवाक् झाला.

चिखलात कमळ असावं तशी ही मुलगी या घरात आहे. की मग कमळ उमलण्यासाठी चिखलाचीच गरज असते, तसे काही असावे का ?

"ठीक आहे, चलतो मग ?" म्हणत दादा उठले.

•••

दादा आणि मामी बोलता बोलता घरामागच्या अंगणात गेले. मामींना पाहून पिंजऱ्यातला मिठू जागच्या जागी डोलायला लागला.

"बोलतो का हा ?"

"हं ! फारसं नाही, थोडं फार बोलतो" म्हणत मामींनी मिठूला बोट देत चुचकारले. त्या बरोबर मिठूने

त्याचा बोलण्याचा पट्टा सुरू केला. पण "अरे वा !" असे म्हणत दादा जवळ येताच मिठ्ठू थांबला. अन् मान वाकडी करत त्यांना पाहायला लागला. दादांनीही मग मामीप्रमाणेच बोट देताच मिठ्ठू त्याच क्षणी धावून आला. त्याची चोच लोखंडी पट्टीवर आढळली. काळे गोल डोळे विस्फारत, पांढरे करत मिठ्ठू त्याचा राग व्यक्त करत होता. मामींनी परत चुचकारले. मिठ्ठू राग आवरून बोलायला लागला, पण मध्येच थांबला. जणू त्याला दादांच्या समोर बोलायचे नव्हते.

"बस् इतकाच बोलतो का हा ?"

"हो"

"अजून कंठ नाही फुटला त्याला"

"पण मला नाही वाटत याला कंठ फुटेल असं"

"का ?"

"बहुधा हा मिठ्ठू नसावाच. ही मिठ्ठी असावी - मादी"

"अरे रे ! पण कंठ फुटला की मिठ्ठू झकास दिसतो नाही ?"

"तुम्हाला कसं कळलं की हा मिठ्ठू नसून मिठ्ठीच आहे म्हणून ?"

"अं ! समजतं ते आपलं....असंच...."

"तरी पण कसं ?.....सांगा नं"

"तडफड ! तडफड जाणवते मला तिची. तुम्हाला नाही दिसत मादीची तडफड ?"

"हं ! समजतंय मला....पण ही तडफड कोणाचीही असू शकते....मादीचीच कशावरून ? म्हणजे बंधनात अडकलेल्या कोणाचीही......बंधनातल्या नराची होत नाही का तडफड ?"

"माणसांचं सोपं असते. माणसं कुठेही मोकळे होऊ शकतात. स्त्रीचं सगळंच कठीण असते." - दादांच्या तोंडून निघून गेलं.

"पण मला वाटतं आपण ह्या मिठ्ठीबद्दल बोलत आहोत. फारच फार तर जनावरातल्या नर मादींबद्दल..." मामी.

"शेवटी माणूस म्हणजे तरी कोण ?...." - म्हणत दादा किंचित हसले.

"मान्य"

"आणि तसा विषय नरमादीचाही नाही. विषय बंधनाचा आहे."

"मग तुम्हाला काय म्हणायचं आहे ?"

"काही नाही. हेच की या मिठ्ठीला पिंजऱ्यातून मुक्त करा. स्वातंत्र्य द्या. जाऊ द्या तिला जिकडे पाहिजे तिकडे !" - म्हणत दादा सूचक हसले.

सुस्कारा सोडत मामी म्हणाल्या - "हं ! इतकं सोपं नाही ते. जाऊ द्या. चला, आपण आत जाऊ. नाही तर त्यांना उगाच वाटेल की, इकडे आपण काय बोलत आहोत."

"बंधनं !...बंधनं !!" - हसत दादा म्हणाले.

"अखेर बाजी जिंकली" अशा सारखे हसून मामींनी त्यांना निरोप दिला. शेखर कधीच घराबाहेर पडून फाटकाजवळच्या स्कूटरची थांबला होता.

शेखरने स्कूटर सुरू केली आणि तो जोरजोरात 'पिप-पिप' करत दादांना बोलवायला लागला.

"चलतो मी. शेखरला उशीर झाला आहे" - दादा

कधी नव्हे ते शेखरने सीटवर बसल्या बसल्या स्कूटरला किक मारली !

घरी परत येताना शेखरनेच स्कूटर चालवली.

रस्त्यात तो दादांशी एक शब्दही बोलला नाही. ते सुद्धा मुकाट्याने मागे बसून होते.

दादांचे घर आले. शेखरने स्कूटर थांबवली. "खाली उतर" दादा नेहमीप्रमाणे म्हणाले -

"चलत नाही घरात ?"

त्यांना उत्तर देण्याच्या फंदात न पडता उलट शेखरनेच विचारले -

अनुक्रमणिका

"मग कधी जाणार तुमची ट्रिप"

"पाहू आता.... काही नक्की नाही"

"तुम्ही मला सहलीची कल्पना आधी द्यायला हवी होती, असे नाही तुम्हांला वाटत ? आज काही फारसे ठीक वाटले नाही मला."

"हं ! अहो पण मामीला मदत करावी हे तुमचेच तर म्हणणे होते ना ?"

यावर काही न बोलता शेखरने मान उडवली. पुन्हा एकदा सीटवर बसूनच त्याने किक मारली अन् तो घराकडे निघून गेला.

●●●

इकडे दादांच्या मागोमाग फाटकापर्यंत आलेल्या बाईंनी जेमतेम हात हलवून त्यांना निरोप तर दिला; पण दादांच्या ते लक्षात आले नाही. कारण ते स्कूटरच्या मागच्या सीटवर नीट बसायच्या आधीच शेखरची स्कूटर हलली होती.

: फार उशीर झाला का त्यांना ? पण काय इलाज होता, किती दिवसानंतर दादा भेटले ! किती भरभरून बोलत होतो आपण एकमेकांशी ! किती झर्रकन् वेळ निघून गेला ? लक्षातच आले नाही. इतकं बोललो पण मन भरलंच नाही ! बरंच काही आठवते आहे, जे बोलायचे राहूनंच गेले. इतकं काय बोललो आपण ? बहुतेक सारे असेच सटर-फटर होते. फक्त महत्वाचा मुद्दा होता तो गावाला जाण्याचा. खरच, किती छान होईल नाही, निदान दोन दिवस कुठे बाहेर जायला मिळाले तर ! तेवढीच या त्याच त्या एकसुरी कंटाळवाण्या आयुष्यापासून सुटका..... ते काही नाही, काय वाट्टेल ते झाले तरी आपण जायचेच !

कडी जोरात आदळून बाईंनी लोखंडी फाटक बंद केले. आणि घरमालकांच्या बंगल्याच्या बाजूच्या बोळीतून त्या जणू तरंगतच घराकडे निघाल्या. बाई दाराशी पोचल्या अन् पाहते तो काय ! दारात लहानी निशा दोन्ही हात कंबरेवर ठेवून वाट अडवून उभी होती. बाई तिच्या समोर उभ्या राहिल्या. तरी ती हलायला तयार नव्हती !

डोक्यावरचे झिप्रे केस, आक्रसलेल्या भिवया, दोन्ही डोळ्यांच्या उजव्या कोपऱ्यातून रोखून पाहणारे बुबुळं ! काही न बोलताच ती सगळं काही बोलली ! शेवटी आतून उषाने आवाज दिला -

"निशा !"

निशा थोडी सरकली. बाई आडव्या होवून घरात शिरल्या. उषा-निशा एकमेकांच्या सोबतीने जवळजवळ उभ्या राहून बाईंकडे पहात होत्या. उजव्या कोपऱ्यात आत दूरवर बाबा उभे होते. तिघेही बाईंकडे फक्त पहात होते, काही न बोलता...

बाबा त्यांच्या जागेत निघून गेलेत. काय बोलावे ते बाईंना समजेना

दोन्ही मुली फार विचित्र नजरेने पाहत होत्या. बाईंना मुलींमध्ये विलक्षण तुटकपणा जाणवला.

एकदमच बाईंना त्यांच्या मुली, ते घर, परके वाटायला लागले. बाईंच्या पायातले त्राणच ओसरले. त्यांना एकदम दादांची तीव्रतेने आठवण झाली. काही न बोलता त्या स्वैंपाकघरातून मागच्या अंगणात गेल्या. पिंजऱ्यातील मिठ्ठी टुण्णकन् उडी मारून त्यांच्या दिशेने आली. सर्व जग सोडून जाईल, पण मुके पशुपक्षी मात्र शेवटपर्यंत इमानदार राहतील !

●●●

शाळेतला शेवटचा तास कधी एकदाचा संपतो असे बाईंना झाले होते. सतत त्यांची नजर घड्याळाकडे जात होती. मन कोमेजून आणि शरीर मरगळून गेले होते. शेवटी शाळेच्या चपराशाने घंटा बडवली आणि बाईंची सुटका झाली. कधी एकदाचे घरी जाऊन पडतो असे त्यांना झाले होते. घरमालकाचे मुख्य फाटक उघडतानाच मिठ्ठूचा ओरडा कानावर पडला. मिठ्ठू अगदी जिवाच्या आकांताने ओरडत होता. त्याचे आक्रंदन ऐकून बाईंच्या हृदयात कालवाकालव झाली.

अनुक्रमणिका

बहुधा याला कोणी खायला सुद्धा दिले नाही वाटते ! घरात एवढे तीन तीन माणसं असताना सुद्धा त्या मिठ्ठूला कोणी साधे पाणी देत नाही. मग जेवण तर सोडाच ! आपण मेल्यावर कसं होणार या मुक्या जीवाचं ? आधीच पिंजऱ्यात अडकवलेला दुःखी जीव अन् परत ती मिठ्ठी ! कशाला आपण हे सर्व पाप करतो आहो ?...

घरमालकांचा बंगला ओलांडून कधी एकदाचे मिठ्ठूला पाहते असे बाईंना झाले होते.

"अरे कुठे गेलेत सर्व ? तो मिठ्ठू एवढा बोंबलतो आहे. ऐकू येत नाही का कोणाला ? कान फुटले का सर्वांचे ? कुठे गेल्या कारट्या ?" अंगणातूनच बाई ओरडल्या.

"अगं शांत हो, मुली मैत्रिणीकडे गेल्या आहेत."

"मग तुम्ही तर होता घरात ! तुम्ही द्यायचं त्या मिठ्ठूकडे लक्ष !" - पर्स पलंगावर भिरकावत बाई टणटणत होत्या.

"अगं मला इतक्या उंचावरचा पिंजरा काढताच येत नाही" - आपला आखडलेला हात दाखवत मुलींचे बाबा म्हणाले.

"अहो मग दुसरं काही द्यायचं. टोपलीतली एखादी शेंगच द्यायची. ते ही नाही जमलं तर निदान तो एवढा ओरडतो आहे तर त्याच्या पिंजऱ्याखाली जाऊन निदान त्याच्याशी बोलायचं. इतकं सुद्धा तुम्हाला नाही करता येत ?"

"मी येतच होतो. जरा मागच्या अंगणात गेलो होतो."

"कारणं ! तुम्ही फक्त कारणं सांगण्यात पटाईत आहात. माणसाला काही करायचं नसलं की त्याला कारणं सापडतातच !" - पिंजऱ्यातली वाटी पेला काढण्यासाठी बाईंनी हात घातला. आणि कधी नव्हे ते मिठ्ठूने बाईंना चोच मारली.

"हत्त् मेल्या ! ज्याचं करावं भलं तो म्हणतो आपलंच खरं !" यावर मिठ्ठू कर्कश्श ओरडत राहिला. बाईंनी पिंजऱ्यातला वाटीपेला खालून सरकवत सरकवत दारापर्यंत आणला. आणि दार अर्धवट उघडून बाहेर काढला. मिठ्ठू डोळे वटारून ओरडत राहिला.

"थांब रे ! डोकं उठवू नको. देतेच आहे तुला" - वरणपोळीचा कुचकरा करत बाई बोलत होत्या. पण बाईंनी पाण्याचा पेला देताच मिठ्ठूने तो चोचीत धरून उबडा केला. कुचकऱ्याची वाटी आत सारताच ती देखील चोचीत धरून भिरकावली.

"मॅड झाला बहुधा हा ! जास्त नखरे करशील तर उडवूनच देईल तुला" - बाईंच्या सहनशक्तीचा अंत झाला होता. त्यांनी पिंजरा मागच्या अंगणात नेला आणि डाळिंबाच्या झाडाजवळील तारेला टांगला. मिठ्ठूला चुचकारून शांत केले. बोलते केले. आणि पुन्हा एकदा वाटी पेला भरून दिला. मिठ्ठू त्यांच्याशी बोलायला लागला. शाळेत जाणवणाऱ्या थकव्याने परत एकदा बाईंना घेरले. अंगणातील खाट टाकून तळहाताची उशी डोक्याखाली धरून बाई लवंडल्या. त्यांच्या नजरेपुढे पिंजऱ्यात अडकलेली मिठ्ठी होती !...

तेवढ्यात आंब्याच्या झाडांवर जंगली मिठ्ठूंचा मुक्त थवा भरारत येऊन स्थिरावला. त्यांचा कालवा ऐकू येताच पिंजऱ्यातल्या मिठ्ठीने खाणे सोडले. टुणकन् उडी मारून ती झाडाच्या दिशेने आली. आणि मान वाकडी करून वर पाहायला लागली. झाडावरचे पक्षी 'मिठ्ठू मिठ्ठू' करत एकमेकांशी भांडत होते. पिंजऱ्यातल्या मिठ्ठीने अंग बसके करून जागच्या जागी अंगात हुडहुडी भरल्याप्रमाणे पंख खालीवर केले. आणि ती जीवाच्या आकांताने ओरडायला लागली. तिच्या पंखांचा झपाटा विलक्षण वाढला. पण झाडावरच्या कोणाच्याही ते गावीही नव्हते. थोड्याच वेळात ते सर्व उडून दूर निघून गेले. मिठ्ठी पिंजऱ्यातल्या पट्ट्या चोचीत आणीत आणि दोन्ही पायात पकडत सरसर वर चढली. पिंजराभर फिरली आणि ओरडत राहिली. पण पक्षी दूर निघून गेले होते. मिठ्ठीच्या तडफडण्याला अर्थ

उरला नव्हता. बाजीवर पडल्या पडल्या बाई पाहत राहिल्या... मूकपणे !

•••

"कशाला राहतेस या बंदीवासात ? जा नं उडून !" बाई पिंजऱ्याला नाक लावून हळूहळू बोलत होत्या. पिंजऱ्यातील मिठ्ठी मान वाकडी करून लक्षपूर्वक ऐकत होती. ती डोळे मोठे करून बघत होती. तेवढ्यात उषा आली. बाई चपापल्या ! जणू चोरी करताना कोणी पकडले.

बाईंनी टेलीफोनची ॲल्युमिनिअमची जाड तार हातांनी वाकवली आणि अकोडा तयार केला. पिंजऱ्याचे दार उघडून, उघड्या दाराला आकोड्यात अडकवले. आता दार सोडून दिले तरी बंद होत नव्हते. आकोडा काढल्याशिवाय दार बंद होणार नव्हते.

बाई घरात जायला लागल्या तसा मिठ्ठू टुणकन उडी मारून त्यांच्या दिशेने आला. तरीही बाई जातांना पाहून ओरडायला लागला. बाई दुर्लक्ष करून आत निघून गेल्या. मिठ्ठू चोच आणि दोन्ही पायांनी पिंजऱ्याच्या लोखंडी पट्ट्या पकडत पिंजऱ्यावर भरभर चढला. कर्कश्य ओरडायला लागला. झपाट्याने खाली उतरला आणि एकदम थबकला. तो अगदी दाराशी. त्याला समजेना, आता काय करावे ते ! तो भरभर वर चढला तिथून पिंजऱ्यात हलणाऱ्या पाळण्याला चोचीत पकडून मिठ्ठीने जवळ ओढले. आणि ती पटकन् पाळण्यात बसली. पाळण्याचे हलणे वाढले. पाळणा पायांनी घट्ट पकडत तिने तोल सांभाळला. थोडे स्थिरावल्यावर ती तिथून मान वाकडी करून, उघडा दरवाजा पहायला लागली. थोड्याच वेळात डाळिंबाच्या आणि आंब्यांच्या झाडांवर मिठ्ठूंचा थवा येवून स्थिरावला. त्यांचा कलकलाट ऐकू येताच पिंजऱ्यातील मिठ्ठी देखील ओरडायला लागली. जणू ते सर्व एकमेकांना साद घालत होते. मिठ्ठी पाळण्यावरून उतरली. आणि क्षणात उघड्या दाराशी येवून थबकली. चोचीने दाराच्या लोखंडी पट्ट्या तपासायला लागली. पिंजऱ्यावाहेर पडायचे तर होते. पण हिंम्मत होत नव्हती. मिठ्ठी आतल्या आत पिंजऱ्याभर वर-खाली बेभान फिरली. झाडावरील थव्याचा कलकलाट जसजसा वाढत होता, तसतशी पिंजऱ्यातल्या मिठ्ठीची घालमेल होत होती. ती दारापर्यंत येवून थबकत असे आणि परत पिंजऱ्यावर चढून आतल्याआत फिरत ओरडत राहिली. एकाएकी थव्यातला एक मोठा मिठ्ठू उडाला, त्यापाठोपाठ दोन चार उडाले. आणि पाहता पाहता झाडाला पोरकं करत सर्व थवाच उडून दिसेनासा झाला. पिंजऱ्यातल्या मिठ्ठीने जिवाचा आकांत केला. घसा फुटेस्तोवर ती ओरडत राहिली. पण आता उशीर झाला होता. कोणीही परतून येणार नव्हते. मिठ्ठीने कर्कश्य ओरडत पेला उलथवला. आणि चोचीत धरून वाटी भिरकावली. ती एकदम उघड्या दारातून बाहेर जावून खाली अंगणात पडली. मिठ्ठीला एकदम धक्का बसल्यासारखे झाले. टूणकन् उडी मारत ती दारापाशी आली. आणि लोखंडी पट्ट्यांच्या फटीमधून मान वाकडी करत वाटी पाहायला लागली. एकदोनदा विनाकारणच ओरडली. मग काय वाटले कोणास ठाऊक, मिठ्ठी पिंजऱ्याच्या आडव्या पट्टीवर चढली. तिथून पलीकडचा पाण्याचा पेला चोचीत उचलून अलीकडे दाराच्या ढकलून दिला. पेला पिंजऱ्याखालच्या फरशीवर आदळून कंप पावू लागला. त्याक्षणी मिठ्ठी अचानक तिचे नेहमीचे बोलायला लागली !

•••

बाईंनी मिठ्ठूचा पिंजरा कपडे वाळत घालायच्या तारेवर डाळिंबाच्या झाडाच्या टोकावर अडकवला. आणि त्या मिठ्ठीला म्हणाल्या -

"मी दार उघडे ठेवते आहे. तू उडून जा !"

बाई आंघोळीला न्हाणीघरात गेल्या.....

आंघोळ उरकून बाई परतल्या, पाहतात तो काय, मिठ्ठी बाहेर येवून पिंजऱ्याच्या छतावर बसली होती. बाई आनंदाने चित्कारल्याच -

"अगं बाई आलीस का तू बाहेर !"

बाईंचा आवाज ऐकू येताच मिठ्ठी छतावरूनच बोलायला लागली. बाईंनी पिंजऱ्याला हलकेच हात लावला. त्याबरोबर मिठ्ठीचा एकदम तोल गेला. तिने कशीबशी चोचीत पट्टी पकडली आणि उलटी होत ती पटकन उघड्या दारातून पिंजऱ्यात शिरली. आत शिरताच ती बाईंवर ओरडायला लागली !

"बरं बरं ! एकदम भीती वाटली का तुला ?" बाईंनी हसत विचारले.

मिठ्ठी आणखीनंच ओरडायला लागली. बाईंनी आकोडा काढून दार बंद केले. आणि त्या घरात निघून गेल्या.

●●●

तोच बाईंची मोठी मुलगी तिथे आली.

"आई, आई, पहाना मिठ्ठूचा पिंजरा कोणीतरी उघडाच ठेवला !" - निशा

"कोणीतरी काय ? मीच ठेवलाय" - बाई

"तू"

"हो"

"का ?"

"अगं, मिठ्ठू उडून जाईलना !"

"त्यासाठीच उघडा ठेवला."

"उडून जाण्यासाठी ?..... कां बरं ?"

"मिठ्ठू पाळण्याची आपली कोणाचीच लायकी उरली नाही, असं मला वाटतं."

अचानक तोंडात बसल्यासारखी उषा स्तंभित झाली. आईला अचानक काय झाले तेच निशाला समजेना.

"कोणीच त्याच्याकडे नीट पहात नाही. थोडेही त्याचे काही काम सांगितले तर एकजात सर्वांच्या जीवावर येते ! त्याची आंघोळ तर राहिली दूरच, त्याला कोणी साधं पाणीही देत नाही ! मग काय अर्थ आहे असा मिठ्ठू पाळून ? उगाच त्या मुक्या जीवाला पिंजऱ्यात कोंडायचं ? त्यापेक्षा त्याला मुक्त केलेले बरं."

"अग, पण मोकळं केलं तर त्याला उडता येईल का ?"

"का, नाही येणार ? त्याला का पंख नाहीत ?"

"अगं, आई आज झाले तरी काय तुला ? अस कसं बोलते आहेस तू ? शेंडा नं बुडूख"

"पहा नं ताई, आई मिठ्ठूला उडवून देण्याच्या गोष्टी करते आहे. हे बरोबर होईल का ? जो मिठ्ठू त्याच्या खाण्यापिण्यासाठी आपल्यावर जन्मापासून अवलंबून आहे, त्याला एकदम अचानक हाकलून कसं काय द्यायचं ?"- निशा

"आई मला तर काही आठवत नाही. पण तूच नेहमी सांगते ना की, शाळेतून परतताना तुझ्या कोण्या खेड्यावरच्या विद्यार्थ्याने दोन मासाचे गोळे दिले होते. त्यावेळी ते अजिबात मिठ्ठूसारखे दिसत नव्हते. शरीराच्या मानाने त्यांची चोच मात्र मोठी आणि लालसर टणक होती. त्या चोचींवरून मात्र ते मिठ्ठू आहेत. असं लक्षात यायचं. त्या पिल्लांना तू अक्षरशः कापसाच्या बोळ्याने गाईचे दूध पाजून मोठे केले. मोठे झाल्यावर एकाच पिंजऱ्यात दोन मिठ्ठू एकमेकांशी भांडत. त्यामुळे नाईलाजाने त्यापैकी एकाला तुझ्या खास मैत्रिणीकडे दिले. तुझा त्या मिठ्ठूवर किती जीव आहे याची आम्हांस काय कल्पना नाही ? मग असे असतानाही तू असे का बोलतेस ?"

बाई, केवळ मुलीकडे पहात राहिल्या. त्यावर उषा आईला समजावत म्हणाली -

"आई, ज्या मिठ्ठूला पिंजऱ्यापलिकडचे जगच माहीत नाही तो उडेल कसा ?, इतर मिठ्ठू त्याला कसे काय सामावून घेतील ? तो कुठे खाणार ? कुठे पिणार ? कुठे झोपणार ? ज्याला पिंजऱ्याच्या कृत्रिम संरक्षणाची सवय झाली आहे. तो नैसर्गिक मुक्त वातावरणांत स्वतःचे संरक्षण कसे करणार ?"

"हे सर्व मी पाहीन. मी त्याला पिंजऱ्याबाहेर हळूहळू

अनुक्रमणिका

काढेन आणि उडायला शिकवेल."

आपल्या आईला जणू वेड लागले आहे असे उषा-निशाचे चेहरे !

●●●

घरात सुतक लागले असताना, केवळ देहधर्म अटळ असल्यामुळे नाईलाजाने, जबरदस्तीने जेवणं उरकल्या जावीत तसे अशात बाईच्या घरचे सर्व मुकाट्याने जेवत असत. वातावरणात एक प्रकारचा अदृश्य पण जाचक असा तणाव पसरला होता. मोठी मुलगी उषा रात्रीच्या स्वैंपाकाचे फार पूर्वीपासूनच सांभाळत असे. पण बाईंनी ती जबाबदारी परत स्वतःकडे घेतली. बाई खेड्यावरची शाळा आटोपून घरी परततांना आठवणीने काहीतरी आणतच होत्या. शाळेतल्या कवठाच्या थोरल्या झाडाची कवठे पिकून तडकायला आली होती. बाईंनी एका विद्यार्थ्यांच्या हातून पिकलेली दोन कवठे काढून घेतली. बाजाराच्या दिवशी मुद्दाम पायपीट करून बाबांना आवडतात तशा शेवग्याच्या शेंगा घेवून आल्या. मैत्रिणीच्या अंगणातील हेटयाच्या फुलांचा सडा पदरात बांधून घेवून आल्या.

पण बाईच्या धडपडीला यश येईना.

निशाला कवठाची चटणी म्हणजे जीव की प्राण ! पण चटणीचे बोट चाटतांना ती बोलून गेली -

"मला वाटते आई अशात आपल्या सर्वांची फार वरवर करायला लागली आहे ! पण त्याचा काही उपयोग होणार नाही."

"निशा, तुझे जेवण झाले असेल तर झोपायला जा ! मी आईला आवरायला मदत करते."

निशा आपल्या ताईकडे रागाने पाहत तनक्यात निघून गेली.

"ताई, तू काही आवरून नको, पण इथेच बस. तू फक्त माझ्या नजरेपुढे असली तरीही मला बरं वाटेल."

"आई तुझे पाय दाबून देवू काय ?"

"नको बेटा ! तू विचारलं हेच खूप झालं. अशात आपल्या घरचे वातावरण पूर्वीसारखे राहिलेले नाही."

"हं !" - उषा

"पण आज निदान तू माझ्याशी बोलणे सुरू केले. मला अशात खरोखरंच असं वाटतं, की हे जे आपण जगतो आहे हे सारं एक मोठं नाटकच सुरू आहे. हे काहीच खरं नाही. प्रत्येकाला कोणीतरी एकेक रोल दिला आहे. आणि जो तो आपापल्या ताकदीप्रमाणे स्वतःचा रोल करत आहे. तो शेक्सपियर खरोखरच द्रष्टा होता. त्याने म्हटलेच आहे, की जीवन हे एक नाटक आहे. आणि आपण त्यातील कलावंत आहोत !"

"आई ! तू कधी गं हे सगळं वाचलं ?"

"अगं वेडी आहेस का तू ? इतकं वाचायला माझे शिक्षण तरी झाले आहे का ?"

"मग तू कसं काय इतकं छान बोलतेस ?"

"अगं हेच, इकडचं तिकडचं ऐकते आणि देते लावून ! ते दादा नेहमी असंच काहीतरी वारंवार बोलत असतात. ऐकून ऐकून माझं आपोआप पाठ होते."

"कोण दादा ! त्यांचं आहे का इतकं वाचन ?"

"नसेल बहुदा. आणि खरं सांगू का, बहुतेक कोणाचंच नसते ! लायब्ररीत अनेकदा नाटकाची पुस्तके शोधताना मी स्वतः पाहिलं आहे, शोकेसेसमधील मोठमोठ्या पुस्तकांवरची धूळ सुद्धा झटकल्या जात नाही. समाजात विद्वान समजल्या जाणारी मंडळी फॅशन म्हणून पुस्तके विकत घेतात आणि त्यांच्या दिवाणखान्याची शोभा वाढवतात. अशा ग्रंथाची चिकटलेली पानेसुद्धा त्यांनी फाडलेली नसतात. मग मला सांग, हेही एक प्रकारचे नाटकच नाही का ?"

"पण मग ते दादा इतकं कसं काय छान बोलू शकतात ? त्यांचे इंग्रजी ऐकले की असे वाटते त्यांच्यापुढे आपल्याला काहीही येत नाही."

"अनुभव ! ताई अनुभव !! पुस्तके आपली मित्र असतात. पण सर्वात थोर गुरु कोण ? तर माझ्या मते

आपल्याला येणारा अनुभव ! शेवटी महर्षी व्यास किंवा शेक्सपियर तरी कोण होती ? आपल्यासारखी माणसंच ना ? अनुभवाचे बोल, त्याला सगळ्यात जास्त मोल !"

"अगं ही तर कवितावजा म्हणच झाली !" - उषा

"अगं आई, बाबा जागेच आहेत. ते ऐकत असतील."

"मग बिघडलं कुठे ? उलट तर त्यांनी ऐकावेच ! मी त्यांच्या समोरही बोलायला तयार आहे. मी जर खोटी असती तर तू मला एका कोपऱ्यात नेऊन कानगोष्टी केल्या असत्या !"

●●●

"त्या एक वर्षात मी माहेरीच राहिली. पण ट्रेनिंग झाल्यावर दोन वर्ष ह्यांनी मला नौकरी करू दिली नाही. कारण खेड्यापाड्यातून नोकरी करायला त्यांचा विरोध असे. पण मग आठ नऊ महिन्यात ह्यांचीच नोकरी सुटली."

"त्यावेळी पानशेतचे धरण फुटले होते त्यामुळे पी.डब्ल्यू.डी. मधील टेंपररी लोकांना कमी करण्यात आले."

"हे त्यांनी सांगितलेले कारण होते. खरे खोटे ईश्वर जाणो." बाई थोड्या थांबल्या. "पण बहुधा खोटेच असेल ते."

"आम्ही घराबाहेर पडलेलो आणि ह्यांची नोकरी गेलेली. घरात खायचे वांधे, त्यामुळे मी नोकरीचा प्रयत्न केला आणि मला ती ताबडतोब मिळाली. आणि दुसरा काहीच मार्ग नसल्याने हे सुद्धा विरोध करू शकले नाहीत. तेव्हापासून एका खेड्यावरून दुसऱ्या खेड्यावर नोकरी करीत फिरते आहे."

"सासरी मी सात-आठ महिनेच राहिली. ह्यांच्या घरची परिस्थिती इतकी हलाखीची होती की, अक्षरशः चार दिवस उपास घडल्याचे मला आठवते. उपाशी असताना घरची सर्व कामेही मलाच करावी लागत. ते सर्व मला अतिशय जड जायचं. सासरच्या लोकांनी जवळपास कट केल्यासारखं आम्हाला रात्रीच हाकललं. त्यानंतर मी त्या घरी कधीही गेले नाही. माझ्या मिस्टरांचे घरात काही वजन नव्हते कारण ते काही कमावत नसत. तसे तर सर्वच लोक आळशी आणि ऐतखाऊ होते. इतके असूनही मला शिक्षिकेचे ट्रेनिंग घ्यायची इच्छा होती. त्याला घरच्यांचा आणि विशेषतः माझ्या सासऱ्यांचा विरोध होता. घरच्या सुनेने नौकरी करायला बाहेर पडणे हे त्यांना कमीपणाचे वाटत होते. यावरून घरात खूप वाद झालेत. पण शेवटी हेच म्हणाले की, हिने ट्रेनिंग घ्यायला माझी काहीच हरकत नाही. आणि मी हक्काने एक वर्षाचे ट्रेनिंग घेतले. माझ्यासारख्या स्त्रीला काय पाहिजे असते ? मला काय पाहिजे होते ?...... तर आधार ! स्त्री ही वेलीसारखी असते ! जीवनात उभे राहण्यासाठी तिला आधाराची गरज असते. जितका बळकट आधार चांगला द्याल तितकी ती उंच जाते ! एवढ्यात मी सतत स्वतःलाच तपासत असते. तू विषय काढला, तू आता पुरेशी मोठी आहेस... समंजस आहेस. मुलगी मोठी झाली की मैत्रीणच समजायला हवे...

माझ्यासारख्या बाईला आयुष्यात काय पाहिजे असते ह्याचा बाबांनी कधी तरी विचार केला का ? बाईला पुरुषाच्या आधाराची गरज असते. शेवटी पुरुष म्हणजे काय ? तर पुरुष म्हणजे कर्तृत्व, पुरुष म्हणजे निर्णय क्षमता, पुरुष म्हणजे जबाबदारी घेणे, पुरुष म्हणजे आधार देणे, साथ देणे, उदार मनाने क्षमा करणे. ज्या नवऱ्याला त्याची बायकोच सांभाळते तो कसला आलाय नवरा ? तो असतो तिचं आणखी एक बाळ ! लहान बाळाचं आपण सर्व समजू शकतो पण एवढा मोठा नवरा जर बाळासारखा वागला तर तो गायीच्या गळ्यातल्या लोढण्याप्रमाणे असतो. बाळ नसून घराचा काळ ठरतो.

मी ह्यांच्यासाठी आणि ह्या घरासाठी काय खस्ता खाल्ल्या हे जगालाच काय पण तुम्हाला पण सांगितले नाही. दत्तपूरच्या महारोग्यांच्या केंद्रात ह्यांना इतक्या वेळा नेवून सोडलं की विचारू नकोस ! नेवून सोडलं की काही

दिवसांनी घरी परत हजरच ! लहान मुलं नाही का प्रायमरी शाळेतून पळून घरी येतात, अगदी तस्से करायचे हे ! ह्यांचा आपला एकच धोशा -

"हॅट ! हिचं हे काहीतरीच आहे ! मला काहीच झालेलं नाही. मला उगीचच घराबाहेर काढते अन् दूर नेवून डांबते !"

दत्तपूरच्या सेंटरवर हे इतक्या वेळी म्हणायचे की मला काहीच झालेले नाही की शेवटी काही लोकांना तर वाटायचं मीच पेशंट आहे. आणि हे मला सोडायला येतात ! ह्यांनी कधीही ह्यांचा आजार गंभीरपणे घेतला नाही. कधीही औषधोपचाराची फिकीर केली नाही. ह्यांचं करून करून मला इतकं कळायला लागलं होतं की सेंटरवरचे लोक मला नोकरी द्यायला तयार होत. हे गोळ्या घेण्यात टंगळमंगळ करतात, मी मात्र आजपर्यंत डी.डी.एस. ची गोळी कधी चुकवली नाही.

"तू ? तू कशाला घेते ती गोळी ?"

"डॉक्टरांना विचारूनच घेते मी. ह्याचा आजार संसर्गजन्य अवस्थे असतांनाही मी त्यांना वाळीत टाकले नाही. उलट जास्त सेवा केली. मला आजार लागायला नको म्हणून मी तर काळजी घेतेच. पण तुमच्या दुधात पण अर्धी अर्धी गोळी टाकून तुम्हांला देत आली आहे. आज हे सगळं सांगायचं कारण इतकंच, आज मी इथे आहे, उद्याचे काय सांगावे ? परवा निशा वाट अडवून उभी. उद्या कदाचित माझ्या तोंडावर दार लावायची."

"आई असं बोलू नको गं !" उषा रडवेली होत म्हणाली.

"रडू नकोस आणि माझी काळजीही करू नको. मी खंबीर बाई आहे ! माझी शाळा अन् नाटक ह्याच्या भरोशावर कुठेही मी दिवस काढेल."

"शाळेच्या नोकरीचं मला माहीत आहे. पण हे नाटकाचं भूत तुझ्या डोक्यात कसं शिरलं ? तुला नाही वाटत् या नाटकानं तुझं आणि आपल्या सगळ्यांचे नुकसान झालं ?"

"तुला असं वाटणं साहजिक आहे कारण तू आजच्या दिवसाच्या चष्म्यातून नाटकाकडे पाहते आहे. त्यामुळे तुला "नाटकाचं भूत" दिसते आहे. ते तसं नाही. शिवाय मी काही कोणाकडे 'मला नाटकात घ्या' असं म्हणत गेली नव्हती ! नाटक सुद्धा माझ्या आयुष्यात आपोआप चालत आले. आपल्याला अभिनयाचे अंग आहे वगैरे काही मला कळत नव्हते. हो, फक्त माझे वडील आम्हा मुलींकडनं कविता, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळकांच्या भाषणातले उतारे, संस्कृत श्लोक पाठ करून घेत. मला आठवतं, पाठांतरात नेहमीच माझा दुसरा नंबर यायचा - पहिला कधीही नाही."

"का ?"

"कारण माझं पाठांतर एकदम पक्कं असायचं"

"मग तरीही ?....."

"तीच तर गंमत आहे. माझं पाठांतर इतकं चांगलं आणि इतकं लवकर व्हायचं की माझा हात सर्वात पहिले वर ! मग स्पर्धेच्या वेळेस सुद्धा मला वाटायचं कधी एकदाची जाते कधी भरभर ओकून येते. तिथेही मी इतके फास्ट बोलायची की माझं बोलणं कोणाला कळायचंच नाही ! त्यामुळे सगळं पाठ असूनही मी स्पर्धेत दुसरी यायची. ते पाठांतर नाटकात कामी आलं."

"पण नाटकं नेमकं सुरू कसं झालं ?"

"त्यावेळी मी कान्हेरी सरप या खेड्यावर शाळेत होती. एकदा एक बीडीओ साहेब शाळेला भेट देण्यासाठी आले. त्यावेळी त्यांच्या स्वागताचा छोटासा कार्यक्रम ठेवला होता. शाळेतल्या अशा छोट्यामोठ्या कार्यक्रमांची जबाबदारी नेहमी आपोआपच माझ्याकडे येत राहिली आहे. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनापासून तो आभार प्रदर्शनापर्यंत सर्व एक खांबी तंबू आम्ही, हे साहेबांच्या लक्षात आले."

"एक दिवशी अचानक गावातली आठ दहा उत्साही मंडळी मला भेटायला आली अन् एकदमच हात जोडून

म्हणाली की "आमच्या नाटकात काम करा." मला आश्चर्यच वाटलं, मी म्हटलं त्यांना, तुम्हांला कोणी सांगितलं की मी नाटकात काम करते म्हणून. मी तर नाटक धड पाहिलं सुद्धा नाही, तर ते म्हणाले - बीडीओ साहेबांनी तर तुमचं नाटकातलं काम पाहिलं ! ते का खोटं बोलतील ? आता बीडीओ साहेबांनीच पाहिलं म्हटल्यावर कोणाचं काही चालते का ? असं माझं नाटक सुरू झालं. माझ्या मते मला काही नाटकात काम जमत नव्हतं. पण खेड्यातल्या लोकांसाठी माझं काम चालून जायचं. ते लोक मला खूप मानतात, याचं कारणं माझं पाठांतर फक्त माझंच काम नाही, तर मला सगळं नाटकच पाठ असते ! त्यामुळे मी असली अन् वह्या हरवल्या तरी सर्व निर्धास्त ! शिवाय शाळेतल्या बाई नाटकात काम करतात म्हटलं की लोकांना भयंकर उत्सुकता. प्रयोग हाऊसफुल ! मला भराभर कामे मिळत गेली आणि त्याबरोबर थोडा पैसाही सुटत गेला. पैसा मिळाल्याने घरून आडकाठी राहिली नाही. नाटकाच्या निमित्ताने मला बाहेर रहायला मिळायचे. त्यामुळे घरच्या कटकटीपासून मुक्तता झाली. आणि तू म्हणते की नाटकाचं भूत !"

"आता आपल्या घरात हा जो प्रश्न आला आहे तो नाटकामुळेच नाही का ?" - उषा

"इतकी वर्षे तुझ्या वडिलांनी प्रश्न निर्माण केले त्याचे काय ? विचार तुझ्या बाबांना, ते आयुष्यभर माझ्याकडे संशयाने पाहत राहिले की नाही ! विचार त्यांना मी वेळोवेळी नाटकात काम करणे बंद केले होते की नाही ! त्यावेळी हे स्वतः मला तालमीच्या हॉलवर पोचवायचे. कारण त्यावेळी त्यांना नाटकातून मिळणारे पैसे दिसायचे !"

"अगं बाबा ऐकत असतील ना ?"

"अगं उलट तर, या नाटकाचे माझ्यावर आणि तुमच्यावर उपकार आहेत. हे नाटक अन् शाळेतले ते विद्यार्थी यांच्यामुळेच आजपर्यंत मी जगली आणि पुढेही जगेल ! एक दिवस बापाच्या जखमेवर पट्टी बांधायची वेळ आली की तुमचे तोंड वाकडे होतात हे काय मला माहित नाही ? तरी त्यांच्या चिघळणाऱ्या जखमा, त्याभोवती घोंगावणाऱ्या माशा, नाका-डोक्यात भणभण करणारा सडक्या मासाचा वास; हे सगळं मी बिनतक्रार सोसलं, ते माझ्या विद्यार्थ्यांच्या प्रेमाच्या आधारावर आणि नाटकाच्या आभासमय जगात मिळणाऱ्या वास्तव आनंदावर ! तुला भलेही ती माझी चूक वाटते पण मला ते बरोबरच वाटते कारण तालमीला गेली की घरच्या कटकटी मी संपूर्णपणे विसरत असे. मी पैसे मिळत असल्याने तिथे जाण्यात घरून अडचण नसायची. पण मी फार व्यवहारी राहिले नाही. कधीही पैसे मागितले नाही. जेवढे देतील तेवढ्यावरच समाधान मानले. कधी एखाद्या वेळी निर्माता अडचणीत आल्यास मला पैसे मिळतही नसत, पण मी तक्रार केली नाही. त्यामुळे उलट असे झाले की माफक दरात, जास्तीत जास्त वेळ देणारी, हुशार, पाठांतरात चोख अशी माझी कीर्ती पसरली आणि मला एकामागे एक भूमिका मिळतच गेल्यात. मी कधीही रिकामी राहिली नाही. मुळात मी पैशांसाठी कामच करत नव्हती, तर जास्तीत जास्त वेळ घरापासून दूर राहण्यासाठी माझा तो मार्ग होता. आणि मला ते जमलं."

शनिवारचा दिवस असल्याने दोन्ही मुलींची शाळा सकाळीच होती. चहासोबत शिळ्या पोळ्या खावून त्या सकाळीच आपापल्या शाळांमध्ये निघून गेल्या. बाईंना दादांच्या निरोपाची वाट होती. म्हणून आज त्यांनी शाळेची सुट्टी टाकली होती. दादांचा निरोप नेमका कसा मिळेल हे बाईंना लक्षात येत नव्हते. त्यामुळे त्यांचा वेळ जाता जाईना !

बाबा त्यांच्या जागेत चुपचाप काहीतरी करीत आहेत, याची जाणीव बाईंना झाली. बाई, बाबांच्या बेपटीवजा जागेत डोकावल्या. ते लक्षात येताच, बाबांनी

स्वत:चे अंग आणखीनच आक्रसवून घेतले. मुद्दाम किंचित खाकरत बाई समोर सरकल्या. तेव्हा बाबांनी ताडकन् मान वर उचलून पाहिले. बाबांचे लालसर सुजलेले डोळे पाहून बाई हादरल्याच. आल्या पावली माघारी वळल्या. बाहेरच्या खोलीत जातांना त्यांनी चोरून परत एकदा पाहिलेच. बाबा मान मोडून काहीतरी लिहित होते. त्यांच्या आसपास वस्तूंचा पसारा होता.

काय करताहेत हे ! आणि आज त्यांची नजर एकदम इतकी कशी काय बदलली ?

बाई अस्वस्थपणे आंगणातून खोलीत, तिथून मागच्या आंगणात, तेथून समोरच्या आंगणात, पुन्हा एकदा घरात अशा फेऱ्या मारत राहिल्या. शेवटी फेऱ्या मारून त्यांचे पाय थकले, त्यांना दम लागला. त्या खुर्चीत बसल्या.

पण बाबांच्या समोर ठांबेठोकपणे उभे राहून, 'तुम्ही हे काय करता आहात ? कसला पसारा मांडून बसला आहात ?' असा साधा प्रश्न विचारण्याची त्यांची हिम्मत झाली नाही.

तोच, खुद्द बाबाच येवून समोर उभे राहिले. अभावितपणे बाई खुर्चीतून उठून उभ्या राहिल्या ! बाईंच्या चेहऱ्यावर आश्चर्य होते. पण बाबांची नजर स्थिर होती. हातातली जुनी सुटकेस बाईंजवळ देत ते म्हणाले -

"तुला सहलीला जायचे आहे ना ? हं ! ही माझी सुटकेस घेवून जा. मी रिकामी केली."

काळजाचा ठाव घेणाऱ्या बाबांच्या नजरेला बाई नजर देवू शकल्या नाहीत. पण त्यांचा आनंदही त्या लपवू शकल्या नाहीत. बॅग गादीवर ठेवून त्या प्रवासाची तयारी करू लागल्या. बॅग भरताना त्यांच्याही नकळत त्या गाणं गुणगुणायला लागल्या. तोच काहीतरी फाडल्याचा आवाज एकदोनदा आला. न राहवून बाईंनी बेपटीत हळूच डोकावून पाहिले. पण त्यांना फक्त बनियन मधल्या बाबांची पाठ दिसली.

' काय करताहेत हे सकाळपासून ? आपल्या तर डोक्याच्या पलिकडंचे आहे ! जावू द्या, आपण त्यात लक्ष घातले तर आपला वेळ जाईल. आणि आपल्याला तर गावाला जायचे आहे !

बाईंची गावाची तयारी झाली तरीही बेपटीतून काहीतरी आवरासावरीचे आवाज येतच राहिले. पण बाईंनी तिकडे पद्धतशीर दुर्लक्ष केले.

' आता काय करावे ?

कधी नव्हे ते बाईंना वेळ कसा घालवावा असा प्रश्न पडला. घराबाहेर पडण्याची त्यांची इच्छा इतकी तीव्र होती की शेवटी त्यांना राहवेना. काहीही न सुचून शेवटी दादांना भेटायला त्यांच्या घरी जावे असे त्यांनी ठरवले आणि त्या घराबाहेर पडल्या.

●●●

'गढीच्या जवळच वडाचा विस्तार आहे. तिथे विचारले, तर कोणीही तुम्हाला घरी पोचवेल.' कधीतरी दादांनी सांगितलेलं बाईंना आठवलं. उतरताना त्यांनी रिक्षेवाल्यालाच पत्ता विचारला. त्याने दाखविल्याप्रमाणे, उजवीकडच्या उतारावरून पावलांना थोपवत, त्या डावीकडच्या गल्लीत एका जुन्या घराशी पोचल्या. तेवढ्यातच, काचेच्या मोठ्या बाटलीभोवती मळकट फडके गुंडाळत, एक बाई एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जाताना दिसली. बाईंना पाहून ती थबकली. नकळत उजव्या हाताने पदर तोंडावर धरत ती समोर आली.

'.................?'

"दादा..... दादासाहेब लोखंडे...." बाईंनी घुटमळत विचारले.

"तुम्ही बाईच नां ? म्हणजे नाटकातल्या आजी, म्हणजे टीचर.....!!"

"हो.....हो !!"

"या ना. आतच या, बाहेर का उभ्या ?"

बाई खोलीत गेल्या अन् कुठे बसावं ? या विचारात उभ्याच राहिल्या.

म्हणाली की "आमच्या नाटकात काम करा." मला आश्चर्यच वाटलं, मी म्हटलं त्यांना, तुम्हांला कोणी सांगितलं की मी नाटकात काम करते म्हणून. मी तर नाटक धड पाहिलं सुद्धा नाही, तर ते म्हणाले - बीडीओ साहेबांनी तर तुमचं नाटकातलं काम पाहिलं ! ते का खोटं बोलतील ? आता बीडीओ साहेबांनीच पाहिलं म्हटल्यावर कोणाचं काही चालते का ? असं माझं नाटक सुरू झालं. माझ्या मते मला काही नाटकात काम जमत नव्हतं. पण खेड्यातल्या लोकांसाठी माझं काम चालून जायचं. ते लोक मला खूप मानतात, याचं कारणं माझं पाठांतर फक्त माझंच काम नाही, तर मला सगळं नाटकच पाठ असते ! त्यामुळे मी असली अन् वह्या हरवल्या तरी सर्व निर्धास्त ! शिवाय शाळेतल्या बाई नाटकात काम करतात म्हटलं की लोकांना भयंकर उत्सुकता. प्रयोग हाऊसफुल ! मला भराभर कामे मिळत गेली आणि त्याबरोबर थोडा पैसाही सुटत गेला. पैसा मिळाल्याने घरून आडकाठी राहिली नाही. नाटकाच्या निमित्ताने मला बाहेर रहायला मिळायचे. त्यामुळे घरच्या कटकटींपासून मुक्तता झाली. आणि तू म्हणते की नाटकाचं भूत !"

"आता आपल्या घरात हा जो प्रश्न आला आहे तो नाटकामुळेच नाही का ?" - उषा

"इतकी वर्षे तुझ्या वडिलांनी प्रश्न निर्माण केले त्याचे काय ? विचार तुझ्या बाबांना, ते आयुष्यभर माझ्याकडे संशयाने पाहत राहिले की नाही ! विचार त्यांना मी वेळोवेळी नाटकात काम करणे बंद केले होते की नाही ! त्यावेळी हे स्वतः मला तालमीच्या हॉलवर पोचवायचे. कारण त्यावेळी त्यांना नाटकातून मिळणारे पैसे दिसायचे !"

"अगं बाबा ऐकत असतील ना ?"

"अगं उलट तर, या नाटकाचे माझ्यावर आणि तुमच्यावर उपकार आहेत. हे नाटक अन् शाळेतले ते विद्यार्थी यांच्यामुळेच आजपर्यंत मी जगली आणि पुढेही जगेल ! एक दिवस बापाच्या जखमेवर पट्टी बांधायची वेळ आली की तुमचे तोंड वाकडे होतात हे काय मला माहित नाही ? तरी त्यांच्या चिघळणाऱ्या जखमा, त्याभोवती घोंगावणाऱ्या माशा, नाका-डोक्यात भणभण करणारा सडक्या मासाचा वास; हे सगळं मी बिनतक्रार सोसलं, ते माझ्या विद्यार्थ्यांच्या प्रेमाच्या आधारावर आणि नाटकाच्या आभासमय जगात मिळणाऱ्या वास्तव आनंदावर ! तुला भलेही ती माझी चूक वाटते पण मला ते बरोबरच वाटते कारण तालमीला गेली की घरच्या कटकटी मी संपूर्णपणे विसरत असे. मी पैसे मिळत असल्याने तिथे जाण्यात घरून अडचण नसायची. पण मी फार व्यवहारी राहिले नाही. कधीही पैसे मागितले नाही. जेवढे देतील तेवढ्यावरच समाधान मानले. कधी एखाद्या वेळी निर्माता अडचणीत आल्यास मला पैसे मिळतही नसत, पण मी तक्रार केली नाही. त्यामुळे उलट असे झाले की माफक दरात, जास्तीत जास्त वेळ देणारी, हुशार, पाठांतरात चोख अशी माझी कीर्ती पसरली आणि मला एकामागे एक भूमिका मिळतच गेल्यात. मी कधीही रिकामी राहिली नाही. मुळात मी पैशांसाठी कामच करत नव्हती, तर जास्तीत जास्त वेळ घरापासून दूर राहण्यासाठी माझा तो मार्ग होता. आणि मला ते जमलं."

शनिवारचा दिवस असल्याने दोन्ही मुलींची शाळा सकाळीच होती. चहासोबत शिळ्या पोळ्या खावून त्या सकाळीच आपापल्या शाळांमध्ये निघून गेल्या. बाईंना दादांच्या निरोपाची वाट होती. म्हणून आज त्यांनी शाळेची सुट्टी टाकली होती. दादांचा निरोप नेमका कसा मिळेल हे बाईंना लक्षात येत नव्हते. त्यामुळे त्यांचा वेळ जाता जाईना !

बाबा त्यांच्या जागेत चुपचाप काहीतरी करीत आहेत, याची जाणीव बाईंना झाली. बाई, बाबांच्या बेपटीवजा जागेत डोकावल्या. ते लक्षात येताच, बाबांनी

स्वत:चे अंग आणखीनच आक्रसवून घेतले. मुद्दाम किंचित खाकरत बाई समोर सरकल्या. तेव्हा बाबांनी ताडकन् मान वर उचलून पाहिले. बाबांचे लालसर सुजलेले डोळे पाहून बाई हादरल्याच. आल्या पावली माघारी वळल्या. बाहेरच्या खोलीत जातांना त्यांनी चोरून परत एकदा पाहिलेच. बाबा मान मोडून काहीतरी लिहित होते. त्यांच्या आसपास वस्तूंचा पसारा होता.

काय करताहेत हे ! आणि आज त्यांची नजर एकदम इतकी कशी काय बदलली ?

बाई अस्वस्थपणे आंगणातून खोलीत, तिथून मागच्या आंगणात, तेथून समोरच्या आंगणात, पुन्हा एकदा घरात अशा फेऱ्या मारत राहिल्या. शेवटी फेऱ्या मारून त्यांचे पाय थकले, त्यांना दम लागला. त्या खुर्चीत बसल्या.

पण बाबांच्या समोर ठांबेठोकपणे उभे राहून, 'तुम्ही हे काय करता आहात ? कसला पसारा मांडून बसला आहात ?' असा साधा प्रश्न विचारण्याची त्यांची हिम्मत झाली नाही.

तोच, खुद्द बाबाच येवून समोर उभे राहिले. अभावितपणे बाई खुर्चीतून उठून उभ्या राहिल्या ! बाईंच्या चेहऱ्यावर आश्चर्य होते. पण बाबांची नजर स्थिर होती. हातातली जुनी सुटकेस बाईंजवळ देत ते म्हणाले -

"तुला सहलीला जायचे आहे ना ? हं ! ही माझी सुटकेस घेवून जा. मी रिकामी केली."

काळजाचा ठाव घेणाऱ्या बाबांच्या नजरेला बाई नजर देवू शकल्या नाहीत. पण त्यांचा आनंदही त्या लपवू शकल्या नाहीत. बॅग गादीवर ठेवून त्या प्रवासाची तयारी करू लागल्या. बॅग भरताना त्यांच्याही नकळत त्या गाणं गुणगुणायला लागल्या. तोच काहीतरी फाडल्याचा आवाज एकदोनदा आला. न राहवून बाईंनी बेपटीत हळूच डोकावून पाहिले. पण त्यांना फक्त बनियन मधल्या बाबांची पाठ दिसली.

' काय करताहेत हे सकाळपासून ? आपल्या तर डोक्याच्या पलिकडंचे आहे ! जावू द्या, आपण त्यात लक्ष घातले तर आपला वेळ जाईल. आणि आपल्याला तर गावाला जायचे आहे !

बाईंची गावाची तयारी झाली तरीही बेपटीतून काहीतरी आवरासावरीचे आवाज येतच राहिले. पण बाईंनी तिकडे पद्धतशीर दुर्लक्ष केले.

' आता काय करावे ?

कधी नव्हे ते बाईंना वेळ कसा घालवावा असा प्रश्न पडला. घराबाहेर पडण्याची त्यांची इच्छा इतकी तीव्र होती की शेवटी त्यांना राहवेना. काहीही न सुचून शेवटी दादांना भेटायला त्यांच्या घरी जावे असे त्यांनी ठरवले आणि त्या घराबाहेर पडल्या.

•••

'गढीच्या जवळच वडाचा विस्तार आहे. तिथे विचारले, तर कोणीही तुम्हाला घरी पोचवेल.' कधीतरी दादांनी सांगितलेलं बाईंना आठवलं. उतरताना त्यांनी रिक्षेवाल्यालाच पत्ता विचारला. त्याने दाखविल्याप्रमाणे, उजवीकडच्या उतारावरून पावलांना थोपवत, त्या डावीकडच्या गल्लीत एका जुन्या घराशी पोचल्या. तेवढ्यातच, काचेच्या मोठ्या बाटलीभोवती मळकट फडके गुंडाळत, एक बाई एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जाताना दिसली. बाईंना पाहून ती थबकली. नकळत उजव्या हाताने पदर तोंडावर धरत ती समोर आली.

'................?'

"दादा..... दादासाहेब लोखंडे...." बाईंनी घुटमळत विचारले.

"तुम्ही बाईच नां ? म्हणजे नाटकातल्या आजी. म्हणजे टीचर.....!!"

"हो.....हो !!"

"या ना. आतच या, बाहेर का उभ्या ?"

बाई खोलीत गेल्या अन् कुठे बसावं ? या विचारात उभ्याच राहिल्या.

एका जुन्या पण जाड सागवानी गाताच्या बाजीवर, अस्ताव्यस्त सतरंजीवर, दादांच्या चेहऱ्यापट्टीचा एक गुट्टुगुट्टु मुलगा पालथा पडला होता. त्याच्या पोटऱ्या मांड्यावर काळसर पांढरे वळ टरारले होते. बाईंनी पाठीवर बाटली ठेवली. तो कळवळला.

"काय झालं वहिनी ?" - बाईंनी विचारलं.

वहिनींनी तोंड उघडायच्या आतच, झोपलेला मुलगा विव्हळत म्हणाला -

"आई सांगू नको ! सांगू नको आई !"

"नाही बेटा, नाही सांगत माझ्या सोन्या !"

त्या एवढ्याशा जागेत थांबणं शक्यच नव्हतं.

बाई ओसरीत आल्या. वहिनी मागोमाग येत म्हणाल्या -

"बसा नं ! दुध आणते अन् चहा ठेवते, हे येतीलच एवढ्यात."

"काय झालं ? कुठे पडला का तो ?"

"पडला कसला ? मारलं त्याला !"

"मारलं ! कोणी ?"

"त्याच्या बाबांनीच !"

"कोणी दादांनी ?...... का बरं ?" बाईंना अतिशय आश्चर्य वाटले.

"हं !........ असे कधी वागत नाही ते. मलाही विचित्रच वाटलं. पण कारणही तसंच घडलं."

"काय झालं ?"

"काही नाही, हा संजू अन् त्याचे मित्र रस्त्यावर गंमत गंमत मारामारी करत होते. कुठे माहीत आहे ?"

"कुठे ?"

"कोतवाली समोर ! पोलिसांच्या साहेबादेखत ! आता सांगा वहिनी, भर चौकात, वाहत्या रस्त्यात गंमत म्हणून हे पोरं मारामारी करतील, तर पोलिसांनी तरी काय करावं ? त्यांनी ह्यांना धरलं अन् साहेबांपुढे उभं केलं. तो साहेब निघाला ह्यांच्या ओळखीचा ! नाटक गाण्यांच्या कार्यक्रमांमुळे ह्यांना बहुतेक सर्व ओळखतातच. तो साहेब काय बोलला देवच जाणे ! ह्यांना संजूचा इतका राग आला की कोतवालीपासून ते घरापर्यंत त्याला मारत आणलं ! आजपर्यंत कधीही असं झालं नाही. अहो मुलांना साधं रागवत नाहीत. मला तर धक्काच बसला त्यांचा अवतार बघून. बरं झालं तुम्ही आल्या, बसा थोडा वेळ. येतीलच इतक्यात. तुम्हांला पाहून बरं वाटेल त्यांना" - वहिनी आपुलकीने बोलत होत्या.

बाई पाट टाकून ओसरीवर बसल्या.

"गेलेत कुठे पण ?"

"माणसं काय सांगून जातात ? मरेस्तोवर मारलं त्याला आणि गेले निघून ! त्यांच्या भोवती का एक प्रश्न आहे ? मुख्य प्रश्न असतो पैशाचा ! तिकडे नाटकात सगळी सोंगं करता येतात. प्रत्यक्ष संसारात मात्र पैशाचं सोंग आणता येते का ? जावईबापू आणि मोठी मुलगी आलेली आहे. त्यांचं पहिलं अपत्य पोटातच गेलं, मुलीच्या औषधपाण्याचा खर्च... तरी बरं, ह्यांच्या डॉक्टरांशी ओळखी आहेत !...... ते इलेक्ट्रीक मिटरचं एक वेगळंच प्रकरण सुरू आहे. संसार म्हटलं की काय-काय लागतं हे तुम्हाला सांगायची गरजच नाही ! त्यात परत तुम्हाला कुठे ट्रिपला पण जायचे आहे ना आज ?"

बाईंच्या पोटात खड्डाच पडला ! त्या किंचित शरमल्या अन् कतरतं बोलल्या,

"तुम्हाला...."

"माहीत आहे !" - वहिनी अगदी सहजगत्या घेत म्हणाल्या.

"बहुतेक सगळं मला माहितच असते ! दिवसभरात काय काय घडलं, कोण काय म्हणालं, सध्या कोणतं काम अंगावर आलं आहे, ह्या सर्व गोष्टी मला ते रात्री जेवताना किंवा सकाळी चहा पिताना सांगतात."

"ट्रिपची सगळी माहिती आहे तुम्हाला म्हणजे कुठे जाणार ? कोण कोण जाणार ?"

"जावून जावून तुमच्या नाटकाचा ग्रुप कुठे जाणार हो ? तर अजिंठा-वेरुळ ! काश्मिरला थोडीच जाणार ? मुंबईसुद्धा नाही !"

"'कोणकोण येणार ते सुद्धा अजून पक्कं नाही."

"हे गंमतीने म्हणत असतात की फक्त मी अन् बाईच जाणार आहोत !"

"मग ?"

"मग काय मग ?"

"तुम्हाला काही वाटत नाही ? म्हणजे वावगं ?"

"अहो मी माझ्या नवऱ्याला ओळखून आहे ! मीच कशाला ? प्रत्येक स्त्री आपल्या नवऱ्याला चांगली ओळखून असते. आता माझा नवरा करून करून काय करेल ? काही दारू पिणार नाही की मांस मच्छी खाणार नाही. खावून खावून जास्तीत जास्त तंबाखू खाईल ! दारू पिणार नाही किंवा जुगार खेळणार नाही. जास्तीत जास्त गाणे गातील, नाटक करतील ! त्यात थोडे बहुत पदरचे पैसे गमावतील ! पण म्हणतात ना, हौशेला मोल नसतं ! माझं इतकंच म्हणणं असते, बाहेर काय वाट्टेल ते करा, फक्त माझ्या संसाराला पैसा पुरवा. तोही यासाठी, की मी काही पैसे कमवत नाही म्हणून ! आता नाटक म्हटलं की त्या दुर्गासारख्या, तुमच्या सारख्या काही मुली, बायका भोवती येणारच ! शेवटी माणूस आहे.... पण होवून होवून काय होणार ? माणसाचा राक्षस होणार नाही का देव होणार नाही ! निसर्गाच्या पलिकडचं तर काही होणार नाही ना ?"

बाई उठल्याच !

"थांबा, थांबा कुंकू लावते.... असं आहे बाई, माझ्या नवऱ्यावर माझा पूर्ण विश्वास आहे ! त्यावरच माझा संसार सुरू आहे. विश्वास ठेवू नको तर काय करू ? जोपर्यंत माझा नवरा घरी येवून माझ्याच हातचा स्वैंपाक आवडीने खातो, तोवर मला घोर नाही ! आणि मला खात्री आहे, तो हॉटेलातलं किती वेळा खाईल ? एकदा दोनदा ? शेवटी तर त्याला माझ्या हातची चूनभाकरीच आवडते ना ?"

हे ऐकून बाईंना गरगरायलाच लागलं !

काही न बोलता, मान हालवत त्यांनी दादांचे घर सोडले.

●●●

वडाच्या झाडाखाली बाईचा रिक्षेवाला गिऱ्हाईकाची वाट पाहत बसलाच होता. काही न बोलता बाई रिक्षेत जावून बसल्या. आणि घरी पोहोचल्या.

घरी पोहचताक्षणीच उषा म्हणाली -

"अगं आई, तुझे ते दादा आले होते."

"कधी ?" - बाईंनी हळहळत विचारले.

"आम्ही शाळेतून आल्यानंतर थोड्याच वेळाने. थोडा वेळ थांबले."

"कोण कोण बोललं त्यांच्याशी ?"

"तसे सगळेच बोलले. पण मला सगळ्यात जास्त बोलावे लागले. आणि बाबा जेवढ्याचं तेवढं बोलले. निशा फारसे बोलली नाही."

"मग काय केलं त्यांनी इतका वेळ ?"

"काही नाही, त्यांना आपला मिठू खूप आवडतो. त्यामुळे बहुतेक सगळा वेळ आम्ही मिठूविषयीच बोलत होतो. मुख्य म्हणजे आपल्या मिठूला संगीत कळते आणि आवडत्या गाण्यातील नेमकी आवडती ओळ आल्याबरोबर तो हमखास प्रतिसाद देतो. हे मी त्यांना दाखवून दिले."

"म्हणजे ती "चैन से हमको कभी, आपने जीने ना दिया'ची कॅसेट सापडली कां ?- तेच गाणं तू लावलं असशील ना ?"

"अर्थात् ! ती कॅसेट मला कालच आलमारीच्या मागे पडलेली दिसली. आधी मी या गाण्याविषयी सांगितलं तेव्हा दादांचा विश्वासच बसत नव्हता. पण मी तीन-चार वेळा तेच ते गाणे लावून दादांना दाखवून दिलं की आमच्या मिठूला संगीताचा कान आहे. इतकंच नव्हे तर

जितक्या वेळी कडव्यातील 'काश ना होती अपनी जुदाई, मौत ही आ जाती !' ही ओळ वाजली, तितक्यावेळी आपल्या मिठूने बरोबर 'चिट्टुक !' असा आवाज दिला. इतका हुशार आहे आपला मिठू !"

असे म्हणत उषा मागच्या अंगणात मिठूचे लाड करायला गेली आणि गेल्या गेल्या किंचाळली -

"अगं आई ! लवकर इकडे ये ! पिंजऱ्यात मिठू नाही !"

"आँ ! असं कसं झालं ? आता तर दोन तासांपूर्वी आपण त्याच्याशी बोललो !" - निशा ओरडतच मागच्या अंगणात गेली. आणि ढणढण रिकामा पिंजरा पाहून ओक्साबोक्शी रडायला लागली.

"अगं पण असं कसं झालं ? आता मिठू होता आणि आता नाही. हे कसं काय शक्य आहे ?"

"अगं नाहीतरी आपण अशात त्याचा पिंजरा, त्याने उडून जावे म्हणून उघडा ठेवतच होतो." - बाई.

"हो आई हे बरोबर आहे. पण इतक्या तडकाफडकी आपल्याला सोडून उडून जाणारा तो मिठू नव्हता."

"नाही कसं ! अशात तो स्वतःहून पिंजऱ्याच्या बाहेर यायचा आणि पिंजऱ्याच्या छतावर फिरायचा. मी स्वतः हे पाहिलं आहे."

"मान्य आहे. पण जरी तो पिंजऱ्याच्या बाहेर आला होता. तरी तो उडून गेला होता का ?"

"मुख्य म्हणजे उडून जाण्यासाठी दरवाजा उघडा ठेवावा लागतो. मग हा दरवाजा कोणी उघडला ? मी तर बंदच केला होता." - उषा

"हं ! हं !! आले लक्षात. दादांनी तर मिठूला उडवून दिले नसेल ! कारण सगळ्यात शेवटी मिठूजवळ तेच होते. आणि आम्ही घरात निघून आल्यावरही थोडावेळ ते मिठूच्या पिंजऱ्याशीच होते आणि नंतर अचानक घाईघाईने घरात येवून त्यांचा निरोप ठेवून निघून गेले."

"काय होता त्यांचा निरोप."

"अगं तेच. आज संध्याकाळी सहाच्या गाडीने जायचे आहे. सगळ्यांना त्यांनी बस स्टँडवर पाच वाजताच बोलावले आहे. ते तर निशाला आणि मलासुद्धा या म्हणत होते. पण मी त्यांना सांगितले की, आईच्या माघारी मलाच स्वैंपाक पाणी करावे लागेल. निशाने मात्र स्पष्ट शब्दात नकार दिला. ती म्हणाली आईला जायचे असेल तर जाईल. मी मात्र जाणार नाही."

तेवढ्यात निशाची हाक ऐकू आली ती उषाला ओरडून म्हणाली -

"ए ताई ! मी माझ्या मैत्रिणीच्या घरी खेळायला जात आहे. अर्ध्या तासाने परत येईल."

"आई ! तू जाते आहेस तर !..... काही हरकत नाही. पण जाण्यापूर्वी मला एक गोष्ट तुला दाखवायची आहे." असे म्हणत उषा आईला अंगणाच्या दूरवरच्या कोपऱ्याकडे घेवून गेली. आणि म्हणाली -

"आई, हे पाहिलंस का ? आज सकाळी तू कुठेतरी बाहेर गेल्यावर बाबांनी त्यांच्या खोलीतला हा कचरा इथे आणून टाकला. त्यात मला तुमच्या लग्नाचा फाडलेला फोटो दिसला. तो मी उचलून माझ्याजवळ ठेवला. तुला काही या ढिगाऱ्यात ओळखीचं दिसत आहे का ? कारण हा सगळा कचरा बाबांनी फेकलेला आहे."

बाई तिथेच बसून पाहायला लागल्या. फाडलेल्या जुन्या कागदांमध्ये बाईंच्या ओळखीचे अक्षर वाटले. ते उचलून त्यांनी वाचायला घेतले. आणि त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. ते अक्षर त्यांचेच होते ! खूप खूप वर्षांपूर्वी त्यांनी बाबांना लिहिलेले ते पत्र होते. बाई स्वतःचे ते पत्र विसरून गेल्या होत्या. बाई भराभर कचऱ्याचा ढिगारा उचकायला लागल्या. आणि त्यांना धक्क्यावर धक्के मिळाले. एव्हाना त्यांच्या लक्षात सर्व आलेच होते. बाईंच्या नकळत बाबांनी त्यांच्या संसाराचा अनमोल खजिना जतन करून ठेवला होता. त्या प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टीमधे अविस्मरणीय अशा आठवणी जगत होत्या.

काय नव्हते त्यात ?

इतकी वर्षे जपून ठेवलेली बाईंची जुनी पत्रे होती. कसल्यातरी फुलांच्या वेण्यांचे अवशेष होते. बाईंच्या जीर्ण झालेल्या पैठणीचा काठपदर, दोन्ही मुलींच्या जन्मवेळा, त्यांची वजने, यांच्या नोंदी. बाईच्या व बाबांच्या लग्नाची पत्रिकासुद्धा फाडलेली होती. बाबांचा तो जुना ठेवा होता. तो ठेवा ते बाईंना कधीही दाखवत नसत. खरं तर अशा अनेक बारीकबारीक आठवणी जतन करून ठेवल्या असतील ही बाईंच्या कल्पनेपलिकडची गोष्ट होती. बाबा तो ठेवा आज नष्ट करू पाहत होते.

बाईंच्या सर्व लक्षात आले. पण आता काय करावे हे त्यांना सुचेना. त्या तिथेच फतकल मारून बसल्या. शेवटी उषाने एक मोठी बॅग आणली आणि तो फाडलेला फेकलेला पसारा तिने बॅगेत भरला. त्यानंतर बाईंना हात देवून उठवले. शेवटी तिच्या घरगुती कामांकडे वळण्यापूर्वी घड्याळाकडे पाहत ती म्हणाली

"आता फारसा वेळ उरला नाही. जाण्यापूर्वी तुला मी चहा करून देते हो एक विसरलेच होते. बाबा हे लिहीत होते. त्यांनी मला ते तुला द्यायला सांगितले आहे. जेव्हा वेळ मिळेल तेव्हा शांतपणे वाच."

उषाने दिलेले कागदाचे जाडजूड पुट्ठल बाईंनी पर्समध्ये ठेवले.

चहा घेवून त्या निघाल्या, त्यावेळी त्यांना सोडण्यासाठी कोणीही दारापर्यंत आले नाही.

बस स्टँडवर बाई वेळेच्या कितीतरी आधी पोचल्या. कोपऱ्यातल्या एका बाकड्यावर बसून त्यांनी अधीरपणे पर्स उघडली. सुटकेस पायाशी लावून ठेवली आणि त्या मग्न होवून बाबांचे पत्र वाचायला लागल्या...

...बाईंचे पत्र वाचून होत असतानाच त्यांना हाक ऐकू आली -

"बाई ! बाईऽ !"

कोपऱ्यातून आवाज ऐकू आला. आणि बाईंच्या छातीत धस्सं झाले. बाई त्या जागेवरून सपाट्याने दूरवर निघून जायला लागल्या. पण हाकांची तीव्रता अधिकच वाढली. बाईंच्या लक्षात आले, ह्या हाका दुसऱ्या कोणासाठीही नसून, कोणीतरी आपल्यालाच बोलावते आहे. तरीही बाई नेटाने चालतच राहिल्या. आणि कोणीतरी धावतच येवून त्यांच्या मागे पोहोचले.

"बाई ! तुम्ही मला ओळखलं नाही का ? मी तुमचा विद्यार्थी !"

आता दुर्लक्ष करणे बाईंना अशक्य होते. त्या वळल्या. मान वर करून पाहायला लागल्या. एकदम काही लक्षात येईना. पण निरखून पाहिल्यावर त्या उंचपुऱ्या तरुण चेहऱ्याआडच्या बालपणाच्या ओळखखुणा त्यांना पटायला लागल्या ! चमकदार काळसर रंग, मोठे डोळे आणि कपाळावर डाव्या बाजूला खोलवर खोक ! बाईंना थोडंफार आठवल्यासारखं वाटलं... आणि त्याचवेळी तो म्हणाला -

"बाई मी तुमचा अर्जुन !" - उत्तेजित झालेला तो तरुण मुलगा जवळपास ओरडलाच. त्याचा आनंद, उत्साह, चेहऱ्यावरून दुथडी भरून वाहत होता.

..हां ! हां !! अर्जुन... सुरुवातीला कधीही शाळेत न येणारा, कधी आलाच तर उशिरा येणारा आणि मधूनच पळून जाणारा !...

तेवढ्यात एक माणूस बाजूला येवून पोहचला आणि आदराने मान लववून जरा दूरच उभा राहिला. त्याच्याशी नजरानजर होताच, बाईंच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. अर्जुन, त्याचे ते नमस्कार नाकारणारे वडील, त्यांचे ते व्यसन, सर्व सर्व एका अक्षात आठवले.

"बाई तुम्ही मला ओळखले नाही ! मला ?" - किंचित खट्टू होत अर्जुन अविश्वासाने विचारत होता. बाईंना उत्तर सुचेना. कसाबसा आवंढा गिळून त्यांनी मान डोलावली. त्यात होकार-नकार असा नेमका काहीही अर्थ

नव्हता.

"अरे अर्जुन, बाई तुला कधी तरी विसरू शकतील का ? तू आपल्या खेड्यातल्या शाळेचे नाव सगळीकडे वाढविले. तुला कशा काय त्या विसरू शकतील ?" - अर्जुनचे वडील समजावत होते.

"अं ? हो नं" - बाई गुळगुळीत बोलल्या.

"कोणी काही म्हणो, आज आमचा अर्जुन मोठा डॉक्टर होतो ते केवळ तुमच्यामुळे. तुमचे त्याच्यावर अन् आमच्या समद्या खटल्यावर लय मोठे उपकार आहेत."

"बाई गावाला चालल्या का तुम्ही ? कोणत्या"

आता काय उत्तर द्यायचे ह्याला ?

बाईंचा चेहरा चोरी पकडल्यासारखा एकदम गोरामोरा झाला.

"बाई बरं वाटत नाही का तुम्हाला ? बसा कुठेतरी थोडावेळ. थांबा, मी तुमच्यासाठी पाणी आणतो" - म्हणत अर्जुन धावत निघाला.

"अरेरे ! थांब बेटा जावू नको. मी कॅन्टीनकडेच निघाली होती" म्हणत बाई बोलणं संपवून कॅन्टीनच्या दिशेने चालायलाही लागल्या.

"बेटा अर्जुन, बाईंचे आशिर्वाद घे" अर्जुन वाकला.

"बाई तुम्हाला अगदी घरातली गोष्ट सांगतो. आमच्या घरी फक्त देवाचा फोटो आहे. पण अर्जुन म्हणतो की, तो मोठा झाल्यावर तुमचाही एक फोटो त्यांच्या जवळ तो ठेवणार आहे..."

"अहो हे काय भलतंच. कोण्या थोर विभूतींशी माझी तुलना करताय तुम्ही ? असं काही विचित्र बोलू नका. मी आपली एक चारचौघींसारखी सर्व सामान्य शिक्षिका आहे."

"बाई हा तुमचा मोठेपणा आहे. तुम्ही माझ्यासाठी आणि माझ्यासारख्या अनेक दरिद्री आणि दुबळ्या मुलांवर प्रेम केलं. त्यांना घडवलं. आमच्यासाठी तर तुम्ही देवाइतकेच मोठे आहात. आशिर्वाद द्या आणि आता यानंतर विसरू नका." - अर्जुनने बाईंच्या दोन्ही पायांवर एकेकदा कपाळ टेकवत 'दर्शन' घेतले.

त्याक्षणी धरणी दुभंगावी आणि तीत आपण गाडल्या जावे असे बाईंना तीव्रपणे वाटले.

अर्जुन आणि त्याचे बाबा नमस्कार करून निघून गेले होते. पायांमध्ये जणू मणामणांचे ओझे बांधल्याप्रमाणे बाई पाय घासत कॅन्टीनकडे वळल्या...

शेवटी माणूस म्हणजे कोण ?

माणूस म्हणजे काय ? शेवटी काय करतो ?

कोणत्या गोष्टीला किंमत येते ? पैसा अडका दागदागिने, जमीनजुमला, सोनंनाणं ! माणूस म्हणजे त्याचा शब्द !

माणूस म्हणजे त्याचे नाव, त्याचा लौकिक. इतकी वर्षे आपण या भागात वावरतो आहोत. इतके विद्यार्थी हाताखालून गेलेत. त्या सर्वांच्या मनात आपली एक विशिष्ट प्रतिमा तयार झालेली आहे. इतक्या वर्षापासून आपण आपला जीव खरडून खरडून शिकवतो, मुलामुलींना घडवतो, त्यांच्यावर आपल्याच मुलांप्रमाणे समजून प्रेम करतो ते वाया गेलेलं नाही. छोटे छोटे रोपटे आपण जोपासतो. त्यांचे पाहता पाहता वृक्ष तयार होतात. त्यांच्या हृदयात आपल्यासाठी एक जागा आहे. तिथे आपले नाव कोरलेले आहे. आपली एक प्रतिमा तेथे दिमाखात विराजमान झालेली आहे.

आता जेव्हा त्यांना कळेल की आपण या कारणासाठी बाहेरगावी गेलो आहे तर त्यांना काय वाटेल ? त्यांच्या मनातील आपल्या प्रतिमेला तर सुरूंगच लागेल. ती उध्वस्त होईल. तीही आपल्याच हाताने. काय वाटेल विद्यार्थ्यांना ?

कसे सहन करतील, कसे पचवतील ते ही गोष्ट ? भाजी बाजार, धान्य बाजार, किराणा बाजार बँका असे सर्वत्र विद्यार्थी पडलेले आहेत. आपल्याला कधी एस. टी. मध्ये, कधी कंट्रोलच्या दुकानात अथवा बँकेत रांगेत उभे

रहावं लागत नाही. कधीही, कोणतीही गोष्ट अडत नाही. आपण आपलं पाऊल थोडंही चूक टाकलं तर मग ? काय करावं ? दादांसोबत गावाला जावे की नाही ? काय मिळणार आपल्याला जावून, काय चिटकेल आपल्याला ? बहुदा काहीही नाही. आणि त्याबदल्यात काय गमवाल ? पुष्कळ काही उध्वस्त होईल. विद्यार्थ्यांच्या मनात आपणच ती प्रतिमा तयार केली तिच्या गळ्याला नख लावायचा आपल्याला तरी काय अधिकार आहे ? जो लौकिक इतक्या वर्षात आपण अक्षरशः एकेका विद्यार्थ्यांच्या रूपात कणाकणाने कमावला तो कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही किंमतीवर अबाधितच ठेवावा लागेल. कारण शेवटी माणूस म्हणजे त्याचा लौकिक !

●●●

बाई विचार करत होत्या. दादा त्यांच्या बाजूला कधी येवून उभे राहिले, त्यांना कळलेही नाही.

शेखर बस स्टँडवर जावून पोचला. दादा आणि बाई पाठमोरे दिसले. दोघांच्याही हातात बॅग्ज. म्हणजे "झाले सगळे संपल. आता काही फायदा नाही. आता काय करावे ?"

आता जर ते जातच आहेत मग आपण त्यांना भेटून करणार तरी काय ?

दादा खूष दिसत होते. त्यांनी वेळ पाहिली. नलिनीने हाताने खुणावले. ती त्यांना कँटीनमध्ये जावू असे म्हणत होती. ती दोघेही आत गेली. शेखर अंतर राखून सावकाश मागोमाग गेला. बाहेरून पाहू लागला. दादा तिथेच बसणार होते. तिथे त्यांना उठवले - नाही म्हटले.

शेजारच्या फॅमिली रूममध्ये जावू म्हणाली. दादा अधिकच खूष झाले.

बाई वळल्या अन् अचानक त्यांच्या दृष्टीस शेखर पडला. लपून छपून पाहताना शेखर पकडल्या गेला होता. बाईंनी शेखरला ओळखले अन् हातच वर केला. दादांच्या कपाळावर आठ्या पडल्या. तिथून निघून जावे असे त्याच क्षणी शेखरला वाटले. पण बाईंनी शेखरला हाक मारली. कसंवसं ओळखीच हसू चेहऱ्यावर ओढत शेखर अनिच्छेने आत शिरला. दादांची नजर टाळत तो त्यांच्या जवळ गेला. आणि एकदम त्याला जाणवलं, त्याच्यात आणि दादांमध्ये जणू एक 'खाई' तयार झाली होती. संबंधामध्ये एक विचित्र पोकळी, एक ताण, परकेपणा होता. जणू ते दोघे एकमेकांच्या विरुद्ध पार्टीतले होते. शेखर त्यांच्यावर जळतो आहे असे तर त्यांना वाटत नाही ना ?

एका गोल टेबलाभोवती तिघेही बसले होते. खाली शेजारी दोन बॅग्ज होत्या. शेखरचे लक्ष बाईंकडे गेले अन् तो चमकला. बाई वेगळ्याच वाटल्या. विचारमग्न, उदास, ओठांची किंचितसी थरथर, डोळे थकलेले. बाईंनी दोन्ही हातांच्या तळव्यांवर कपाळ टेकवले आणि हाताच्या तळव्यांनी दोन्ही डोळे दाबले. आणि रगडले. अंगठे कानाच्या बाजूला चाळ्यांवर जोरात चोळले. अन् मग म्हणाल्या - "दादा, मला काही बोलायचं आहे म्हणूनच मी तुम्हाला इथे बसायला म्हटलं." इतक्यात आमच्या घरी फार विचित्र वातावरण तयार झाले आहे. माझे मिस्टर बोलत काहीच नव्हते. पण न बोलताही मला सर्व काही समजत होते. त्यांना ट्रिपची कल्पना आपण दिली होतीच. ते बोलले काहीच नाहीत. रात्रभर बहुधा विचार केला असावा. मग सकाळी स्वतःहून त्यांची ही सूटकेस रिकामी करून दिली. काही न बोलता त्यांनी ही चिठ्ठी माझ्या हातात दिली." बाईंनी पोलक्यात ठेवलेल्या कागदाची घडी दादांच्या हातात दिली. दादांनी वाचली व ती शेखरच्या हातात देताना त्यांच्याही नकळत त्याचा श्वास गंभीर सुस्कारला ! शेखर मनातल्या मनात वाचू लागला.

प्रिय नलू !

तुला पत्र लिहायचा प्रसंग फारसा पडला नाही. मी प्रिय लिहिलेले तुला फारसे आवडणार नाही. हे मला माहीत आहे पण तू मला खरोखरीच प्रिय होती, आहे, राहशील व रहावीस असे वाटते. मी तुला आयुष्याच्या

सुरूवातीपासून सदैवच त्रासदायक ठरत आलो. तू मात्र मला नेहमी साथच दिली दुसऱ्या कुणीही दिली नसती अशी ! कित्येकदा माझ्या दोषांवर चुकांची झाकपाक करताना सगळा बोल तू स्वतःला लावून घेतला. माझ्या आजारपणात दिलेली साथ तर केवळ गडकऱ्यांच्या सिंधूच्याच जातीची किंवा वि. स. खांडेकरांच्या कथा कादंबऱ्यातच शोभून दिसावी अशी. विशेषतः माझ्या आजारानंतरही आपल्याला झालेली मुलगी ! नुसता विचार केला तरी मला स्वतःलाच लाज वाटते. या बदल्यात मी काय दिलं तुला ? काहीही नाही. खरं तर तू काही मागितलंच नाहीस. संसाराचा सगळा भार तू उचलला. नोकऱ्या केल्या. पैसे कमावण्यासाठी नाटकात कामेही केलीत. दोन दिवस झालेत मी विचार करतो आहे... या दरम्यान मी काय केलं तर सतत केवळ संशयाने तुझ्यावर पहारा ठेवला. तू मला कधी सांगितले नाहीस पण सरपंचाच्या हातावर तू कशी तुरी दिली हे मला माहीत होते. तरीही मी मात्र तुझ्या तालमींकडे सुद्धा संशयानेच पाहिले.

या पार्श्वभूमीवर आता मला वाटते, इतके दिवस तू माझ्याशी प्रामाणिकपणे संसार केला, आता तुलाही एकसूत्री आयुष्याचा कंटाळा आला नसेल का ? तू काय मोठसं वावगं करते आहे ? नोकरीवर जाणाऱ्या कित्येक बायका मला माहीत आहेत...

हे विचार मनात रुजवायला मला किती यातना होताहेत माझे मला माहिती. पण तू जा. निःसंकोचपणे जा ! तू परतली नाहीस तरी चालेल. मी आजपासूनच तुला विसरण्याचा प्रयत्न करत आहे. मला विसर व सुखी समाधानी रहा.

तो दिवस तर मी कधीही विसरू शकणार नाही. घरात काही सोय नव्हती ! मी नुकताच ऑफिसमध्ये कारकुनाच्या जागेवर लागलो होतो. घरातल्या पिठा-मिठाची जबाबदारी सुरूवातीपासून तूच सांभाळली ! त्यामुळे साहजिकच कर्तेपण तुझ्याकडे चालत गेले ! त्यादिवशी घरात ठणठणीत असतानाही मी मख्खपणे बसून राहिलो. जणू मी त्या गावाचाच नाही ! तू उठली. शेजाऱ्या पाजाऱ्याकडून उधार उसनवार करून चूल पेटविली. मुली चुरू चुरू बोलल्या "तुम्ही काही कामाचे नाही आमची आईच चांगली आहे !"

झाले ! माझा राग मस्तकात गेला.

ऑफिसला उशीर झाल्याचे निमित्त करून सायकलवर टांग मारली आणि रागाराग निघून गेलो.

आणि तू मात्र स्वैंपाक तसाच टाकून उठली आणि डबा भरून माझ्या मागे धावली - चप्पलही न घालता. तुला माझ्या मागे धावताना बघून अधिकच चेवाने सायकल दामटवली आणि ऑफिसकडे निघून गेलो.

नंतर तू मला सांगितले की दगडी पुलावरून नदी ओलांडताना कोण्या एका अनोळखी भल्या सायकल स्वाराला तुझी दया आली आणि त्याने चौकशी केली. कोण कुठला तो ! ओळख ना पाळख ! तू त्याला सांगितलं की, "ऑफीसला उशीर झाला म्हणून ते तसेच गेले. त्यांच्या पोटात अन्नाचा कणंही नाही. तुम्ही प्लीज..." काही न बोलता तो सायकलवरून उतरला. तू अंदाजे ऑफिसचा पत्ता सांगितला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो डबा बरोबर माझ्या टेबलावर येवून पोहोचला... इतकी वर्षे मी तुला सांगू शकलो नाही... त्यादिवशी तो डबा खाताना इतकी शरम आणि अपराध्यासारखे वाटले की विचारू नकोस !

घरात काहीही नव्हतं. यात खरं म्हणजे दोष तुझा होता की माझा ? आणि उलट तमाशा मात्र मीच केला !

तू इतक्या प्रेमाने, कष्टाने टाक्यावर टाके टाकत मुद्दाम माझ्यासाठी उलनचे स्वेटर विणले. आणि मी मात्र करंटेपणाने ते न घालता त्यातले दोषच काढत राहिलो. तुला हिणवत राहिलो !

तुला कल्पना नाही, पण माझ्यापर्यंत तुझ्या सगळ्या

बातम्या नीट पोहचत असत. तू त्या तांदूळवाडीच्या सरपंचाला भीक न घालता हिंमतीने त्याच्या हातावर तुरी ठेवून बाहेर पडली होती. तुझे बोलणे आणि तुझा आवेश पाहून सरपंचाचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली होती. मला त्या वेळीच नाहीतर आतासुद्धा अभिमान वाटतो. पण मी कधी ते मोकळेपणाने मान्य केले नाही. तू जितकी चारित्र्यवान होती तितकाच मी विनाकारण संशयी होतो.

●●●

"काय वाटले तुम्हाला हे वाचून"

आम्ही एकमेकांच्या तोंडाकडे पाहत राहिलो. बाईच पुढे बोलत्या झाल्या.

इतकी वर्ष माझ्याही नकळत माझ्यापासून लपवून त्यांनी एक खजिना जमवून ठेवला होता.

सगळ्या माझ्या आठवणी साठवून ठेवलेल्या नष्ट करून पाहत होते. धडपड चालली होती मला विसरून जाण्याची. केविलवाणी धडपड ! वाटलं काय करतोय आपण ? इतकी वर्ष प्रतिकूल परिस्थितीतही जे जपले, सांभाळले ते गमावून काय मिळणार ? ते मिळवण्यासाठी कशा कशाचा त्याग करायचा ? मुलांना तिलांजली देवून अखेरीस काय मिळणार ?

पुरूष आणि स्त्री यामध्ये हाच फरक आहे. माणसाने मैत्री केली तर संसार टिकतो. कारण बाई घरातच राहते. पण बाईने मैत्रीचा नुसता विचार जरी केला तरी संसार उध्वस्त होतो. बाई घराबाहेर पडली रे पडली की तो संसारच उघड्यावर येतो. विचार करतेय की सगळ्या घटनांना तिलांजली देवून शेवटी काय अस मोठसं आपण मिळवणार ? ते खरोखरीच तेवढं लायकीचं आहे का ? लायकीचं असलं तरी अत्यावश्यक आहे का ? समजा ते नाहीच मिळालं तर त्याने काही अडणार आहे का ? दादा खंबीरपणे ऐकत होते. वेटर चहा ठेवून निघून गेला होता.

"मी काय बोलतेय हे बहुधा तुमच्या लक्षात आलं असेलच. बरं आपण जे मिळवू इच्छितो ते कशाच्या जोरावर ? कशा कशाची किंमत आपल्याला मोजावी लागणार ? नुसता विचार केला तरी मन शहारते अंगावर काटे येतात. माझा संसार तुमचा संसार. केवळ तुमच्या नावावर मुली बायका नाटकासाठी मिळतात. ते सर्व धुळीला मिळणार असं नाही तुम्हाला वाटत ? इतक्या दिवसांची पुण्याई पाण्यात जाणार. हे सगळं करण्यापेक्षा मला वाटतं..."

बाई थांबल्या. दादांकडे पाहिलं. दादांचा चेहरा उतरला आहे का ? त्यांनी शेखरकडे पाहिलं. शेखरने नजरेनेच होकार भरला. मूक संमती. त्यांनी पुढे बोलावे म्हणून प्रोत्साहन. पण.. बाई निघून गेल्या !

●●●

"आता अगदी नाईलाज आहे म्हणून सांगतो. माझ्या बायकोशिवाय ही गोष्ट कोणाला सांगितली नाही. तुम्ही सुद्धा एक दोनदा विचारले होते पण मी सांगणे टाळले होते. कारण तत्त्व म्हणून मी कोणाही मुली बद्दल बोलत नाही. कारण शेवटी आपल्यालाही मुली आहेतच ना !

हो, मी दुर्गाबद्दलच बोलतो आहे. कमीतकमी दहा बारा वर्षापूर्वीची गोष्ट आहे. जग आता तिला तिच्या माघारी दुर्गा बारड म्हणूनच ओळखते. तेव्हा ती दुर्गा पाटील होती आणि मी अजूनही तिला दुर्गा पाटीलच म्हणतो. अनेक लाळ गाळणाऱ्यांशी बोलणे तर सोडाच ती ढुंकूनही पाहत नाही. मग ते तिला छप्पन टिकली म्हणतात. पण या जगात ती टिकून आहे. आता तारुण्याचा भर ओसरला आहे. आता लग्नाचं वय उलटून गेलं आहे. तरीही कोणालाही भुरळ पाडेल अशी ती अजूनही आहे ! म्हातारी आई, व्यसनी बाप, बारड पहेलवानाच्या नादी लागून वाया गेलेला मोठा भाऊ... त्यावेळी ती नुकतीच वयात आली होती. मी सुद्धा फारसा मोठा नव्हतो. तिशी उलटली होती. पण पस्तीशी ओलांडली नव्हती. माझ्या नाटकात ती पहिल्यांदाच काम करत होती. एका रात्री तालमीनंतर तिला तिच्या घरी सोडून मी परतणार. तर ती

म्हणाली -

"घरात येणारच नाही का ?"

मी म्हणालो, "येतो ना, त्यात काय मोठेसे ?"

पण आत गेल्यावर लक्षात आले की त्या दिवशी तिच्या घरी कोणीही नव्हते. आईवडील गावाला गेले होते आणि भाऊ रात्री फार उशीरा कधीतरी घरी यायचा. मी थांबलो....फक्त पाणी पिण्यापुरता थांबलो. मी तिच्याच घरी जेवावे असा आग्रह तिने केला. तेवढ्या वेळात ती आधी सूचक बोलली, मग स्पष्टपणे बोलली. मी नाही म्हटल्यावर ती मागेच लागली. तिने विनवण्या केल्या. मी निघून जातोच असे लक्षात आल्यावर ती रडली, भांडली. मला शिव्याशाप दिले. शेवटी तर मला नामर्द-छक्का म्हणाली. पण ती जो जो माझ्या गळ्यात पडायला लागली तो तो मी माझ्या नकारात पक्का होत गेलो. जणू तिला नाकारणे हाच माझ्या पौरुषत्वाचा विजय होता."

"आश्चर्य आहे. विश्वास ठेवणे कठीण आहे."

"तुम्ही विश्वास दाखवला तरी मला काही फरक पडत नाही."

"पण इतके कसे काय तुम्ही पक्के होते त्यावेळी ?"

"नेमके सांगणे कठीण आहे. पण एकंदरच मला दुर्गाचे वागणे त्यावेळी आवडले नव्हते. आणि माझी इच्छाच झाली नाही.

मला नेमके सांगता येणार नाही पण मला दुर्गाचं वागणंच आवडलं नाही, आणि माझी इच्छाच झाली नाही. तसंही मला दोन गोष्टी फारच भयानक वाटतात....मला त्या अजिबात आवडत नाहीत आणि सहसा मी त्या करत नाही...करणार नाही."

"कोणत्या ?"

"पहिली गोष्ट म्हणजे कोणापुढे कपडे काढणे आणि....."

"आणि ?"

"आणि दुसरं म्हणजे कोणापुढे गुडघे टेकवणं !.... आता मला सांगा जिथे एक गोष्ट करणे सुद्धा मला अशक्य आहे. तिथे दोन्ही गोष्टी एकाच वेळी मी कशा काय करणार ?" शेखरच्या मांडीवर थाप मारत दादांनी हसण्याचा खकाणा उडवला !

"हा विनोदाचा भाग सोडला तरी गोष्ट शंभर टक्के सत्य आहे आणि ती लहान नक्कीच नाही...."

"पण मग ही गोष्ट -"

"कोणालाही माहीत नाही. तसे मी तिला सांगितलेच होते. आणि आम्ही दोघांनीही ते पाळले."

"पण मग बारड पहेलवान...."

"त्याची मैत्री अगदी इतक्यातली. म्हंजे या पाच वर्षातली आहे. मी तुला किमान दहा वर्षापूर्वीची घटना सांगितली. पण का कोण जाणे इतके मात्र नक्की की रस्त्यात कुठेही आमची भेट झाली तर पहेलवान त्यांची गाडी थांबवतात, ख्याली खुशाली विचारतात अन् नमस्कार करून मगच पुढे जातात !"

"अस्सं !......"

"आज मला दुर्गाच्या वागण्याचा उलगडा झाला !"

दादा केवळ हसले.

"पण दादा इतके जर तुम्ही पक्के आहात तर मग बाईच्या बाबतीतच मग तुम्ही का असे वागता आहात ?"

"बरोबर ! हाच प्रश्न तर मलाही पडतो.... यावर अनेक गोष्टी लक्षात येतात. दोन्ही घटनांमधे जरी मीच आहे. तरीही पूर्वीचा मी आणि आताचा मी यात बराच फरक पडलेला आहे."

"कोणता ?"

"वयाचा ! दुर्गाच्या वेळी मी साधारण तीस ते पस्तीस वर्षांचा होतो. त्यावेळी दुर्गासारख्या मुलीला नाकारणे यातही कुठेतरी मर्दुमकी गाजविण्याचे सुप्त समाधान असू शकेल. आता माझे वय पंचेचाळीसला पोहचते आहे. याही वयात आपल्यावर कोणी स्त्री जीव टाकते आहे, ही गोष्ट मला सुखवणारी आहे."

"तुम्ही फार छन आणि कठोर परीक्षण करत आहात." - शेखर

"दुसरे असे की, दुर्गा आणि बाईच्या स्वभावात जमीन अस्मानाचा फरक आहे. दुर्गा एकदम अंगावर आली. एक शरीर सोडलं तर दुर्गामध्ये तसं आवडण्यालायक काहीही नव्हते."

"कां ? तिचं तुमच्यावरील एकतर्फी प्रेम, तिची निष्ठा.... ती स्वतः भलेही तुम्हांला शिव्या देईल. पण तिच्यासमोर तुमच्या बद्दल कोणी जराही वाकडं बोलायची काय बिशाद ! जीभ हासडून ती हातात देईल !"

"तेच तर ! यासाठीच मी तिला मानतो. तिचं सगळं उंडारणं माफ करतो."

"आण बाई...."

"बाई दुर्गाच्या अगदी उलट आहेत. बाईमधले अनेक गुण माझ्या लक्षात आहेत. सर्वात पहिली गोष्ट म्हणजे त्या स्त्री आहेत. स्त्रीत्वाचे अनेक सद्‌गुण त्यांच्यात आहेत. त्यांच्यात अफाट सहनशक्ती आहे. त्या प्रेमळ आहेत, त्यांच्यात समर्पण आहे, त्या दुसऱ्याचा अधिक विचार करतात, समोरच्याचं चुकलं तरी त्याला माफ करतात. त्या कोणत्याही परिस्थितीशी चटकन जुळवून घेतात, याही वयात नवीन गोष्ट शिकण्याची धडपड असते. त्यांची गोष्ट कळली. त्या बोलल्या तेव्हा मी असा गोंधळलेलो होतो. त्या दुःखात, अडचणीत असल्याने साहजिकच सहानुभूती त्यांच्या बाजूने गेली त्यात तुम्ही "ते" म्हटलं...."

"काय ?"

"तुम्हीच तर म्हणाले होते की तहानलेल्यास पाणी देणे, भुकेल्यास अन्न देणे हाच जर आला धर्म शिकवतो, तर बाईंना साथ देण्यास काहीच हरकत नाही !"

"हे मी बोललो कबूल ! पण हेच तुमच्याही मनात नव्हते का ? की फक्त मी बोललो म्हणूनच तुम्ही तसा निर्णय घेतला का ?"

"मी कुठे तसे म्हणतो ? माझ्याही मनात तेच होतं. पण माणसाला असं वेगळं वागतांना एखाद्याच्या मानसिक आधाराची गरज असते. तो आधार मी तुमच्यात शोधला. आणि तुम्ही सुद्धा तो मला तावडतोब आणि भक्कम रीतीने दिला. पण तुम्ही अवसानघातकी निघाला. जी भूमिका तुम्ही आधी घेतली होती, ती शेवटपर्यंत निभावली नाही ! तुम्ही मध्येच, ऐन वेळेवर कच खाल्ली. आणि मला दिलेला पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे माझ्यावर काय परिणाम होईल याची तुम्ही फिकीरच केली नाही !"

"काय परिणाम झाला ?"

"इतर कोणाला दिसत नाही. पण माझे मला तर कळते ना ! तुमच्या साक्षीने तुमच्या भरवशावर मी जो डोलारा उभारला होता त्याच्या पायथ्यालाच तुम्ही सुरुंग लावला ! त्यामुळे मी सैरभैर झालो अन् कधी नव्हे तो माझे ताळतंत्रच बिघडले. माझा बॅलन्स गेला. इतक्या वर्षात मी कधी कोणावर आवाज सुद्धा चढवला नाही. पण आज सकाळी माझ्या लाडक्या मुलावर मी हात टाकला. अन तो सुद्धा साधासुधा नाही. तर एखाद्या जंगली जनावराप्रमाणे मी माझ्या सख्ख्या पोरावर तुटून पडलो. भर रस्त्यातून कोतवालीपासून ते घरापर्यंत त्याला वेताच्या काठीने झोडपत आणले !"

"काय सांगता !"

"हो, जणू माझ्यातला सैतानच जागृत झाला होता. इतका काय गुन्हा होता त्याचा ? दोष त्याचा नव्हताच. असलाच तर तो माझाच होता. पण मी स्वतःला पार हरवून बसलो होतो. मी मुलाला मारतच नव्हतो. मारत होतो मी साऱ्या जगाला... ज्यांनी ज्यांनी मला फसवले, मला लुबाडले, माझ्यातल्या माणुसकीचा, चांगुलपणाचा ज्यांनी गैरफायदा घेतला, मला रस्त्यावर आणले ! त्या मुलाच्या जागी मला मीच आणि मी मलाच मारत होतो...! तुम्हाला माहीत आहे, माझा मुलगा जवळपास माझ्यासारखाच दिसतो. माझ्यातल्या मूर्ख, बावळट, अव्यवहारी, नाटकी,

अनुक्रमणिका

ढोंगी माणसावरचा सर्व राग मी माझ्या मुलावर काढला !

मला एक सांगा, गेलो असतो आम्ही दोन दिवस कुठे बाहेर, तर काय असे मोठे तुमच्या संस्कृतीचे नुकसान झाले असते ? आणि काय गप्पा मारता तुम्ही नैतिक-अनैतिकतेच्या ? मला तर उलट असेच वाटते की जो जितका जास्त नैतिकतेच्या गप्पा मारतो तो तितकाच अनैतिक असतो. आणि ही संस्कृती, नैतिकता या अशा गोष्टींची चाड फक्त आमच्याच माथी ? दरिद्री लोकांच्या पोटातल्या आगीत या गोष्टी जळून खाक होतात. तर श्रीमंत वर्ग पैशाच्या मस्तीत ह्या असल्या गोष्टी पायदळी तुडवतो."

मी 'आता काय ?' अशा अर्थाने दादांकडे पाहिले. दादा उठले.

"निघाले ?" मी.

"तर काय ?" म्हणत बेफिकीर हसले. मलाच वाटले. ह्या माणसाला कशाचेच काही वाटत नाही ?

"काय निघाले घरी ?"

"हां तर !"

"काहीही झाले नाही ?"

"काय झाले ? असे काय मोठे झाले ? त्यात काय ? अरे आपण एक दगड टाकून पाहिला. पाहिलं जमते काय ? ...जमलं तर जमलं, नाही तर नाही ! आहेच काय त्याचं मोठंसं ?"

दादा उठले. हात वर करून त्यांनी "आ" करून डोळ्याच्या कडांवर पाणी येईस्तोवर कडकडून जांभई दिली. हातांची, पाठीची, मानेची हाडे मोडली. आणि ते वळले सुद्धा !

कुठून बुद्धी झाली देव जाणे. पण पटकन् तोंडातून निघून गेलं,

"या सगळ्या प्रकरणावर मी एक नाटक लिहितो. आपण करूया ते. तुम्ही हिरो अन् डायरेक्टर, मी रायटर-प्रोड्यूसर, काय ?"

"नाटक"

दादांना ब्रेक लागले. अपेक्षेप्रमाणेच. दादा तिथेच थांबले आणि म्हणाले -

"काय नाटक ?"

काय म्हटलं ? तू काय म्हटलं ?

नाटक करा ?....

विसरा आता ते नाटक नी फाटक !

काहीतरी एक सांगा. एकतर चणे खायला सांगा नाही तर, पुंगी वाजवायला सांगा. तुम्ही आधी चणे देता अन् ते तोंडात टाकल्यावर हातात पुंगी देता अन् म्हणता 'आता वाजवा !' असं कसं जमेल दोन्ही एकाच वेळी ? कसं जमेल ? काही तरी एक सांगा.

"तुम्ही लोक काय लिहिणार अन् काय सादर करणार फतरं ? हे, हे जे तू पाहिलं ना ते आहे जीवन. ते आणू शकणार का तू स्टेजवर."

"मग तुम्ही लिहा अन् सादर करा."

"मी आणि नाटक. शक्यच नाही."

"इतक्यात तरी नाही."

"असं तुम्ही नेहमीच म्हणता."

"नेहमीचं वेगळं अन् हे वेगळं. खरं सांगू, तुला नाटक, कलावंताचं मनोविश्व वगैरे कशाशी खातात काहीच कळत नाही. मी नेहमी म्हणत असे ना, की मला फक्त एक साथीदार द्या. मला समजून घेणारा सांभाळून घेणारा आणि मग पहा."

"त्याचं इथे काय ?"

"तो मित्र आयुष्यात पहिल्यांदा मिळाला होता. या बाईच्या रूपात ! कळलं ? आता तीच निघून गेल्यावर नाटकाचा विचारही करवत नाही."

"का ? आश्चर्यच आहे, कमाल आहे."

"तेच, तेच म्हणतोय, ना मी, की तुम्ही लोकं मूर्ख आहात. नाटक सिनेमा ह्या सांघिक कलाकृती आहेत ना. राजकपूर, नर्गीस, राज शंकर जयकिशन, शंकर जयकिशन

शैलेन्द्र, राज मुकेश या जोड्या माहीत आहेत ना ? बाई सोबत राहिल्या असल्या तर कदाचित मी 'एक शून्य बाजीराव' हातात घेतलं असतं. एखाद्या वेळी 'तुघलका'ला सुद्धा हात लावला असता. काय मिळालं रे तुम्हा लोकांना अशा काड्या करून."

"मी काय केलं ?"

"मला या ट्रिपचं विशेष असं काही वाटत नाही. ही ट्रिप काय झाली तर झाली अन् नाही तं नाही. हं पण नाटकाचं मात्र वाटतं, बरंच वाटतं.... म्हणजे असं की, समजा बाई जर माझ्या सोबत माझ्या टीममध्ये असत्या तर बरंच काही मी करू शकलो असतो. उदा - एक शून्य बाजीराव किंवा अशीच काही दर्जेदार पण प्रचंड नाटके- ज्यांना हात लावण्याची सहसा आपल्यासारखे कोणी हिंमत करणार नाही. म्हणूनच मी नेहमी म्हणतो की, एक जण फक्त एकजण हवा असतो कलावंताला समजून साथ द्यायला. मग पहा even we can, rather I can create wonders ! ही बाई तशी वाटली होती, नाटकासाठी जीव ओवाळून टाकणारी. अरे, इतक्या दिवसात मला तिची, तिच्या सहवासाची सवय झाली होती रे. तुम्ही सगळ्यांनी मिळून तोडलं तिला माझ्यापासून आणि आता वर म्हणताय की नाटक करता ? कसं शक्य आहे सांग ना ? निदान इतक्यात तरी अशक्यच आहे." म्हणत दादा तिथून निघून गेले. मी सुन्न होऊन बसून राहिलो.

"तिकडे चहात माशी पडली ना !" - वेटर म्हणाला.

निवलेल्या चहावर बारीक चुन्यांची लालजर्द पातळ साय जमली होती. आणि नुकत्याच कपात पडलेल्या माशीच्या तडफडाटानं साय कडेकडेने फाटत होती..

शेखरची तंद्री भंगली. कपात बोट बुडवून त्याने हलकेच माशीला खालून वर उचलले. आणि ते बोट सनमायकाच्या टेबलावर टेकवून जरा पुसले. माशी टेबलावर उतरताच मात्र तो ते बोट वारंवार टेबलावर, पँटवर रगडत राहिला.

चहात चिंब भिजलेली माशी गांगरली होती. मागचे दोन पाय तिच्या रेषाळ पण चिकट पंखांवरून वारंवार फिरवून ती स्वतःला स्वच्छ ठेवू पाहात होती ! त्याचवेळी उरलेल्या चारही पायांचा नेट लावून ती आहे त्या स्थितीतून निसटण्याकडे केविलवाणी धडपडत होती. गुळगुळीत टेबलावरून ओलसर चिकट पायांनी चिकाटीने सरपटताना माशीच्या मागोमाग एक बारिकसा पट्टा उमटत होता.

सरपटत, खुरडत सुटकेसाठी धडपडणाऱ्या माशीकडे शेखर एकटक पाहत होता. जीव घड्याळातील लंबकासारखा लोंबकळत होता. शेखरने पेल्यात बोटं बुडवून बोटांवरून निथळणारा पाण्याचा थेंब माशीवर धरला. या पाण्याच्या थेंबाने ही धुतली जाऊन स्वच्छ होणार, हिची सुटका होणार की पाण्यात बुडून ही मरणार ?

कुठेतरी शेखर माशीच्या जागी स्वतःची तडफड पाहात होता. त्याच्या मनात श्यामचे वाक्य घोळत होते - रॉंग साईडवरून राईट साईडला जाता येत नाही.

●●●

बाई रिक्षावाल्यापुढे उभ्या राहिल्या...

"चला, बसा बाई" - रिक्षेवाला म्हणाला,

"कुठे जायचं बाई ?"

कुठे जायचं ?..... कोणता पत्ता सांगायचा. कोणाच्या घरी जायचं ? आपलं घर, कुठे उरलं ते आता ? ते फक्त बाबा आणि मुलींच राहील.

"घर तेच आहे नं बाई, गणपती मंदीराजवळचं ?"

: अरेच्या ! हा सुद्धा ओळखतो वाटतं आपल्याला !

मान हलवून बाई रिक्षात येवून बसल्या. रस्ताभर रिक्षेवाला काहीतरी बडबड करत होता. बाईंपर्यंत ते काहीही पोचलं नाही. रिक्षा गल्लीत शिरताच आपोआपच बाईंच्या शरीराची जुडी झाली, दोन्ही खांद्यावरून पदर घट्ट लपेटून, मान जास्तीत जास्त खाली लववून त्या आक्रसून बसल्या. गल्लीने असंख्य डोळे उघडून आपल्यावर रोखले आहेत असे त्यांना वाटत होते. रिक्षा फाटकाशी थांबताच

ढोंगी माणसावरचा सर्व राग मी माझ्या मुलावर काढला !

मला एक सांगा, गेलो असतो आम्ही दोन दिवस कुठे बाहेर, तर काय असे मोठे तुमच्या संस्कृतीचे नुकसान झाले असते ? आणि काय गप्पा मारता तुम्ही नैतिक-अनैतिकतेच्या ? मला तर उलट असेच वाटते की जो जितका जास्त नैतिकतेच्या गप्पा मारतो तो तितकाच अनैतिक असतो. आणि ही संस्कृती, नैतिकता या अशा गोष्टींची चाड फक्त आमच्याच माथी ? दरिद्री लोकांच्या पोटातल्या आगीत या गोष्टी जळून खाक होतात. तर श्रीमंत वर्ग पैशाच्या मस्तीत ह्या असल्या गोष्टी पायदळी तुडवतो."

मी 'आता काय ?' अशा अर्थाने दादांकडे पाहिले. दादा उठले.

"निघाले ?" मी.

"तर काय ?" म्हणत बेफिकीर हसले. मलाच वाटले. ह्या माणसाला कशाचेच काही वाटत नाही ?

"काय निघाले घरी ?"

"हां तर !"

"काहीही झाले नाही ?"

"काय झाले ? असे काय मोठे झाले ? त्यात काय ? अरे आपण एक दगड टाकून पाहिला. पाहिलं जमते काय ? ...जमलं तर जमलं, नाही तर नाही ! आहेच काय त्याचं मोठंसं ?"

दादा उठले. हात वर करून त्यांनी "आ" करून डोळ्याच्या कडांवर पाणी येईस्तोवर कडकडून जांभई दिली. हातांची, पाठीची, मानेची हाडे मोडली. आणि ते वळले सुद्धा !

कुठून बुद्धी झाली देव जाणे. पण पटकन् तोंडातून निघून गेलं,

"या सगळ्या प्रकरणावर मी एक नाटक लिहितो. आपण करूया ते. तुम्ही हिरो अन् डायरेक्टर, मी रायटर-प्रोड्यूसर, काय ?"

"नाटक"

दादांना ब्रेक लागले. अपेक्षेप्रमाणेच. दादा तिथेच थांबले आणि म्हणाले -

"काय नाटक ?"

काय म्हटलं ? तू काय म्हटलं ?

नाटक करा ?....

विसरा आता ते नाटक नी फाटक !

काहीतरी एक सांगा. एकतर चणे खायला सांगा नाही तर, पुंगी वाजवायला सांगा. तुम्ही आधी चणे देता अन् ते तोंडात टाकल्यावर हातात पुंगी देता अन् म्हणता 'आता वाजवा !' असं कसं जमेल दोन्ही एकाच वेळी ? कसं जमेल ? काही तरी एक सांगा.

"तुम्ही लोक काय लिहिणार अन् काय सादर करणार फतरं ? हे, हे जे तू पाहिलं ना ते आहे जीवन. ते आणू शकणार का तू स्टेजवर."

"मग तुम्ही लिहा अन् सादर करा."

"मी आणि नाटक. शक्यच नाही."

"इतक्यात तरी नाही."

"असं तुम्ही नेहमीच म्हणता."

"नेहमीचं वेगळं अन् हे वेगळं. खरं सांगू, तुला नाटक, कलावंताचं मनोविश्व वगैरे कशाशी खातात काहीच कळत नाही. मी नेहमी म्हणत असे ना, की मला फक्त एक साथीदार द्या. मला समजून घेणारा सांभाळून घेणारा आणि मग पहा."

"त्याचं इथे काय ?"

"तो मित्र आयुष्यात पहिल्यांदा मिळाला होता. या बाईच्या रूपात ! कळलं ? आता तीच निघून गेल्यावर नाटकाचा विचारही करवत नाही."

"का ? आश्चर्यच आहे, कमाल आहे."

"तेच, तेच म्हणतोय, ना मी, की तुम्ही लोकं मूर्ख आहात. नाटक सिनेमा ह्या सांघिक कलाकृती आहेत ना. राजकपूर, नर्गीस, राज शंकर जयकिशन, शंकर जयकिशन

शैलेन्द्र, राज मुकेश या जोड्या माहीत आहेत ना ? बाई सोबत राहिल्या असत्या तर कदाचित मी 'एक शून्य बाजीराव' हातात घेतलं असतं. एखाद्या वेळी 'तुघलका'ला सुद्धा हात लावला असता. काय मिळालं रे तुम्हा लोकांना अशा काड्या करून."

"मी काय केलं ?"

"मला या ट्रिपचं विशेष असं काही वाटत नाही. ही ट्रिप काय झाली तर झाली अन् नाही तं नाही. हं पण नाटकाचं मात्र वाटतं, बरंच वाटतं.... म्हणजे असं की, समजा बाई जर माझ्या सोबत माझ्या टीममध्ये असत्या तर बरंच काही मी करू शकलो असतो. उदा - एक शून्य बाजीराव किंवा अशीच काही दर्जेदार पण प्रचंड नाटके- ज्यांना हात लावण्याची सहसा आपल्यासारखे कोणी हिंमत करणार नाही. म्हणूनच मी नेहमी म्हणतो की, एक जण फक्त एकजण हवा असतो कलावंताला समजून साथ द्यायला. मग पहा even we can, rather I can create wonders ! ही बाई तशी वाटली होती, नाटकासाठी जीव ओवाळून टाकणारी. अरे, इतक्या दिवसात मला तिची, तिच्या सहवासाची सवय झाली होती रे. तुम्ही सगळ्यांनी मिळून तोडलं तिला माझ्यापासून आणि आता वर म्हणताय की नाटक करता ? कसं शक्य आहे सांग ना ? निदान इतक्यात तरी अशक्यच आहे." म्हणत दादा तिथून निघून गेले. मी सुन्न होऊन बसून राहिलो.

"तिकडे चहात माशी पडली ना !" - वेटर म्हणाला.

निवलेल्या चहावर बारीक चुन्यांची लालजर्द पातळ साय जमली होती. आणि नुकत्याच कपात पडलेल्या माशीच्या तडफडाटानं साय कडेकडेने फाटत होती.

शेखरची तंद्री भंगली. कपात बोट बुडवून त्याने हलकेच माशीला खालून वर उचलले. आणि ते बोट सनमायकाच्या टेबलावर टेकवून जरा पुसले. माशी टेबलावर उतरताच मात्र तो ते बोट वारंवार टेबलावर, पँटवर रगडत राहिला.

चहात चिंब भिजलेली माशी गांगरली होती. मागचे दोन पाय तिच्या रेषाळ पण चिकट पंखांवरून वारंवार फिरवून ती स्वतःला स्वच्छ ठेवू पाहात होती ! त्याचवेळी उरलेल्या चारही पायांचा नेट लावून ती आहे त्या स्थितीतून निसटण्याकडे केविलवाणी धडपडत होती. गुळगुळीत टेबलावरून ओलसर चिकट पायांनी चिकाटीने सरपटताना माशीच्या मागोमाग एक बारीकसा पट्टा उमटत होता.

सरपटत, खुरडत सुटकेसाठी धडपडणाऱ्या माशीकडे शेखर एकटक पाहत होता. जीव घड्याळातील लंबकासारखा लोंबकळत होता. शेखरने पेल्यात बोटं बुडवून बोटांवरून निथळणारा पाण्याचा थेंब माशीवर धरला. या पाण्याच्या थेंबाने ही धुतली जाऊन स्वच्छ होणार, हिची सुटका होणार की पाण्यात बुडून ही मरणार ?

कुठेतरी शेखर माशीच्या जागी स्वतःची तडफड पाहात होता. त्याच्या मनात श्यामचे वाक्य घोळत होते - रॉंग साईडवरून राईट साईडला जाता येत नाही.

●●●

बाई रिक्षावाल्यापुढे उभ्या राहिल्या...

"चला, बसा बाई" - रिक्षेवाला म्हणाला,

"कुठे जायचं बाई ?"

कुठे जायचं ?..... कोणता पत्ता सांगायचा. कोणाच्या घरी जायचं ? आपलं घर, कुठे उरलं ते आता ? ते फक्त बाबा आणि मुलींचं राहील.

"घर तेच आहे नं बाई, गणपती मंदीराजवळचं ?"

: अरेच्चा ! हा सुद्धा ओळखतो वाटतं आपल्याला !

मान हलवून बाई रिक्षात येवून बसल्या. रस्ताभर रिक्षेवाला काहीतरी बडबड करत होता. बाईंपर्यंत ते काहीही पोचलं नाही. रिक्षा गल्लीत शिरताच आपोआपच बाईंच्या शरीराची जुडी झाली, दोन्ही खांद्यावरून पदर घट्ट लपेटून, मान जास्तीत जास्त खाली लववून त्या आक्रसून बसल्या. गल्लीने असंख्य डोळे उघडून आपल्यावर रोखले आहेत असे त्यांना वाटत होते. रिक्षा फाटकाशी थांबताच

त्यांनी घाईघाईने पर्स उघडून हातात येईल ती नोट रिक्षेवाल्याला दिली.

"बाई ! तुम्ही मला ओळखलं नाही, मी रघू ! तुमचं बरोबर आहे म्हणा, तुम्हाला इतके विद्यार्थी असतात, तुम्ही कोणाकोणाला ध्यानात ठेवणार ? पण माझ्यासाठी तर तुम्ही एकट्याच बाई होत्या ना ? त्यामुळे पैसे नको. एक कबूल करतो, त्यावेळी तुमचं ऐकलं असतं, भलत्या रस्त्याने गेलो नसतो, तर आज ही रिक्षा ओढण्याची पाळी आली नसती. एकदा का राँग साईडला गाडी टाकली की मग राईट साईडला येणं लवकर जमत नाही !.....चलतो बाई" म्हणून त्याने रिक्षा वळवली.

कितीही टाळले तरी बाईंचे लक्ष घरमालकाच्या बंगल्याकडे गेलेच. खिडक्यादारं लावनू तो सामसूम शांत उभा होता. बाईला बरं वाटलं. बंगला ओलांडून कधी एकदा घरात जाते असे बाईला झाले होते. अन् त्याचक्षणी पायातले सर्व त्राणच ओसरले ! नजरेपुढे दिसणारे घर अचानक दूर, परके जाणवले. कोरड्या पडलेल्या दात ओठांवर जीभ फिरवत बाई नेटाने घरात शिरल्या. पाहते तो काय ! बाईच्या गादीवर मध्यभागी बाब अन् त्यांच्या डावीकडे उषा व उजवीकडे निशा. त्यांच्या हातांवर डोके टेकवून त्यांना बिलगून निश्चिंतपणे झोपलेल्या. लहानीच्या तोंडात अंगठा. बाई दिसताच बाबा गादीवरून उठले अन् चोरासारखे उभे राहिले. आई दिसताच लहानीने तोंडातला अंगठा काढून फ्रॉकला पुसला. मुली पुन्हा त्यांच्या दोन्ही बाजूला उभ्या. एखादे भूत दिसावे तसे भयचकित भाव मुलींच्या चेहऱ्यावर. बाबा मात्र एकदम सावरले. मोठीचे लांबसडक केस बाबांच्या जखमेने बरबटलेले पाहून बाईंच्या पोटात एकदमच ढवळून आले. तोंडावर हात ठेवत त्या न्हाणी घराकडे गेल्या. घशात बोटं घालू घालू त्यांनी उलटी काढली. थंड पाण्याने चेहरा धुवून पदराला पुसत त्या बाहेर आल्या...

डाळिंबाच्या झाडाशी तारेवर टांगलेल्या बंद पिंजऱ्यावर मिठ्ठी येवून बसली होती अन् बोलावत होती.

"बाई ! बाऽई !!"

ओळखीचा आवाज ऐकू येताच दोन्ही मुली मागच्या अंगणात धावतच आल्या. आणि टाळ्या पिटून ओरडायला लागल्या.

"मिठ्ठू आला ! मिठ्ठू आला !"

"आई मी तुला म्हणत नव्हती, पिंजऱ्याची सवय झालेल्या मिठ्ठूला बाहेरच्या मोकळ्या वातावरणात जगणं जमणार नाही ! पहा आला की नाही तो परत ?"

बाईंनी पिंजऱ्याचे फाटक उघडले. तोवर मिठ्ठीने चोचीने पट्टी घट्ट पकडून तोल सांभाळला होता. पटकन् उलटी होत ती सटकन् आत गेली अन् जीव भांड्यात पडल्यासारखी बोलायला लागली.

तोवर मिठ्ठू आला म्हणून मोठ्या मुलीने टेपवर त्याचे गाणे लावले होते.

चैनसे हमको कभी आपने जीने ना दिया... काश न होती अपनी जुदाई मौतही आ जाती !

नेहमीच्या ओळी येताच मिठ्ठी उद्‌गारली,

"चिट्टक !"

कधी नव्हे ते बाईंना चाळ्यांमधे व नाकात गरम गरम जाणवले. बाईंच्या घशातल्या, नाकातल्या वाफा डोळ्यात पोचल्या, चुरचुरणारे डोळे कधी पाझरायला लागले ते कळलेच नाही.

"आई, काय झालं तुला ?"

"काही नाही,"

डोळे निपटत बाई म्हणाल्या तर खरं, पण स्वर घशातून अडखळत घोगरा आला.

घसा खाकरून आवंढा गिळत बाईंनी मान वळवली आणि त्या पिंजऱ्यासारख्या भासणाऱ्या झोपडीत शिरल्या.

त्यांनी स्वतःच दार लावून घेतले.

■ ■ ■

।। सहा कविता ।।

अनंत अमदावादकर

१. निमूट पुढे जा

इथून आता निमूट पुढे जा
मागे वळून पाहू नकोस
तुझी पहिली सर जिथे कोसळली होती
तिथे आता वाळवंट झाले आहे.
तुलाच ओलांडता येणार नाहीत
तुझ्या पावलांच्या ठशांचे खळगे झालेले.

पुढे पडणारे प्रत्येक पाऊल
नवेच असते नव्या वाटेवर
तर मग वठलेल्या दिवसांच्या
पानगळीत गुंतून पडू नकोस.

सायंकाळपावेतो फार तर
तू त्या वळणापर्यंत पोचशील
तिथे केव्हापासून तिष्ठत असलेले आकाश
तू तिथवर जाईतो बरेच पुढे गेलेले असेल
तेव्हा विसंबू नकोस.

तोवर भेटलाच कुणी एखादा परतीचा प्रवासी
तर तेवढीच रात्रीची सोबत
नाहीतर, एकटेपणाची सवय आहेच तुला तशी झालेली

२. पूर्वजांच्या जखमा

पूर्वजांच्या जखमा अजूनही झिरपताहेत
शतकांपासून ऐकू येतायत त्यांचे समयोचित हुंदके
रक्ताच्या पेशींचे अपेशीपण जोपासत
स्तंभित चेहऱ्याचे आम्ही निर्लज्जपणे
पाहतोच आहोत आरशात स्वतःचीच जीवंत झालेली थडगी-
आम्ही आपले सांगाड्यानिशी फक्त सोंगाडे

ऋतूच्या ग्रीष्मावतारी प्रकर्षात
उन्हावर रंगाची पाखर घालणारा गुलमोहर विझतांना
एखादा स्वसंरक्षक तर्क सुटू दिला तर
त्वचेला पडलेल्या भेगा मोजता येतात
पण मोजता मोजताच फाटून जातात डोळे
आणि अंधारबंद पापणीत नुसताच ऐकायला येतो
आत्म्याची पालवी खुडल्याचा आवाज.

3. कहर

उगवल्यापासून क्षणाक्षणाला अस्तापावेतो
वेगळा असतो सूर्य आपल्यासाठी

असाध्य आयुष्याच्या कुठल्याही क्षणी
बंदोबस्तात चाललेले श्वास
आणि जखमी रक्त यांना कुठलेच नसते आश्वासन
आणि तरीही गोठलेले रक्त
चाचपू पाहते ओळखीचा ठावठिकाणा
आणि कालवश झालेल्या शब्दांचे अर्थ

शिशिराशी युक्तिवाद करता करता
निघून जातात बहर
कहर होतो बहराचे अर्थ समजून घेताना.

४. कविता

फांद्याफांद्यावर स्तब्ध हे पक्षी
केव्हा होतील स्वरसजीव
यांच्या शब्दांचा ऋतू कोणता ?
कोणत्या प्रायश्चित्तात यांचे पंख फांद्या झाले आहेत
वारा पडण्यापूर्वी यांचे पंख ऋतूमान होवोत

५. तुमचा आत्मा

तुमचा आत्मा तुमच्याजवळ आहे
याची तुम्हाला खात्री आहे काय ?
मनाचे लाचार बदचलन अस्तित्व
म्हणजे नसतो आत्मा हे तर तुम्हाला ठाऊकच असेल
मी तुम्हाला विचारतो आहे कारण
तुम्ही माझे मित्र लागता
किंवा तुमचा आकार आहे माणसासारखा
किंवा तुम्ही अजुनही माणुसकीबद्दल कळकळीने बोलता
म्हणून वगैरे
तर तुमच्या आत्म्याची, अथवा अस्तित्वाची म्हणा हवं तर
तुम्ही झडती घ्या एकदा तरी दिवसातून
निदान झोपण्यापूर्वी डायरीत नमूद करा
तुमच्या असतेपणाचे परसेंटेज
काही खात्री नाही आजकाल कुणाची कशाची
तुमचा आत्मा गेला असेल कुणाचे पायपोस हुंगायला
किंवा तुम्हीच घातला असेल त्याला किमाम किंवा
जाफरानी समजून
मालकाच्या पानात
किंवा साहित्यिक दंढारीत लचकत मुरडत गाऊन दाखवत
असेल
आकांतगर्भकविता किंवा कलात्मक शिताफीने श्रोत्यांवर
फेकत असेल आत्महत्यांवरचा क्रांतीकारी वैताग
किंवा असेही असू शकेल की
तो असेल आजारी आणि इस्पितळात दाखल
तुमच्या पोटावर मारलेली लाथ
त्याने स्वतःवर झेलली असेल

६. आमच्या परागंदा आत्म्यांना

उष्णता हरवून बसलेलं रक्तच गोठून येतं शब्दात
तेव्हा मला आत्मोद्धार अशक्य होतो
आणि माझ्या शिडातून फडफडत असते
अंधाराची कातील आपुलकी

बिकटच वाटत जाते जगणे
जेव्हा प्रत्यय पुसून टाकणाऱ्या मूल्यांचे
विनाशी हात फिरतात माझ्या नेणिवेतून

मला कळत नाही
युगांच्या संकलित अंधारात कोसळताना
कसे उभारावे इच्छांचे सेतू

"बोरी बाभळी उगाच जगती" म्हणण्याचा
पोचत नाही अधिकार
सुगंधासाठी चंदनावर घाव घालणाऱ्यांना
आणि तुम्ही अशा गोष्टींना जेव्हा डोलावता माना
तेव्हा वेदनेशी डोळा भिडवू शकत नाही
तुम्ही पढवलेला निधडा शब्द
तो फक्त माझ्या चुथडा झालेल्या मेंदूची
राखण करीत असतो

जेव्हा प्रखर होता देव्हारा मला ईश्वरा,
तेव्हा चालत होते पढवलेले पाय तुझाच रस्ता
आणि मानीत होतो
आयुष्यातील विस्कळित घटकांना कावेबाज लंपटतेने
अर्थपूर्ण करणारे मतलबी संस्कार
ईश्वरा,
जेव्हा मी पाहतो तुझ्या मूर्तीइतकेच थबकलेले
माणसांचे चेहरे आणि त्यांचे निचेष्ट ओठ
दगडी श्रद्धेने भ्रमाच्या जबड्यात कोलमडून पडलेली माणसे
करीत आहेत नवस तुला तुझ्यादेखत
हे मी पाहतो आणि ईश्वरा
मी तुला प्रखर होतोय

माणसांनो
मानवी चेहरे पांघरलेल्या वासनांनो
तुमच्यातला माणूस हरवल्याबद्दल मी अस्वस्थ आहे
तुमच्या हद्दपारीबद्दल तुम्ही
बेचैन का नाही ?

कसे सहन करू शकता तुम्ही
केस्तुडासारखे उगवलेले नेते

तुमच्यावर सुजेसारखे पसरलेले गांधील राजकारण
आणि त्यांचे इंद्रजाल ?
कुणीतरी तुम्हाला जबरदस्त भयकथा ऐकवली पाहिजे
किंवा यातना शिबिरातील किंकाळयांची टेप
वास्तवतेच्या सामुहिक बलात्कारात
आज तुम्ही सुरक्षित असाल तर
निश्चित समजा की तुम्ही गुन्हेगार आहात.
मित्रहो
माणसातल्या निलंबित निसर्गाला स्मरून
प्रार्थना करा "आमच्या परागंदा आत्म्यांना
लवकर भेटोत आपापली शरीरं"

।। पाच कविता ।।

◗ सुखदेव ढाणके

१. अतीताच्या आरशात...

अतीताच्या आरशात
वर्तमान काळेनिळे
फोलकटात हेतूंच्या
काय सापडे निराळे.

जरठल्या संवेदना
भाव जाहले प्रस्तर
आपणच आतडीचे
किती ताणावे अस्तर.

केले अस्थिंचे इंधन
वर शेकला जिव्हाळा
तरी वंचनेची तांत
घट्ट आवळते गळा

२. दुपार

झाली उन्हाची कडक सुपारी
चघळीत पडली घरे उताणी
टेकाडाच्या टकलावरती
दुपार टाकी दाहक गुळणी

आमाळाची धुपे गोवरी
रान टाकते त्यात काटक्या
गाय हडकुळी अंग गुंतवी
झाडांच्या छायेत फाटक्या

म्हैस खुपसते अंग आपले
डोहावरची फाटे मलमल
पैलथडीला लव्हाळीतुनी
घुंगुरपाणी करते कलकल
घाटाखाली वाट उतरते
खडक नागडा पाहुन बिचकत
धुणी धुण्याचा दगड कोडगा
तिला खुणावी डोळा मिचकत

वावटळीची दीर्घ जांभई
सताड भव्य तोंड फाडुनी
गिळते पाला दरी भयाण
आसपासचा ओरबाडुनी

दिवस पिवळ्या पानमिसाने
हळूच गळतो मातीमध्ये

खुडल्या डोळयांमधील आता
धार गोठली भेगांमध्ये.

माझा मी कानोसा
आता सर्वनाशा / ग्वाही नको.

३. अभंग - एक

साध्या गणिताचा
जमेचना मेळ
हातचा गहाळ / सापडेना.
गुणिले भागिले
वजा नि बेरीज
शुन्याच्या खेरीज / नुरे काही.
जरी तोंडपाठ
आहे तुझा पाढा
प्रमेयाचा तिढा / सुटेचना.

४. अभंग - दोन

तुडुंबले डोळे
डुंबले आकाश
अवघ्या विश्वास / बुडविन.
घेणारही नाही

५. अभंग - चार

तोलू कसे तुझे
अतुल आकाश
उलू जाय श्वास / अळूमाळू.
जीव तरी कैसा
सावरीच्या वाणी
आहे तरंगोनी / अधांतरी.
तूच ना घातले
उन्हाचे विसण
विजेचे वसन / नेसविले ?



॥ ॲसिडिटी :
काही अस्वस्थ संदर्भ ॥

▶ अजीम नवाज राही

ओरखडतात ॲसिडिटीची नखे
रोज सकाळचा प्रसन्न चेहरा
घालतो दिवसभर शरीरात थैमान
अस्वस्थतेचा बेताल हत्ती
घुसतो कधी हत्ती मेंदूत
घेतो जिभेचा ताबा
अशावेळी संयमी माणसेही
घालू शकत नाहीत रागावर आवर

अन् लहानसहान कारणावरून
तडकतात जिवापाड जपलेले संबंधांचे आरसे

शिरते झेंटॅक्समुंगी ॲसिडिटीच्या मस्तकात
पडतो निपचित क्षणात
देहभर धुमाकूळ घालणारा हत्ती

ॲसिडिटी वाढली की, करावासा वाटतो
बडबडणाऱ्या जिवाभावाच्या मित्राचा मर्डर

ॲसिडिटी आवळते आतल्या रसिकाचा गळा
एखादी अस्सल कलाकृती बघूनही
येत नाही अंगावर सर्रकन् काटा

ॲसिडिटीप्रवाह शरीरनदीत वाहू लागला
की, गढूळतात नितळ डोळे
करपते नजरेसमोरची हिरवाई
फाडतो कानपडदे पाखरांचा किलबिलाट
उपटते ती मळमळीच्या हातांनी
दिवसाला आलेले उत्साहांकुर

गाजवते भयाणतेवर सत्ता
नियोजनसुपारीची सालपटे
उडवितो बेचैनीचा आडकित्ता

बांधते पेटत्या सिगरेटच्या टोकावर घरटे
शोधते दाढेखालच्या तंबाखूत वास्तव्य
घेते चहाच्या कपातून उसळी बिनधास्त

कधी कधी असेही घडते
असतो लांबच्या प्रवासात आपण
गिरणीचे धोक्याचे सायरन वाजावे
तशी खणाणते मेंदूत घंटा
घरीच विसरून राहतात झेंटॅक्समुंग्या
अन् मनसोक्त हुंदळतत देहभर बेचैन हत्ती

ती करते दचकन् जागे रात्रीअपरात्री
आठवतात विनाकारण,
दिवसभरातले अपमानास्पद प्रसंग
एखाद्या जिवलगाचे टोचून बोलणे
सरकतच नाही पुढे घड्याळकाटा

श्वासनळीतून येणाऱ्या आंबट पाण्याच्या धारा
करतात बेचव, मित्राने आवडीने
ऑर्डर केलेली चिकनहंडी
होतात चिडीचूप पोटात ओरडणारे कावळे

हरी, वरी, करीच्या गोंधळात
गवसतो तिला शरीरात शिरण्याचा रस्ता

ॲसिडिटीच्या मुठीने मेंदू आवळला
की, हुसकावून द्यावासा वाटतो
आग्रहाने थांबवलेला पाहुणा

झाडांचे वठणे, बहरणे
झऱ्यांचे रुणझुणणे
पाखरांचे क्षितिज कवेत घेणे
उठवत नाही अंगावर रोमांच
ॲसिडिटी वाढली
की, राहत नाही आपण कवीबिवी काही.



हिरवाईतला अखेरचा प्रवास

▸ छाया चितमपल्ली

आजवरच्या आयुष्यात मी मोजक्याच अंत्ययात्रा पाहिल्या. पण या सर्व सिमेंटच्या जंगलातल्या ! आता ही माधवराव पाटील (आजोबा) यांची हिरवाईचा स्पर्श असलेली नि हिरवाईतनंच वाटचाल करत जाणारी अंत्ययात्रा पाहिली नि मन गलबलून गेले. हे खरे 'अरण्यपुत्र' !

आजोबांची हिरवाईतली यात्रा सुरू झाली. गाडी हिरव्या रंगाची. त्यांचा शर्ट पण तसाच. गाडीला नाजुकशी रानफुलं लावली होती. त्यांच्या आवडत्या बिस्मिल्लाखानच्या शहनाईवादनाची धून हलक्या आवाजात वाजत होती. हळुहळू गाड्या जात होत्या. जिकडं पाहावं तिथं माणसांची गर्दी होती. आजोबांच्या प्रेमापोटी आजूबाजूच्या अनेक गावातनं लोक जमले होते. हळूहळू आजोबांनी लिहून ठेवलेल्या जागी पोचलो. खड्डा खणून झाला होता. आजोबांची आवडती धून नि पाखरांचा आवाज ! बास्स्, इतकंच होतं. शांतपणे सावलीत उभी राहून मी पाहत होते. आता आजोबा परत कधीच दिसणार नाहीत. नजरेने जरी मी हे विधी पाहत होते, तरीही मन कुठं मानायला तयार होतं ?

धाबेपौनीच्या वाड्यातील आजोबांचे जे पहिलं रूप मनावर ठसलं ते कायमचं !... ते म्हणजे बाबा - मी येणार, हा निरोप त्यांना पोचला की ते आमची वाट पाहत वाड्याबाहेरच्या कट्ट्यावर बसलेले असायचे. आम्ही गाडीतनं उतरतांना दिसलो की, जवळ यायचे. मोकळंढाकळं हसून स्वागत करायचे. त्यांच्यामागून आम्ही आत जायचो. नि मग त्यांच्या हिरवाईच्या गप्पात तासन्‌तास कसे संपायचे, कळायचं पण नाही.

मी अवघ्या दहा वर्षाची होते. तेव्हापासून आजोबांना पाहतेय. मग धाबेपौनीच्या वाड्याशी जे ऋणानुबंध घट्ट झाले, ते अजूनही कायम आहेत. 'हिरवाईतलं आजोळ' हा खास परिचय !.... हळूहळू वाड्यातील अमिता-यामू-भीमसेन-आशा-किशोरी-भारद्वाज.... यांच्याशी स्नेह जमून आला. या कोणत्याच नात्याला नाव नाही. नात्यापलीकडचं नातं अनुभवतेय हीच माझी खरी हिरवाईतली शिदोरी !..... आजी-आजोबा-दादा-काकू यांची माया तर वाड्यात मुक्काम ठोकूनच अनुभवावी अशीच आहे. हेच तर हिरवाईचं वरदान !....

आबी-मी-बाबा नवेगावबांध-तळ्याजवळ 'मनोली' बंगलीत राहत होतो. तेव्हा आठवड्यातनं दोन वेळा तरी सकाळी-सकाळी गरम-गरम नास्ता वाड्यातनं घरी यायचा. पहिला नास्ता आठवतो. ते लसणाच्या किंवा कांद्याच्या पातीचे आयते (दोसा) ! त्या आयत्यांना खाण्यापेक्षा त्यांची हिरव्या रंगाची छटा पाहण्यातच माझा वेळ जायचा. 'पकानभेदचे आयते' पण गरम यायचे. 'पकानभेद' ही खास वाघाची आवडती भाजी ! आंब्याच्या दिवसात पोतंभर आंबे यायचे. एक-एक आंब्याचा आकार

नारळाएवढा ! मी तर एका आंब्यातच गार व्हायची..... आंब्याचा रस खाण्यापेक्षाही तो ओंजळीत पकडून, सटकत असताना, त्याला पकडून खायची माझी आवळ्याखाली चांगलीच कसरत रंगलेली असायची. नि याला साक्षी पाखरांची दुनिया !....

असंच एकदा बाबा रानकुत्र्यांच्या अभ्यासासाठी नागझिरा इथं मुक्काम ठोकून होते. त्यांच्यासोबत तात्या (व्यंकटेश माडगूळकर) होते. माझी परीक्षा होती. म्हणून अजून आबी-मी नागझिरा इथं पोचलो नव्हतो. नागझिरा इथनं बाबा एका आठवड्याचा किराणा न्यायला घामाघूम होऊन यायचे. त्यांचा तो त्रस्त चेहरा मी अजूनही विसरले नाही. त्यांनी नेलेला किराणा त्यांचा स्वयंपाकी एक-दोन दिवसातच उडवून टाकायचा. नि परत बाबा संशोधन सोडून किराणा घ्यायला यायचे. एकदाची परीक्षा संपली नि आबी-मी निघालो. दोन महिन्यांचा रेशनबॉक्स आबीने तयार केला होता. माझ्या परीक्षेसोबत तिची पण परीक्षा होती. काही विसरायला नको. नाहीतर पळापळ झाली असती.

आबी-मी रात्री पोचलो. बाबा बाहेर आले. आम्ही सामानासह आत आलो. ते एक खूप जुनं नि खूप ऐसपैस रेस्टहाऊस होतं. रात्र तर होतीच. इथं वीज नाही म्हणून जी जागा दाखवली तिथं गाढ-गुडुप झोपी पण गेले.

पहाटेला पाखरांच्या आवाजानं जाग आली. उठून काय करायचं हा प्रश्न मला नव्हता. उलट उठून आजूबाजूला काय-काय आहे - हे पाहायची जिज्ञासा होती. उठून आधी आबीकडे गेले. ती अर्थातच स्वयंपाकघरात होती. आबी सतत गुंतून राहावी अशी खाशी तयारी बाबांनी करून ठेवली होती. चुलीला नमस्कार करून आबीनं चूल पेटवली. नास्त्याची तयारी सुरू झाली. बाबांनी दुरून तात्या कुठं राहतात ते दाखवलं नि म्हणाले - तात्यांना नास्त्यासाठी बोलवून आण. पडत्या फळाची आज्ञा मानून मी सुसाट पळत गेले. त्याबरोबर हिरवाईत पण हलचल झाली. रोज दोन पायाचे प्राणी चालत होते. पण आज ही पोर का पळतेय म्हणून पाखरं-वानरं पण आपलं खाणं सोडून मला पाहत होती. पण मला तर कधी एकदा तात्यांना भेटू असं झालं होतं. तात्या-मी चालत गप्पा करत घराकडं आलो. तोपर्यंत नास्ता तयार झाला होता. 'घोडं मेलं ओझ्यानं, नि शिंगरू मेलं येरझाऱ्यानं' अशी माझी गत महिनाभर होती.

मग मस्तपैकी चवदार नास्ता करून दिलखुश होऊन तात्या-बाबा आपापल्या कामगिरीवर गेले. मी पण आजूबाजूला काय-काय उचापती करत होते. अंगणात आंब्याच्या झाडाला टायर बांधला होता. त्या टायरमध्ये घुसून झुल्यात झुलत हिरवाई खालून-वर पाहण्यात मग्न झाले. इतक्यात आजोबा ट्रॅक्टरने आले. सोबत गडी होता. त्याच्या हातात दोन मोठ्या पिशव्या होत्या. एक-दोन केटल्या होत्या. हा जामानिमा घेऊन गडी आबीजवळ गेला. आजोबा आत येऊन बसले. पाठोपाठ तात्या-बाबा पण हाश् हुश्श्.... करत आले. तिघांनी एकमेकांना पाहिलं नि काय त्यांचे चेहरे प्रेमाने उजळले ते मलाच माहीत. कारण मीच काय ते लुडबुड करणारं शिंगरू, या प्रसंगाचे साक्षीदार होते.

नंतर मग नागझिऱ्याला आमचा मुक्काम असेपर्यंत आजोबा आठवड्यातनं दोन वेळा आम्हाला रानमेवा घेऊन यायचे. आम्ही सर्वजण नीट राहू शकलो. कारण आजोबा आमची काळजी घेत होते. आंबे-कलिंगड-खरबूज-भाजीपाला-दूध-दही याची कधीही कमतरता पडू दिली नाही. अगदी घरच्या शेतीतला तांदूळ नि इतर धान्य पण आणून द्यायचे. रिकाम्या हाताने कधी ते आले नाही. पिशवीभर नाही तर, पोत्यानंच द्यायची त्यांची सवय होती. कधी आजोबा एकटेच फटफटी घेऊन यायचे. कधी ट्रॅक्टर आणायचे. त्या हिरवाईत आजोबांची वाट पाहायची मला पण सवय लागली.

आजोबांचं देणं नि तात्या-बाबांची मेहनत याला वेग आला. आजोबा-तात्या-बाबा तिघंही आंब्याच्या फोडी

खात-खात हिरवाईच्या गप्पा करत हिरवाईत हरवून जायचे. आबी-मी पायरीवर बसून तिघांच्या गप्पा ऐकत राहायचो.

जसं मी एकटी प्रवास करू लागले, तसं मला आठवण आली की, धाबेपौनीला पोचायची. मनसोक्त राहूनच परतायची. वाड्यातील सर्व मंडळी मायाळू !.... म्हणून तर हिरवाईची पाऊलवाट मला सारखी खुणावत असते.

वाड्यात पोचण्याआधीच, आजोबा कट्ट्यावर बसून वाट पाहत आहेत, हे दृश्य नजरेपुढं राहायचं. मी पोचल्यावर माझं स्वागत करून आजोबा आपल्या दुनियेत हरवून जायचे. माझं खाणं झालं की, सगळ्यांशी गप्पा. नंतर आजोबा खाली असले तर आजोबांशी गप्पा. नाहीतर मी वरच्या त्यांच्या खोलीत जाऊन धडकायची. 'आजोबा, मी तुमच्या गप्पा ऐकायला आलीय...' असं म्हणायचं नि मोकळीढाकळी पोझ घेऊन समोर बसायचं. आता काही ही पोर हलणार नाही हे माझ्या पोझवरून त्यांना उमगायचं. नि ते आपल्या गप्पांचा अनमोल खजिना बाहेर काढायचे. या खजिन्यात अमिता-यामू-भीमसेन-किशोरी-भारद्वाज नि इतर अजून बरेच जण यायचे.

अमिता-यामिनी (यामू) या दोघी आजोबांच्या अतिशय लाडक्या नाती ! मला तर नेहमी दोघींचा हेवा वाटतो. अमिता-यामू दोघींना लहानपणापासून संगीत शिकवलं. नाट्यसंगीत-भजनं-शास्त्रीय संगीतात पारंगत केलं. कालांतराने त्यांची लग्नं झाली नि संसारातील जबाबदाऱ्यांमुळे संगीत मागे राहिल. तरीही संगीत त्यांच्या मनात मुरलेलं आहेच. ते कुठं त्यांना सोडून गेलं ?

आजोबा मग टेपरेकॉर्डर काढायचे. कॅसेटच्या संग्रहातील दोन-तीन कॅसेट वाजवायचे. त्या कॅसेटमध्ये अमिता-यामू यांच्या आवाजातले नाट्यसंगीत-भजनं रेकॉर्ड केलेले. आजोबांसोबत मी पण संगीत ऐकण्यात रंगून जायची. ऐकण्यासोबतच अमिता-यामूच्या खूप आठवणी सांगत. आजोबा म्हणायचे - 'अमिताला प्रॅक्टिसला बोलावलं का ती यायची. फार आज्ञाधारक ! पण यामूला बोलावलं की ती लवकर यायची नाही. पण एकदा का आलं की, दोघी रंगून जायच्या तासन्तास ! मी ऊठ म्हणल्याशिवाय दोघी उठायच्या नाही. खूप चांगला गाता गळा दोघींना आहे. आजोबांच्या बोलण्यातनं सतत दोघी नातींबद्दलचा अभिमान ओसंडून वाहत राहायचा. दादा नि भीमसेन यांच्या फोटोग्राफीच्या मेहनतीबद्दल तर किती बोलू नि किती नको असं त्यांना व्हायचं. किशोरी-भारद्वाज हे आजोबांचे पणतू ! त्यांच्यासोबत आजोबा रंगून जायचे.

शिकारीच्या काळातल्या खूप गमती आजोबा सांगायचे. या गमती ऐकताना खळखळून हसू यायचं. नि स्वतः आजोबा पण गडगडाटी हसून मोकळं व्हायचे. त्यांचं हसणं इतकं निर्मळ होतं ना, की लहान बाळाचं निरागस हसणंच मला नेहमी आठवतं. इतरही खूप आठवणींचा खजिना न संपणारा होता.

असंच आजोबांनी पक्क केलं की, जंगलात प्राण्यांचे पाण्यासाठी खूप हाल होतात. त्यामुळे त्यांना पाणी प्यायला झरी खोदायची. दोन-तीन महिने दाट जंगलातच राहिले. खोदकाम सुरू झालं. पाण्याचा झरा लागल्याशिवाय वाड्यात परतायचं नाही अशी प्रतिज्ञा करूनच ते बाहेर पडले होते. रात्रंदिवस एकच ध्यास लागला होता. सोबत एक-दोन गडी होते. सर्वांसाठी रोज जेवण वाड्यातनं यायचं. स्वतः आजोबा पण खोदकाम करायचे. आणि एक दिवस यश आलं. मोठ्ठी झरी लागली. त्याला 'जांभूळ झरी' हे नाव दिलं. कालांतराने त्याचं नाव 'माधवझरी' झालं. ही झरी परत परत तशीच भरून येते. आजोबांची हिरवाईतली साधना खऱ्या अर्थाने सफल झाली.

आजोबांनी आपल्या घराण्याच्या परंपरेला तडा दिला नि 'अग्निदहन' विधी ऐवजी त्यांचा 'दफनविधी' झाला. त्यांनी तसं आपलं इच्छापत्र यामूकडं दिलं होतं. खरंच अशा आजोबांची नात म्हणून यामू भाग्यवान आहे. हेवा वाटावा असे आजोबा तिला मिळाले. तिच्या हक्कातला

खारीचा वाटा मला पण लाभला याचा मला कायम अभिमान राहील.

माझ्यासाठी आजोबांची प्रत्येक भेट त्यांचे अनेक पैलू उलगडणारी होती. प्रत्येक भेटीत त्यांचा वेगळा पैलू लक्षात यायचा नि मी थक्क व्हायची. २००५ चा शेवटचा दिवस म्हणजे ३१ डिसेंबर ची रात्र. आजोबांबरोबर शेकोटीजवळ गप्पा रंगल्या होत्या. या गप्पात वाड्यातले आम्ही सर्वजण होतो. तसंच १ जानेवारी २००६ या नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी आजोबांजवळच होते. लगेच २ जानेवारी रोजी हिरवाईतला अजून एक अद्‌भुत सोहळा आजोबांसोबत रंगला. त्यादिवशी आजोबांसह वाड्यातल्या सर्वांचा सत्कार सोहळा पार पडला. कारण होतं 'पुस्तक प्रकाशनाचं ! भीमसेनच्या चित्रांचं मुखपृष्ठ असलेली बाबांची दोन पुस्तकं प्रकाशित झाली. आजोबांनी भाषण याही वयात बिना चष्म्यानं लिहिलं नि वाचलं. आजोबा खूप भावुक झाले होते. आजोबांचं खास वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या अंगातला हिरवागर्द शर्ट. हिरव्यागार शाईतले त्यांचे अक्षर नि पायात कधीही चप्पल त्यांनी घातली नाही. शहरात नागपूरला आमच्या घरी आजोबांचं कमी येणं व्हायचं. बाबा त्यांना खास कार्यक्रमासाठी बोलवत असत. पण शहरात आजोबा कधीच रमले नाहीत. कार्यक्रम संपला की आपल्या हिरवाईत निघून जायचे. आजोबांच्या हिरवाईवरचा जीव पाहून आम्ही पण कधी त्यांना राहायचा आग्रह केला नाही.

ज्या दिवशी आजोबांचा दफनविधी सुरू होता, मी झाडाखाली उभी होते. तेव्हा जाणवलं की, इतक्या कडकडीत उन्हातपण झाडातनं थेंब-थेंब पाणी पडत होतं. ज्याच्या अंगावर पाण्याचा थेंब पडायचा, तो थक्क होऊन वर झाडाकडं पाहायचा नि गप्प बसायचा. पाण्याचा थेंब कसा पडला हे आश्चर्य सर्वांसह मलाही होतं. सर्व आश्चर्य मनात ठेऊनच वाड्यात परतले.

आजीचा निरोप घेऊन आम्ही निघालो. परतताना गाडीत चर्चा झाली की, जेव्हा आजोबांचा दफनविधी सुरू होता तेव्हा पाण्याचे थेंब अंगावर पडत होते. तो विषय निघाला. दादाने बाबांना पण ही गोष्ट वाड्यात सांगितलेली. दादा म्हणाले, 'असं कधी झाडावरनं थेंब इतक्या प्रमाणावर पडत नाहीत. पण ही अघटित घटना घडली. आम्ही सर्वजण या थेंब पडण्याचे साक्षीदार होतो. समाधीच्या आजूबाजूलाच काय, पण सर्वत्र 'गरारी-मोह' जंगल आहे. तरीही हा सारा परिसरच 'गरारी जंगल' म्हणून ओळखला जातो. बारीक-बारीक पानांचं हे झाड असतं. पाण्याचे थेंब पडले ही सारी हिरवाईची किमयागारी ! आजोबांनी ज्या हिरवाईला जीव लावला, त्याच हिरवाईने त्यांना अशी आगळीवेगळी श्रद्धांजली वाहिली नि आजोबा तर 'हिरवाईचे बादशहा'! मग त्यांना त्यांच्या पद्धतीनेच झाडांनी पण थेंब वाहून आपला आदर व्यक्त केला.

बऱ्याच दिवसापासून वाड्यात एक मोर आहे. आजोबांचा मोरावर खूप जीव. जेव्हा आजोबा गेले तेव्हा हा मोर पण जो नाहीसा झाला तो सात दिवसांनीच परत आला.

अजून आजोबांचा एक जंगलात नेहमी सोबत करणारा 'मंगरू गोंड' पण आजोबांच्या निधनाची बातमी एकून खचून गेला. त्याच्यापेक्षा आजोबा वयाने लहान ! आपल्यापेक्षा आपला लहान सोबती सोडून गेला याचं दुःख त्याला अधिक झालं. त्याने तेव्हापासून अन्न-पाणी सोडून दिलं. तब्येत नरम-गरम आहे. जगण्याची अजिबात इच्छा नाही. आजोबांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकच व्यक्तीला आजोबा या जगात नसल्याचे दुःख आहे.

हिरवाईचा बादशहा आपल्यात येऊन मिसळला हा हिरवाईकरता सुखदायक योग ! पण आपलं काय, आपल्याला उणीव भासतच राहणार. प्रसिद्ध तत्वचिंतक थोरोचा भाऊ क्षयाने मरण पावला. तेव्हा आपल्या दैनंदिनीत थोरोने लिहिले की - 'मृत्यू ही त्याच्या देहस्वभावाची एक नैसर्गिक मागणी होती नि ती पूर्ण झाली.' - काही दिवसांनी

पुन्हा जेव्हा थोरो आपल्या भावाच्या समाधीपाशी गेला तेव्हा तिथे गवत उगवलेले नि त्यावर निळी फुले फुललेली त्याला दिसली. निसर्गाचे चक्र कोणत्याही सुख-दुःखमय भावनेच्या आहारी न जाता सदैव सुरू असते याचे ते बोलके प्रतीक होते.

आता आजोबा या जगात जरी शरीराने नाहीत तरी 'माधवझरी'च्या रूपाने अजरामर आहेत. झरीचं पाणी तर माझ्यासाठी नेहमीच तीर्थ आहे. वेगळंच मस्त उत्साह आणणारं गोड-चवदार-गार पाणी ! आजोबा आता त्यांच्या मनपसंद जागी चिरविश्रांती घेत सगळीकडे लक्ष ठेऊन आहेत. सोबतीला हिरवाई नि पाखराचं संगीत ! सर्वांनाच असा मृत्यू मिळत नाही. पण आजोबांना जे हवं ते सारं मिळालं.

आपण सचैल मनाने जेव्हा हिरवाईत जातो तेव्हा सारी हिरवाईपण आपल्याला निरखत असते. आपल्याला हिरवाईबद्दल जितकी जिज्ञासा असते, तितकीच जिज्ञासा हिरवाईला आपल्याबद्दल असते. इथल्या प्रत्येक वृक्षात देवता असते. जिथं जल असेल तिथं जलदेवता असते. या देवता आपल्याला आशिर्वाद देतात. आपण हिरवाईत जाऊन त्यांचे आशिर्वाद घेऊन परततो, रूक्ष व्यवहारी जगात, तेव्हा हे आशिर्वादच व्यवहारी जग सहन करायला शक्ती पुरवतात. आपली काही साधना आहे, म्हणूनच हिरवाईने मला स्वीकारलं आहे. हे सर्व आपल्याला हिरवाईच देत असते. आपण याचक !...

आजोबांवर वृक्ष, जलदेवता यांची कृपा-आशिर्वाद आहे. देवतांनी आजोबांचं रक्षण आयुष्यभर केलं. नि आताही समाधिस्थ झाल्यावर त्या, आजोबांचं रक्षण करताहेत हिरवाईचं मोठ्ठं वरदानच त्यांना लाभलं.

आता यापुढं कधी माधवझरीवर गेलं की हिरवाईत सामावलेले आजोबा दिसतील. दफनविधीनंतर २३ एप्रिल २००६ रोजी सकाळीच बाबांना दादानी फोनवर सांगितलं की, 'वाघ आजोबांच्या समाधीभोवती ३ प्रदक्षिणा मारून गेला.' एका बादशहाने दुसऱ्या बादशहाला दिलेली हिरवाईतली ही अनोखी सलामी !... या वाघाबद्दल अजून एक माहिती सांगितली की, त्याच्या पाऊलखुणा ट्रेसिंग केल्या तर आकार १५×१७ सें.मी. आहे. नि या मोजमापाचं पाऊल अजून तरी रेकॉर्डवर नाही असं फॉरेस्टवाल्यांनी सांगितलं.

कट्ट्यावर बसलेले आजोबा यापुढं कधी दिसणार नाही. पण ते सूक्ष्मातनं वावरत आपल्या सर्वांना पाहतच असणार...

■ ■ ■

वर्गणीदारांसाठी सूचना

१. 'युगवाणी'चे अंक मिळण्यासाठी वर्गणीदारच व्हावे हे उत्तम.
२. 'युगवाणी' हे त्रैमासिक स्वरूपात निघणार असून जुलै २००६ ते जून २००७ या वर्षातील चार अंकांची वर्गणी १०० रु. आहे.
३. वर्गणी फक्त मनीऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्टने ('विदर्भ साहित्य संघ' या नावाचा) स्वीकारण्यात येईल.
४. सध्या, वर्गणी फक्त एका वर्षाची स्वीकारण्यात येईल.
५. वर्षाच्या मधल्या अंकापासून वर्गणीदार झालेल्यांना आधीच्या अंकाच्या प्रती शिल्लक असल्यास पाठवणे शक्य होईल.
६. वर्गणी पाठविताना आपले नाव, संपूर्ण पत्ता, पिन कोड आणि फोन नंबरही कळवावा.

पत्ता : १. 'किताब', राऊतवाडी, अकोला - ४४४००५
२. विदर्भ साहित्य संघ, झाशीराणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४००१२.

अनुक्रमणिका

।। कथात्मसाहित्य ।।

▶ श्याम मनोहर

किती बोलू आणि किती नको, असे प्रत्येकाला कधी ना कधी होते. म्हणजे भाषा वापरायची इच्छा प्रत्येकाला कधी ना कधी होतेच. भाषा हा कथात्मसाहित्याचा महत्त्वाचा घटक आहे. दोन दिवसांपूर्वी पूर्णिमा झाली. चांदणे पाहाणे हा आनंद असतो. चांदण्याचे वर्णन आपण करतो. आता ऋतूबदल होतोय. हिवाळा संपतोय, उन्हाळ्याची चाहूल लागतेय. ऋतूबदलाबद्दल आपण बोलतोय. पावसाचे, महापुराचे, पावसात भिजण्याचे, पावसाळा असून पाऊस नसला तर त्या नसण्याचे, कडक उन्हाचे वर्णन आपण कुणाजवळ तरी करतो. सुखाचे वर्णन करतो, दुःखाचे वर्णन करतो, माणसांचे वर्णन करतो. प्रसंगांचे, दृष्याचे वर्णन करतो. अशी वर्णने कथात्मसाहित्यात असतात. दैनंदिन जीवनात आपण सरासरी भाषा वापरतो. कथात्मसाहित्यात अचूक वर्णने करायची लेखकाची धडपड असते. अचूक वर्णनांची व्याख्या वा धारणा अनेक असतात. अचूक वर्णनांच्या नाना पद्धती असतात. ह्या पद्धती म्हणजे भाषाशैली. भाषाशैलीमुळे भाषेचे सुख कळते. ज्या समाजात भाषेचे सुख उमजलेले असते, तिथे कथात्मसाहित्य बहरते, तिथे चांगले वाचकही असतात. आणि व्यत्यास ज्या समाजात भाषेचे सुख उमजलेले नसते, तिथे कथात्म साहित्य बहरत नाही की, चांगले वाचकही नसतात. आपल्या समाजाची स्थिती तपासता येईल ह्यावरून. माणूस जगतो ते प्रसंगांतून, घटनांतून. कथात्म साहित्यात प्रसंग असतात. माणूस एखादा प्रसंग दुसऱ्याला सांगतो. प्रसंग सांगतो म्हणजे काय काय घडले, ते सांगतो. प्रसंग म्हणजे प्रक्रिया. प्रक्रिया जाणणे म्हणजे ज्ञान. कथा, कविता, कादंबरी ही ज्ञानाची पुस्तके असतात. जगताना अनेक प्रसंग असतात. एकसारखे नसतात. उलटसुलटही असतात. असे अनेक प्रसंग बघून आपण गोंधळतो. कथात्म साहित्यात अनेक प्रसंग असतात. म्हणजे अनेक प्रक्रिया असतात. अनेक प्रक्रियांमधून एकत्रितमध्ये ज्ञान जाणण्याची एक प्रक्रिया शोधायची कथात्मसाहित्यात धडपड असते. मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्र ह्यात प्रक्रिया जाणणे असतेच. मग कथात्मसाहित्य का वाचायचे ? मानसशास्त्रात चांदणे नसते, तत्त्वज्ञानात कडक उन्हाचे वर्णन नसते. सगळे एकत्रपणे कथात्मसाहित्यात असते. सगळे एकत्र बघायचे असेल तर अजून तरी कथात्मसाहित्यच आहे. कथात्म-साहित्यात प्रत्येकाला जागा असते. ज्या समाजात प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची असते, तिथे कथात्मसाहित्य बहरते. तिथे चांगले वाचक असतात. प्रत्यक्ष जीवनात आपण एखाद्या कुरूप व्यक्तीकडे बघायचे टाळू. कथात्मसाहित्यात बेधडकपणे कुरूप व्यक्ती असते. भाषेची जादू अशी असते की कुरूप माणसाचे वर्णन वाचून, कदाचित् वाचक शहारेलही; पण त्याचीच मनातली

अढी जाते. अढी जाणे म्हणजे स्वातंत्र्य. कथात्मसाहित्य स्वातंत्र्य देते. 'भाषेचे सुख' असा मी शब्दप्रयोग वापरला. हा शब्दप्रयोग मी ताणतो आणि भाषेची चैन असा शब्दप्रयोग आता मी करतो. दैनंदिन जीवनात आपण टोकापर्यंत जायचे टाळतो. कथात्मसाहित्यात टोकापर्यंत जाता येते. भाषेची चैन आणि सगळे एकत्र एकदम बघण्याची चैन करायची असेल तर कथात्मसाहित्याकडे वळावे. एरवी जीवन अमूर्त असते. जीवनाची जाणीव कथात्मसाहित्य देते.

मी ठामपणे बोललो का ? मला ठामपणे नव्हते बोलायचे. कथात्मसाहित्यात ठामपणा टाळता येतो. मी माझ्या लिखाणाचे पाचपाच खर्डे करतो. 'खूप लोक आहेत'चे मी पाच खर्डे केले. आजचे माझे भाषण हा पहिला खर्डा म्हणायला हरकत नाही. ह्याचे आणखी खर्डे माझ्या मनात चालू राहतील. एखाद्या कादंबरीतही येतील. माझ्या लिखाणाची ही पद्धत आहे. वाचकांनीही कथात्मसाहित्याचे वाचनखर्डे करणे आवश्यक आहे का, हे बघावे. भाषेची चैन करायची इच्छा आणि जीवनाची जाणीव व्हायची इच्छा उंच उभारून वाचकांनी लेखकांना हाक द्यावी.

आभार.

('खूप लोक आहेत' या कादंबरीसाठी 'दिवाण पुरस्कार' स्वीकारताना लेखकाने १६ जानेवारी २००६ रोजी औरंगाबाद येथे केलेले भाषण)

■■■

लेखकांसाठी सूचना

१. लेखकांनी आपले साहित्य कागदाच्या एका बाजूने लिहून वा मुद्रित करून पाठवावे.
२. लेखनाच्या डाव्या बाजूस आवर्जून समास सोडावा.
३. लेखन सुवाच्य हस्ताक्षरात आणि शुद्धलेखनाचे अधिकाधिक नियम पाळणारे असावे.
४. लेखकाने आपल्या लेखनाची प्रत स्वतःजवळ ठेवावी. नापसंत लेखन परत पाठविणे शक्य होणार नाही.
५. लेखनाच्या स्वीकृतीसंबंधीचा निर्णय सर्वसाधारणपणे दोन महिन्यात कळविला जाईल.
६. लेखन अनुवादित वा रूपांतरित असल्यास मूळ लेखकाची व प्रकाशकाची संमती लेखी स्वरूपात जोडावी.
७. निर्णय कळविण्यासाठी स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टकार्ड लेखनासोबत पाठवावे.

प्रकाशकांसाठी सूचना

१. मराठीत नव्याने प्रकाशित होणारी पुस्तके लेखक / प्रकाशकांनी 'युगवाणी'कडे जरूर पाठवावीत.
२. सर्वच पुस्तकांची परीक्षणे स्थलाभावी देणे शक्य नसले तरी महत्त्वाच्या पुस्तकांची दखल 'युगवाणी' घेईल.
३. ललित-समीक्षा-संशोधन-वैचारिक अनुवाद या प्रकारातील लेखनाची परीक्षणे 'युगवाणी'त येतील.

भवताल : हिंदी

चंद्रकान्त देवतालेच्या तीन कविता

१. कवितांच्या काळयाकुट्ट जिभा

आपल्या भयंकर इराद्यांनी
जगाला नेस्तनाबूत करणारा जादूगार
माहीत नाही की कुठला मुखवटा घालून
पाय ठेवणारय् बुद्धाच्या जेतवनवाल्या देशात

त्याच्या स्वागतासाठी कमानी-तोरणं
लावण्यात गढून गेले आहेत
लाळ गाळणारे, सत्ता-संपत्तीचे
भुकेले, गिळंकृत करून तृप्त झालेले मूठभर लोक
त्यांचे औदार्य नोंदवलं जाईल रक्तरंजित इतिहासात

आपल्या फायद्यासाठी महाजनांचा हितचिंतक आणि
बाजार मुक्त करणारा
येऊ लागलाय् आता नवे प्राण फुंकायला
त्याच्या अभिनंदनासाठी सजवा लोकसभा
आणि फुलांनी लदबदून टाका मोठमोठ्ठे बाजार
आणि हेही, अर्धपोटी काबाडकष्ट करणाऱ्या
उष्टं-शिळंपाकं अन्न शोधीत फिरणाऱ्या मुलांच्या
व अन्नदात्यांच्या आत्महत्त्यांवर
अख्ख्या देशाएवढा विराट झगमगता पडदा टाका
मिटवून टाका सगळ्या दारिद्र्यरेषा
विश्वमंचावरून सांगून टाकलंय्
आमच्या एका अधू दृष्टीच्या अर्थ-पुरोहितानं
की "मागास नाहीय् आमचा मुलुख"
असं केल्यानं कुबेरांनो, सत्ताधीशांनो
एकविसाव्या शतकातल्या सगळयात काळयाकुट्ट इतिहासात
अजरामर होऊन जाईल तुम्ही केलेलं आतिथ्य

विचार करा, सांगा काय असेल त्याच्या मुखवट्याआड-
मानवी चेहरा ? सत्य ? धर्म ? प्रेम ? करुणा ?
नाही नाही, यातलं काहीही नाही
फक्त वर्चस्वाचं बलशाली रूप, विध्वंसक शक्तीचा अहंकार
शरम, खोटेपणा, खोटं हसू
आणि समृद्धीच्या चिखलात मदतशील -
दिसायचा प्रयत्न करणारा नकली, धनवंत, विश्वविजयी चेहरा
ज्याच्या तऱ्हेतऱ्हेच्या साम्राज्यवादी इराद्यांच्या
महाभयंकर विषाणूंनी
सद्भावाच्या आणि रक्तपाताच्या, युद्धाच्या आणि शांतीच्या
दरम्यानचं अंतर मिटवून टाकलंय्
अशा जगण्याची इच्छा असेल का कुणात
ज्यात आत्माच नाहीय्.

जगातल्या सर्वात श्रीमंत देशाच्या पहिल्या नागरिका,
नरक ठरू लागलीय्
तुमची प्रगती, तुमची स्वातंत्र्याची कारवाई
उडून जाऊ लागलाय् आमच्या जगण्याच्या आणि जनपदाच्या
बाहेरचा आणि आतला सुगंध
खरं तर तुम्हाला पाठवायला हवं होतं
वधस्तंभ-खाटिकखाने-काळकोठड्या-छळछावण्यांच्या प्रवासासाठी
काळेपाणी नाव ऐकलं असेल ना ?
कालाहांडी माहीतय् का ?
हिरोशिमाबद्दल दुसऱ्यांनी तुम्हाला काय सांगावं ?
आणि इराणबद्दल ?
तुमचं विश्वशांतिअभियान चालू असताना

तिथं मारल्या गेलेले लाखो लोक
- ज्यात मुलंही होती निरागस -
विझलेल्या दगडी डोळ्यांनी पाहात
विचारतायत आम्हाला -
कशासाठी एवढं आदरातिथ्य
या कसायाचं ?
तुम्ही सगळे तर जिवंत आहात अजून

जे या शतकातले सर्वात मोठे व्हीआयपी
युद्धापराधी ओळखून काढण्यात तरबेज असतील
आमची हेरगिरी करणारी कुत्री
तर तुमचा बडेजाव आड येणार नाही
भुंकायच्या महाद्दष्याच्या दरम्यान
तुम्ही उतराल या मुलुखाच्या भुईवर
आणि सहजगत्या तुमच्या डागांचे वास घेतील आमचे
अधिकारी
की तीव्र घृणा आणि शरम विखुरली आहे
या पाहुण्याच्या चारी बाजूंनी हवेत

कुठंही जा
फक्त महात्म्याच्या समाधीच्या आसपास
पडू देऊ नका तुमची सावलीसुद्धा
किंवा तिकडं जिथं बोधी आणि शांततेचे वृक्ष
आणि निरागस मुलं आणि शाळा आहेत

आमचा आवाज विकाऊ म्हणून बाजारात ठेवलेला नाहीय्
कुणी विकतही घेऊ शकत नाहीय्
आम्ही तुमचा सक्त विरोध करत आहोत
देशभरातल्या समुद्रांसारख्या भाषांमधल्या
कवितांच्या काळयाकुट्ट जिभा दाखवत आहोत आम्ही
तुमचं आगमन वसंतऋतूसाठी वाईटय् !

२. रणथंबोरमधे क्लिंटन

रणथंबोरच्या अभयारण्यात तुम्ही
तीन तासांत दोन वेळा पाहिलात
आम्ही पाच दिवसांत हजारो वेळा पाहिलाय्
आमच्या हिंदुस्थान देशातल्या सर्कशीत
दुनियेतला सगळयात मोठ्ठा वाघ

अभयारण्यात मुक्त-भयविहीन-बिनदिक्कत
हिंडत होते
आणि तुम्ही पिंजऱ्यातून पाहात होता तिथं
आम्ही निर्भय होतो इथं आपापल्या घरांत
आणि एकटक पाहात होतो ज्या वाघाला
तो पिंजऱ्यात होता दूरदर्शनच्या
आणि आमच्यावर झडप घालू शकत नव्हता

आम्ही हेही पाहिलं की या वाघाला स्पर्श करण्यासाठी
खोडकर लहान मुलांसारखे लोकसभेत
खिदळत होते या देशाचे भाग्यविधाता

विश्व-खेड्याच्या उत्तर-आधुनिकतेच्या गोरखधंद्यात
आपल्या बळाच्या जोरावर विकत घेणारा आणि मनासारखं
विकणारा
बेहद्द शक्तिशाली आकर्षक चमकदार वाघ जो आम्ही
पाहिलाय
एकदम् वेगळा आहे तुम्ही पाहिलेल्या
अभयारण्यातल्या शांत सौम्य खऱ्याखुऱ्या वाघांपेक्षा

हा ना जंगलातला ना दगडाचा
ना म्यूजियममधला
बोरहीसच्या कवितेतला तर नक्कीच नाही
याला बघून आठवण आली तर फक्त
पंचतंत्रातल्या गोष्टीतल्या त्या वाघाचीच
जो अनेक शतकांपासून जिवन्तय् आठवर्णीमधे
आणि प्रतीक होऊन गेलाय्
विश्वासघातकी दानशूर हिंसक पुण्यात्म्याचं

3. जगातला सगळयात दरिद्री माणूस

जगातला सगळयात दरिद्री माणूस
कोण असेल ?
विचार करू लागलोय् त्याच्या आर्थिक स्थितीबद्दल
नाही, नाही, विचार नाही
कल्पना करू लागलोय्....

मला चक्कर येऊ लागलीय्
दरिद्री जगाच्या घाणीनं बरबटलेल्या
विराट दरिद्री मीनाबाजाराचा सर्व्हे करताना
सभ्य स्त्री-पुरुषांनो,
'चक्कर येऊ लागलीय्'
ही कवितेची ओळ नाहीय्
हे जीवनकंपन आहे ज्याच्याशी झगडणं चालूय्
पाठीच्या कण्याला झिणझिण्या येतायत्
तुटू लागलीत वाक्यं
शब्दांच्या ढिगाऱ्यात दबून अडकलेल्या मानवतेला
वाचवता येत नाहीय्
आणि त्या शापित, दगडी सावल्यांच्या गर्दीत
सगळयात मागं स्तब्ध डागासारखा
कोणता क्रमांक सांगू त्याचा
मला तर जगाच्या लोकसंख्येचे आकडेही
आठवत नाहीयत् या वेळी

यादीवाद्यांनी
जगातल्या कमीत कमी एक लाख एक अशा सगळयात शेवटच्या
दरिद्री लोकांची एक अद्ययावत् यादी तयार केली पाहिजे
नाव, वय, गाव, मुलुख आणि त्यांची
बुडालेली, काही नसल्यासारखी संपती अशा सगळ्या तपशिलासह

आमच्या भागातल्या एका कवीच्या मुलाजवळ
११ मोटारी आहेत त्यात एक अशीही
जिच्या फक्त चारी चाकांची किंमत दहा लाख
सांगितली होती त्याच्या ऐश्वर्याचं आणि थाटमाटाचं संशोधन करणाऱ्या एकानं
तरीही जगातल्या धनिकांच्या यादीत त्याला कुठंच जागा नसेल
आणि दमडीबाईला ओळखतो मी...दारिद्र्याच्या साम्राज्याच्या विराट रूपाचं दर्शन...
तिच्याजवळ....सांगता येणार नाही मला.... जीभ झडून जाईल
पण एवढं तर नक्की सांगू शकेन की
ती जगातली सगळयात दरिद्री बाई नाहीय् नक्कीच
जगातला सगळयात धनवान असं सिद्ध झालेल्या बिल गेट्सचा फोटो
वर्तमानपत्रातल्या पहिल्या पानावर
त्याच्या शेजारीच जर असता
दुनियेतल्या सगळयात दरिद्री माणसाचा फोटू
तर सूर्य तुटून पडला असता भूमंडळीकरणाच्या
तौलनिक वास्तवावर प्रकाश टाकण्यासाठी

पण कोण काढून आणील
त्या दरिद्री कंगालाचा फोटू
साता समुद्रांच्या दगडांतली
सगळयात लहान-झिजून चोपट झालेली चिपरंग

म्हणजे तो ज्याला बापूंनी अखेरचा माणूस म्हटलं होतं
आश्चर्य वाटतंय्
कोणत्या विचारानं म्हटलं होतं
त्याचे अश्रू पुसण्याबाबत
आणि ते अश्रू जे अदृष्य वाळल्यावरही वाहतच राहतात
कुणी पाहू शकेल का ते

आणि माझी स्थिती तर किती लाजिरवाणी
ना धनिकांच्या ना दरिद्र्यांच्या यादीत
मी बेवारशी कुत्रं प्रगतिशील
खाली जाऊ शकलो नाही ज्यासाठी
निरंतर संघर्ष करीत राहिले मुक्तिबोध
पाच रूपये महिन्यावर ट्यूशन करण्यापासून

आज सत्तरी ओलांडल्यावर
नऊ हजार पाचशेची पेन्शन उचलण्यापर्यंत
वर वर येत गेलो
तर मग कशासाठी ही जगण्याची थरथर
कशासाठी हे अग्निकांड
की जगातला सगळयात दरिद्री माणूस
कोणत्या मुलुखात मिळेल
कशी असेल त्याची शरीर-संपदा
त्याचा प्रकाश, त्याचा आवाज, बोलणं आणि हाडं त्याची
त्याच्या तुडवल्या गेलेल्या स्वप्नांची मूठभर राख
कुठल्या मडक्यात असेल किंवा....
आणि दररोजच्या गोष्टी
किती लक्तरं असतील त्याच्या पारदर्शक शरीरावर
किती दाणे असतील पोटात
किंवा गवताची पाती
किती गडद काळोख असेल त्याच्या आसपास
किती जंगलात लपलेलं जंगल
किती दूर मरणापासून किंवा किती जवळ
असेल त्याचा कुठला श्वास
कुणाकुणाच्या उजाड डोळयांच्या आणि
विझलेल्या चेहऱ्यांच्या गर्दीत तो
पुटपुटत किंवा चहाडी करत असेल
कोणत्या प्रसंगाची, कुणाच्या नावाची

कसं कळू शकेल कुणाला
कोणत्या अक्षांश-रेखांशावर
कोणता विचार करीत असेल आता यावेळी
लिहीत असेल का बेहोशीत आपलं मुकं मृत्युपत्र
म्हणजे बिल गेट्सच्या जातीचं नाही
त्याच्या अगदी विरुद्ध टोकावरच्या
अखेरच्या बिंदूवर खोकणारा
महाश्वेताताईंच्या सुद्धा जवळ
असणं अशक्य आहे त्याचा फोटू
जो छापून आणला असता जगातल्या सर्वात मोठ्या
धनवानासोबत

आणि त्याचं नाव ?
माझी काय हिम्मत की विचार करू
आपले निराला-प्रेमचंद-नागार्जुन-मुक्तिबोध
किंवा नेरूदा तर नक्कीच सांगू शकले असते
त्याचं एखादं मार्मिक काल्पनिक नाव

तसं तर मला माहीतय् की आगीचा दरिया आहे दारिद्य
ज्वालामुखीय्
वादळातलं महावादळ
त्याचे तडाखे-धडका आणि तूफान
कोसळवू शकतात
नव्यातल्या नव्या साम्राज्यवादाचं आणि ढोंगाचं
सर्वात उंच गडावरचं शिखर
उडवून देऊ शकतात शेअर-बाजारावरचं
सोन्या-चांदी-लोखंडाचं पक्कं छप्पर
पण या वेळी इतका उजेड
इतकं डोळे फोडणारा झगमगाट
शत्रूंच्या कपटांमधे अडकलेली दगडी भूक
त्यांच्याच जयजयकारात सामिल
नागड्या-उघड्या जिभा
गाफिल गफलतीत
गुणगानात गुंग

आणि माझं असणं प्रगतीच्या आकाशगंगेत
झगमगणाऱ्या एकविसाव्या शतकाच्या छातीवर
एक हास्यास्पद दृष्य
अर्धमेल्या जगातल्या सगळयात दरिद्री माणसासाठी.

(सर्व अनुवाद चंद्रकान्त पाटील)

■ ■ ■

'सूफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरून'
॥ किनाऱ्यावर ओटंगून बसलेली कविता ॥

◗ भास्कर लक्ष्मण भोळे

औरंगाबाद येथील तुला प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या श्रीधर नांदेडकर यांच्या *'सूफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरून'* या पहिल्याच कवितासंग्रहातील कविता जाणकार मराठी वाचकांचे लक्ष निश्चितपणे वेधून घेतील हे सांगण्यासाठी कोणीही भविष्यवेत्ता असण्याची आवश्यकता नाही. हा त्यांचा संग्रह पहिला असला तरी पहिलेपणाच्या कोणत्याही खुणा या कवितेवर नाहीत. कवीची स्वतंत्र अशी सराईत शैली आहे. जुन्यानव्या कोणत्याही कवीच्या प्रभावाखाली त्याची कविता वावरतांना दिसत नाही किंवा स्वतःशीही ती उगाच चाचपडताना आढळत नाही. तिचे जे काही पेच, तिढे किंवा प्रश्न आहेत ते तिचे स्वतःचे आहेत आणि त्यातून सुटण्याची क्षमताही तिच्याठिकाणी पूरेपूर प्रमाणात आहे. कविता येथे कवीच्या जगण्याचा भाग झालेली असल्याने अगदीच स्वाभाविकपणे ती कवीच्या सुखदुःखाचा उद्‌गार ठरली आहे. अस्थिरता, असहाय्यता, आंतरिक ऊर्जेचा अभाव, एकाकीपणा, आणि नाती सांभाळताना येणारा शीण यातून अनिवार्यतः अथांग नैराश्याच्या व मृत्युविचाराच्या गर्तेत कवीचे हरवून जाणे जेव्हा वारंवार या कवितेच्या ओळींमधून वाचकाला दिसते तेव्हा तो तिच्या भवितव्याबाबत साशंक होतो. पुनःपुन्हा डोकावणाऱ्या अंधाराच्या प्रतिमेनेही वाचक काहीसा खंतावतो. पण कवितेचा पट समग्रपणे जेव्हा त्याच्या पुढे येतो तेव्हा मात्र हे चित्र पालटते. रसरसून जीवनास्वाद घेण्याच्या ऊर्मी सुप्त स्वरूपात, परंतु तीव्र प्रमाणात या कवितेत त्याला जागोजाग दिसू लागतात.

प्रस्तुत संग्रहाच्या शीर्षकास पात्र ठरलेली जी कविता आहे ती एका परीने कवीच्या मानसिक स्थितीपर्यंत वाचकाला नेऊ शकते. देहात खिन्नतेचे विष, एकटेपणाचे दुःख, आर्ततेचा उंचावलेला पारा आणि जिव्हारी लागलेले जगण्यातील अनुभव घेऊन कवी येथे सूफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरून धावतो आहे, ढोल-टाळ्या-सारंगी-गायनवादनाद्वारे दूरस्थ पाठमोऱ्या ईश्वराचा धावा करणाऱ्या प्रार्थनांच्या खळाळत्या प्रवाहापासून तो दूर आहे, कारण सहचरांच्या दैवी स्वरांचे गाणे त्याच्या देहातून धपापत्या लयीत सुरू आहे आणि त्याच्या बळावर पाऊल पुढे टाकण्याचे त्याचे बळही अद्याप शाबूत आहे. शेवटी सळसळत्या झाडाच्या पानांतून पक्षी होऊन ईश्वर उडताना कवीला दिसतो आणि पुन्हा त्याच्या देहात खिन्नतेचे विष उतरते. अशी ही कविता आहे. काही खऱ्या वा कल्पित कारणांनी अविमनस्क झालेला कवी सूफी गूढवादाच्या किनाऱ्यापर्यंत पोचतो, तिथल्या वैराग्यपूर्ण विरक्तीचे, उत्कट भावनाप्रधानतेचे, विठ्ठल ईश्वरभक्तीचे किंवा आणखी कशाचे तरी त्याला आकर्षण वाटते, कदाचित आधारही वाटत असावा. पण तो स्वतःला त्या प्रवाहाच्या हवाली मात्र

करत नाही. त्याने तसे केले असते तर त्याची कविताही इतर अनेक सूफी गूढवादी कवींप्रमाणे स्वतःच्या मानसिक उद्रेकांविरुद्धची बचावात्मक फळी म्हणून अवतरली असती, किंवा मनस्तापांवरचा उतारा झाली असती. किंवा तिने अन्य काही मराठी कवींच्या कवितेप्रमाणे आपल्याभोवतीच्या दुर्बोधतेच्या वलयाला झळाळी आणण्याखातर गूढवादाचा आधार शोधला असता. ईश्वरभक्तीचा ध्यास घेऊन आत्म्याचे शब्द ऐकण्यातील धुंदी भोगण्यात तिने परमानंद मानला असता. पण श्रीधर नांदेडकरांची कविता यापैकी काहीच करत नाही कारण ती सूफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावर ओठंगून उभी आहे, प्रवाहात शिरलेली नाही - म्हणजेच जिथून ती आली तिथे परत जाण्याच्या तिच्या वाटा तिने पुसून टाकलेल्या नाहीत. हताशा आणि विव्हलता ही कवीची तात्पुरती मनोवस्था आहे, तो त्याचा स्थायीभाव वाटत नाही. कडवट वर्तमानाने, अनिश्चित भवितव्याने आणि हादरवणाऱ्या काही आकस्मिक प्रसंगांनी तो तात्पुरता खचला, खिन्न व विरक्त झाला आहे. त्याला अकाली संध्याछायाही भिववू लागल्या आहेत, पण त्याची जीवनेच्छा पुरती करपलेली मात्र नाही, किंबहुना येथेच त्याच्या कवितेला उत्तम भवितव्य असण्याच्या शक्यतेची जागा मला दिसते.

एकाकीपणाच्या भावनेने कवीला विशेष अस्वस्थ केलेले दिसते. आयुष्यात ज्याला खुणेचे झाड मानून येथवरची वाटचाल केली त्या वडिलांना इस्पितळात मृत्यू येऊन ते झाड उन्मळून पडावे आणि आता ते झाडच नाही म्हटल्यावर निश्चल अधांतर झेपेनासे व्हावे हा अनुभव त्याला अंतर्बाह्य हादरवून टाकणारा ठरतो. अजाण वयात या झाडाची सावलीही आपल्याला पोळत होती ही जाणीव त्याला गतकातर व अस्वस्थ करते. पाठोपाठ आपल्या इतरही नात्यांचे लचके, ज्याला कधीकाळी आपण उपकृत केले आहे असा कोणीतरी तोडीत असल्याची दुःस्वप्ने त्याला भेडसावू लागतात. पुस्तक खिळखिळे व्हावे तसे सगळ्या नात्यांचेही होत चालले असे कळल्यावर त्याला संताप येण्यापेक्षा असहाय्यताच अधिक वाटू लागते. रक्ताचीच नाहीत तर इतरही नाती दुरावत चालल्याचा अनुभव येतो तेव्हा कवीला स्वतःला सावरणे अवघड होते. बालपणी नकळत उगवलेले असेच एक अश्राप नात्याचे रोपटे अचानक कोमेजतांना पहावे लागते, इतर नात्यांच्या हरवण्याची पर्वा न करता जी अभिन्न मैत्री जोपासली होती तिलाही तडे पडलेले सोसणे प्राप्त होते आणि डोळ्यांदेखत असंख्य नात्यांची वाफ होते त्या त्या वेळी कवी हवालदिल होतो. कोलाहल आणि शांतता, प्रतीक्षा आणि भेट, उंबरठ्याच्या आत आणि बाहेर अशा उभयलक्षी शक्यता त्याला सारख्याच असह्य होतात. एखाद्या जुगारासारखे अख्खे आयुष्यच त्याला बेभरवशाचे वाटू लागते. जगातल्या सगळ्या यांत्रिक हालचाली वाळलेल्या झाडाप्रमाणे तटस्थतेने पहाव्यात, केवळ पर्याय नाही म्हणून स्थळकाळ-व्यक्तिघटितादिकांचा निमूट स्वीकार करावा आणि अनोळखी जमिनीत मुळे रुजवण्याचा व्यर्थ प्रयत्न करत निरर्थ जगत राहावे अशा निर्णयावर कवी येतो. पानगळ, रितेपणा, धुगधुगत्या श्वासाचे घड्याळ, भंगूर बुडबुडा अशा मृत्यूसूचक प्रतिमा त्याच्या मनात भिरभिरत राहतात. रिकाम्या प्रेक्षागारात फक्त आपण एकटे बसलो आहोत असा त्याला भास होतो.

अशावेळी आधीच आत्मनिष्ठ असलेला कवीचा स्वभाव अधिकच अंतर्मुख आणि आत्मकेंद्री होतो. बाहेरचे जग तो जणू जाणीवपूर्वक वगळत जातो, आणि स्वनिर्मित अंधाराच्या अथांगतेत खोलखोल बुडत जातो. आयुष्य म्हणजे जणू एक विस्तारत जाणारे शून्य असून आधाराचे सारे दिवे विझून गेले आहेत, आतील सारे दुभंग उफाळून वर आले असून ते असह्य होत आहेत आणि कवीला ते आत्मशोधाच्या पलीकडे नेऊन आत्मक्लेशाच्या गर्तेत भिरकावत आहेत. प्रत्येकच पेच अधिकाधिक क्लिष्ट बनून समोर येत असल्याचे पाहून कवी हतबल होतो. दोन

खोल्यांच्या घरात हिंस्र होऊन चिडचिडणारे आपण मुळात भेकड व पापभीरू आहोत हे लक्षात आल्यावर तो स्वतःची निर्भर्त्सना करू लागतो, अपराधभावनेपासून वेगळे काढून तो आपल्या कोणत्याच कृत्याचे, विचाराचे वा वासनेचे स्मरण करू शकत नाही. आभाळभरच्या पापभावनेने तो पोळून निघतो. स्वतःच्या बालपणाकडेही तो निरभ्र दृष्टीने पाहू शकत नाही. पृथ्वीची विपुलता आणि काळाची अनंतता जणू आपल्यासाठी अस्तित्वातच नाही अशा गंडाने कवी ग्रस्त होतो. आपल्या काळजात एक खोल जखम दे असे ईश्वराला तो साकडे घालतो, कारण आवाज नसण्याच्या काळ्याकभिन्न भयातून त्याला कायमची मुक्ती हवी असते. अज्ञाताच्या अनाकलनीय अंधाऱ्या कृष्णविवरात आत्मविलोपन व्हावे या एकाच अनावर आकर्षणाने तो पुरता पछाडला जातो. भयकारी प्रपात, गडद हिरव्या खोलखोल दऱ्या, अफाट पापभूमी, अनाकार धावणारे तप्त लाव्ह्याचे प्रवाह, अदृश्य तडफडीची गुहा, मरणाच्या अपार दुःखाची पारंबी अशा उग्रभीषण प्रतिमा त्याला चौफेर घेरून टाकतात. रक्ताचा टिळा, मोरपंखांचा फडा, पाठीवरचे वळ अशा अनेक आत्मक्लेशसूचक प्रतीकांचे कवितेतील प्रमाणही वाढलेले दिसते.

श्रीधर नांदेडकरांच्या कवितेत हे जर एवढेच असते तर तिची गंभीर दखल घेण्याचीही गरज पडली नसती, पण वर म्हटल्याप्रमाणे तिच्या अनेक जमेच्या बाजू आहेत. सूक्ष्म संवेदनक्षमतेबरोबरच मूलगामी चिंतनशीलताही कवीला लाभली आहे. विचार, भावना, स्वर आणि चित्रे या सर्वांची अंतःकरणात उसळून येणारी अलोट गर्दी अचूक चिमटीत पकडणारी शब्दकळा कवीला आईच्या भाषेने दिली आहे. त्याच्या दर्शनी विषण्ण खिन्नतेच्या कातळाखाली जबर जीवनेच्छेचे जिवंत प्रवाह झुळझुळत असल्याचे स्पष्ट दिसत आहेत. अंधारात सुरू असलेल्या दिशाहीन भटकंतीतही त्याला जो अज्ञात शक्तीच्या गाण्याचा आधार जाणवतो तो त्याच्या सृजनशील प्रवासाचा सकारात्मक शकून समजायला हरकत नाही. कवीच्या आत कुठेतरी संध्याकाळ तोलून धरणारे मित्राचे तराण्यातले गाणे आणि मंदस्मित करणारा ईश्वर दुःखाच्या भीषण ज्वाळांनी कवी पोळून निघत असतानाही सतत वास्तव्याला असतो. 'तुझ्या गाण्यातला देवाचा पाऊस' ही कविता मला त्यादृष्टीने फारच लक्षणीय वाटते. जन्मभर साथ देणारे हे गाणे आपण खोलचखोल दरीत झेपावतानाही आपल्या सोबतीला असेल, त्या गाण्यातून देवदूत आपले बाहू पसरील आणि आपण समाधानाने मिटून जाऊ असे कवी म्हणतो. त्या गाण्याचे आपण खूप देणे लागतो असे त्याला वाटते. मरणाच्या वाटेवर साथ करणारे हेच गाणे कवीने जर अर्थपूर्ण जगण्याचे सूत्र म्हणून स्वीकारले तर ते त्याला सर्व क्लेशकारक आभासविश्वातून सोडवू शकेल असे वाटल्यावाचून राहात नाही.

जबर जीवनेच्छेचे झुळझुळणारे उपरिनिर्दिष्ट प्रवाह ज्या कवितांमधून उत्कटतेने व्यक्त झाले आहेत त्या बव्हंशी कवीच्या कौटुंबिक गोतावळ्याशी संबंधित आहेत. आपली वृद्ध सावली मुलाच्या संसारावर पडू नये म्हणून जिवाचे रान करणारा वत्सल पिता जसा एका कवितेतून येथे भेटतो तसेच बालपणीचे आपले गजबजलेले घरही कवीच्या मनात जणू कायम वस्तीला असते.

हे अंधारात उभं असलेलं घर
मी आहे
स्थिर उभं राहून माझं घर उजळून काढणारी
मेणबत्ती तू आहेस
आपण दोघंही हे फडफडणं सांभाळू

असे अत्यंत समजूतदार मी-तूचे नाते सांगणाऱ्या काही कविता या संग्रहात आहेत. मी अजून एवढा आटलेलो नाही असे कवी स्वतःला बजावतो, पाषाणाच्या दुभंगलेल्या बारीकशा तड्यामधून झुळझुळणारी पाण्याची पारदर्शी थरथरती रेष होऊन तिची ओंजळभर तहान आपण भागवू याबद्दल त्याला यत्किंचितही शंका नाही. या नाजूक

संबंधातील बहुपदरी अन्योन्याश्रितता नेमकेपणी व्यक्त करण्यासाठी जो हळूवारपणा आणि समंजस सहानुभाव आवश्यक असतो तो सुदैवाने कवीच्या वाट्याला पुरेपूर आलेला आहे. पाण्यातून तुरटीचा खडा फिरवल्यावर ते जसे नितळ पारदर्शी होते तसे आपले रागद्वेष सारे तळाशी बसून स्वच्छ निर्भय होण्याची आपली मनीषा कवीने एका कवितेत व्यक्त केली आहे.

कोलाहलात जीव थरथरण्याची तक्रार कवी एका ठिकाणी करत असला तरी त्याचा मूळ स्वभाव माणूसघाण्या नाही. घरातले सारे आवाज नाहीसे झाल्यावर तो कासावीस होतो, आपल्या माणसांच्या आवाजांच्या कल्लोळात तो आपल्या सगळ्या व्यथावेदना विसरतो. जिवाच्या आकांताने तो त्या माणसांना आवाज देतो. आपल्याच माणसांवर नव्हे तर एकूण माणूसमात्रावरच कवीचा जीव आहे, माणसांखातर साक्षात ईश्वरालाही तो बाजूला व्हायला सांगण्यास मागेपुढे पहात नाही. ईश्वराला तो बजावतो की, बाहेरच्या माणसांना आत येऊ दे; "तू माझ्यासाठी मरणकळ दाबशील तोवर मला असंख्य माणसांना कडकडून मिठी मारायचीय." तडफडत्या दिवसांना कापरासारखे जाळून वितळवून टाकणारी जादूच्या बाहुलीसारखी पोरगी, तिचे खळाळून हसणे, तिने भुर्रकन उडून जाणाऱ्या चिऊची गोष्ट सांगताच आपले म्हाताऱ्या लिअरचे घर मेणाचे असूनही वाहून जाईल अशा भीतीने कवीचे अस्वस्थ होणे, तिच्या बहरत्या दिवसांची कवीच्या मनात रेंगाळत असलेली स्वप्ने, शनिवार-रविवारीच भेटणाऱ्या पित्याची प्रतीक्षा करणारी चिमणीपाखरे, त्यांच्या पंखांमध्ये बळ येण्याच्या सद्हेतूने का होईना पण त्यांना दूर सोडावे लागताना कवीच्या मनात दाटून येणारी कासाविशी ही काही उदाहरणे उत्कट अनुभवरेखाटनाची द्योतक म्हणून सांगता येतील. अत्यंत हृद्य स्वरूपात कवीने हे सारे प्रसंग कवितांमधून उभे केले आहेत. कौटुंबिक परीघाच्या बाहेर जाऊन एका कवितेत रातांधळ्या म्हातारीच्या माळावर बकऱ्या चारणाऱ्या लेकीचे रेखीव व भावपूर्ण शब्दचित्र कवीने रंगवले आहे, तसेच एका भडक आत्मचरित्राच्या हळुवार कथानकात गुंतवून विद्यार्थ्यांवर संघर्षशीलतेचा संस्कार करणाऱ्या मास्तराचेही त्याच्या मानसिक आंदोलितांसह व्यक्तिचित्रणही कवीने प्रत्ययकारी केले आहे.

स्व आणि स्वतःचे कुटुंब यांच्यापलीकडे जाण्याच्या या दिशेने कवीने आगेकूच केल्यास त्याला आपल्या कवितेची खुणावणारी नवी क्षितिजे आपोआपच दिसू लागतील. आजही त्याच्या कवितेत रंगीत मासा, गारुड्याचा साप, गोठ्यात परतणारे जनावर, काळ्याभोर डोळ्यांचा बैल, पिंजऱ्यातला रावा आणि साऱ्या चराचराचा व्याप लीलया पेलणारी पृथ्वी या सर्वांची आस्थेवाईक नोंद आढळते, पण ती स्वतःच्या दुःखाची बाह्य आलंबने म्हणूनच बहुतेक वेळा झाली आहे.

पृथ्वी
तुझ्या अस्तित्वावर उमटणारा अग्नी, जलप्रलय
लाव्ह्याचा उद्रेक पाहतो
आणि सलते मनात
माझ्या छोट्या दुःखाची गोष्ट

अशीच त्याची गत इतरही संदर्भात झालेली दिसून येते. हे जसे नैसर्गिक पर्यावरणाबाबत झाले आहे तसेच सामाजिक पर्यावरणाबाबतही आढळते. सामाजिक जीवनातील ऱ्हासशीलता, क्रौर्य, हिंसा व परात्मता या गोष्टी कवीला अस्वस्थ करतात. पण त्यांचाही विचार स्वसापेक्षतेच्या पल्याड जाऊन अद्याप तरी तो करताना फारसा दिसत नाही.

संवेदनविस्ताराबरोबरच सामाजिक घटितांच्या कार्यकारणांच्या शोधाच्या दिशेने जर कवी जाऊ शकला तर तो त्यांना अधिक अर्थपूर्णरीत्या जोडून घेऊ (रिलेट करू) शकेल असे वाटते. आज तसा प्रयत्नच त्याच्या कवितेत कुठे दिसत नाही. याबाबतीत त्याची चिंतनशीलता त्याला उपकारक ठरू शकेल. व्यापक जाणिवांचा असा

स्पर्श त्याच्या कवितेला जर होऊ शकला तर आपोआपच त्याला त्याच्या वैयक्तिक दु:खांची तीव्रता व ठसठस कमी झाल्याचे लक्षात येईल. त्याच्या अंतर्मुखतेला समर्थपणे तोलून धरणारी बहिर्मुखता त्याला सहज साध्य होऊ शकेल. अधिक परिपक्व कविता त्याच्या हातून लिहून होईल. तसे अभिवचन त्याच्या पहिल्या कवितासंग्रहाने रसिकांना दिले आहे, आणि ते पूर्ण करणे हे त्याच्या पुढच्या कवितासंग्रहाचे कर्तव्य आहे असे म्हटल्यास ते अनाठायी होणार नाही.

आज सूफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावर ओठंगून बसलेल्या श्रीधर नांदेडकरांच्या कवितेसमोर तसे दोन पर्याय आहेत. एक, त्या प्रवाहात उडी घेणे; स्वत:भोवती आखून घेतलेल्या आजच्या वर्तुळातच जर ही कविता अडकून राहिली तर तिला हाच पर्याय जवळ करावा लागेल असे दिसते. पण दुसरा पर्याय परिणामदृष्ट्या अधिक श्रेयस्कर आहे असे वाटते, आणि तो म्हणजे ज्या तात्कालिक स्मशानवैराग्यामुळे कवी भौतिक जगण्यापासून विरक्त झाला आहे ते प्रयत्नपूर्वक झटकून जगण्याला निधडेपणाने सामोरे जाणे हा आहे. व्यक्तिगत आणि सामुदायिक या दोन्ही स्तरांवरचे जिणे समजून उमजून कवीला जगता आल्यास तो अधिक कसदार कविता लिहू शकेल. श्रीधर नांदेडकर कोणता पर्याय निवडतात याकडे रसिकांचे लक्ष लागून राहील हे मात्र निश्चित.

[सूफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरून (कविता) :
श्रीधर नांदेडकर, तुला प्रकाशन, औरंगाबाद
वितरण : साकेत प्रकाशन, ११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड, औरंगाबाद-४३१००५
पृष्ठे : १३२; किंमत : रुपये १३०]

■ ■ ■

॥ साभार पोच ॥

- 'येथून पुढे' (कविता) - प्रभू राजगडकर, जागरुक प्रकाशन, चोरखिडकी, नगीना बाग, चंद्रपूर - ४४२४०१ किं. ५० रु.
- 'आषाढ माती' (कविता) - श्रीकांत देशमुख, शब्दालय प्रकाशन, वार्ड नं. ७, श्रीरामपूर-४१३७०९ किं. ९० रु.
- 'पाटीलकी' (कादंबरी) - बाबाराव मुसळे, प्रतिभास प्रकाशन, तारांगण बसस्थानक परिसर, परभणी किं. २५० रु.
- 'सूफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरून' (कविता) - श्रीधर नांदेडकर, तुला प्रकाशन, वितरण साकेत प्रकाशन, म. गांधीनगर, औरंगाबाद किं. १३० रु.
- 'दमन' (दोन नाटके) - शाम पेठकर, प्रकाशक - अध्ययन भारती विदर्भ, रामनगर, वर्धा किं. ६० रु.
- 'अन्नदात्याची धुळाक्षरे' (कविता) - भगवान ठग, तुका म्हणे प्रकाशन, केशवनगर, बुलडाणा-४४३००१ किं. ७५ रु.
- 'आवानओल' (कविता) - अजय कांडर, शब्दालय प्रकाशन, वार्ड नं. ७, श्रीरामपूर-४१३७०९ किं. ६५ रु.
- 'मर्ढेकर आणि टीकाकार, भ्रांत कोण ?' (समीक्षा) - आचार्य विवेक गोखले, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, महाडवार रस्ता, कोल्हापूर-४१६०१२ किं. ३०० रु.
- 'मावळत कां नाहीस' (कविता) - मनीषा साधू, विजय प्रकाशन, हनुमानगल्ली, सीताबर्डी, नागपूर-१२ किं. ११० रु.
- 'सृजन संवाद' (समीक्षा) - डॉ. प्रमोद मुनघाटे, तनुजा प्रकाशन, हिलटॉप, अंबाझरी, नागपूर-३३ किं. १५० रु.

'पाटीलकी'

॥ सामाजिक अभिसरण प्रक्रियेला लागलेल्या वाळवीचे भेदक दर्शन ॥

◗ रमेश अंधारे

महाराष्ट्रात फुले-शाहू-आंबेडकर या त्रि-निर्मिकांनी ज्या सामाजिक अभिसरणाच्या परिवर्तन-पर्वाला जाणीवजागृतीने ऊर्जस्वल बनविले त्या सामाजिक प्रबोधन-युगाचा चेहरा उत्तरोत्तर कसा काळवंडत चालला आहे याची विदारक प्रचिती बाबाराव मुसळे यांच्या 'पाटीलकी' या कादंबरीतून फार प्रभावीपणे येते. जातीव्यवस्थेचा विषाक्त द्रव आज साऱ्या समाजाच्या अंगोपांगात मिसळून गेला आहे. अस्पृश्यता, जातीयता कायद्याने नष्ट केली असली तरी मनातला जातीचा अभिनवेश विविध वेषांतरांतून व रूपांतरांतून आपल्याला बोचत राहतो. जात्याभिमानाच्या अशा विषसंकुल वेषांतराचं व कलात्मकतेला स्पर्श करणारं वाङ्मयरूप म्हणजे 'पाटीलकी' ही कादंबरी !

'हाल्या हाल्या दुधू दे', 'पखाल', 'वारूळ' या तीन कादंबऱ्यांनंतरची 'पाटीलकी', ही मुसळेंची एक सशक्त कादंबरी. विधीद्वारा स्थापित राज्यघटनेच्या कलमान्वये समाजात समानता स्थापू पाहणाऱ्या विचारसरणीला आजच्या विज्ञानयुगातही कसे उलथून टाकले जाते याचे कथात्म चित्रण एका वाङ्मयीन तटस्थतेने मुसळेंनी केले आहे.

गेल्या पंधरावीस वर्षांपासून आरक्षणाचे धोरण काटेकोरपणे अंमलात आणले जाते आहे. त्यानुसार ग्रामीण भागातल्या विविध दलित जाती घटकांमधल्या लोकांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमधला पदप्राप्तीचा दर झपाट्याने वाढत आहे. परंपरेने उच्चवर्णियांनी आतापर्यंत ज्या आदिवासी, भटक्या, विमुक्त, दलित जातींना निव्वळ टाचेखाली ठेवले, त्या जातींना उच्चपदावर पाहणे; त्यांच्या हाताखाली काम करणे, उच्च जातीच्या लोकांना भयंकर जड जात आहे. परिणामस्वरूप 'सामाजिक मन' व 'दलित जाणीव' न लाभलेल्या समूहमनाचं चित्रण 'सरावन'च्या कथेतून उलगडते.

यशवंत पाटलासारखा समंजस माणूस गावचा पाटील म्हणून काम करत असताना, आदिवासी सरावनला कोतवाल करतो. ह्याच सरावनला यशवंता पाटलाचा राजकीय विरोधक असलेला सरपंच, पाटीलकीची सनद मिळवून देतो. यशवंता पाटलानंतर परंपरेने आपल्यालाच पाटीलकी मिळावी अशा ईर्ष्येने यशवंता पाटलाचा लहानभाऊ बाजीराव, सारे अर्थबळ लावून प्रयत्न करतो. परंतु गावच्या पाटीलकीची जागा आदिवासी प्रवर्गासाठी राखीव असल्यामुळे सरावनच पाटील होतो आणि इथूनच गावातल्या संघर्षाला सुरूवात होते.

यशवंता पाटलाच्या खटल्यात ट्रॅक्टर ड्रायव्हर असलेला सरावन, सरपंचाने फोडून आपल्या गटात नेला ह्या समजापायी बाजीराव विरुद्ध सरपंच असा संघर्ष गावात सुरू होतो आणि ह्या संघर्षाची जटिलता व विखार वाढतो; तो ग्रामीण मनाच्या तळाशी घर करून बसलेल्या अंधश्रद्धा, भानामती, जादूटोणा, गावठी वैदूगिरी इत्यादीमुळे.

गावात सरळसरळ दोन तट पडतात. एक बाजीरावचा. त्यात परबत दुकानदार, किसना हेड्या अन् भुराजी मानदार हे मुख्य. तर दुसरा गट सरपंचाचा. त्याचा मुख्य प्रवक्ता सरावन. बाजीराव व सरपंच ह्या दोन गटांतला संघर्ष अतिशय जीवघेणा होतो तो बाजीरावच्या खलत्वामुळे. तो दारूडा, बदफैली, माथेफिरू असा सर्वदुर्गुणसंपन्न असल्याने त्याच्या व्यक्तित्वात साऱ्या अवगुणांचा गुणाकारच अर्करूप होतो. 'सकवारी' ही बाजीरावला मजूरबाया उपभोगण्यासाठी उपलब्ध करून देणारी दलालच आहे. सकवारी दलाल तर पुरासिंग हा हस्तक. ह्या दोघांच्या मार्फत बाजीरावचे सारे गाव नासविणारे छिनालधंदे चालतात. सरावनच्या बायकोला - सुगंधाला - धरून नेवून तिच्यावर बलात्कार करणे, त्याच्या घरावरचे टिनपत्रे काढणे, त्याच्यावर तीन हजार रुपये कर्ज असल्याचा आळ घेणे अशा प्रसंगांतून बाजीराव-सरावन असा संघर्ष लेखकाने उभा केला आहे.

या संघर्षाचं स्वरूप अधिक गुंतागुंतीचे करण्यासाठी मुसळेंनी अनेक घटनाप्रसंगाचे घनदाट जाळे उभे केले आहे. बाजीरावचा गोठा जाळणे व त्याची तोहमत 'सरपंच-सरावन' यांच्या गटावर आणणे, पुरासिंगने गावात दारूभट्टी लावून लोकांना दारूच्या नादी लावणे, भानामती, करणी, जादूटोणा ह्या अंधश्रद्धांचे चाळे करून गावकऱ्यांची मानसिकता दहशतीची बनविणे व त्याच्या संशयाची सुई सरावनवर रोखणे, परबत दुकानदाराच्या मकानाच्या जोडणीची विनापखाना लाकडे वनखात्याकडून पकडून देणे, पोलीसस्टेशनमध्ये एकमेकांच्या विरुद्ध फिर्याद दाखल करणे इत्यादी.

गावातल्या ह्या साऱ्या कलागतींचा छडा सरपंचाला लागतो, तो परबत दुकानदाराच्या बायकोकडून. आणि मग सरपंच त्याच्या बायकोच्या मरणानंतरच्या राख सावडण्याच्या दिवशी स्मशानात एक योजनाबद्ध नाट्य घडवून आणतो. सरावन, पुरासिंग व भीमा वैद ह्या जातीबाहेरच्या लोकांनाही सरपंच 'सावडण्या'च्या विधीला बोलावतो आणि सर्वांसमक्ष परवतने ही सारी कारस्थाने कशी केली ते उलगडून सांगतो.

सर्व कारस्थानांचा सूत्रधार परवत. भीमाकडून परवतचे पितळ सरपंच उघडे करतात. आणि परवत संपूर्ण शरणागती पत्करून माफी मागतो व असे न वागण्याची शपथ घेतो. यापाठोपाठ पुरासिंग आणि भीमावैदही शपथ घेतो आणि शेवटी सरपंचही, राजीनामा देऊन, गावच्या विकासासाठी नव्या पिढीकडे गावची सूत्रे देण्याची विचार शपथपूर्वक बोलतात.

स्मशानात गावातल्या साऱ्या इरसाल, नीच खलपुरूषांनी तडकाफडकी हृदयपरिवर्तन होऊन, तसे न वागण्याची एकामागोमाग शपथ घेणे ही घटना एखाद्या मद्रासच्या मसाला चित्रपटातल्यासारखी वाटते. खलत्व हीच ज्याची जीवनधारणा आहे असा माणूस लगेच बदलत नाही. तो सहज शरण येत नाही; उघडा पडल्यावर तो त्रागा करतो, प्रत्यारोप करतो, खोटे बोलतो, तर्कहीन बोलतो, शेवटी तिरीमिरीत निघून जातो, पण शरण येत नाही. साक्षात्कार झाल्यासारखा एकदम पाय धरत नाही. त्याला पश्चात्ताप होत नाही. खळांचे मनपरिवर्तन फार धीम्या गतीने होते.

खळांचे वेगाने होणारे मनःपरिवर्तन जसे खटकते तसे दुर्गाबाईने आपल्या नवऱ्याची - परबतची सर्व कारस्थाने उघड करण्याची हिंमत दाखविणे हेही वाचकाला सहज पचविता येत नाही. खुनशी, कारस्थानी माणसांच्या बायका दबलेल्या, पिचलेल्या व नवऱ्याची हुकमी मनमानी मुकाट मानणाऱ्या असतात. ही अशी पात्रे थोड्या भडक रंगात रंगविलेली वाटतात.

सरपंच आणि सरावनची व्यक्तिमत्वे मात्र मुसळेंनी फार रेखीव केली आहेत. त्यांचा व्यक्तित्व-विकास लेखकाने फुलवत नेला आहे. दोघेही सत्त्वशील. त्यातही सरपंच अधिक उमदा, विचारी व विशेषतः विज्ञाननिष्ठ. भानामती, जादूटोणा, करणीवर विश्वास नसलेला. गावात शांतता

राहावी. भानगडी व कलह पेटू नयेत या विचाराचा. बदलत्या काळाची पावले ओळखणारा व सामाजिक बदलांचा खुल्या मनाने स्वीकार करणारा. सरावनचे मन सरपंचीनकडे, तिच्या हळदिव्या रूपाकडे वारंवार आकृष्ट होते. सरावनचे हे मानसिक स्खलन मुसळेंनी संयमाने, हळुवारपणे चित्रित केले आहे. त्याचे पूर्ण पाय नव्हेत, पण एक करंगळी मातीची आहे हे त्याच्या मनातल्या कामभावनेचं धूसर चित्रण करून बहारदारपणे मांडले गेले आहे. सरावन नेहमीच सरपंचाच्या उमद्या विचारांची व आपल्या 'गदळ' विचारांची मनातल्या मनात तुलना करतो. त्याचे हे कठोर आत्मपरीक्षण खूपसे चमकदार वाटते.

सरपंच केवळ विज्ञाननिष्ठच नव्हे तर चारित्र्यवान रंगवून मुसळेंनी पारंपरिक राजकीय चित्रणाला फाटाच दिला आहे. सरपंच, आमदार, मंत्री म्हटला की तो रंगेल, रमा, रमीत रमणारा असाच मराठी कथाकादंबऱ्यांत रंगविला गेला आहे. पण हा सरपंच विधायक राजकारण, समन्वयाचे समाजकारण व गुण्यागोविंदाचे गावकारण करणारा आदर्श राजकारणी आहे. यशवंता पाटलाशी, उमदे राजकीय डावपेच खेळणारा हा खरा 'स्टेट्समन' शोभतो. सरावनला तो 'बोलकं बाहुलं' बनवत नाही. ह्याच्या म्हणण्याप्रमाणे पोलीस ठाण्यात रिपोर्ट न देऊनही सरपंच सरावनला त्रास देत नाही. असे न करण्यामागची सरावनची परिस्थिती व मनःस्थिती तो समजून घेतो. सरावनच्या मनाचेही सूक्ष्म कंगोरे व हळुवार वाढ मुसळेंनी कौशल्याने दाखविली आहे.

सुगंधा ही वरेरकरांच्या 'बिजली'सारखी कडकलक्ष्मी होऊ न देण्यात मुसळेंचे मोठे कथायश जाणवते. नवऱ्याच्या मोठेपणाने ती हुरळून जात नाही, पण मानवसुलभ स्वभावाप्रमाणे सरपंचीनविषयी तिला नवऱ्याचा पुसटसा संशयही येतो. बोलीभाषेची स्वाभाविक लय, ठसकेबाज पण अपरिचित वाक्‌प्रचार व म्हणींचा चपखल वापर, मराठवाडी बोलीशी जवळीक आणि लेखकीय संस्कार न केलेली ओबडधोबड भाषा या विशेषांमुळे कथेचा एक झणझणीत स्वाद जाणवतो. परंतु घटनाप्रसंगांच्या गर्दीमुळे, किंबहुना घटनाप्रधानतेमुळेच कथेचे मुख्य आशयसूत्र थोडे विसविशित झाले आहे. "एक आदिवासी जातीचा माणूस गावचा पाटील झाल्यामुळे पारंपरिक वतनदारी मानसिकता उग्र जहाल बनून सारा गाव त्या संघर्षात भस्मीभूत होतो" या आशयसूत्राचा कथाविस्तार वाचकांपुढे उलगडत नाही. दुसरीकडे ती 'दोन गटांतील संघर्ष कहाणी' म्हणूनही जर चित्रित झाली असती तरी ती अधिक कलात्मक होऊ शकली असती. घटनाप्रसंगांची एक मजबूत साखळी उभारण्याच्या नादात कदाचित पात्रांच्या मनोविश्लेषणावरचे लक्ष ढळून गेले असावे आणि परिणामी कथेचे मुख्य आशयसूत्र असे क्षीण होऊन बसले असावे.

'स्थानिक स्वराज्य संस्थांमधील व आमदार खासदारांची पदे आरक्षित करण्याचे धोरण व त्याचा सामाजिक-राजकीय आणि गावपातळीवरचा परिणाम' हे वास्तव बाबाराव मुसळेंनी मराठी कादंबरीत प्रथमच आणले. त्याचे श्रेय त्यांना द्यावेच लागेल. परंतु ह्या वास्तवाचा त्यांनी कथेच्या सोयीपुरताच वापर केला आहे. त्याचा संपूर्ण वापर त्यांनी केला नाही. तो तसा केला असता तर ही कथा अधिक वास्तववादी, अधिक परिणामकारक व त्यामुळेच अधिक कलात्मक झाली असती.

गावात (कादंबरीभर गावाचे नाव सापडत नाही. शेलू, उंबरा, अकोला इ. नावे मात्र आहेत.) बाजीराव आदिवासी सरावनच्या घरावर हल्ला करतो, सुगंधावर बलात्कार करतो. सात दिवस बाजीराव व साथीदार पोलीस कस्टडीत बंद असतात. स्वतः सरावन पाटीलकी मिळविण्यासाठी तहसिलीसमोर उपोषणासारखा, मिडियाला, प्रेसला खाद्य पुरविणारा मार्ग निवडतो; तर मग गावातल्या ह्या साऱ्या भानगडी वर्तमानपत्रापासून, मिडियापासून दूर कशा ? पं. स. चा सभापती सरपंचीनच्या राख सावडण्याच्या कार्यक्रमाला येतो, पण गावातल्या ह्या साऱ्या भानगडींमध्ये

तालुका, जिल्हा स्तरावरचे कोणीही पुढारी, अधिकारी गावात येत नाहीत, हे कसे ?

वास्तविक पाहता आरक्षण धोरण अंमलात यायला लागल्यापासून दलितांचे राजकीय पक्ष अधिक जागरूक व आक्रमक झाले आहेत. ट्रॅक्स, टेम्पो, ऑटो, फोन, टी. व्ही. ही सर्व साधने पंधरा, वीस वर्षांपासूनच खेड्यांचे शहरांशी दळणवळण वाढवताहेत. वास्तवाचा हा मोठा भाग मुसळेंनी दुर्लक्षिल्यामुळे कथावास्तवाची मोठी क्षती झाली आहे.

काही ठिकाणी कादंबरीरचनेचा ठोकळेबाजपणा जाणवतो. बहुतेक मुख्य स्त्री-पात्रे कामभावनेच्या क्रियाकलापात गुंतलेली आहेत. सकवारी व तिने बाजीरावला पुरविलेल्या बायका मनकर्णा, सुगंधा इत्यादी. प्रणयभावनेच्या चित्रणाचा हा फडके-मार्ग स्वीकारणे नव्या पिढीच्या कादंबरीकारांकडून अपेक्षित नाही. एवढ्या खदखदत्या घटनाप्रसंगांचं केंद्र असलेलं गाव जसं बिनानावाचं राहातं, तसं मुख्य पात्रांच्या कुटुंबातली मुलंबाळंही निव्वळ पुसटत्या उल्लेखापुरतीच येतात. संपूर्ण कथाविस्तारात कधीही ऋतू बदलत नाही. नेहमी शेतीची कामे चालतात. पात्रेही मार्ग कामकरी, शेतकरी. पण कादंबरीत उन्हाळा, पावसाळा, हिवाळा येतच नाही.

ह्या सर्व त्रुटी दुर्लक्ष करण्यासारख्या खासच नाहीत. ह्या दोषांचं महत्त्वाचं कारण जाणवतं ते म्हणजे ही कादंबरी लेखकाने एकटाकी लिहिली असावी. अशा अनेक जागा कथेतून दाखवता येतील. पहिल्या धारेचं लेखन झाल्यावर कथेवर दोनतीन तरी संस्करणे, परिष्करणे आवश्यकच असतात. निर्मितीचा व स्मरणसाखळीचा ओघ खंडित होऊ नये म्हणून पहिली जलद गती थांबल्यावर लेखक स्वतःची रचना पहिला वाचक म्हणून वाचून पाहतो व त्याचवेळी संस्करणाला सुरूवात होते. अशी संस्करणे, परिष्करणे केली असती तर ह्या कादंबरीची खुमारी काही औरच झाली असती.

('पाटीलकी' (कादंबरी) ले : बाबाराव मुसळे. प्रतिभास प्रकाशन तारांगण, वसस्थानक परिसर, परभणी. कि. : २५० रु. प्र. आ. नोव्हेंबर २००५)

■ ■ ■

विदर्भ साहित्य संघ
॥ कार्यवृत्त ॥
१ जानेवारी २००६ ते ३० जून २००६

जानेवारी : २००६

४ जानेवारी - विदर्भ साहित्य संघाचे कार्यकारी मंडळाचे माजी सदस्य व संत साहित्याचे अभ्यासक प्राध्यापक गो. मो. कोलते यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांचे कुटुंबीय व विदर्भ साहित्य संघ यांच्या वतीने संत वाङ्मय-क्षेत्र पुरस्कार संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. यू. म. पठाण यांना प्रदान करण्यात आला.

७ जानेवारी - कै. ग. त्र्यं. माडखोलकर व्याख्यानमाले अंतर्गत 'सामाजिक एकता के आधार' या विषयावर डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांचे व्याख्यान झाले.

९ जानेवारी - प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे यांच्या काव्यवाचनाचा व काव्य चर्चेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

१४ जानेवारी - विदर्भ साहित्य संघाचा ८३ वा वर्धापनदिन लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक को. ऑप. सोसायटीच्या प्रांगणात साजरा झाला. ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर या समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. आ. देवेंद्र फडणवीस हे याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार हे होते. या समारंभात विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मय पुरस्कार प्रदान करण्यात आले. विदर्भ साहित्य संघातर्फे देण्यात येणारा कै. ग. त्र्यं. माडखोलकर स्मृती 'जीवनव्रती' हा सर्वोच्च पुरस्कार प्राचार्य राम शेवाळकर यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी विदर्भ साहित्य संघाच्या वाङ्मय पुरस्कारांपैकी पु. य. देशपांडे स्मृती कादंबरी पुरस्कार 'वारूळ' या कादंबरीसाठी बाबाराव मुसळे यांना, गो. रा. दोडके स्मृती ललित गद्य पुरस्कार 'गुलाबपाणी' या ललित ग्रंथासाठी डॉ. आशा सावदेकर यांना, शरदचंद्र मुक्तिबोध स्मृती काव्यपुरस्कार 'ब्रह्मसोपान' या काव्यसंग्रहासाठी रेषा आकोटकर यांना, कुसुमानिल स्मृती समीक्षा पुरस्कार 'भालचंद्र नेमाडे यांची समीक्षा' या ग्रंथाकरिता डॉ. किशोर सानप यांना, वा. कृ. चोरघडे स्मृती कथालेखन पुरस्कार 'किनखापी मोर' या कथासंग्रहासाठी सुप्रिया अय्यर यांना तर नवोदित साहित्य लेखन पुरस्कार 'इतिहास लेखनाच्या परंपरा' या ग्रंथासाठी डॉ. प्रभाकर गद्रे व 'महारुद्र' या ग्रंथासाठी जी. बी. देशमुख यांना देण्यात आला. याशिवाय व. कृ. वऱ्हाडपांडे स्मृती विशेष ग्रंथ पुरस्कार 'म. जोतीराव फुले पूर्वसूरी आणि प्रभावळ' या ग्रंथाकरिता प्रा. कृष्णा चौधरी यांना देण्यात आला. यावर्षीचा हरिकिसन अग्रवाल स्मृती पत्रकारिता पुरस्कार 'दैनिक हितवाद' या इंग्रजी दैनिकाचे संपादक विजय फणशीकर तर डॉ. शकुंतला खोत पुरस्कृत एकांकिका पुरस्कार 'तळघर' या एकांकिकेसाठी श्री. गजानन पांडे यांना, प्रसिद्ध पत्रकार

पां. बा. गाडगीळ स्मृती 'युगवाणी' तील सर्वोत्कृष्ट लेखासाठीचा पुरस्कार प्रा. देवानंद सोनटक्के यांना, 'शांताराम' कथा पुरस्कार 'कथाश्री' (दिवाळी, २००५) या अंकातील 'टपरी' या कथेसाठी लक्ष्मण लोंढे यांना देण्यात आला.

७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. मारुती चितमपल्ली यांचा याप्रसंगी विशेष सत्कार करण्यात आला.

१५ जानेवारी - विदर्भ साहित्य संघ व 'ग्रंथाली', मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या गेल्या तीन दशकातील निवडक कवितांचा संग्रह 'समायत' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ झाला.

विदर्भ साहित्य संघ व राजहंस प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'इस्रो' मधील निवृत्त शास्त्रज्ञ प्रकाश मुजुमदार यांच्या 'इस्रोतील माझे ते दिवस' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ झाला.

२५ जानेवारी - डॉ. आनंद पाटील यांचे 'विश्वसाहित्याचे बदलते स्वरूप' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले.

२५ जानेवारी - गणतंत्र दिनी विदर्भ साहित्य संघात मनोहर म्हैसाळकर यांचे हस्ते ध्वजवंदन झाले.

फेब्रुवारी २००६

१२ फेब्रुवारी - विदर्भ साहित्य संघ व अपूर्व पब्लिकेशन प्रा. लि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. गंगाधर मद्दीवार यांच्या 'स्वान्त सुखाय् !' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला.

राजहंस प्रकाशनाचे 'मंथन' व्यासपीठ आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'कायदे आझम जिना : एक आकलन' या विषयावरील महाचर्चेचे आयोजन करण्यात आले.

१८ फेब्रुवारी - मराठीचे प्रख्यात ज्येष्ठ कवी व समीक्षक विंदा करंदीकर ह्यांच्या निमित्ताने मराठीला लाभलेल्या तिसऱ्या भारतीय-ज्ञानपीठ सन्मान प्राप्त झाल्यावद्दल त्यांना अभिवादन करण्यासाठी 'अभिवादन विंदा....' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मार्च २००६

१ मार्च - विजय प्रकाशनने डॉ. राम शेवाळकर यांच्या गौरवार्थ प्रकाशित केलेल्या डॉ. रवींद्र शोभणे संपादित 'मराठी कविता परंपरा आणि दर्शन' या ग्रंथाचे प्रकाशन प्रा. महेश एलकुंचवार यांचे हस्ते सर्वोदय आश्रम सभागृहात करण्यात आले.

१२ मार्च - विदर्भ साहित्य संघ व मंगेश प्रकाशन, नागपूर यांनी संयुक्तपणे आयोजिलेल्या 'नाती गोती' या डॉ. श्रीकांत चोरघडे यांच्या लेखसंग्रहाचा प्रकाशन समारंभ प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते पार पडला.

२९ मार्च - मर्ढेकर स्मृतिदिनानिमित्त विदर्भ साहित्य संघाच्या भाऊजी दप्तरी संदर्भ वाचनालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमप्रसंगी डॉ. सुलभा हेर्लेकर व डॉ. सुनील रामटेके यांनी विचार व्यक्त केले.

२ एप्रिल २००६
विदर्भ साहित्य संघाची निवडणूक

२००६-२०११ या कार्यकाळासाठी विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्ष व कार्यकारी मंडळ सदस्यांच्या पदासाठी निवडणूक झाली. अध्यक्ष पदासाठी श्री. मनोहर म्हैसाळकर यांची अविरोध निवड झाली. तर कार्यकारी निवड सदस्यपदी पुढील सभासद निवडून आले. त्यांची नावे अशी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, वामन तेलंग, शोभा उवगडे, प्रकाश एदलाबादकर, डॉ. ईश्वर नंदपुरे, नरेश सबजीवाले, शुभदा फडणवीस, सीमा रोठे, जयंत मादुस्कर, द. सा. बोरकर, रमाकांत कोलते, नरेंद्र लांजेवार, प्रा. रमेश मुनघाटे, संयोगिता धनवटे, सुमती वानखेडे, मेघना वाहोकर,

निरंजन मार्कंडेयवार, यशवंत सरूरकर, डॉ. विलास चिंतामण देशपांडे, प्रा. सुभाष गढीकर, देवेंद्र गावंडे, प्रा. कृष्णा चौधरी.

प्रा. नारायण कुळकर्णी कवठेकर व प्रकाश दुबे या दोन सभासदांना अध्यक्षांनी कार्यकारी मंडळावर नियुक्त केले. या सभेत खालील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

उपाध्यक्ष १. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी,
२. वामन तेलंग,
३. डॉ. रमाकांत कोलते

सरचिटणीस शोभा उबगडे

चिटणीस १. डॉ. विलास चिंतामण देशपांडे (कार्यालय), २. नरेंद्र लांजेवार (शाखा समन्वय) ३. संयोगिता धनवटे (अर्थ)

कोषाध्यक्ष नरेश सबजीवाले

संपादक, युगवाणी नारायण कुळकर्णी कवठेकर

संचालक, सांस्कृतिक संकुल / वास्तू : प्रकाश एदलाबादकर

संचालक, परीक्षा समिती : शुभदा फडणवीस

संचालक, ग्रंथालय डॉ. ई. तु. नंदपुरे

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ प्रतिनिधी :
वामन तेलंग / नरेश सबजीवाले

८ एप्रिल - विदर्भ साहित्य संघ आणि सुयोग प्रकाशन, पुणे यांच्या विद्यमाने उर्मिला देशपांडे यांची कादंबरी 'क्षण एक पुरे प्रेमाचा' आणि 'नातं' या कथासंग्रहाचे प्रकाशन सर्वोदय आश्रम सभागृहात झाला.

१३ एप्रिल - सुप्रसिद्ध बंगाली लेखक श्री. सुनील गंगोपाध्याय यांचा सत्कार वि. सा. संघातर्फे करण्यात आला.

२१ एप्रिल - विदर्भ साहित्य संघ व विद्या विकास पब्लिशर्स ह्यांच्या संयुक्त विद्यमाने स्वाती धर्माधिकारी ह्यांच्या 'उमलताना' या लेख संग्रहाचा प्रकाशन समारंभ झाला.

३० एप्रिल - श्री. प्रमोद वाळके यांच्या 'स्पंदन निळ्या नभाचे' आणि 'हे गाव कुणाचे आहे' (दुसरी आवृत्ती) या दोन काव्यसंग्रहांचे प्रकाशन विदर्भ साहित्य संघ व वाङ्मय सेवा प्रकाशन 'नासिक रोड' यांच्या संयुक्त विद्यमाने झाले.

मे २००६

१ मे - विदर्भ साहित्य संघाच्या रंगमंदिराचे शिल्पकार कै. गणेश शिवराज उपाख्य नाना जोग यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून त्याच्या पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले. अन्य भाषा विभागातर्फे 'मराठी भाषिकांना अन्य भाषिकांकडून अपेक्षा' या विषयावर विविध भाषिक वक्त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

८ मे - विदर्भ साहित्य संघ व परिवर्तन साहित्य महामंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरक्षणात महिलांचे स्थान' या विषयांवर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

जून २००६

१९ जून - विदर्भ साहित्य संघ, नागपूर आणि राजहंस प्रकाशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने वैशाली परांजपे लिखित 'एक आणि दोन आणि.....' या कथासंग्रहाचे प्रकाशन झाले.

परीक्षा समिती

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही इ. ५ वी ते साहित्य पारंगत (एम. ए. समकक्ष) पर्यंतच्या परीक्षा घेण्यात आल्या.

विदर्भात या परीक्षांची एकूण १५७ केंद्रे आहेत.


विद्यालय व महाविद्यालय या स्तरावरील विविध परीक्षात एकूण १८८५६ विद्यार्थी सहभागी झाले होते.

■ ■ ■



चंद्रपूर जिल्ह्यातील मार्कंडा देवस्थान येथील एक शिल्प

अनुक्रमणिका


An ISO 9001 : 2000 Company
20 YEARS OF CARE
Trust, Reliability & Quality. The Hallmarks of a Shewalkar Property.
Shewalkars. The name that has generated an aura of abject trust and faith around itself. Shining bright in the halo of recognition by its customers - 2822 happy families & 686 commercial space owners, and over a dozen dignified corporates, who occupy real estate developed with absolute care & devotion. And a mission- To give nothing but the best.
An ISO 9001 : 2000 Company.
shewalkar developers limited
Laxmi Bhavan Square, W.H.C. Road, Dharampeth, Nagpur-440 010.
Tel. : 2543807, 2543785, 2531777. Fax : +91-712-2538129.
e-mail : shewalkr_ngp@sancharnet.in

अनुक्रमणिका